भगवान श्रीसद्गुरू श्रीज्ञानेश्वरमहाराज

यांचे हरिपाठावरील



श्रीदासराममहाराज कथित

# ॥ हरिपाठ संकीर्तन ॥


संपादक

अनिलप्रभू रामराय केळकर

प्रकाशक

अनिरुद्ध अनिलप्रभू केळकर

|| श्रीगुरुलिंगजंगम प्रसन्न ||

*श्रीदासराम ग्रंथमाला : पुष्प ४*

भगवान श्रीसद्गुरू श्रीज्ञानेश्वरमहाराज
यांचे हरिपाठावरील

श्रीदासराममहाराज कथित

# || हरिपाठ संकीर्तन ||

❖ संपादक ❖

*अनिलप्रभू रामराय केळकर*

❖ प्रकाशक ❖

*अनिरुद्ध अनिलप्रभू केळकर*

आवृत्ती पहिली सांगली इ. स. २००७

❖ प्रकाशक ❖

अनिरुद्ध अनिलप्रभू केळकर

घर क्र. ८२७, श्रीराम निकेतन,

श्रीबापूरावजी केळकर वाडा,

गांवभाग, सांगली - ४१६ ४१६.

दूरभाष - (०२३३) २३३२४६३

❖ सर्व हक्क प्रकाशकाधीन ❖

❖ अक्षर जुळणी व मुद्रण ❖

गजेंद्र प्रिंटींग प्रेस,

७०५, पेठभाग, गुजर बोळ,

सांगली - ४१६ ४१६

दूरभाष - (०२३३) २३७४३१९

❖ प्रसादमूल्य : रु. ६०/- ❖

# अनुक्रमणिका

संपादकीय ........................................१
प्रकाशकाचे मनोगत ........................................५
माझे मनीचे ........................................७
हरिपाठ गौरव ........................................९
प्रारंभिक ........................................११

श्रीदासराममहाराज कथित

## ।। हरिपाठ संकीर्तन ।।

अभंग १........................................१
अभंग २........................................१०
अभंग ३........................................१५
अभंग ४........................................२१
अभंग ५........................................२५
अभंग ६........................................३०
अभंग ७........................................३४
अभंग ८........................................३८
अभंग ९........................................४४
अभंग १०........................................४९
अभंग ११........................................५३
अभंग १२........................................५७
अभंग १३........................................६१
अभंग १४........................................६५
अभंग १५........................................७१
अभंग १६........................................७५
अभंग १७........................................७८
अभंग १८........................................८३
अभंग १९........................................८८
अभंग २०........................................९२

अभंग २१........................................................................१००
अभंग २२........................................................................१०४
अभंग २३........................................................................१०९
अभंग २४........................................................................११४
अभंग २५........................................................................११९
अभंग २६........................................................................१२३
अभंग २७........................................................................१२६
अभंग २८........................................................................१३१

## परिशिष्ट - १

श्रीदासराममहाराज कृत भावार्थ हरिपाठ...............................१३४

## परिशिष्ट - २

श्रीदासराममहाराज कृत सुश्लोक भावार्थ हरिपाठ.........................१४१

## परिशिष्ट - ३

श्रीदासराममहाराज विरचित (श्रीज्ञानेश्वरमहाराज कृत) हरिपाठाच्या आरत्या.१४४
श्रीदासराममहाराज विरचित श्रीज्ञानेश्वरीच्या आरत्या...........................१४५
श्रीदासराममहाराज विरचित श्रीज्ञानेश्वरमहाराजांची आरती....................१४६
श्रीदासराममहाराजांची आरती.............................................................१४६

# संपादकीय .....

माझे पितृदेव ती. प. पू. दादांची हरिपाठावरील कीर्तने म्हणजे एक पर्वणीच असायची हो ! त्यांची सगळीच कीर्तने तशी असायची. पण श्रावण महिन्यातील हरिपाठावरची कीर्तने, चैत्र महिन्यातील रामपाठावर होणारी कीर्तने, नवरात्रातील कीर्तने, तुकारामबीजेची कीर्तने, ज्ञानेश्वरमहाराजांचा समाधिसोहळा, गुरुतृतीया पर्वकाळ या प्रसंगांतील कीर्तने ही अधिक उठून दिसायची. त्यावेळी ते देहावर असायचेच नाहीत. व देहावर राहून अशी कीर्तने होणारच नाहीत हेच खरे.

त्यांनी ३९ वर्षे हा हरिपाठ वेगवेगळ्या प्रकारांनी सांगितला. त्यांच्या कीर्तनाला शिळेपणा कधी आलाच नाही. त्यांचे कीर्तन अनुदिन अभिनव असायचे. विषय तोच "नारायण हरी"; पण निरनिराळ्या दृष्टिकोनांतून पाहिला जायचा. श्रावण महिन्यात आमचे श्रवण धन्य होऊन जायचे. "श्रावणाचा मास धन्य श्रवणास" ही आमचे मामांची अमृतवाणी आमचे बाबतीत खरी ठरायची. हरिपाठाची अनुभूती कशी घेता येते हे सांगणारे आमच्या ती. प. पू. दादांचे विवेचन असायचे. "हरीकडे पाठ करून हरिपाठ केला तर अनुभूती कशी येणार? पण तेच नित्य सत्य मित असा जो हरी आहे तो जाणून त्याचा पाठ जर घडला, तर अनुभूती निश्चित आहे," असे ते ठासून सांगत. त्यांनी स्वतः याची प्रचीती घेतलेली असल्याने, त्यांचे सांगणे श्रोत्यांच्या अंत:करणाला भिडायचे.

म्हणून हे "हरिपाठ संकीर्तन" ती. प. पू. दादांचे सिद्धहस्त लेखणीतून उतरले गेले असते, तर ते अभूतपूर्वच झाले असते. त्यांनी लिहिलेले "श्रीरामपाठामृत" पाहिले असता, त्यांनी "हरिपाठ संकीर्तन" कसे लिहिले असते याची कल्पना येईल. पण तसा योग नव्हता.

आमचे प. पू. दादांचेवर निष्ठा असणारे परमप्रिय व्ही. के. कुलकर्णी यांचे मनात हे "हरिपाठ संकीर्तन" (ती. प. पू. दादांची हरिपाठावरील कीर्तने) प्रसिद्ध व्हावे अशी तळमळ होती. ते मला म्हणाले, " तुम्ही पण ती. प. पू. दादांची कीर्तने ऐकली आहेत, तुम्ही ती लिहिण्याचा प्रयत्न करा." मी ही गोष्ट माझे ज्येष्ठ बंधू ती. प. पू. अण्णांचे कानावर घातली. ते मला म्हणाले, "प्रयत्न कर; सारे काही महाराजांचे कृपेने व्यवस्थित होईल."

ती. प. पू. दादांनी ३९ वर्षे हरिपाठ सांगितला. त्यांचे हे प्रदीर्घ सागरासारखे सांगणे, त्यांचे हे अफाट पाठांतर. पाठांतर हा शब्द त्यांचे बाबतीत चुकीचा आहे. हे सारे पुस्तकाचे मयदित कसे आणणार, हा माझे समोर मोठा प्रश्नच होता.

माझी सर्व नोकरी सांगलीतच झाल्याने बराचसा काळ ती. प. पू. दादांचे सहवासातच गेला. त्यामुळे ती. प. पू. दादांची कीर्तने ऐकण्याचे भाग्य मला लाभले हेच माझे मोठे भाग्य आहे.त्यांची विषय मांडण्याची पद्धत, बोलण्याची ढब, सारे काही अलौकिक होते. म्हणून हे "हरिपाठ संकीर्तन" हे ती. प. पू. दादांचे भाषेतच व्हावे असे मला वाटले व तसा प्रयत्न करावयाचे ठरविले. त्यासाठी श्रीदादा जसा हरिपाठ म्हणत तोच येथे वापरला आहे.

प्रतिवर्षी श्रावण महिन्यात हरिपाठातील रोज एक अभंग कीर्तनात विवेचनार्थ घेतला जाई. पण तास-दीड तासाचे कीर्तनात संपूर्ण अभंगावर विवेचन करणे हे ती. प. पू. दादांना शक्य होत नसे. एका तासात एखाद्या शब्दावर अथवा चरणावर विवेचन व्हावयाचे व बाकीच्या अभंगावर विवेचन करणेस वेळ अपुरा पडायचा. पण हे राहिलेले विषय मागे कुठल्यातरी वर्षी त्यांचे हरिपाठावरील कीर्तनात सविस्तरपणे पाहिलेले असायचे. म्हणून "हरिपाठ संकीर्तन" हे लिहिताना या सर्व कीर्तनांचा एकत्रितपणे विचार करणे आवश्यक होते.

आता हे "हरिपाठ संकीर्तन" ती. प. पू. दादांची हरिपाठावरील सर्व कीर्तने विचारात घेऊन त्यांचे कीर्तनातील भाषेत लिहायचे हे काम माझेसाठी फारच अवघड होते. पण "सत्य संकल्पाचा दाता नारायण । सर्व करी पूर्ण मनोरथ." आपले मनोरथ पूर्ण करण्यास भ. स. निंबरगीकरमहाराज समर्थ आहेत हे सांगणारी ही तुकोक्ती मला आधार देऊन गेली.

भ. स. निंबरगीकर महाराज, भ. स. तात्यासाहेब महाराज, भ. स. मामामहाराज, भ. स. दादामहाराज यांचेसमोर नतमस्तक होऊन प्रार्थना करून लेखनास प्रारंभ केला. पण भराभर आठवायला नको का हो ! पण महाराजांना आमची सर्व काळजी आहे. "नाठविता स्वये द्यावी आठवण। हीच आहे खूण सद्गुरूंची॥" असे आमचे महाराज आहेत. आमचे मामांचे पारमार्थिक शाळेचे एक वैशिष्ट्य असे आहे की येथे एकदा शिकवले की झाले असे म्हणणारे शिक्षक नव्हते.

आजही नाही आहेत. येथे रोज हरिनामाची उजळणी चालते. भगवान श्रीसद्‌गुरू तात्यासाहेबमहाराज कोटणीस यांनी शिकवलेल्या हरिनामाची उजळणी आमचे प. पू. मामांनी अत्यंत निष्ठेने ३८ वर्षे व त्यानंतर आमचे ती. प. पू. दादांनी ३९ वर्षे कीर्तनसेवा हीच खूणगाठ बांधून केली व त्यांचेनंतर माझे ज्येष्ठ व श्रेष्ठ बंधू ती. प. पू. अण्णा तितक्याच निष्ठेने, आदराने त्यांनी शिकवल्याप्रमाणे, नित्यश: हीच हरिनामाची उजळणी करत आहेत; आमचेकडून करून घेत आहेत. या प्रदीर्घ हरिनामाचे उजळणीचा हे "हरिपाठ संकीर्तन" साकार करणेचे कामी फार मोठा उपयोग झाला.

त्याचप्रमाणे परमप्रिय श्री. व्ही. के. कुलकर्णी यांनी अपार कष्ट घेऊन साधारणत: १९८५ सालापासून आमचे ती. प. पू. दादांची होणारी नित्यकीर्तने संक्षिप्त स्वरूपात लिहून घेतली आहेत. हे आम्हा कीर्तनप्रेमी लोकांचेवर त्यांनी केलेले मोठे ऋण आहे. निष्ठेशिवाय या गोष्टी होणार नाहीत. आमचे ती. प. पू. दादांचेही प्रेम त्यांचेवर तसेच होते. त्यांच्या या टिपणांचा उपयोग हे "हरिपाठ संकीर्तन" लिहिणेचे कामी झाला आहे.

मी वेळोवेळी हे लिखाण ती. प. पू. अण्णांना दाखवत असे. ती अण्णांनी केलेल्या सूचनांप्रमाणे लिखाणात फेरफार करून घेत असे. "हरिपाठ संकीर्तन" पूर्ण झाल्यावर ती. प. पू. अण्णांनी ते संपूर्ण वाचले व "फारच छान झाले आहे बाबा" असे म्हणून पाठीवर कौतुकाने शाबासकी दिली.

हे "हरिपाठ संकीर्तन" माझेकडून लिहिले गेले. त्यातील विषय ती. प. पू. दादांचा वाटतो का नाही ? का त्यात काही लिहिण्याच्या ओघात चुका झाल्या आहेत हे जाणून घेण्यासाठी मी हे ती. प. पू. केशवकाकांना दाखविले. आमचे ती. प. पू. केशवकाका हे आमचे ती. प. पू. दादांचेकडे त्यांचे बालपणापासून येत आहेत. आमचे ती. प. पू. दादांचेवर त्यांची अतीव निष्ठा आहे. ते स्वत: संतवाङ्मयाचे, संस्कृतचे गाढे अभ्यासक आहेत. त्यांची आमचे ती. प. पू. दादांचेबरोबर वारंवार पारमार्थिक चर्चा होई. या पारमार्थिक चर्चेतूनच "परमार्थ प्रश्नोत्तरी" हा अनमोल ग्रंथ साकार झाला आहे. त्यांचे मनात आमचे ती. प. पू. दादांचे "वाराची देव आमुचा" हे तत्त्वज्ञान जे अंतर्बाह्य खरे आहे ते सर्वांपर्यंत पोचावे अशी तळमळ आहे. ते स्वत: याकरिता प्रयत्नशील आहेत. आमचे ती. प. पू. केशवकाकांनी केलेल्या सूचनांचा हा

ग्रंथ साकार करणेचे कामी फार उपयोग झाला आहे. त्यांनीही हे पुस्तक पाहून समाधान व्यक्त केले व माझे प्रयत्नांचे कौतुकच केले.

हे ''हरिपाठ संकीर्तन'' मी बंधुवर्य श्री. श्रीधर सहस्रबुद्धे, श्री. न. ना. गोखले, श्री. कृष्णा रा. शिंगाडे, श्री. मधुकर वि. काटकर, श्री. दिलीप कुलकर्णी यांना दाखविले. या सर्वांनी माझे प्रयत्नांचे कौतुक केले.

या पुस्तकात व्यक्त झालेले विचार ती. प. पू. दादांचे आहेत. फक्त शब्दरचना माझेकडून झाली आहे. या पुस्तकात जे काही चांगले आहे, तुमचे अंत:करणाला भिडणारे आहे ते सारे ती. प. पू. दादांचे आहे, जे काही चुकीचे झाले असेल ते सर्वस्वी माझे आहे.

''हरिपाठ संकीर्तन'' या पुस्तकाचे प्रकाशन करून चि. अनिरुद्ध याचे हातून महाराजांची मोठी सेवा झाली आहे असे मला वाटते. महाराज कुणाचे हातून कशी सेवा करवून घेतील हे काही सांगता येत नाही. अशीच सेवा महाराजांनी आमचे हातून करवून घ्यावी अशी प्रार्थना मी भ. स. निंबरगीकरमहाराज, भ. स. तात्यासाहेबमहाराज, भ. स. मामामहाराज व आमचे भ. स. दादामहाराज यांचे पवित्र चरणी करतो व त्यांचेच कृपेने पूर्ण झालेले त्यांचेच ''हरिपाठ संकीर्तन'', जशी कृष्णाबाईची पूजा, कृष्णाबाईचे पाणी घेऊनच करतात त्याप्रमाणे, माझे पितृदेव ती. प. पू. दादा व माझी आई ती. प. पू. सौ. सीतावहिनी यांचे पवित्र चरणी अर्पण करतो.

*अनिलप्रभू रामराय केळकर*

सांगली
पौष शुद्ध ९ श्रीगुरुलिंगगीता जयंती
२८.१२.२००६

# प्रकाशकाचे मनोगत.....

" श्रीदासराममहाराज-कथित हरिपाठ संकीर्तन" हे पुस्तक प्रकाशित करण्याचे भाग्य मला लाभले, याचा मला फार मोठा आनंद आहे. हा योग जर माझे आजोबा ती. प. पू. दासराममहाराज शरीराने विद्यमान असताना आला असता, तर त्यांना व मला दोघांनाही याहीपेक्षा जास्त आनंद झाला असता.

माझे घरात, वंशात नित्यकीर्तनाची परंपरा आहे. माझे पणजोबा ती. प. पू. मामामहाराज केळकर यांनी ३८ वर्षे, माझे आजोबा ती. प. पू. दासराममहाराज केळकर यांनी ३९ वर्षे ही परंपरा अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत सांभाळली. तीच परंपरा माझे ज्येष्ठ व श्रेष्ठ काका ती. प. पू. अण्णा चढत्या वाढत्या श्रेणीत सांभाळीत आहेत. आम्हां केळकरांना या परंपरेचा अभिमान आहे.

श्रीदासराममहाराज हे प्रतिवर्षी श्रावण महिन्यात होणाऱ्या नित्यकीर्तनात, विवेचनार्थ श्रीज्ञानेश्वरमहाराजांचा हरिपाठ घेत. त्यांची कीर्तने म्हणजे नि:शब्द परमात्म्याचा शब्दबद्ध केलेला अनुभव असे. त्यांनी सांगितलेले हरिपाठ-विवेचन हे आपल्या जीवनाशी, श्वसनाशी निगडित असे. त्यांनी कथन केल्याप्रमाणे, हरिपाठाचा अर्थ जर आम्हाला समजला, तर जीवनाचा अर्थ आम्हाला समजला, असे होणार आहे.

माझे वडील ती. अनिलप्रभू रामराय केळकर यांनी ती. प. पू. आजोबांची कीर्तने त्यांच्याच भाषेत शब्दबद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. याकरिता त्यांना ती. प. पू. अण्णा व ती. प. पू. केशवकाका यांचे समर्थ मार्गदर्शन लाभले आहे. या पुस्तकाचे प्रकाशनाने, वाचकांना - ज्यांनी ही ती. प. पू. आजोबांची कीर्तने ऐकली नाहीत त्यांना - ही कीर्तने ऐकल्याचे समाधान व ज्यांनी ही कीर्तने ऐकली आहेत त्यांना काही अंशी पुन:प्रत्ययाचा आनंद प्राप्त होणार आहे, असे मला वाटते. याशिवाय या पुस्तकात हरिपाठाचा भावार्थ प्रगट करणारे ती. प. पू. दासराममहाराजांनी रचलेले अभंग व भावार्थ सुश्लोक हरिपाठ यांचा समावेश केलेला आहे. याचाही लाभ हरिपाठप्रेमींना निश्चित होणार आहे.

हे पुस्तक साकार करणेचे कामी माझे आजोबांचेवर निष्ठा असणारे

श्री. म. वि. गाडगीळ व श्री. श्री. वि. सहस्रबुद्धे यांचे सहकार्य लाभले आहे. मी त्यांचा कृतज्ञ आहे. हे पुस्तक निर्दोष, आकर्षक स्वरूपात प्रसिद्ध व्हावे म्हणून बंधुवर्य श्री. नारायण के. आपटे व श्री. मधुकर काटकर यांनी अपार कष्ट घेतले आहेत. मी त्यांचा मन:पूर्वक आभारी आहे. या पुस्तकाचे मुद्रण आपले घरचे काम समजून अत्यंत सुबकपणे करण्याचे काम श्री. सतीश लोखंडे यांनी केले आहे. मी त्यांचा आभारी आहे.

हरिपाठ हा लिहायचा, बोलायचा किंवा वाचायचा नसून तो अनुभवावयाचा विषय आहे. तो अनुभव आम्हा सर्वांना प्राप्त व्हावा, अशी प्रार्थना भ. स. निंबरगीकरमहाराज, भ. स. तात्यासाहेबमहाराज, भ. स. मामामहाराज, भ. स. दासराममहाराज यांचे पवित्र चरणी करतो व हे चार शब्द माझे आजोबा ती. प. पू. रामराय गोविंद केळकर व माझी आजी ती. प. पू. सौ. सीतावहिनी रामराय केळकर यांचे चरणी अर्पण करतो.

*अनिरुद्ध अनिलप्रभू केळकर*

सांगली

पौष शुद्ध ९ श्रीगुरुलिंगगीता जयंती

२८.१२.२००६

पितृदेव ती.प.पू. रामराय गोविंद केळकर व
मातोश्री ती.प.पू. सौ. सीतावहिनी रामराय केळकर



हरीपाठ हा जीवन ज्यासी झाला। हरीपाठी जो साच अखंड ठेला।
हरीपाठ कीर्ती जयाचे मुखी या। हरीपाठ अर्पू सीता रामराया॥

- अनिलप्रभू

# माझे मनीचे....✍

भगवान श्रीसद्गुरू श्रीज्ञानेश्वरमहाराज यांचा हरिपाठ म्हणजे ती सोळा आणि बारा यांची मिळणी आहे, सारासार विचार म्हणजेच तो हरिपाठ आहे जो नित्य आहे, सत्य आहे, नियमात बसविलेला आहे असे सांगणारी, माझे पितृदेव ती. प. पू. श्रीदासराममहाराज केळकर यांची प्रति श्रावण मासातील कीर्तने ही एक अलौकिक पर्वणी होती. त्याच्या पुनःप्रत्ययाचा आनंद प्राप्त करून देत आहेत माझे बंधुवर्य व गुरुबंधू श्री. अनिलप्रभू केळकर जे श्रीदादांचे शेंडेफळ, आणि शेंडेफळावर वडिलांचे अधिक प्रेम असते असे म्हणतात, याचाही अनुभव आम्ही घेतलेला आहे.

हे हरिपाठ संकीर्तन म्हणजे श्री. अनिलप्रभू केळकर यांना श्रीदादांनी आतून जे स्फरविले, त्याप्रमाणे त्यांनी या श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या हरिपाठातील अभंगांचे श्रीदादांचे विवरण श्रीदादांच्या भाषेतच लिहिले आहे. अलौकिक घटना आहे एवढी गोष्ट खरी.

या पुस्तकाचे संदर्भात आमच्या ती. प. पू. श्रीदादांचे अंतरंगातील प्रा.डॉ. के. वा. आपटे तथा आमचे श्री. केशवकाका यांनी अपार कष्ट घेतले आहेत. श्रीदादांचे शिवाय दुसरा विषय त्यांचे ठिकाणी असत नाही, हे खरे विशेष आहे.

श्री. अनिलप्रभू यांनी हे श्रीहरिपाठावरील श्रीदादांचे विवरण - "हरिपाठ संकीर्तन" आम्हा सर्वांना उपलब्ध करून दिल्यामुळे त्याचा फार मोठा लाभ सर्वांनाच होणार आहे. श्री. प्रभूजींना धन्यवाद द्यावेत तेवढे थोडे आहेत.

अशी ही सोळा आणि बाराची मिळणी किंवा असा हा सारासार विचार माझे ठिकाणी निर्माण व्हावा, अशी शतशः प्रार्थना माझे पितृदेव ती. प. पू. श्रीदादामहाराज केळकर यांचे चरणी करीत आहे.

भगवान श्रीसद्गुरू श्रीनिंबरगीकरमहाराज, भगवान श्रीसद्गुरू श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस व माझे आजोबा ती. प. पू. मामामहाराज केळकर यांचे चरणी शतशः दंडवत घालीत आहे.

"ज्ञानेश्वर माऊलींची कृपा संपादिली। आशीर्वाद योगे रामसीता ही पावली" हे

जे ह.भ.प. आप्पाराव पोवार यांनी म्हटले आहे आणि जे माऊलींच्या कृपेनेच हे घडले आहे, त्या भगवान श्रीसद्गुरू श्रीज्ञानेश्वरमहाराज यांचे चरणी शतशः लोटांगण घालून येथेच थांबतो.

**॥ पुंडलीक वरदा हरि विठ्ठल श्रीज्ञानदेव तुकाराम ॥**

**॥ राजाधिराज श्रीसद्गुरुनाथ महाराज की जय ॥**

श्रीदादांचा कृपाभिलाषी,
*चंद्रशेखर*
**( चंद्रशेखर रामराय केळकर)**

सांगली.
श्रीब्रह्मचैतन्यमहाराज पुण्यतिथी
दिनांक : १५/१२/२००६

# हरिपाठ गौरव.....

*वैकुंठाची शिडी ऐसा हरिपाठ । अभंग ते स्पष्ट अट्ठावीस ॥१॥*
*सोळा आणि बारा मिळूनी अट्ठावीस । अभंग सुरस हरिपाठी ॥२॥*
*जाणिती हे वर्म साधुसंतजन । प्रचीत घेऊन सुखावले ॥३॥*
*आळशी मंदमति तरेचिना येथे । सांगती भक्ताते ज्ञानेश्वर ॥४॥*
*काय हा अभंग पहावा शोधून । तरी समाधान दासरामी ॥५॥*

अशा शब्दांत ती. प. पू. श्रीदादांनी हरिपाठमाहात्म्य सांगितले आहे. श्रीदादांचा जन्मच हा मुळी श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी ती. प. पू. श्रीमामांना प्रपंच साधून परमार्थ कर, या आशीर्वादपर आज्ञेचे फलद्रूप आहे. आणि या पार्श्वभूमीवरच श्रीदादांचे उभे आयुष्य गेले. तो सारा इतिहास 'श्रीदासराम चरितामृत' या पुस्तकांत डॉ. के. वा. आपटे यांनी नोंदविला आहे.

हरिपाठाचे वर्म जाणून सुखावलेल्या श्रीदादांनी प्रत्येक श्रावण महिन्यात हरिपाठ समजावून सांगणारी कीर्तने केली. हरिपाठ नित्यनेमाने म्हणणारे अनेक भाविक होते आणि आहेत. लो. टिळकांच्या सुटकेसाठी प्रतिदिन हरिपाठ म्हणणाऱ्या बाई (पातंजल योगशास्त्रावरील उत्तम विवेचन करणारे डॉ. कृ. के. कोल्हटकर यांच्या मातोश्री) मरणासन्न अवस्थेत असतानाही केवळ हरिपाठाचे स्मरण दिल्यावर उठून बसल्या व पुढेही काही काळ त्या होत्या; एक प्रकारे त्यांचा तो पुनर्जन्मच होता. अशा समर्थ असलेल्या हरिपाठावरील श्रीदादांची कीर्तने पुस्तकरूपाने प्रकाशित व्हावीत अशी अनेकांप्रमाणे माझीही इच्छा. ती इच्छा मी बोलून दाखविली तेव्हा श्रीदादांनी १९८३ मध्ये पत्र लिहून 'हरिपाठावरील कीर्तने प्रकाशित होतील तेव्हा तुम्ही चार शब्द लिहा,' अशी एकप्रकारे आज्ञा केली. ते आज्ञापालन आज तेवीस वर्षांनी होत आहे. माझे बंधुवर्य, श्रीदादांचे कनिष्ठ चिरंजीव श्री. अनिलप्रभू यांनी श्रीदादांच्या हरिपाठावरील कीर्तने अशी सादर केली आहेत की श्रीदादांची कीर्तने पुनः ऐकत असल्याचे समाधान लाभावे. अर्थात या पुस्तकाच्या सिद्धतेसाठी श्रीदादांचे अंतरंगाचे अधिकारी चिरंजीव श्री. चंद्रशेखरअण्णा यांचे मार्गदर्शन लाभले. डॉ. के. वा. आपटे यांनीही आवश्यक त्या सूचना केल्या, संदर्भ दिले आहेत.

या पुस्तकाने श्रीज्ञानेश्वरमहाराज-संबंधित मराठी वाङ्मयात फार मोलाची

भर पडत आहे. आणि त्या योगे साधकांना श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे एक आगळे वेगळे दर्शन घडेल, चिंतनाला नवी दिशा लाभेल असा विश्वास वाटतो. पुन:एकवार श्रीज्ञानेश्वरमहाराज, श्रीमामा व श्रीदादांचे चरणांवर मस्तक ठेवून लेखणीस विराम देतो.

सांगली.

*शिरूभाऊ*
(श्री. वि. सहस्रबुद्धे)

**भ. स. श्रीतात्यासाहेबमहाराज जयंती**
कार्तिक शु॥ ८, १९२८
३० ऑक्टोबर २००६

# प्रारंभिक.....

श्रीदासराममहाराजांचे म्हणजेच श्रीदादांचे पितृदेव श्रीमामामहाराज केळकर हे प्रथमपासूनच ज्ञानेश्वरमहाराजांचे भक्त होते. ज्ञानेश्वरमहाराजांच्या आज्ञेनुसार त्यांनी विवाह केला आणि प्रपंचात राहूनच परमार्थ पूर्ण केला. श्रीदादांच्या पित्याची ही ज्ञानेश्वर-भक्ती श्रीदादांच्या ठिकाणी उतरली असेल तर त्यात नवल वाटण्याचे कारण नाही. आणि त्यामुळेच ज्ञानेश्वरमहाराजांविषयीच्या अत्यंत आदरापोटी श्रीदादांनी ज्ञानेश्वरमहाराजांच्या अभंगांवर आणि अन्य लहान मोठ्या ग्रंथांवर लेखन केले. त्यातील काही त्यांनी इतरांच्या सूचनेनुसार केले तर काही स्वयंस्फूर्तीने केले. श्रीज्ञानदेव तेहत्तिशी या ज्ञानेश्वरमहाराजांच्या ग्रंथावर त्यांनी पांडुरंगमहाराज ताम्हनकर यांच्या सूचनेने सानंद टीका लिहिली आणि ती प्रकाशितही झाली. प्रा. डॉ. के. वा. आपटे यांच्या विनंतीनुसार त्यांनी ज्ञानेश्वरांच्या मुद्राक्रमग्रंथावर टीका रचली आणि ती मुद्राप्रकाश या शीर्षकाखाली प्रकाशित झाली. याखेरीज ज्ञानेश्वरमहाराजांचा दत्तावरचा एक अभंग, 'प्रणव' नावाचा प्रदीर्घ अभंग, चांगदेवपासष्टी आणि अमृतानुभव ग्रंथांचे प्रारंभीचे संस्कृत श्लोक, ज्ञानदेव आज्ञापत्र, ज्ञानदेव सनद, नमनस्तोत्र यांवरही लेखन केले आणि तेही प्रकाशित झाले. अमृतानुभव, उत्तरगीता यांवरचे श्रीदादांचे लेखन अप्रकाशित आहे.

ज्ञानेश्वरमहाराजांचा "हरिपाठ" हा लघुग्रंथ फारच लोकप्रिय झाला. त्या हरिपाठाचे धर्तीवर अन्य काही संतांनी आपले हरिपाठ रचले. रामभक्तांनी "रामपाठ" रचले तर एका शिवभक्ताने "शिवपाठ" रचला. श्रीदादांनाही ज्ञानेश्वरमहाराजांचा हरिपाठ प्रिय होता. परिणामतः त्यांनी आपले स्वतःचे असे दोन हरिपाठ लिहिले ते 'दासरामगाथा' या ग्रंथात मुद्रित झालेले आहेत. ज्ञानेश्वरमहाराजांच्या हरिपाठाचा भावार्थ सांगणारा भावार्थ हरिपाठ श्रीदादांना स्फुरला; तोही 'दासरामगाथा' या ग्रंथात प्रकाशित झाला आहे. तसेच श्रीदादांनी हरिपाठाच्या प्रत्येक चरणाचा तात्पर्यार्थ एकेका गद्य वाक्यात लिहिला; तोही 'ज्ञानदेवतेहत्तिशी' या ग्रंथात प्रकाशित झाला. ज्ञानेश्वरमहाराजांच्या हरिपाठाची महती गाणाऱ्या तीन आरत्याही श्रीदादांना स्फुरल्या; त्या आरत्याही "आरतीसंग्रह" ग्रंथात प्रकाशित झाल्या. भावार्थ हरिपाठ लिहिला असूनही श्रीदादांनी "सुश्लोक हरिपाठ" लिहिला. असे दिसते की श्रीदादांना ज्ञानेश्वरमहाराजांच्या हरिपाठाचे विस्तृत विवेचन करावयाचे होते आणि तसे त्यांनी

करण्यास प्रारंभही केला होता आणि हरिपाठाच्या पहिल्या ५-६ अभंगांचे विस्तृत विवरण त्यांनी लिहिले होते. तथापि ते विवरण वेगळ्या स्वरुपाचे असल्याने त्याचा येथे समावेश झालेला नाही. पण कोणत्या तरी कारणाने ते पूर्ण होऊ शकले नाही. नंतरच्या काळात श्रीदादांनी इतरांच्या सूचनेनुसार 'श्रीरामपाठामृत' व 'नित्यपाठामृत' लिहिले; त्याप्रमाणे त्यानी जर 'हरिपाठामृत' लिहिले असते तर फारच उत्तम झाले असते. पण तसा योग जुळून आला नाही.

ज्ञानेश्वरमहारांच्या हरिपाठाचे संपूर्ण विस्तृत विवेचन जरी श्रीदादा लेखनबद्ध करू शकले नव्हते, तरी तोंडी हरिपाठाचे विवेचन करण्याचा योग त्यांना आला. त्याचे असे झाले :- इ.स.१९६२ मध्ये मामामहाराजांचे निर्वाण झाल्यानंतर, मामामहाराजांचे आज्ञेनेच दादांनी आपल्या पित्याची नित्य हरिकीर्तने करण्याची परंपरा पुढे चालू केली आणि ती इ. स. २००१ पर्यंत ३९ वर्षे अखंड चालविली. दरवर्षी श्रावण महिन्यात मामामहाराज ज्ञानेश्वरमहाराजांच्या हरिपाठावर कीर्तने करीत. तीच प्रथा श्रीदादांनीही चालू ठेवली. दरवर्षी हरिपाठावर दादांची अशी जी कीर्तने झाली त्यांचे संकलन प्रस्तुत ''हरिपाठ संकीर्तन' या ग्रंथात श्रीदादांचे कनिष्ठ चिरंजीव श्री. अनिलप्रभू यांनी केले आहे. महत्त्वाचे असे की ही कीर्तने वाचताना श्रीदादाच जणू आपल्यासमोर बोलत आहेत आणि आपण त्यांचे कीर्तन ऐकत आहोत असे वाटते.

श्रीदादा हे आत्मसाक्षात्कार झालेले श्रेष्ठ संत होते. स्वतःच्या अनुभवाच्या आधारावर त्यांना हरिपाठाचा जो अर्थ स्फुरला तो त्यांनी कीर्तनातून निवेदन केला. साहजिकच श्रीदादांनी केलेले हरिपाठाचे विवरण हे इतरांनी केलेल्या हरिपाठाच्या अन्य भाषांतरात्मक अथवा स्पष्टीकरणात्मक उपलब्ध ग्रंथांपेक्षा वेगळेपणाने खुलून आणि उठून दिसते. या म्हणण्याच्या पुष्ट्यर्थ दादांच्या विवरणातील काही वाक्ये येथे उद्धृत केली आहेत :- देव म्हणजे सच्चिदानंद आत्मा आहे आणि तो जेथून दिसतो ते देवाचे द्वार म्हणजे मानवी देहातील दशमद्वार आहे (अभंग १). रक्ताचे नियमन करणारे हृदय सर्वांना माहीत असते; दुसरे हृदय सद्गुरूकडून जाणून घ्यावे लागते. पहिल्या हृदयात प्राण - अपान (इडापिंगला) यांचे घर्षण - मंथन - होऊन दुसऱ्या हृदयात देवाचा म्हणजे आत्म्याचा साक्षात्कार होतो (अभंग २). हे सारे विश्व ज्याच्यामुळे दृश्य होत आहे ते सार आहे आणि जे दृश्य प्रगट आहे ते असार आहे (अभंग ३). भाव म्हणजे आपला अस्तित्व भाव; त्याला धरून नामाची साधना होणे

हे आवश्यक आहे (अभंग ४). जीवाला उन्मनी अवस्थेत देवाचे दर्शन होते हाच खरा दृष्टांत आहे (अभंग ५). जो कोणी आत्मतत्त्वाशी समरस होतो तो मोक्षरेखेला येतो (अभंग ६). पर्वत हा शब्द तृणवत्प्रमाणे आहे. परवत् म्हणजे परक्याप्रमाणे. आत्म्याशी आपली जी परक्याप्रमाणे वागणूक आहे तेच पाप आहे (अभंग ७). संतांची संगती म्हणजे आंतर खुणेने संतांनी जी जीवनाची समगती दाखवून दिली आहे तीच खरी संतसंगती आहे (अभंग ८). राम आणि कृष्ण या जीवनाच्या दोन गती आहेत; त्यांत मनाचा लय झाला की अद्वय परमात्म्याकडे जाण्याची वाट सापडते (अभंग ९). पाप करण्याची प्रवृत्ती नाम घेतल्याने नाहीशी होते, हेच नामाचे वैशिष्ट्य आहे (अभंग १०). नामाचा उच्चार - घोष - गगनात आहे (अभंग ११). रामकृष्णवाचा हा जीवाचा भाव आहे आणि या भावाच्या बळाने आत्मसाक्षात्कार होतो (अभंग १२). समबुद्धीने नाम घेतले असता साधक हा हरिसमानच होऊन जातो (अभंग १३). रामकृष्ण या जीवनाचे गतीत भगवंताचे नाम आहे (अभंग १४). परमात्मा हा वायुस्वरूप आहे (अभंग १५). रामकृष्णवाचा म्हणजे श्वसनाची चाललेली अखंड अशी सूक्ष्म हालचाल (अभंग १६). नित्य सत्य मित असे जे भगवंताचे नाम आणि परमात्म्याचे स्वरूप आहे तोच हरिपाठ (अभंग १७). शीर्षाकडे जाणाऱ्या मार्गाने गेले असता पुराण पुरुषाची प्राप्ती होते (अभंग १८). आत्मा शरीरात आहे म्हणून शरीराची आणि बाह्य दृश्याची जाणीव होते (अभंग १९). प्रत्येक जीवाचे ठिकाणी परमेश्वराचे सूत्र आहे; ते सूत्र हातात धरून परमेश्वर जीवरूपी बाहुल्या नाचवतोय (अभंग २०). नामाची जिव्हा म्हणजे जी जिव्हा फक्त नामच घेते, जी नामाचीच बनली आहे, ती नामजिव्हा (अभंग २१). ''नामी'' म्हणजे ''ना मी'' म्हणजे मी नाहीसा करणारा असा नामाचा नित्य नेम सांभाळणारा प्राणी दुर्लभ आहे (अभंग २२). एकतत्त्व नामाचे साधन साधले असता सर्वत्र चैतन्य अनुभवाला येते (अभंग २३). प्राणाच्या धक्क्यावर श्वसनक्रिया चालते (अभंग २४). शिवाचा हरिमंत्र म्हणजेच आधारचक्रापासून होणारे स्वधर्माचे आचरण आहे (अभंग २५). खरे नाम हे श्वास आणि उच्छ्वास यांच्या दरम्यान जो संधिकाळ आहे त्यात आहे (अभंग २६). सर्वसुख म्हणजे संसारातील सर्व सुखे नव्हेत; सर्व म्हणजे ब्रह्म. तेव्हा सर्वसुख म्हणजे ब्रह्मसुख असा अर्थ आहे (अभंग २७). नित्य असणाऱ्या हरिपाठाचे नित्य पठणाने परमार्थाचा योग्य तो अधिकार प्राप्त होतो (अभंग २८).

वर उल्लेखिल्याप्रमाणे येणारे अनेक विषय हे 'हरिपाठ संकीर्तन' या ग्रंथात आलेले आहेत. त्यामुळे हे हरिपाठ संकीर्तन हे साधक आणि मुमुक्षू यांना उपयोगी पडणार आहे यात शंका नाही. असे हे "हरिपाठ संकीर्तन" हे संकलित स्वरूपात एकत्रितपणे लिहून काढून श्री. अनिलप्रभू केळकर यांनी आणि ते प्रकाशित करून त्यांचे चिरंजीव अनिरुद्ध केळकर यांनी परमार्थप्रेमी पुरुषांवर उपकार केले आहेत. ते दोघेही अभिनंदनास पात्र आहेत.

*के. वा. आपटे*

॥ ॐ ॥



श्री ज्ञानेश्वर महाराज

कै.ती.प.पू.बापूरावजी ऊर्फ मामामहाराज केळकर यांनी स्वहस्ते
श्रीआळंदी क्षेत्री काढलेल्या चित्राची प्रतिकृती

# श्रीदासराममहाराज - कथित

## ।।'हरिपाठ संकीर्तन'।।

### (१)

**देवाचिये द्वारी उभा क्षणभरी । तेणे मुक्ती चारी साधियेल्या ॥१॥**
**हरि मुखे म्हणा हरिमुखे म्हणा । पुण्याची गणना कोण करी ॥२॥**
**असोनी संसारी जिव्हे वेगु करी । वेदशास्त्र उभारी बाह्या सदा ॥३॥**
**ज्ञानदेव म्हणे व्यासाचिया खुणा । द्वारकेचा राणा पांडवाघरी ॥४॥**

आज श्रावण महिना सुरू होतो आहे. श्रावण महिन्यात नागपंचमी, गोकुळ अष्टमी यांसारखे अनेक सण येत असलेने आपल्या आहारात तूप व गूळ यांचे प्रमाण खूपच वाढते. आमचे मामा[1] म्हणतात, *''श्रावण श्रावण । गुळातुपाचा रावण,''* ते या अर्थानेच. आमचे संप्रदायाचे[2] दृष्टीने मात्र या श्रावण महिन्याचे महत्त्व काही वेगळेच आहे. आमचे संप्रदायात श्रावण महिना हा ''साधन मास'' म्हणून ओळखला जातो. आमचे मामा म्हणतात, *''श्रावणाचा मास धन्य श्रवणास । काय पक्वान्नास केला देवे.''* आमचे मामांचे दृष्टीने श्रावण महिना हा देवाने गोडधोड खाण्यासाठी केला नसून तो अनुहात श्रवणासाठी केलेला आहे. चैत्र महिन्यात श्रीमामांचाच ''रामपाठ'' व श्रावण महिन्यात श्रीज्ञानेश्वमहाराजांचा हरिपाठ व उरलेले दहा महिन्यांत आमचे मामांनीच लिहिलेला ''नित्यपाठ'' हे कीर्तनांत विवेचनार्थ घेण्याची पद्धत आमचे मामांचे वेळेपासून आहे. त्यानुसार आजपासून ज्ञानेश्वरमहाराजांच्या हरिपाठाचे अभंग क्रमश: रोज एक याप्रमाणे कीर्तनातील निरूपणासाठी घेतले आहेत.

ज्ञानेश्वरमहाराजांनी प्रथमत: ज्ञानेश्वरी लिहिली व ती आपले परमआदरणीय सद्गुरू निवृत्तिनाथमहाराज यांना दाखविली. ती पाहून निवृत्तिनाथ उद्गारले, ''अहा रे कृष्णा !'' त्यांना असे म्हणायचे होते की या ज्ञानेश्वरी ग्रंथात तुझे काय आहे. जे भगवंतांनी सांगितले तेच फक्त अधिक ऊहापोह करून तू प्राकृत भाषेत सांगितलेस इतकेच. मग ज्ञानेश्वरमहाराजांनी स्वतंत्र असे अमृतानुभव आणि चांगदेवपासष्टी

---

१) येथे मामा म्हणजे दासराममहाराजांचे पिताजी होत. त्यांचे संपूर्ण नांव गोविंद अनंत केळकर. ते मामामहाराज केळकर या नावाने प्रसिद्ध होते. त्यांनी तात्यासाहेब कोटणीस-महाराजांच्या आज्ञेने अखंड ३८ वर्षे रोज संध्याकाळी हरिकीर्तन केले. (सं. टी.)

२) दासराममहाराजांचा ''चिमड संप्रदाय'' होता. (सं. टी.)

यांसारखे ग्रंथ - ज्यांत प्रामुख्याने तत्वज्ञानाचा भाग येतो - लिहिले. पण त्यांत त्यांना स्वत:ला आलेल्या अनुभवाचे वर्णन क्वचितच आढळते. म्हणून त्यांनी यौगिक प्रक्रियेला धरून ''श्रीज्ञानदेवतेहत्तिशी'' हा अलौकिक ग्रंथ लिहिला. व तो पाहून श्रीनिवृत्तिनाथमहाराजांचे समाधान झाले. त्यानंतर सर्वसामान्य माणसांना समजेल अशा सुलभ भाषेत गूढ अर्थ प्रगट करणारा ''हरिपाठ'' लिहिला. हरिपाठ म्हणजे श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे वाङ्मयातील शेंडेफळ आहे, शेवटचे अपत्य आहे. शेवटच्या अपत्यावर वडिलांचे अतिशय प्रेम असते. साहजिकच ज्ञानेश्वरमहाराजांना हरिपाठ प्रिय होता. आमचे चिमडचे महाराज हे श्रीलक्ष्मीबाई अक्का, तात्यासाहेबमहाराज कोटणीस, बाबासाहेब मुजुमदार इत्यादी शिष्यांसमवेत श्रीक्षेत्र आळंदी येथे ज्ञानेश्वरमहाराजांचे दर्शनास गेले असताना, त्या सर्वांना ज्ञानेश्वरमहाराजांचे संजीवन समाधीतून हरिपाठाचा पहिला चरण असा ऐकू आला- *''देवाचिये द्वारी उभा क्षणभरी। तेणे मुक्ती चारी वोळंगिल्या.''* या गोष्टीवरून हरिपाठ हा ज्ञानेश्वरमहाराजांचा किती लाडका होता हे स्पष्ट होते. वारकरी संप्रदायाचे अध्वर्यू असणाऱ्या गुलाबरावमहाराजांचे जीवन म्हणजे हा हरिपाठ होता. आळंदीतील गोडबोलेमहाराज तर हरिपाठाशिवाय काही बोलत नसत. हरिपाठ ही वारकरी संप्रदायाची संध्याच मानली जाते. कित्येक भाविक वारकरी हरिपाठ पठण केल्याविना अन्नग्रहण करीत नाहीत. ज्ञानेश्वरमहाराजांनी हा हरिपाठ एकनाथमहाराजांना दिला व त्यातूनच एकनाथांना स्वत:चा हरिपाठ स्फुरला. श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे साक्षात दर्शनातून आमच्या मामांना रामपाठाचे स्फुरण झाले असे त्यांनी रामपाठात नमूद केले आहे. ते म्हणतात, *''ज्ञानेश्वर कृपाप्रसादे रचिले। तयांचिये बोले समाधान॥ गोविंद करी रेवणसिद्धपदी नमन। रामपाठ पूर्ण सांग झाला.''* मामांचा रामपाठ हा ज्ञानेश्वरमहाराजांचे हरिपाठाइतकाच महत्त्वाचा आहे.

हरिपाठ हा ग्रंथ आकाराने छोटा पण सर्वश्रेष्ठ आहे. हरिपाठ नेमाने म्हणणारास साक्षात्कार होऊन, परमार्थाच्या वाटा दिसायला पाहिजेत, इतका महत्त्वाचा हरिपाठ आहे. अहो ! जो हरिपाठ पाहून प्रत्यक्ष सद्गुरू निवृत्तिनाथमहाराजांनी प्रशंसोद्गार काढले, त्याची महती काय वर्णावी ? हरिपाठाच्या निर्मितीस सातशे वर्षांहून अधिक इतका प्रदीर्घ काळ लोटला. हा हरिपाठ अनेकांचे मुखांत राहिला. साहजिकच अनेक पाठभेद या हरिपाठात शिरले; त्यांचे संशोधन होणे आवश्यक आहे. मुळातला हरिपाठ कसा असेल हे पहाण्याचा छंद मला लागला. ज्ञानेश्वरमहाराजांच्या संजीवन समाधीच्या सप्तशताब्दीच्या निमित्ताने त्यावेळी एका महिन्यात सातशे वेळा हा हरिपाठ माझेकडून

म्हटला गेला. जितके वेळा आपण हरिपाठ म्हणू, तितके वेळा निरनिराळ्या प्रकारांनी हरिपाठाच्या अर्थांशी झोंबी घेता येते. अशी अपूर्वता आहे एवढी गोष्ट खरी.

भागवत धर्माची इमारत पंढरपूरच्या वाळवंटात मोठ्या दिमाखाने तळपते आहे. तिचा पाया ज्ञानेश्वरमहाराजांनी घातला. *''ज्ञानदेवे रचिला पाया। उभारिले देवालया,''* ही तुकोक्ती हे स्पष्ट करणारी आहे. ज्ञानेश्वरमहाराज हे नाथपंथाचे कळस तर भागवत धर्माचे संस्थापक होते. हे दाखविणारी *''शिवपीठ हे जुनाट। ज्ञानाबाई तेथे मुगुट,''* हे एकनाथांचे वचन, आणि *''आदिनाथ गुरु सकळ सिद्धांचा। मच्छिंद्र तयाचा मुख्य शिष्य॥१॥ मच्छिंद्राने बोध गोरक्षासी केला। गोरक्ष वोळला गहिनी प्रती॥२॥ गहिनीप्रसादे निवृत्ति दातार। ज्ञानदेवा सार चोजविले॥३॥''* हे ज्ञानेश्वरमहाराजांचे वचन पुरेसे आहे. अशा थोर, ज्ञानी, योगी व भक्त अशा ज्ञानेश्वरमहाराजांना हरिपाठ स्फुरला आहे. यादृष्टीने त्यातील प्रत्येक शब्दाकडे पहाणे आवश्यक आहे.

हरिपाठाच्या पहिल्या अभंगाच्या पहिल्या चरणात ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, *''देवाचिये द्वारी उभा क्षणभरी। तेणे मुक्ती चारी साधियेल्या॥१॥''* या चरणाचा अर्थ सर्वसामान्यपणे असा घेतला जातो :- देवाचे म्हणजे देवळाचे दारात क्षणभर उभे राहिले असता, तसे करणाऱ्याला चार प्रकारच्या मुक्ती प्राप्त होतात. पण प्रश्न असा :- असा अनुभव आपणास येतो का ? तासंतास देवाचे दारात घालवले, तरी आम्हाला एकसुद्धा मुक्ती प्राप्त होत नाही. हे असे का ? ज्ञानेश्वरमहाराजांचे आश्वासन खोटे आहे की काय ? त्यांचे वचन खोटे नाही. मग आम्हाला अनुभव का येत नाही ? याचे कारण असे की आम्ही ज्याला देव समजतो, तो देव किंवा देवाचे द्वार समजतो, ते द्वार ते दोन्ही त्यांना तसे अपेक्षित नाही. कारण आपण देव जसा समजतो तसा तो नाही. देव हा दृश्यापेक्षा वेगळा आहे. दृश्य नव्हे तो देव, देह नव्हे तो आत्मा, व्यवहार नव्हे तो परमार्थ, हे सूत्र लक्षात घ्यावयास हवे. श्रीसमर्थ[१] म्हणतात, *''दृश्यास दिसे ते दृश्य। मनास भासे तो भास। दृश्याभासातीत अविनाश। परब्रह्म ते.''* डोळ्यांस दिसते ते दृश्य व मनास होतो तो भास; पण परब्रह्म मात्र दृश्यभासातीत अविनाशी आहे. अर्थात देव हा डोळ्यांना दिसणारा नाही अथवा मनाला भासणारा नाही. *''अस्थीचा देही मांसाचा डोळा। पाहेन म्हणे ब्रह्माचा गोळा। तो ज्ञाता नव्हे आंधळा। केवळ मूर्ख,''* हे समर्थांचे मत आहे. तेच ज्ञानेश्वरमहाराज असे सांगतात :-

१. श्रीसमर्थ म्हणजे श्रीसमर्थ रामदासस्वामी होत. (सं. टी.)

*''पै स्थूल दृष्टी माते। भरवसा बांधुनी चित्ते। देखती मज अविनाशाते। परी हो दिसे कैसा'' आणि ''दृष्टीचा देखणा दृष्टि अगोचर। दृष्टीसी गोचर कैसा होय.''*

हे यच्चयावत विश्व ज्या परमात्म्याने तयार केले, तो परमात्मा विश्वापेक्षा वेगळा आहे. सुताराने टेबल केले; येथे टेबलापेक्षा सुतार वेगळा आहे. तसेच येथे आहे. *''एवं जगदीश तो वेगळा। जगनिर्माण त्याची कळा। तो सर्वांमध्ये परी निराळा। असोन सर्वी,''* असे समर्थांचे वचन आहे. परमात्म्याने विश्व निर्माण केले व तो स्वत: विश्वात भरून राहिला. म्हणून तर त्याला ''विश्वंभर'' असे संबोधिले आहे. *''विश्वी विश्वंभर। हे तो वेदांतीचे सार,''* ही तुकोक्ती स्पष्ट आहे. असा जो विश्वात्मक देव आहे, तो येथे ज्ञानेश्वरमहाराजांना अपेक्षित आहे. हा देव म्हणजे आत्मदेव आहे.

या अनंत विश्वाची जाणीव जी आपल्याला होते ती कशामुळे होते, हाच महत्त्वाचा प्रश्न आहे. जे आपल्या ज्ञानात येत नाही, त्याला अस्तित्व नाही. साऱ्या विश्वाचे, दृश्याचे, देहाचे अस्तित्व ज्ञानाने सिद्ध होते. चैतन्याशिवाय ज्ञान नाही. आपल्या शरीरात जर सामसूम झाली, तर तेथे कशाची जाणीव आहे ? शरीरामुळे आत्म्याचे ज्ञान होते की आत्म्यामुळे शरीराचे ज्ञान होते ? ज्ञानाने आत्मा सिद्ध होतो की आत्म्यामुळे ज्ञान होते ? आपल्यासाठी घर की घरासाठी आपण ? काय आहे तरी काय ? जाणीव आणि नेणीव तरी कशामुळे ? ''हे काही तरी आहे'' आणि ''हे काही नाही'' याची जाणीव कशाने होते ? ''आहे'' आणि ''नाही'' हे दोन्ही ज्याच्यामुळे आहेत, त्याचा शोध संतांनी घेतला. चैतन्यविरहित बाळाचे बारसे कसे करणार ? शरीर तर दिसते आहे पण त्याची हालचाल मात्र नाही. हे जर सारे रासायनिक आहे, तर शरीराची हालचाल का होऊ नये ? त्या शरीरात काय कमी आहे म्हणून हालचाल होत नाही ? याचा विचार महत्त्वाचा. शरीरात जर चैतन्याची हालचाल असेल तर शरीराची हालचाल होते, हे तर खरे ना ? हे शरीर कोणाच्या सत्तेने चालतंय, बोलतंय, तोच देव आहे. *''चाले हे शरीर कोणाचिया सत्ते। कोण बोलविते हरिवीण॥ देखवी ऐकवी एक नारायण। तयाचे भजन चुको नका,''* ही तुकोक्ती हेच सांगते. नारायण[1] म्हणजे निंबरगीकरमहाराज. निंबरगीकरमहाराजांचे शिवाय दुसरा नारायण आम्हाला माहीत नाही. त्यांचे सत्तेने सारं काही होतंय.

देव म्हणजे नेमके काय हे समर्थ असे सांगतात :- *''देव म्हणजे आपला*

१. चिमड संप्रदायाचे प्रवर्तक नारायणराव भाऊसाहेबमहाराज निंबरगीकर. ते निंबरगी गावात रहात असल्याने त्यांना निंबरगीकरमहाराज म्हणतात. (सं. टी.)

*प्राण। प्राणासी न करावे निर्वाण। परम प्रीतीचे लक्षण। ते हे ऐसे.''* देव म्हणजे दुसरे तिसरे काही नसून तो आपला प्राण आहे. ''देव नाही'' असे म्हणणारी माणसे भेटतील, पण ''प्राण नाही'' असे म्हणणारा निष्प्राण या जगात कोण आहे ? आता प्राण हा देव आहे असे म्हटल्यावर तो देव बाहेर शोधून सापडेल का ? अर्थातच नाही. देव म्हटल्यावर आमचे डोळ्यांसमोर जी आकृती येते, जे रूप येते, तसे रूप या देवाला असेल काय ? अर्थातच नाही. त्याचे नाम आपण समजतो तसे असेल का ? अर्थातच नाही. ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात :- *''देव देव म्हणुनी व्यर्थ का फिरशी। निजदेव नेणसी मुळी कोण ॥ १ ॥ देवा नाही रूप देवा नाही नाम। देवा नाही गाव कोठे काही ॥ २ ॥ ज्ञानदेव म्हणे भजा आत्मदेवा। अखंडित सेवा करा त्याची ॥ ३ ॥.''* ज्ञानेश्वरमहाराज ''आत्मा हा देव आहे'' असे सांगताहेत, तर ''प्राण हा देव आहे'' असे समर्थांचे मत आहे. खरे म्हणजे प्राण आणि आत्मा हे वेगळे नाहीच आहेत. हे ''प्राण एव आत्मा'' या श्रुतिवचनावरून स्पष्ट होते. म्हणून आमच्या चिमड संप्रदायात प्राणाची उपासना आहे.

आणि जोवर या आत्म्याचे ज्ञान होत नाही, तोवर जप, तप, साधन, तीर्थ या शब्दांना काहीही अर्थ नाही. *''आत्माचि कळला नाही जप तप साधन तीर्थे खोटी गे,''* असे ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, ते याच अर्थाने. एकदा आत्म्याचे ज्ञान झाले की मग आपल्या आत जे आहे, तेच सर्वत्र कसे भरून राहिले आहे, याचे ज्ञान होते. *''म्हणोनि आपणपां विश्व देखिजे। आणि आपण विश्व होईजे। ऐसे साम्यचि एक उपासिजे। पांडवा गा,''* हे ज्ञानेशवचन हे स्पष्ट करणारे आहे. मगच आत्मज्ञानी माणसाला मूर्तीतील, प्रतिमेतील देवत्वाची जाणीव होते आणि *''अवघे ब्रह्मरूप रिता नाही ठाव। प्रतिमा तो देव कैसा नोहे,''* या तुकोक्तीचा प्रत्यय आल्याशिवाय रहात नाही. त्याला देव दगडाचा वाटत नाही, आणि देवालाही हा भक्त मायेतला वाटत नाही. आत्म्याखेरीज अन्य अशी काही अंतर्बाह्य अनुभूती त्याला रहात नाही.

आता, या आत्म्याचे ज्ञान करून घ्यावयाचे म्हणजे तो रहातो कुठे व त्याच्याशी कसे संधान बांधता येईल हे पहाणे आवश्यक आहे. परमार्थात ज्या प्राणाला समर्थ 'देव' म्हणतात, तो प्राण सहस्रदलस्थानात असतो. मानवी शरीरात नाक, कान, डोळे, तोंड व टाळू या पाच छिद्रांनी जोडलेले अंतराकाश आहे. त्याला ''हृदय'' अशी संज्ञा आहे; ते आपल्या प्रत्येकाच्या अंगठ्याएवढे असून, ते आपल्या मेंदूत आहे. एक उपनिषद सांगते :- *''पंचछिद्रयुतं मांसं अंतराकाशसंयुतं तदेव हृदयं नाम.''* यालाच आयुर्वेदात ''शिरोहृदय'' म्हणतात. याच हृदयात प्राण, जीव, शिव, मन, चैतन्य, सोहं हंस

असतात. या सहस्रदलस्थानातून भ्रूमध्यापर्यंत वहाणारी गती म्हणते प्राणगती होय. ही प्राणगती डाव्या कानावरच्या भागावरील दक्षिणशिखा मार्गाने सहस्रदलापासून भ्रूमध्यापर्यंत वहात असते. ही प्राणगती म्हणजे परमात्म्याने जीवात्म्यासाठी पाठविलेले विमान आहे. प्राणाच्या या स्पंदनावरच श्वासोच्छ्वास चालू असतो. असा श्वसनाचा व प्राणाचा अन्योन्य संबंध आहे. श्वासोच्छ्वास हा आयुष्याचा केवळ बिंदू आहे, आयुष्याचा केवळ आलेख आहे, केवळ जीवनाचा मार्ग आहे. म्हणून ईश्वराकडे जाण्याचा श्वासोच्छ्वास हा एकमेव मार्ग आहे. श्वसन हेच जीवन आहे आणि जीवन हेच श्वसन आहे. उपाधिभूत जीवन किंवा श्वसन हे चैतन्य आणि जडतत्त्व यांचा सांधा आहे; परंतु ते चैतन्यालाही स्पर्श करीत नाही व जडालाही स्पर्श करीत नाही.

देवाचे दर्शन होणेसाठी आपल्याला देवाचे दारात पोहोचले पाहिजे. ज्या दारात पोहचले असता देवाचे दर्शन होते किंवा ज्या दारातून देवाची ये-जा असते त्याला देवाचे दार म्हणतात. आपल्या शरीरात दशमद्वार हे देवाचे दार आहे. हे ठिकाण भ्रूमध्याचे ठिकाणी आहे. जीव हा शरीरातील नऊ[१] दारातून हिंडतो, पण त्याला मायेचे भ्रमाने दहावे दार सापडू शकत नाही. हे ठिकाण अणुपेक्षा लहान आहे; ते गवसण्यास मनाचे उन्मन व्हावे लागते आणि चार देहांचा[२] निरास व्हावा लागतो. ही जी नऊ दारे आहेत की ज्यातून जीव भ्रमण करतो, त्यांचा निरोध झाल्याशिवाय हे दहावे दार उघडत नाही. *''नवद्वाराते रोधोनी। दशमद्वारी दासी जनी,''* हे जनाबाईंचे वचन येथे लक्षात घेण्याजोगे आहे. हे दशमद्वार उघडले असता आपणांस चहूकडे परमात्म्याचा साक्षात्कार होणार आहे. ज्ञानदेवतेहत्तिशी सांगते :- *''खोलोनि दसवे द्वारीचे कवाडपाठी। मन उन्मन परेच्या तठी। अरूप दिसतसे जगजेठी। चहूकडे॥ खोलोनी दशमद्वारीच्या छिद्रा। जाता भेटी रामचंद्रा। योगिया लागली योगमुद्रा। चहूकडे.''*

या देवाचे दारात गेल्याशिवाय आपणास चार मुक्ती प्राप्त होणार नाहीत. हा विषय अतिगहन आहे. एखादा साधू हे जाणतो असे शिवदिनी सांगतात :- *''नव दरवाजे दसवी खिडकी उप्पर है एक फिरकी। विरळा साधु कोई एक जाने लेकर मनकी गिरकी.''* *''मनुष्याणां सहस्रेषु कश्चिद् यतति सिद्धये। यततामपि सिद्धाना कश्चिन्मां वेत्ति तत्त्वत:.''* म्हणजे हजारो माणसांमध्ये एखादा सिद्ध होतो व अशा

---

१. दोन डोळे, दोन कान, दोन नाकपुड्या, तोंड, शिश्न व गुद अशी शरीरात नऊ द्वारे आहेत. (सं. टी.)

२. स्थूल, सूक्ष्म, कारण, आणि महाकारण असे चार देह आहेत. (सं. टी.)

हजारो सिद्धांमध्ये एखादाच मला - देवाला - जाणतो, हे गीताशास्त्र हेच दाखविते.

या देवाचे दारापर्यंत पोहोचण्यासाठी काय करावे लागेल ? प्राणाचा आणि श्वसनाचा संबंध आहे. या श्वसनाचे आधारानेच आपण परमात्म्याप्रत जाऊ शकतो. श्वासोच्छ्वास हे परमार्थाचे मूलभूत साधन आहे. म्हणून श्वासाचा अभ्यास व्हावयास हवा. आपले जीवन हे श्वासोच्छ्वासात आहे. म्हणून श्वासोच्छ्वासाचे उपाधीत सापडलेल्या जीवनाला उपाधिभूत जीवन ही संज्ञा आहे. या जीवनात जड व चैतन्य हे सांधले गेले आहेत किंवा जड व चैतन्य यांना सांधणारा दुवा म्हणजे उपाधिभूत जीवन आहे. चैतन्य आणि जड ही दोन्ही तत्त्वे उपाधिभूत जीवनात असतात. हे उपाधिभूत जीवनच आत्म्याच्या अनुभूतीचे माध्यम आहे. उपाधिभूत जीवनात पृथ्वी, आप, तेज, वायू आणि आकाश ही तत्त्वे असतात. त्यांतील पृथ्वी आणि आप ही तत्त्वे म्हणजे स्थूलदेह, तेजतत्त्वरूप सूक्ष्म देह आहे, ''कारण देह'' हा वायुरूप आहे आणि महाकारण देह हा आकाशरूप आहे. म्हणजे उपाधिभूत जीवनातच स्थूल, सूक्ष्म, कारण आणि महाकारण हे चार देह असतात. साधनाचे अभ्यासाने या चार देहांचे उपाधिभूत जीवनापासून वेगळे होणे म्हणजेच चत्वार देहांचा निरास होय. त्याचे असे आहे :- एखादे पाण्याने भरलेले भांडे उपडे न करता अथवा न फोडता जर त्यातील पाणी बाहेर काढावयाचे असेल, तर त्या भांड्याच्या आकाराचा दुसरा एखादा जिन्नस त्यातील पाण्यात घातला की भांड्यातील पाणी बाहेर पडते. त्याप्रमाणे उपाधिभूत जीवनात चित्ताचे तादात्म्य झाले की उपाधिभूत जीवनातील चार देह बाजूला होऊन शुद्ध आकाशतत्त्व उरते.

साधनाच्या योगाने चित्ताची एकाग्रता आणि दृष्टीची तादात्म्यता झाली की हृदयात वायूची घर्षणक्रिया आपोआप होते. हृदयात वायूची घासणी झाली की कंठात ओंकाराचा वन्ही प्रगट होतो. या वन्हीच्या आचेने उपाधिभूत जीवनातील पृथ्वी, आप, तेज व वायू ही तत्त्वे बाजूला होतात. ओंकार वन्हीने जीवनाची वाफ झाल्यावर जे शुद्ध आकाशरूप जीवन रहाते, ते ऊर्ध्वगामी होते. जीवन ऊर्ध्वगामी होण्याची अटकळ साधली की साक्षात्काराला कमतरता नाही.

ऊर्ध्वगामी झालेले जीवन भ्रूमध्यात येते. तेथे जीवनाची ऊर्ध्वमुख झालेली गती प्राणगतीशी एकरूप होते. या दोन गतींचे मीलन होताच अनुहाताचा निनाद सुरू होतो. अनुहाताचा नाद श्रवण झाला असता आपण दशमद्वार गाठले आहे हे समजावयास हरकत नाही. दशमद्वार हेच देवाचे दार आहे. या ठिकाणी क्षणभर उभे

राहिले असता आपणास चारी मुक्ती प्राप्त होणार आहेत. या ठिकाणी ''क्षणभर'' याचा अर्थ ''आयुष्यभर'' असा आहे. ही गोष्ट *''क्षणभंगुर संसार याचा भरंवसा नाही,''* या मुक्ताबाईंच्या विचारावरून स्पष्ट होते. असे आयुष्यच्या आयुष्य देवाचे द्वारी वेचले असता त्या जीवाला सलोकता म्हणजे देवाच्या लोकाला जाणे, समीपता म्हणजे देवाच्या जवळ जाणे, सरूपता म्हणजे देवाचे रूप प्राप्त होणे, आणि सायुज्यता म्हणजे देवच होऊन जाणे, या चारही मुक्ती प्राप्त होतात. समर्थ या चार मुक्तींचे वर्णन असे करतात :- *'' लोकी रहावे ते सलोकता। समीप असावे ते समीपता। स्वरूपची व्हावे ते सरूपता। तिसरी मुक्ती ॥ निर्गुण परमात्मा निश्चळ। निर्गुण मुक्ति तेही अचळ। सायुज्य मुक्ति ते केवळ । जाणिजे ऐसी.''*

हे सगळे साधण्याकरता काय करायला पाहिजे ते ज्ञानेश्वरमहाराज अभंगाच्या पुढील चरणात सांगत आहेत :- *'' हरि मुखे म्हणा हरिमुखे म्हणा। पुण्याची गणना कोण करी.''* हरि-मुखाने हरी म्हणा म्हणजे अगणित पुण्य होईल असे ज्ञानेश्वरमहाराजांचे म्हणणे आहे. देवाचे नाव घेणारी वाचा वेगळी आहे. आपली जिव्हा ही गोडधोड खाईल कधी, निंदास्तुती कधी करील व देवाचे नाव कधी घेईल ? म्हणून हरि-मुखाने हरी म्हणावयाचे आहे.

आता हे हरिनाम कसे घ्यावयाचे हे ज्ञानेश्वरमहाराज पुढील कडव्यात सांगतात :- *''असोनी संसारी जिव्हे वेगु करी। वेदशास्त्र उभारी बाह्या सदा.''* हरिनाम घेण्यास संसार सोडावयाची गरज नाही. संसारात राहूनच परमार्थ करावा अशी वेदांनी आज्ञा दिली आहे. समर्थ सांगतात:- *''आधी प्रपंच करावा नेटका। मग घ्यावे परमार्थ विवेका। येथे आळस करू नका। विवेकी हो॥ प्रपंच सांडून परमार्थ कराल। तेणे तुम्ही कष्टी व्हाल। प्रपंच परमार्थ चालवाल। तरी तुम्ही विवेकी.''* आता, समर्थांनी कधी प्रपंच केला होता? घर, दार म्हणजे संसार आणि त्यांचा त्याग केला की संसार सुटला अशी आपली कल्पना आहे. पण ती बरोबर नाही. ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात :- *''घरदार वोखंटे त्यजू म्हणसी तरी शरीराएवढे जाड। मायबाप वोखटे त्यजू म्हणसी तरी काम क्रोध मद मत्सर अवघड। पाठीची बहीण त्यजू म्हणसी आशा तृष्णा मायाच बंडरया.''* घरदार टाकले मग शरीराचे काय ? देहभाव जातोय का ? आईबाप टाकले पण काम, क्रोध, मद, मत्सर यांचे काय करायचे ? तेव्हा आपण ज्याला संसार समजतो तो सोडावयाचा नाही. फक्त त्याचा मोह, त्याची आसक्ती सोडावयाची आहे. संसार परमार्थाला पूरकच आहे. फक्त त्याचा मोह असता कामा नये. *''त्या देवाचे दर्शन तू*

*घे तू घे । संसार मोहातुनी निघे निघे,''* हे सोहिराबानाथांचे वचन संसार कसा सोडावयाचा ते स्पष्ट करते. *''पाण्यात नाव असावी, पण नावेत पाणी असू नये''* हे गोंदवलेकरमहाराजांचे वचन सांगते की आपल्या आत संसार असू नये.

संसार म्हणजे काय हे शंकराचार्य असे सांगतात :- *'' पुनरपि जननं पुनरपि मरणं पुनरपि जननीजठरे शयनम् । इह संसारे खलु दुस्तारे.''* जन्ममरणाच्या चक्रात जे आपण सापडलो आहोत तोच संसार. जीव हा क्षणाक्षणाला जन्माला येतो व क्षणाक्षणाला मरतो; हाच संसार आहे. प्रत्येक श्वास हा जन्म आहे व उच्छ्वास हे मरण आहे. श्वासोच्छ्वास हाच खरा संसार आहे. म्हणून संसार सोडला म्हणून सुटत नाही. तो जीवाबरोबरच असतो. विंचवाचे बिऱ्हाड विंचवाचे बरोबरच असते. तेव्हा हरिनाम हे जीवाच्या संसरणातच म्हणजे श्वासोच्छ्वासातच घ्या असे वेदांनी बाह्या वर करून सांगितले आहे, हेच ज्ञानेश्वरमहाराजांना या ठिकाणी सुचवावयाचे आहे.

शेवटच्या कडव्यात ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात :- *''ज्ञानदेव म्हणे व्यासाचिया खुणा । द्वारकेचा राणा पांडवाघरी.''* या जगातील सर्व ज्ञान हे व्यासांचे उष्टे आहे. ज्ञानेश्वरमहाराज सांगतात :- *'' जे महाभारती नाही । ते नोहेचि लोकी तिही । येणे कारणे म्हणिपे पाही । व्यासोच्छिष्ट जगत्त्रय,''* ही ज्ञानेश्वरीतील ओवी व्यासांचे महत्त्व सांगणारी आहे. व्यासांचा आधार घेऊन भगवान् श्रीकृष्ण पांडवांचे घरी वास्तव्यास असतात, असे ज्ञानेश्वरमहाराज सांगतात. पांडवांनी कृष्णाचे नामस्मरण केल्यामुळेच द्वारकेचा राजा असणारा कृष्ण पांडवांचे घरी राहिला.

## (२)

**चहू वेदी जाण षट्शास्त्री कारण । अठराही पुराणे हरीसी गाती ॥१॥**
**मंथोनि नवनीता तैसा घे अनंता । वाया व्यर्थ कथा सांडी मार्गू ॥२॥**
**एक हरि आत्मा जीव शिव समा । वाया तू दुर्गमा न घाली मन ॥३॥**
**ज्ञानदेवा पाठ हरी हा वैकुंठ । भरला घनदाट हरि दिसे ॥४॥**

पहिल्या अभंगात ज्याला देव म्हटले त्यालाच आता 'हरि' असे म्हणून ज्ञानेश्वरमहाराज या दुसऱ्या अभंगात सांगतात:-

चार वेद, सहा शास्त्रे, अठरा पुराणे हे हरीचेच वर्णन करतात. विद् म्हणजे जाणणे; त्यापासून वेद शब्द बनला. वेद म्हणजे मूर्तिमंत ज्ञान. वेद हे अपौरुषेय आहेत. कोणताही ग्रंथ म्हटला की त्याला कर्ता असतो; पण वेदाला कर्ता नाही. वेदांतील मंत्रांचे ऋषि-मुनि हे कर्ते नसून द्रष्टे आहेत. ते ध्यानाला बसले असताना, जे काही त्यांच्या कानांवर आले, त्याचे नाव श्रुती म्हणजे वेद. श्रवण केले आणि स्मरणात कोंडले त्या स्मृती झाल्या. सद्गुरूच्या सानिध्यात जे ज्ञान प्राप्त झाले ते उपनिषदांत आहे. अरण्यात प्राप्त झाली ती आरण्यके. भगवंताच्या लीला वर्णन करणारा प्राचीन इतिहास म्हणजे पुराण. इतिहास जुना झाला की त्यालाच पुराण म्हटले जाते. शिवाजीमहाराजांचा इतिहास आणखी दोन हजार वर्षांनी पुराणातच जमा होणार आहे.

वेदात खूप विषयांचे वर्णन आले आहे. पण संतांना मात्र वेदामध्ये प्रामुख्याने हरिनामच आढळले. आपल्या आत जे असते तेच आपण बाहेर पहात असतो. ज्याचा जो विषय असतो तो त्याला सर्वत्र दिसतो. आमचे मामांची ''अमृतवाणी'' पहा. त्या ग्रंथात त्यांनी खूप विषय हाताळले आहेत. पण त्या प्रत्येक विषयात त्यांनी नामच पाहिल्याचे दिसून येईल. तुकाराममहाराज म्हणतात :- *''वेद अनंत बोलिला। अर्थ इतुकाचि साधिला॥१॥ विठोबासी शरण जावे। निजनिष्ठे नाम घ्यावे॥२॥ सकळ शास्त्रांचा विचार। अंती इतुकाचि निर्धार॥३॥ अठरा पुराणी सिद्धांत। तुका म्हणे हेचि मात॥४॥''* तुकाराममहाराजांना वेदाच्या अनंत बोलण्यात विठोबाचे नामच दिसले. गंमत आहे की नाही ? ते सांगतात की वेदाने फक्त विठोबाला शरण जा आणि निजनिष्ठे नाम घ्या हेच सांगितले.

विठ्ठल ही अनुभूती आहे. विठ्ठल हा शब्द कसा बनला हो ? विद्+स्थल=

विठ्ठल. विठ्ठल म्हणजे काय ? जाणण्याचे ठिकाण. ''जाणण्याचे ठिकाण - निजत्व - जाणून घ्या, त्याला शरण जा, त्याच्यावर निष्ठा ठेवा व त्याचे चैतन्यरूप निजधाम असे नाम तुम्ही घ्या'' हे वेदांनी सांगितले आहे.

नाम हे चैतन्यरूप आहे या काही गप्पा नाहीत. *''तुका म्हणे नाम। चैतन्य निजधाम,''* ही तुकोक्ती, *''एका जनार्दनी नाम। सुख चैतन्य निजधाम,''* हे एकनाथमहाराजांचे वचन आणि *''निजधाम हे नाम शोकापहारी,''* हे समर्थवचन नामाचे स्वरूप सांगते. चैतन्यरूप नामाच्या श्रवणाने विश्वात्मक देवाची जाणीव झाल्यावाचून रहात नाही व हेच वेदांताचे सार असल्याचे तुकाराममहाराज सांगतात :- *''विश्वी विश्वंभर । हे तो वेदांतीचे सार.''* तुकाराममहाराजांनी आपले अभंगाद्वारे वेदाचा अर्थ प्राकृतामध्ये प्रगट केला. ते म्हणतात की, वेदाचा नेमका अर्थ आम्हालाच माहीत आहे; इतरांनी फक्त ओझे वहायचे काम करायचे :- *''वेदाचा तो अर्थ आम्हासीच ठावा। इतरांनी वहावा भार माथा.''* हा वेदाचा अर्थ अभंगाद्वारे प्राकृतात प्रगट केल्याबद्दल धर्ममार्तंडांनी तुकाराममहाराजांना त्यांनी केलेले अभंग नदीत बुडविण्याची आज्ञा केली. वैराग्य येण्यासाठी लाखो रुपयांचे येणे असलेले दस्तऐवज नदीत बुडविताना ज्या तुकाराममहाराजांना वाईट वाटले नाही, त्या तुकाराममहाराजांना अभंग नदीत बुडविताना दु:ख झाले. त्यांनी निश्चक्र उपोषण आरंभले. पुष्कळ दिवसांच्या उपोषणानंतर प्रत्यक्ष परमात्म्याने प्रगट होऊन तुकाराममहाराजांच्या अभंगांच्या वह्या जशाच्या तशा परत दिल्या. इकडे रामेश्वरभट्टांच्या अंगाचा दाह होऊ लागला. त्यांनी ज्ञानेश्वरमहाराजांना साकडे घातले. माऊलींनी सांगितले की, तुझ्या हातून एका साधूचा छळ झाला आहे. त्यांना तू शरण जा. म्हणजे तुझ्या अंगाचा दाह थांबेल. टाकोटाक रामेश्वरभट्ट तुकाराममहाराजांचेकडे आले. त्यांनी त्यांना सर्व वृत्तांत सांगितला व दयेची याचना केली. त्यावेळी तुकाराममहाराज सहजच एक अभंग म्हणत होते, *''दु:ख ते देईल सर्व सुखफळ। होतील शीतल अग्निज्वाळा.''* हा अभंग म्हणत असतानाच तुकाराममहाराजांचा रामेश्वरभट्टांना सहज स्पर्श झाला व त्यांच्या अंगाचा दाह थांबला. पुढे रामेश्वरभट्टांनी तुकाराममहाराजांचे वर्णन करताना म्हटले आहे :- *''तुकाराम तुकाराम। नाम घेता कापे यम॥ धन्य तुकोबा समर्थ। तेणे केला पुरुषार्थ॥ तारियेल्या वह्या। जैशा उदकावरी लाह्या॥ म्हणे रामेश्वरभट्ट द्विजा। तुका विष्णु नाही दुजा.''* असेच वर्णन बहिणाबाईंनी केले आहे. त्या म्हणतात :- *''बहिणी म्हणे लोक बोलती सकळ॥ तुकोबा केवळ पांडुरंग.''*

असे तुकाराममहाराज हे एकदा कीर्तनात ''वेदांनी नाममाहात्म्य वर्णन केले आहे'' असे सांगत होते. कीर्तनास गागाभट्ट, वामनपंडित इत्यादी लोक उपस्थित होते. कीर्तनात गागाभट्टांनी विचारले, ''आपण जे नाममहात्म्य सांगता त्याला वेदात कोठे आधार आहे ?'' यावर वामन पंडित म्हणाले, ''पंडितजी, ते सांगायला तुकाराममहाराज काय करायचे ? मी सांगतो वेदातला आधार. ते म्हणाले :-

*वेदी हा हरिकीर्तनीच महिमा केला असे आदरे।*
*कोठेसा तरि विष्णुसूक्त अवघे शोधोनि पाही बरे॥*
*त्यामध्येहि तृतीय वर्गहि 'भवान् मित्रे च नामे' पहा।*
*त्यामाजी तिसरी ऋचा 'तव तमुस्तोतार' नामे पहा॥*

चार वेद, अठरा पुराणे, सहा शास्त्रे हरिनामाचे वर्णन करून थकली. सेनामहाराज सांगतात *''अठराही भागले सहाही शिणले। चारही राहिले मौन्य धरुनी.''* इतके असून- देखील भगवंताच्या खऱ्या स्वरूपाची ओळख वेदाला झाली नाही. *''सखये बाई सखये बाई। वेदाला काही वेदाला काही। कळलं नाही कळलं नाही॥ शेषाच्या झाल्या दोन जिभा। देव काहो विटेवरी। उभा उभा,''* हे ज्ञानेशांचे वचन, किंवा *''वेदासी कानडा श्रुतीसी कानडा। तो असे उघडा पंढरीये,''* हे नामदेवमहाराजांचे बोल या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहेत.

आता वेदांनी, शास्त्रांनी, पुराणांनी वर्णिलेला हा अनंत श्रीहरी आपणास कसा प्राप्त होईल ? ते ज्ञानेश्वरमहाराज या अभंगाच्या पुढील कडव्यात सांगतात, *''मंथुनी नवनीता तैसा घे अनंता। वाया व्यर्थ कथा सांडी मार्गू.''* विशिष्ट अशा देहातील मंथनातून अनंताचे दर्शन होणार आहे. जसे- मंथनानेच ताकातून लोणी प्राप्त होते. तुकाराममहाराज म्हणतात, *''दुग्धी असता नवनीत। नेणे तयाचे मथित.''* म्हणजे दुधात लोणी आहे पण ते विशिष्ट मंथनाशिवाय प्राप्त होत नाही. अनंत आपल्या देहातच आहे. तुकाराममहाराज सांगतात *''नाही आदि अंत ऐसा जो अनंत । तोची हृदयात तुका म्हणे.''* हा अनंत विशिष्ट अशा मंथनातून साक्षात्कारास येतो. हा अनंत हृदयात साक्षात्कारास येतो. परमात्म्याने आपणांस काही गोष्टी दोन दोन दिल्या आहेत. दोन डोळे, दोन हात, दोन पाय इत्यादी. तशी हृदये पण दोन दिली आहेत. हृदय मधील हृ म्हणजे हरण करणे, द म्हणजे देणे, आणि य म्हणजे नियमन करणे. रक्ताचे हरण करणारे, रक्ताचा पुरवठा करणारे आणि रक्ताचे नियमन करणारे हृदय हे सर्वांना माहीत असते. पण दुसरे हृदय - जे चैतन्याचे हरण करते, चैतन्य देते, चैतन्याचे नियमन करते, ते - सामान्यत: माहीत

नसते. ते सद्गुरूंचेकडून समजून घ्यावे लागते. यांतील पहिल्या हृदयात साधना झाल्यावर दुसऱ्या हृदयात अनुभूती येते. *''हृदयात झाली वायूची घासणी। कंठात उदेला ओंकार वन्ही॥ नामाचा बिंदू घडला गे माये। आंतर बाहेर प्रकाशे स्वये,''* हे वचन या विषयावर प्रकाश टाकते. पहिल्या हृदयात प्राण व अपान यांचे घर्षण होऊन कंठात ओंकाराचा वन्ही प्रगट होतो आणि ते नामच बिंदुरूपाने साक्षात्काराला येते. हेच ज्ञानेश्वरमहाराज जरा वेगळ्या शब्दांत आपल्या उत्तरगीतेवरील टीकेत सांगतात, *''तरी चंद्रसूर्याचे घसणी। मथने होय ब्रह्माग्नि। इडा पिंगला आटूनी। सुषुम्ना होय.''* चंद्रसूर्याचे घासणीने ब्रह्माग्नी प्रगट होतो व इडा पिंगला आटल्या की सुषुम्ना प्रगट होते.

हेच तुकाराममहाराजांनी असे सांगितले आहे- *''भावाचे मथिले निर्गुण संचले। ते हे उभे ठेले विटेवरी.''* भावाच्या मंथनातून निर्गुण साचते व परमात्मा आकाराला येतो. भाव कोणता हे ज्ञानेश्वरमहाराज असे सांगतात, *''रामकृष्णवाचा भाव हा जीवाचा। आत्मा जो शिवाचा रामजप.''* रामकृष्णवाचा हा जीवाचा भाव असून तोच शिवाचा रामजप आहे. राम आणि कृष्ण या जीवनाच्या दोन गती आहेत; त्यांनाच इडा व पिंगला म्हणतात आणि त्यांचे मंथनातून अनंताचा साक्षात्कार होतो. हा साक्षात्कार वर उल्लेखिलेल्या दुसऱ्या हृदयात होतो. हा एकमेव मार्ग परमेश्वराप्रत जाणारा आहे, बाकीचे मार्ग परमेश्वरापर्यंत पोचतच नाहीत; ते लंगडे पडतात. म्हणून ''सत्य मार्गाने, पूर्ण विचार करून, विश्वासयुक्त अंत:करणाने जा; निश्चितपणे भगवंताची प्राप्ती होणार आहे'' असे ज्ञानेश्वरमहाराज सांगतात.

अभंगाच्या तिसऱ्या कडव्यात ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात *''एक हरि आत्मा जीव शिव समा। वाया तू दुर्गमा न घाली मन.''* हकारधारणेत प्रतिबिंबित झालेला जीव आणि सकार धारणेत असलेले परमात्म्याचे अंशभूत शिवस्वरूप, या दोन्ही पारड्यांत, या दोहोंचे हरण करणारा एकच हरी-आत्मा-हा सारखाच भरलेला आहे; म्हणूनच या दोन गतींत समता आहे. येथे चित्ताचा लय झाला असता, परमसुख प्राप्त होते. म्हणून ''येथे मनाला जडवून, इतर दुर्गम आणि परमात्म्यापासून दूर जाणाऱ्या मार्गात किंवा साधनात तू मन गुंतवू नको'' असे ज्ञानेश्वरमहाराज सुचवीत आहेत.

शेवटच्या कडव्यात ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात *''ज्ञानदेवा पाठ हरि हा वैकुंठ। भरला घनदाट हरि दिसे.''* वैकुंठ हे परमात्म्याचे नाम आहे. विष्णुसहस्रनामात परमात्म्याला वैकुंठ म्हटले आहे- *''वैकुंठ: पुरुष: प्राण: प्राणद: प्रणव: पृथु:.''* ज्ञानेश्वरमहाराजांच्या

म्हणण्यानुसार हरी हाच वैकुंठ आहे, व तो सर्वत्र घनदाट भरून राहिला आहे.

वैकुंठ म्हणजे काय आहे हो ? आपले वय ज्या ठिकाणी कुंठित होते त्याला वैकुंठ म्हणतात. आता हरी म्हणजे नेमके काय आहे ? जीवनाची ऊर्ध्वगती ज्या बिंदूत स्थिर होते त्याला हरी म्हणतात. आणि जीवनाची ऊर्ध्व गती जेथे स्थिर होते तेथेच वय कुंठित होते. म्हणून हरी हाच वैकुंठ आहे. या हरिनामाचा पाठ केला असता, हरी सर्वत्र कसा भरून राहिला आहे याचा अनुभव येतो. *''आत हरि बाहेर हरि। हरीने घरी कोंडिले,''* हा तुकाराममहाराजांचा अनुभव, *''हरि येथे रे हरि तेथे रे। हरीवाचुनी न दिसे रिते रे॥ हरि आदि रे हरि अंती रे। हरि हा व्यापकू सर्वा भूती रे,''* हा ज्ञानेश्वरमहाराजांचा अनुभव, *'' जे जे दृष्टी दिसे ते ते हरिरूप,''* हा एकनाथमहाराजांचा अनुभव हरीचे व्यापकत्व दाखवितो. अशा प्रकारे सर्वत्र हरी आहे याचा अनुभव साधकाने घ्यावयाचा आहे.

## (३)

त्रिगुण असार निर्गुण हे सार । सारासार विचार हरिपाठ ॥१॥
सगुण निर्गुण गुणाचे अगुण । हरिवीण मन व्यर्थ जाय ॥२॥
अव्यक्त निराकार नाही ज्या आकार । जेथोनी चराचर हरीसी भजे ॥३॥
ज्ञानदेवा ध्यानी रामकृष्ण मनी । अनंत जन्मोनी पुण्य होय ॥४॥

सर्व जग सार आणि असार यांनी भरलेले आहे. काही असे आणि काही तसे, असे हे सारे जग आहे. जितक्या प्रकारचा माल जगात आहे तितक्या प्रकारचे गिऱ्हाईक आहे. काही व्यापारी म्हणतात की आम्ही खोट्या मोत्यांचे व्यापारी, आम्हाला खरं कळत नाही. काही म्हणतात की आम्हाला फक्त खरं कळतं, आम्हाला खोटं कळत नाही. ही सारी बोलण्यातील लबाडी असते माणसाची. अहो, ज्याला खरं कळतं, त्याला खोटं कळत नाही, हे खरं आहे का ? खरे नव्हे ते खोटं हे तरी खरे आहे की नाही ? ज्याला सार काय आहे हे कळलं की त्याला असार काय आहे हेही कळणारच की नाही ? म्हणूनच सारासार विचार महत्त्वाचा.

विचार कोणता करावा हा विचार येथे विचार करणेसारखा आहे. *''क्षणोक्षणी हाचि करावा विचार। तरावया पार भवसिंधु॥ नाशिवंत देह जाणार सकळ। आयुष्य खातो काळ सावधान,''* असा सावधानतेचा इशारा तुकोपनिषद देते. हे शरीर नाश पावणारे आहे, ते काही आपणास कायमची साथ देणारे नाही. म्हणून मला Dead body हा शब्दप्रयोग फार आवडतो. शरीर मर्त्य आहे, आत्मा अमर आहे. याचा विचार होणे आवश्यक आहे.

समर्थ म्हणतात, *''अरे नर सार विचार करी॥ध्रु॥ सारासार विचार न होता। वाहसी भवपुरी॥१॥ सकळ चराचर कोठुनी आले। कोठे निमाले तरी॥२॥ दास म्हणे समजसी अंतरी। मुळीची सोय धरी॥३॥.''* समर्थ म्हणतात की माणसाने सारासार विचार केला पाहिजे. हे चराचर विश्व कोठून निर्माण झाले व ते कोठे नाहीसे होते याचा विचार अंतरात होणे आवश्यक आहे. आपण झोपी गेलो की सारे दृश्य कोठे जाते व आपण जागे झालो की हे सारे प्रत्ययाला कसे येते, हे पाहिले पाहिजे. हा लय जेथे होतो तोच खरा एकांत आहे. 'एक काय आहे' असा विचार करता तेथे दुसरे काही रहातच नाही. एक म्हणजे अद्वितीय हेच खरे. *''कोणा एकामाजी होत असे अंत। पहावे*

*चित्तात विचारोनी।। एक असे आत्मा ज्यात आदि अंत। तो स्वये एकांत ओळखावा,''* हे रामपाठातील विचार येथे लक्षात घेण्याजोगे आहेत. एक आत्माच असा आहे की जेथून हे विश्व निर्माण होते व तेथेच लय पावते. हा विचार सार आहे.

हे सारे दृश्य कुणामुळे दृश्य होतंय ते सार आणि हे जे दृश्य प्रगट आहे ते असार. तो आत्मा मागे लपलाय म्हणून हे दृश्य प्रगट आहे. तो जर प्रगट झाला तर हे दृश्य लयाला जातंय. *''प्रगट ते जाणारे असार। आणि गुप्त ते जाणावे सार,''* हे समर्थांचे मत किंवा *''स्वस्तिश्री वटेशु। जो लपोनि जगदाभासु। दावी मग ग्रासु। प्रगटला करी।। प्रगटे तव तव न दिसे। लपे तव तव आभासे,''* हे ज्ञानेश्वरांचे वचन वरील विधान स्पष्ट करणारे आहे. म्हणून फक्त आत्मदेव, भगवंत हा सार आहे; बाकी सारे असार आहे. *''फळकट हा संसार। येथ सार भगवंत,''* अशी तुकोक्ती आहे. आता, भगवंत सार आहे असे म्हटल्यावर, त्याचे नाम सुद्धा सार आहे हे निश्चित. परमात्मा हा नादप्रकाशयुक्त आहे. नाद म्हणजे भगवंताचे नाम आहे आणि प्रकाश हे भगवंताचे रूप आहे. व्यवहारात 'नामाला रूप व रूपाला नाम' असे असते. पण परमार्थात नाम व रूप हे वेगळे असत नाहीत. *''नाम तेचि रूप रूप तेचि नाम। नाम रूप भिन्न नाही नाही,''* हे नामदेव वचन परमात्म्याचे रूप व त्याचे नाम भिन्न नाहीत हेच सांगते. *''नामरूप भगवान माझा। नामरूप भगवान,''* हा आमच्या मामांच्या सिंहासनातून ऐकू आलेला चरण, किंवा *''नाम परब्रह्म वेदार्थे,''* ही ज्ञानेश्वरीतील ओवी तेच स्पष्ट करणारी आहे. तेव्हा ''भगवंत सार'' असे म्हटल्यावर त्याचे नामही सारभूतच आहे हे सांगावयास नकोच. म्हणूनच भगवान शंकरांनी भगवंताचे नाम जपणे सोडले नाही. *''सार सार सार विठोबा नाम तुझे सार। म्हणूनी शूलपाणी जपताहे वारंवार,''* हे ज्ञानेशवचन हे स्पष्ट करणारे आहे. *''नामापरते नाही सार। नामे तरलेची अपार,''* इतके नामाचे महत्त्व केशवस्वामी दाखवून देतात. त्रैलोक्यात सारभूत असणाऱ्या या नामाचा उच्चार मनाने तरी व्हावा अशी मनीची तळमळ *''नामापरते सार नाही त्रिभुवनी। ते का तुम्ही मनी उच्चाराना,''* या शब्दांत तुकाराममहाराज प्रगट करतात. अशा प्रकारे एकदा सार काय आहे हे कळल्यावर असार काय आहे हे कळल्यावाचून रहात नाही. मग जाणीवपूर्वक साराचे ग्रहण व असार गोष्टींचा त्याग झाल्यावाचून रहात नाही. यालाच समर्थांनी श्रवणभक्ती असे संबोधले आहे. ते म्हणतात *''ऐसे हे अवघेची ऐकावे। परंतु सार शोधूनी घ्यावे। असार ते जाणोनी त्यागावे। या नाव श्रवणभक्ती.''* नेमके असार काय त्यागावे आणि काय ग्रहण करावे हे सांगताना

समर्थ म्हणतात, *''असारा संसारा त्यजुनी बरवे साधन करी.''* असार संसाराचा त्याग करा व बरवे साधन करा असे समर्थ सांगतात. बरवे साधन म्हणजे काय हो ? *''बरवे साधन सुख शांत मन। क्रोध नाही जाण तिळभरी,''* आणि *''निर्वैर व्हावे सर्व भूतांसवे। साधन बरवे हेची एक,''* असे तुकाराममहाराज सांगतात. ज्याचे योगे मन शांत होते, तिळाएवढासुद्धा राग शिल्लक रहात नाही व चित्त शुद्ध होते व ज्यायोगे निर्वैर अवस्था प्राप्त होते ते बरवे साधन आहे.

मनाचा व श्वसनाचा निकटचा संबध आहे. मनाची गती ही श्वसनाचे गतीवर अवलंबून आहे. मन स्थिर झाले की श्वसन स्थिर होते व श्वसन स्थिर झाले की मन स्थिर होते. मनुष्य रागावला की त्याचे श्वसनाची गती वाढते. अशा प्रकारे मनातला राग व श्वसनाची गती यांचा संबंध आहे. हे मन व त्यातील षड् विकार यांचेवर विजय मिळविण्यासाठी श्वसनाची गती स्थिर होणे आवश्यक आहे. व त्याकरता आमचे निंबरगीकरमहाराजांनी सांगितलेले वायुसाधनच करणेशिवाय गत्यंतर नाही. हे साधन जर आपण पूर्ण करू तर त्या ठिकाणी हे त्रिगुण किंवा माया टिकत नाहीत. नामदेवमहाराज म्हणतात, *''नामाचे साधन करशील पूर्ण। नाही देहधर्म गुण माया,''* ते या अर्थानेच. भगवंत गीतेत म्हणतात, *''दैवी ह्येषा गुणमयी मम माया दुरत्यया। मामेव ये प्रपद्यन्ते मायामेतां तरन्ति ते.''* म्हणजे ''या मायेतून व त्रिगुणातून परपार होणे फार अवघड आहे. पण जे लोक माझे भजन करतील तेच या मायेतून लीलया तरतील.'' हे भजन मात्र भावाने व्हावयास पाहिजे हो ! *''येथ एकची लीला तरले। जे सर्व भावे माते भजले। तया ऐलीच थडी सरले। मायाजाळ,''* हे ज्ञानेशवचन आणि *''भावे करिता हरिचे भजन। देवा होय समाधान,''* हे एकनाथवचन भावाचे महत्त्व सांगते. येथे भाव हा शब्द ''अस्तित्व भाव'' या अर्थाने येतो. हा भाव म्हणजे काही बाजारभाव नव्हे की जो रोज बदलतो.

तत्त्व जाणून घेताना तपशील बाजूला करावा लागतो. शेवाळ बाजूला केल्याशिवाय पाणी दिसत नाही. मणी बाजूला केल्याशिवाय आतील सूत दिसत नाही. संतांनी प्रत्येक गोष्टीतले सार ग्रहण केले. *''उपाधीमाजी गुप्त। चैतन्य जे सर्वगत। ते तत्त्वज्ञ संत। स्वीकारिती,''* असे ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात. संतांनी उपाधी बाजूला केली व ती उपाधी कशामुळे आहे त्याचा स्वीकार केला. म्हणून त्यांना उपाधीची उपाधी कधी वाटली नाही.

ज्ञानेश्वरमहाराजांनी अभंगाच्या पहिल्या कडव्यात सार व असार यांचा स्पष्ट

खुलासा केला आहे :- *''त्रिगुण असार निर्गुण हे सार। सारासार विचार हरिपाठ.''* त्रिगुण हे असार आणि निर्गुण हे सार आहे. व हा सारासार विचार म्हणजेच हरिपाठ आहे. अधोगामी जीवनात त्रिगुण दिसून येतात. त्यापलीकडे जीवनाचे ऊर्ध्वगामी सूत्र आहे. हे सूत्र धरून जे ऊर्ध्वगामी झाले, त्यांना या निर्गुणाचा साक्षात्कार होतो. *''निर्गुणाचा संग मला आजी जाहला। पूर्व दिशे भानु जसा आत उगवला॥ काम क्रोध सर्व कर्म दंडिले बळे। सूत्र धरूनी मध्यभागी वरी चालिले,''* हे मुक्ताबाईंचे विचार येथे चिंतनीय आहेत. गुण म्हणजे जीवनाचे सूत्र हाच अर्थ येथे अभिप्रेत आहे. *''निर्गुणाचे भेटी गेलो गुणासंगे। तव तो झालो अंगे गुणातीत,''* हे वर्म गोरोबाकाकांनी साधकांचे पुढे ठेवले आहे. यावेळी चारही वाचांचा ग्रास होऊन सहजसमाधि अवस्था प्राप्त होते, हे गूज मुक्ताबाई असे सांगतात, *''सहजसमाधि लागली निर्गुणी। खुंटलीसे वाणी बोलवेना.''* हे निर्गुण सार आहे, याने सर्व असार बाजूला होते, मग जीवाचे लक्ष असाराकडे जातच नाही. हंस-क्षीर न्यायाने साराचे ग्रहण होत जाते आणि *''पाणी सांडुनी दुग्धची घ्यावे। ऐसा यत्न करावा। माया सांडुनी भजरंगात्मा। नामी अनुभव घ्यावा,''* या उक्तीचा अनुभव आल्यावाचून रहात नाही. त्रिगुणांबद्दल तुकाराममहाराज सांगतात :- *''रज तम सत्त्व आहे ज्याचे अंगी। याच गुणे जगी वाया गेला॥ तम म्हणजे काय नरकची केवळ। रज तो सबळ मायाजाळ॥ तुका म्हणे ऐका सत्त्वाचे सामर्थ्य। करवी परमार्थ अहर्निशी.''* तमोगुण म्हणजे केवळ नरकच आहे. मागचे लक्षात नाही, पुढचे समजत नाही. गाढ अंधकारातून वाटचाल आहे. *''दाटला चहूकडे अंधार''* अशी अवस्था म्हणजे तमोगुण. रजोगुण म्हणजे मायाजाळ आहे. आपल्या अधोगामी जीवनात जे रज:कण आहेत, ते म्हणजे रजोगुण आहे. रजोगुणाचे आकर्षण साहजिकच बाहेर असते. आणि बाहेर फारच ठेचा लागल्या तर क्वचित प्रसंगी परमात्म्याची आठवण होते हा सत्त्वगुण. हा उदयाला येईपर्यंत नाहीसा होतो; हा टिकत नाही. या त्रिगुणांमुळे मनुष्यप्राणी वाया गेला आहे असे सांगणारे तुकाराममहाराज शेवटच्या कडव्यात मात्र सत्त्वगुणाचे वर्णन करीत आहेत ते कसे काय? ज्या सत्त्वगुणाचे सामर्थ्य तुकाराममहाराजांनी वर्णिलेले आहे तो सत्त्वगुण शुद्ध सत्त्वगुण आहे; त्याचे योगे अहर्निश परमार्थ घडतो. या सत्त्वगुणालाच समर्थ रामदासस्वामींनी *''चौथा गुण''* असे संबोधले आहे :- *''एक गुण तो ब्रह्माचा। एक गुण तो विष्णूचा। एक गुण तो रुद्राचा। चौथा गुण तो वेगळा। अगम्य त्याची लीळा.''*

परमात्मरूपाचे ठिकाणी उत्पन्न होणाऱ्या भ्रमाचे ठिकाणी हे त्रिगुण निर्माण

होतात व जीवाला भ्रमात पाडतात. या त्रिगुणात्मक वृत्ती लोपल्या तर भ्रम दूर होऊन *''माया तेच ब्रह्म आहे आणि माया नाहीच आहे,''* हे प्रत्ययाला येते. या त्रिगुणात्मक वृत्ती असार आहेत. त्यांचा निरास झाला की उरेल ते निर्गुण; तेच सार आहे. भ्रम हा निर्माण झाला, अस्तित्वात आला आणि गेला; त्यात सत्यत्व नसल्याने त्याचे बुडाशी असणारे सारभूत स्वरूप तेच सत्य असल्याने, परमात्मा हा सगुण म्हटला काय किंवा निर्गुण म्हटला काय दोन्ही एकच.

या संदर्भात ''अमृतवाणी''मध्ये आमचे मामा म्हणतात, *''तीनी पैल जाणे। तीन काय ओळखणे॥ सत्त्व रज तम तीन। पैल निर्गुणाची खूण॥ गोविंद म्हणे वर्म जाणे। तीनीत असून नसणे.''* त्रिगुण ओळखले की साधक मायेतून परपार होतो, व निर्गुण ब्रह्माप्रत जाऊन पोचतो. त्रिगुणापासून निर्गुणापर्यंत जाताना त्रिगुण, गुण, अगुण, शून्य, सगुण, निर्गुण हे सहा टप्पे पार करावे लागतात. सगुण हे निर्गुणाला टेकलेले आहे. मूर्ती म्हणजे सगुण व पोथी म्हणजे निर्गुण असे म्हणण्याइतकं ते सुलभ नाही, हे येथे लक्षात घ्यावयास हवे.

समर्थ रामदासस्वामी सांगतात, *''मनी लोचनी श्रीहरी तोचि पाहे। जनी जाणता भक्त होऊनि राहे। गुणी प्रीति राखे क्रमू साधनाचा। जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा.''* या श्लोकात 'गुण' हा शब्द 'जीवनाचे सूत्र' या अर्थाने आला आहे. जो जाणता भक्त असतो, ज्याचे जीवनाचे सूत्रावर नितांत प्रेम असते, तोच ज्याचा साधनाचा क्रम असतो, जो डोळ्यांत आणि मनात श्रीहरीलाच पहातो, तोच सर्वोत्तमाचा दास जगात धन्यता प्राप्त करून घेतो. गुणावर - जीवनाचे सूत्रावर - नितांत प्रेम केले असता जीवन हे सूक्ष्मतर, सूक्ष्मतम होते अर्थात ते (म्हणजे श्वसन) नाकातल्या नाकात वाहू लागते. यालाच ''अगुण'' म्हणतात. यापलीकडे शून्य अवस्था आहे. प्रत्येक संताने या शून्याचा शोध घेतला. ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात *''शून्य शोधिले नाही जेणे। काय विवरण केले तेणे.''* ज्याला शून्य समजले नाही त्याला काहीच समजले नाही. यानंतर सगुण व निर्गुण हे टप्पे आहेत. सगुण व निर्गुण हे दोन्ही तसे एकच आहेत. घट्ट तूप व पातळ तूप यांत काही फरक करता येतो कां ? नाही. तसेच येथे आहे. हेच समर्थ रामदासस्वामी असे सांगतात, *''विघुरले तूप थिजले। तैसी निर्गुणची गुणा आले। तेथे काय वेगळे केले। द्रष्टेपणे.''* ज्ञानेश्वरमहाराजही म्हणतात, *''तुज सगुण म्हणो की निर्गुण रे। सगुण निर्गुण एकु गोविंदु रे.''* या सगुणाचे आधारानेच निर्गुण हाताला येते. समर्थ रामदास म्हणतात, *''सगुणाचेनि आधारे । निर्गुण पाविजे निर्धारे। सारासार विचारे। संतसंगे.''*

समर्थांच्या म्हणण्यानुसार सारासार विचाराने, संतसंगतीत सगुणाचे आधारे निर्गुणाप्रत पोचता येते. आता निर्गुण म्हणजे तरी नेमके काय ? समर्थ सांगतात, *''निर्गुण म्हणजे बहुगुण। बहुगुणी अंतरात्मा जाण.''* तेव्हा निर्गुण म्हणजे अंतरात्मा आहे.

ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, *''सगुण निर्गुण गुणाचे अगुण। हरिवीण मन व्यर्थ जाय.''* आता जे आमचे मन हरिविण आहे तेच व्यर्थ आहे. एकदा का साधनाचे अभ्यासाने गुणाचे अगुण होऊन सारभूत निर्गुण - परमात्मा - हरी हाताला आला की मन हे वेगळे राहातच नाही. *'' मन हे राम झाले आता,''* या ज्ञानेश वचनाचा अनुभव त्याला आल्यावाचून राहात नाही.

ज्ञानेश्वरमहाराज अभंगाच्या पुढील कडव्यात म्हणतात, *''अव्यक्त निराकार नाही ज्या आकार। जेथोनि चराचर हरिसी भजे.''* म्हणजे या निर्गुण अव्यक्त अशा आत्म्याचे चराचर भजन करते. म्हणून अन्यत्र ज्ञानेश्वरमहाराज सांगतात, *''देखे मनुष्य जात सकळ। हे स्वभावता भजनशीळ। जाहले असे केवळ। माझ्याच ठायी.''*

शेवटच्या कडव्यात ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, *''ज्ञानदेवा ध्यानी रामकृष्ण मनी। अनंत जन्मोनी पुण्य होय.''* रामकृष्ण हा मनाचा ध्यानाचा विषय झाला की अनंताचा साक्षात्कार होतो. मनाची चंचलता नाहीशी होते यालाच पुण्य असे म्हणतात. या योगाने *''मनाची चंचलता। मोडोनी स्वरूपी पडला गुंता। मिळोनी गेले आत्मया अनंता। मन मुकले मनपणा,''* या ज्ञानदेव तेहत्तिशीतील ओवीचा अनुभव आल्यावाचून रहात नाही. ज्या सारासार विचाराच्या योगे हा साक्षात्कार होतो तोच हरिपाठ होय.

## (४)

**भावेविण भक्ति भक्तीवीण मुक्ति । बळेवीण शक्ति बोलो नये ॥१॥**
**कैसेनी दैवत प्रसन्न त्वरित । उगा राहे निवांत शिणसी वाया ॥२॥**
**सायास करिसी प्रपंच दिननिशी । हरिसी न भजसी कवण्या गुणे ॥३॥**
**ज्ञानदेव म्हणे हरिजप करणे । तुटेल धरणे प्रपंचाचे ॥४॥**

भाव, भक्ती आणि अन्य काही विषय या अभंगात आले आहेत.

भाव कळला तर भक्तीच्या गोष्टी. भक्ती घडली तर मुक्तीच्या गोष्टी. व अंगात बळ असेल तर शक्तीच्या गोष्टी कराव्यात.

*''भाव कळेना भक्ती घडेना। उगाच म्हणे मला पाव॥ कसा मला तारील पंढरीराव.''* भाव कळला तर भक्ती घडते व मग परमात्म्याची प्राप्ती होते.

भक्ती म्हणजे काय आहे हो ? नारदभक्तीसूत्रात नारदांनी भक्तीची उत्कृष्ट व्याख्या दिली आहे :- *''सा तु अस्मिन् परमप्रेमरूपा.''* भक्ती म्हणजे परमात्म्याविषयी वाटणारे श्रेष्ठ असे प्रेम, प्रेमाची पराकाष्ठा म्हणजे भक्ती. भक्ती म्हणजे दुसरे तिसरे काही नसून चैतन्याकडे आपली वृत्ती वळवणे. *''चैतन्याकडे वृत्ती वळविणे या नाव भक्ती,''* हे शिवरामांचे वचन येथे लक्षात घेण्याजोगे आहे. आता चैतन्य किंवा परमात्मा म्हणजे तरी काय, हे कळलं की भक्ती करणं शक्य आहे. आता, *''भावेवीण भक्ति बोलो नये,''* असे ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात. भावाचा आणि देवाचा अतिनिकटचा संबंध आहे. एकभावाने नामाचे उच्चाराशी जर जीवाचे तादात्म्य झाले तर देव त्या जीवाचा अंकित होऊन राहतो. ज्यांना भाव म्हणजे काय हे कळले आहे असे भाव न खाणारे जे भाविकजन आहेत, त्यांचे हातीच देव असतो. *''तुका म्हणे देव भाविकाचे हाती,''* हे खरे.

भाव म्हणजे काय ? अनेक जीव आहेत, पदार्थ आहेत, अनेक ब्रह्मांडे गरगर फिरत आहेत. पण मातीच्या कणांपासून या सर्वांचे अस्तित्व एकच आहे. हा जो अस्तित्वभाव आहे त्यात फरक नाही. आपले अस्तित्वाची जाणीव ज्या भावाने - गुणधर्माने - होते तो आपला अस्तित्वभाव आहे, तोच तो भाव आहे. त्याला धरून नामसाधना होणे आवश्यक आहे. आपले अस्तित्व बाह्यत: कशावरून सिद्ध होते ? श्वसनावरून. म्हणून श्वसनाला धरून नामसाधना होणे आवश्यक आहे. त्याशिवाय

परमात्म्याचा किंवा चैतन्याचा अनुभव येणार नाही.

भावाविषयी ज्ञानेश्वरमहाराज सांगतात, *''रामकृष्णवाचा भाव हा जीवाचा। आत्मा जो शिवाचा रामजप.''* रामकृष्ण वाचा म्हणजे इडापिंगला हा जीवाचा भाव आहे. हेच आमचे मामा रामपाठात वेगळ्या शब्दांत असे सांगतात : *''भाव म्हणजे काय ज्याविण सर्व वाव। जयाचा प्रभाव देही दिसे॥ भाव कळो येता देव कळो येई। अन्यत्र उपायी शिणतसे॥ गोविंद म्हणे भाव अंतरी धरावा। अभाव टाकावा नामयोगे.''* हा भाव आहे तोवर आपले अस्तित्व आपल्याला जाणवते. तो नाहीसा झाला की आपले अस्तित्वच संपते. असा याचा प्रभाव देहात स्पष्ट होतो. याचे अभावी देह हा जड होऊन निचेष्टित होतो. हा भाव कळला की देव कळला असाच अर्थ होतो. एकनाथमहाराज तर सांगतात की भाव हाच देव आहे - *''भाव तोचि देव भाव तोचि देव। ये अर्थी संदेह नका धरू.''* या नाथमहाराजांचे मताशी तुकाराममहाराज सहमत आहेत. ते म्हणतात, ''भाव तोचि भगवंत.''

या भावाशिवाय नि:संदेह देव कळत नाही, असे *''भावेवीण देव न कळे नि:संदेह''* या वचनात ज्ञानेश्वरमहाराज सांगतात. Existence is God हे वचन येथे विचारात घेणेजोगे आहे. हा भाव कळल्याशिवाय देव कळत नाही व देव कळल्याशिवाय भक्ती करता येत नाही.

आता हा भाव धरावयाचा म्हणजे काय करावयाचे ? *''न संडी रे भावो टाकी रे संदेहो। रामकृष्णी टाहो नित्य फोडी,''* असे ज्ञानेश्वरमहाराज सांगतात. संदेह टाकणे म्हणजेच भाव धरणे. आणि संदेहाची निवृत्ती म्हणजेच आत्मज्ञानाची प्राप्ती होय. हे होण्याकरता रामकृष्ण या जीवनाचे गतीमध्ये नित्य भगवंताचे नामाचा टाहो फोडला म्हणजे झाले. आता हा भाव धरला तर भक्ती घडते व तसे करणारा जीव नवद्वाराचा निरोध करून दशमद्वारात येतो व तेथे त्याला चार मुक्ती प्राप्त होतात. म्हणजेच भक्तीशिवाय मुक्तीच्या गोष्टी बोलून काही उपयोग होत नाही.

याचप्रमाणे बळ असल्याशिवाय शक्तीच्या गोष्टी करण्यात काय अर्थ आहे ? *''नायमात्मा बलहीनेन लभ्य:.''* ज्याच्याजवळ आत्मबळ असेल त्याला आत्मशक्ती आजमावता येते. संतमहात्मे हे आत्मबळाने त्या आत्मशक्तीला प्रसन्न करून घेतात. या संदर्भात ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात *''भावबळे आकळे येऱ्हवी नाकळे। करतळी आवळे तैसा हरी.''* भावाचे बळ असेल तर परमात्म्याचा अनुभव येतो, एरवी नाही. या भावबळाशिवाय परमात्म्याचे हाताला धरता येत नाही. *''धरोनी केशवा आणा

*भावबळे,''* ही तुकोक्ती हेच स्पष्ट करते.

ज्ञानेश्वरमहाराज पुढील कडव्यात सांगतात, *''कैसेनी दैवत प्रसन्न त्वरित। उगा राहे निवांत शिणसी वाया.''* येथे *''दैवत कसे प्रसन्न होईल''* असा प्रश्न ज्ञानेश्वरमहाराजांनी केलेला नाही. येथे ''कैसे'' हा शब्द ''कसणे'' या अर्थाने आला आहे. *''कसा, कष्ट करा, मग दैवत प्रसन्न होईल,''* असे ज्ञानेश्वरांना म्हणावयाचे आहे. आता कष्ट कोणते करायचे, ते पुढील अर्ध्या चरणात ज्ञानेश्वरमहाराज असे सांगतात : *''उगा राहे निवांत शिणसी वाया.''* विविध उपाय करून शिणू नका. उगेपणात रहा, निवांत रहा. महाराजांचा हात आपल्या मस्तकावर आला म्हणजेच तो निवांतपणा प्राप्त होणार आहे. मस्तकावर हात येणे म्हणजे त्यांची क्रिया आपल्या ठिकाणी उमटणे होय. *''याकारणे निवृत्तिनाथु। जव मस्तकी न ठेवी हातू। तोवरी केवी होईल निवांतु। बोले ज्ञानदेव होये निवृत्तीचा,''* हे ज्ञानेशवचन हेच सांगते.

आता निवांतपणा प्राप्त झाल्यावर काय करायचे हो ? *''उगाच एकांती बैसावे। तेथे हे समजोन घ्यावे। घ्यावे आणि सांडावे। प्रभंजनासी,''* हे समर्थांचे वचन आणि *''बैसोनी निवांत शुद्ध करी चित्त। तया सुखा अंत पार नाही॥ येवोनी अंतरी राहील गोपाळ। सायासाचे फळ बैसलिया,''* हे निळोबारायांचे मत ही दोन्ही निवांत बसून काय करायचे हे सांगावयास पुरेशी आहेत.

ज्ञानेश्वरमहाराज पुढील कडव्यात सांगतात, *''सायास करिसी प्रपंच दिननिशी। हरिसी न भजसी कवण्या गुणे.''* दिननिशी होणारे सायास हाच तो प्रपंच आहे. सायास म्हणजे स + आयास म्हणजे षड् विकारात्मक आयास होय. दिननिशी म्हणजे चंद्र-सूर्य-नाड्यांचे गतीत होणारे षड् विकारात्मक आयास; तोच प्रपंच आहे. या चंद्रसूर्यनाड्यांचे गतीत देहाची धारणा ठेवून राहिल्याने, तिचा निरास न झाल्याने, ''कोण'' स्थानाचे ठिकाणी उलट गतीची क्रिया साधत नाही. व त्यामुळे तेथून निघणारा जो रजतमात्मक गुण - कोण गुण - त्या गुणाचे मुळे हरीचे भजन साधत नाही. अधोगामी जीवनातील गुण आपल्या परमार्थाच्या आड येतो; म्हणून हकाराचा निरोध होणे आवश्यक आहे. ऊर्ध्वगामी धारणेने परमार्थ साधता येतो व अधोगामी धारणेने प्रपंच साधता येतो. ज्याची अधोगामी धारणा नाहीशी झाली त्याचा जीवभाव विभक्त राहूच शकत नाही.

ज्ञानेश्वरमहाराज शेवटच्या कडव्यात सांगतात, *''ज्ञानदेव म्हणे हरिजप करणे। तुटेल धरणे प्रपंचाचे.''* हरिजपाने प्रपंचाचे धरणे नाहीसे होते. माणसे हरिजप

करतात, पण त्यांना असा अनुभव येतो का ? येत नसेल तर का येत नाही ? कारण ते हरिनाम - रामनाम - त्यांच्या हाताला आलेले नसते. इडा व पिंगला जेव्हा सुषुम्नाकार होतात तेव्हा हे रामनाम हाताला येते, असे आमचे मामा रामपाठात सांगतात :- *''इडा आणि पिंगला सुषुम्नेत सरता। रामनाम हाता येत असे.''* इडा-पिंगला, सकार-हकार हे शब्द आपण परमार्थात वापरतो. त्यांचा नेमका अर्थ काय आहे ? सकार ही ऊर्ध्वगती आहे आणि हकार ही अधोगती आहे. इडा ही डावी गती आहे, पिंगला ही उजवी गती आहे. इडा व पिंगला एक होऊन जेव्हा ऊर्ध्व वाहतात तेव्हा तीच सुषुम्ना. जेव्हा इडा व पिंगला सुषुम्नेत मिळतात तेव्हा त्यातून निघणारे स्वयंसिद्ध नाम म्हणजेच हरिनाम - रामनाम - आहे. हा हरिनामजप साधला असता,हकाराचे निरोधाबरोबरच भ्रमाचा, देहबुद्धीचा, द्वैताचा निरास होतो आणि हे प्रपंचाच्या उपाधीचे धरणे सहजच नाहीसे होते. या नामसाधनेने आपले आत जो प्रपंच शिरला आहे तो नाहीसा होतो. याचा अर्थ असा की - संसारातला/प्रपंचातला मीपणा गेला की संसार हा ब्रह्मरूप होतो आहे. *''एकचि मीपणे नागविले घर। ना तरी संसार ब्रह्मरूप,''* हे ज्ञानेशवचन ही गोष्ट स्पष्ट करणारे आहे. अहो पितळेचा डाग येण्याचा गुणधर्म गेला की पितळ म्हणजेच सोने आहे. ज्ञानेश्वरमहाराज सांगतात, *''सांगे पितळेची गंधिकाळीक। जै फिटती होय निःशेख। तै सुवर्ण काई आणिक। जोडू जाईजे.''* म्हणजे संसारातील मी व माझे गेले, संसारातील आसक्ती गेली की संसारच ब्रह्मरूप होतो.

या संतमहात्म्यांनी संसाराचा उपयोग परमार्थाकडे करून घेतला. त्यांनी परमार्थाच्या बागेला संसाराचे कुंपण घातले. *''परमार्थाच्या बागी संसार कुंपण। देवाची राखण करिताती,''* ही संतोक्ती येथे लक्षात घेणेजोगी आहे.

अशा प्रकारे हरिजपाने प्रपंचाचे बंधन उरत नाही. माणसाने हेच साधावयास हवे आहे.

## (५)

**योग याग विधी येणे नोहे सिद्धी । वायाची उपाधी दंभधर्म ॥१॥**
**भावेविण देव न कळे नि:संदेह । गुरुविण अनुभव कैसा कळे ॥२॥**
**तपेविण दैवत दिधल्याविण प्राप्त । गुजेवीण हित कोण सांगे ॥३॥**
**ज्ञानदेव सांगे दृष्टांताची मात । साधूचे संगती तरणोपाय ॥४॥**

योगादिक कर्म ही जर नुसती कवायत झाली तर ''तालीम गेली आणि आखाडे राहिले'', ''भजन गेले आणि अड्डे राहिले'', ''सण गेला आणि शिमगा राहिला'' असा प्रकार होतो. प्रत्येक गोष्टीतले वर्म पाहिले पाहिजे. नाही तर सारे कठिणच आहे. योग किंवा याग हे नुसते देहाचे अनुषंगाने होत रहातील, तर आत्मसाक्षात्कार हे जे आपले उद्दिष्ट आहे ते साधणार नाही. देहाचे अनुषंगाने होणाऱ्या योगाने जर चैतन्याचा वियोग होणार असेल तर त्या योगाने देव कसा भेटेल हा मोठा प्रश्न आहे. हा 'योग' हा 'वियोगाचा योग' असून दु:खभोग हाच त्याचा परिपाक आहे. खरे म्हणजे जीव हा परमात्मा आहे. पण मीपणाने - जीवपणाने - सारा घोटाळा झाला आहे. जीवपणाचा वियोग हाच परमात्म्याच्या स्वरूपाचा योग आहे. तो देहाचे अनुषंगाने कसा साधेल, असा प्रश्न आहे. *''नवल स्वरूपाचा योग। जीवपणाचा वियोग,''* हे वर्म समर्थ रामदासांनी सांगितले आहे. परमात्म्याच्या वियोगानेच जीवत्व आले आहे. *''तुझिया वियोगे जीवित्व आले,''* हे समर्थवचन हेच सांगते. 'योग' हा कठिण आहे; त्याने परमात्म्याची प्राप्ती होणे कठिणच आहे. *''योग तो कठिण साधिता साधवेना। तेणे गा चिद्घना न पाविजे,''* हा मुकुंदराजांचा विचार येथे लक्षात घेण्यासारखा आहे. माणिकप्रभुमहाराज हेच सांगतात - *''योग याग विधी येणे नोहे सिद्धी.''* योगयागविधीने परमात्म्याची सिद्धी / प्राप्ती होत नाही. योगयाग ही वाया गेलेली खटपट आहे. ज्ञानेश्वरमहाराज सांगतात, *''अष्टांगयोगे न सिणिजे। यम नियम निरोध न कीजे र्‍या.''* अष्टांगयोग हा नुसता शीण आहे. हठयोगाचे योगाने अणिमा, गरिमा वगैरे सिद्धी मिळविता येतात. अन्न व पाणी यांची जरुरी लागत नाही. वाचासिद्धी प्राप्त होऊन जे बोलाल ते खरे होऊ लागते. आकाशमार्गाने कोठेही संचार करता येतो. दुसऱ्याचे मनातील विचार जाणण्याचे सामर्थ्य निर्माण होते. साहजिक या योग्याची चमत्कार करणेकडेच प्रवृत्ती वाढते. तो परमात्मरूपापर्यंत जाऊ शकत नाही. योगामुळे

ऋद्धिसिद्धीला न भुलता पुढे जाण्याचे सामर्थ्य एखाद्याचे ठिकाणीच असते. तेव्हा या योगाने परमात्मरूप होणे अत्यंत कठिण असल्याने माणसाने योगाच्या भरीला पडू नये असे ज्ञानेश्वरमहाराज सांगत आहेत. योगमार्गाने समाधी लावता येईल पण सायुज्यता मिळविण्याची हातोटी सहज साधनात आल्याशिवाय साधणार नाही.

चांगदेव योगिराज होते. तरीसुद्धा खरे वर्म त्यांच्या हाताला आले नव्हते, त्यांना खऱ्या परमात्मरूपाची ओळख झालेली नव्हती. सात वर्षांच्या मुक्ताबाई त्यांना मार्गदर्शन करताना म्हणतात, *''झालासी तटस्थ नव्हे ती समाधी। उपायाची शुद्धी नेणोनिया ॥ बोलता चालता देखता ऐकता। न ढळे सर्वथा तेचि साधी॥ ब्रह्मादिक ऐसी समाधि इच्छिती। तयांना हे स्थिती प्राप्त नाही॥ ऐके रे चांगया ग्रासी हे कल्पना। पावसी त्या खुणा मुक्ताई म्हणे.''* तटस्थ होणे म्हणजे समाधी नव्हे. बोलताना, चालताना, पहाताना, ऐकताना ज्यात बदल होत नाही अशी समाधी, चांगदेवा, तुम्ही साधा. ब्रह्मादिक देव ही समाधी प्राप्त करून घेण्याची इच्छा करतात पण त्यांना ती साधत नाही. या समाधीचे वर्णन आमचे मामांनी रामपाठात फार सुंदर केले आहे. ते म्हणतात, *''समत्वाचे सुखी हरीची समाधी। इतर उपाधी नुरे जेथे॥ सदा सर्वकाळ अंतरी अढळे। कदापि नढळे तेची साधी॥ गोविंद म्हणे ऐसी समाधी साधिता। वैकुंठ ये हाता अनायासे.''* सर्वत्र सम असणाऱ्या चैतन्याशी तादात्म्य झाल्यामुळे समत्वाचे सुखात जीव येतो आणि त्याला हरि - समाधी प्राप्त होते. व त्या ठिकाणी कोणतीही उपाधी उरत नाही. ही उपाधी कोणती ? अहो, कल्पनेची उपाधी आहे. कल्पनेची उपाधी नाहीशी झाल्याशिवाय समाधी नाही. *''सांडी कल्पना उपाधी। हीच साधूला समाधी,''* ही संतोक्ती साधूंना कोणती समाधी प्राप्त होते हे दाखविणारी आहे. कल्पनेचा निरास हीच परमात्मवस्तूची ओळख आहे. तुकोपनिषद सांगते, *''वस्तूते ओळखा सांडा रे कल्पना.''*

भगवत्प्राप्तीचे सोपे वर्म ज्ञानेश्वरमहाराज असे सांगतात, *''वाचा गीत गाईजे। गाता गाता श्रवणी ऐकिजे रया.''* म्हणजे जे भगवंताचे नाम शरीरात उमटतेय त्याचे श्रवण करा. जीव त्या नामाच्या नादाशी तदाकार होतो; त्याचा देहभाव नाहीसा होतो. योग्याला दुर्लभ असा परमात्मा त्या जीवाला प्राप्त होतो. ज्ञानेश्वरमहाराज हे राजयोगाचा म्हणजे सहज साधनाचा पुरस्कार करतात. हे सहज साधन कोणत्याही परिस्थितीत कोणासही साधता येते. सहजसाधनाने सायुज्यता प्राप्त होते. *''नाम मुखी गाता जोडे सायुज्यता,''* असे नाथवचन[1] सांगते. सायुज्यता म्हणजे परमात्म्याशी एकरूपता.

१. एकनाथमहाराजांचे वचन.

यज्ञयागानेसुद्‌धा देवाची प्राप्ती होणे अवघडच आहे. पूर्वी यज्ञात पशुहत्या होत असे. परंतु यज्ञानंतर ते पशु पुन: जिवंत केले जात असल्याने ते यज्ञ सिद्‌धीला गेले. यज्ञ सफल झाला असे केव्हा मानतात ? यज्ञानंतर *''विष्णवे नमो विष्णवे नम:''* असे म्हटल्यावर स्वर्गात घंटानाद व्हावयास पाहिजे, मारलेले पशु जिवंत व्हावयास हवेत, अनेक ब्रह्मज्ञानी ब्राह्मण जेवले पाहिजेत आणि पावसाळ्याचे दिवस नसताना पाऊस पडावयास हवा. हे सर्व अवघड आहे. तर याचे फळ काय ? स्वर्गप्राप्ती. पण पुण्यसंचय संपला की पुन: मृत्युलोकी यावे लागते. *''क्षीणे पुण्ये मर्त्यलोकं विशन्ति.''* मग तो स्वर्ग मिळवून फायदा काय ? ज्या यज्ञयागात उपाधी व दगदग फार आणि ज्याचे फळ मात्र नाशवंत, त्या फंदात पडा कशाला ? असल्या यज्ञापेक्षा नामजपयज्ञ श्रेष्ठ आहे.

योग किंवा याग यांना उपाधी आहे. ही उपाधी वाया म्हणजे भ्रामक, खोटी आहे. उपाधीला काही तरी नाम आणि रूप असते आणि *''जे जे रूप आणि नाम। तो तो अवघाची भ्रम,''* असे समर्थ रामदास सांगतात. कोणतीही उपाधी म्हटली की तिला अवस्थांतर, स्थित्यंतर आणि रूपांतर हे अटळ असते. याउलट ज्यात कोणताही बदल होत नाही ते ब्रह्म सत्य, नामरूपातीत, निरुपाधिक आहे. जीवाला पिंडाची उपाधी आहे आणि शिवाला ब्रह्मांडाची उपाधी आहे. पण परमात्म्याला मात्र दोनीही उपाधी नाहीत. खरे म्हणजे उपाधी असार आहे. तथापि उपाधीत गुप्तरूपाने एकच परमात्मा भरून राहिला आहे. तोच अनेक रूपांनी व नामांनी नटलेला आहे. या विश्वातील प्रत्येक पदार्थात चैतन्य आहे. परंतु उपाधीचे आकारमानानुसार आपण एकाच चैतन्याला भिन्न नावे देतो. सर्वत्र असणाऱ्या चैतन्याचे ज्ञान आम्हाला का होत नाही ? कारण आपण फक्त उपाधी पहातो. संतमहात्मे मात्र सर्वत्र चैतन्य पाहतात. उपाधीमुळे भ्रम झाला आहे. रूप नसलेल्या चैतन्याला नाव ठेवल्याने भ्रम निर्माण झाला आहे. भ्रम निर्माण करणारी ही उपाधी वाया आहे.

ज्ञानेश्वरमहाराज पुढील कडव्यात सांगतात, *''भावेविण देव न कळे नि:संदेह। गुरुवीण अनुभव कैसा कळे.''* नि:संदेह देव हा भावाशिवाय कळत नाही. संदेहात असणाऱ्या आम्हाला नि:संदेह परमात्मा कसा कळणार ? व्यवहारापेक्षा परमार्थात आम्हाला संशय फार. देवावर संशय, गुरूंवर संशय, नामाबद्दल संशय; संशयामुळे नाश ओढवतो. ''संशयात्मा विनश्यति'' असे भगवंत सांगतात. तेव्हा आपला कोठेतरी पक्का विश्वास पाहिजे; त्याशिवाय हाताला काही लागणार नाही. कोठलेही शास्त्र घेतले

तरी त्यातील मूलतत्त्वांवर विश्वास ठेवावाच लागतो. तसे अध्यात्मशास्त्रात आहे. नाम हे तारक आहे, सद्गुरू हे तारक आहेत यावर आपला विश्वास पाहिजे. तरच पुढे वाटचाल होईल अन्यथा नाही. सद्गुरुवचनावर विश्वास ठेवून नामाचा पाठ घडला तर संशय नाहीसा होतो. गुरुकृपेशिवाय नाम कळत नाही, नाम कळल्याशिवाय नामाचा पाठ घडत नाही, आणि नामाचा पाठ घडल्याशिवाय संशय जात नाही. गुरुकृपेशिवाय संशय जात नाही आणि संशय गेल्याशिवाय आत्मानुभव येत नाही. *''संदेह अवघा फिटला। जनी म्हणे उदय झाला,''* हे जनाबाईंचे वचन लक्षात घ्यावे. थोडक्यात गुरूंचे मार्गदर्शन आणि कृपा यांशिवाय परमात्म्याचा अनुभव येणे तसे अवघडच.

ज्या भावाशिवाय देव कळत नाही त्या भावाचे स्वरूप आपण मागे[1] पाहिले आहेच.

ज्ञानेश्वरमहाराज पुढील कडव्यात सांगतात :- *''तपेविण दैवत दिधल्याविण प्राप्त। गुजेवीण हित कोण सांगे.''* तपाशिवाय दैवत प्राप्त होत नाही. कोणतीही गोष्ट बारा वर्षे सतत करणे याला बाह्यत: तप म्हणतात. तप to shine असे आमचे संस्कृतचे शिक्षक गुरुवर्य दीक्षित सांगत. तप म्हणजे नेमके काय हे आमचे मामा असे सांगतात :- *''तप म्हणजे काय प्रकाशित होणे। अंधार दवडणे बुद्धीतील.''* आपल्या सद्गुरूंनी आपल्याला जे करावयास सांगितले आहे ते आणि तेच सातत्याने विश्वास धरून करीत रहाणे हेच ते तप आहे; त्यायोगे दैवत प्रसन्न होणार आहे.

आपण पूर्वी जसे दिले असेल तसेच प्राप्त होणार आहे. एक सुभाषितकार म्हणतो :- *''पूर्वदत्तेषु या विद्या पूर्वदत्तेषु यद्धनम्। पूर्वदत्तेषु या भार्या अग्रे धावति धावति.''* पत्नी, विद्या, द्रव्य हे सर्व पूर्वदत्त आहे. देवाची प्राप्ती होण्यासाठी काही तरी द्यावेच लागते. नामदेवमहाराज स्पष्टच सांगतात, *''घेसी तेव्हा देसी ऐसा अससी उदार.''* देवाची प्राप्ती होण्यासाठी आपला अहंकार आधी द्यावा लागतो. कारण अहंकार गेल्याशिवाय ईश्वराचा साक्षात्कार घडत नाही. म्हणून *''दिधल्याविण प्राप्त''*होत नाही असे ज्ञानेश्वरमहाराज सांगतात. ते पुढे म्हणतात, *''गुजेवीण हित कोण सांगे.''* हिताच्या गोष्टी अंत:करणात प्रेम असल्याशिवाय कोण कुणाला सांगतो ? आई, वडील, गुरू यांच्या मनात आपल्याविषयी कळवळा असतो, म्हणून त्यांना हितकारक गोष्टी बोलल्याशिवाय भागत नाही. आपले आईवडील हे व्यवहारात आपले हित कशात आहे हे सांगू शकतील; पण त्यांना आपले आध्यात्मिक हित माहीत असेलच असे

१. भावाचे सविस्तर स्पष्टीकरण मागील चौथ्या अभंगाच्या निरूपणात झाले आहे. (सं.टी.)

नाही; ते त्यांना माहीत असले तर फारच चांगले. संतांना मात्र आपले आध्यात्मिक हित कशात आहे हे माहीत असते. ते अभंगातून सांगतात :- *''हित व्हावे तरी दंभ दुरी ठेवा। चित्तशुद्धी सेवा देवाची ते''*, *''हित ते हे एक रामकंठी राहे,''* या उक्ती येथे लक्षात घ्याव्यात.

ज्ञानेश्वरमहाराज शेवटच्या कडव्यात सांगत आहेत, *''ज्ञानदेव सांगे दृष्टांताची मात। साधूंचे संगती तरणोपाय.''* साधूंचे संगतीत तरणोपाय आहे, हाच खरा दृष्टांत, हे रबर घेऊन कोण खोडून काढेल काय ? आता, साधूंची संगत करायची म्हणजे काय करायचे हो ? साधू आत की आम्ही आत, साधू बाहेर की आम्ही बाहेर, म्हणजे साधूंची संगत काय ? आणि अशी संगत करणे आणि घडणे हे सर्वांचे बाबतीत शक्य आहे का ? मग खरी संगत कोणती ? *''संगती म्हणजे समगति जाणे,''* हे रामपाठातील वचन संगती म्हणजे काय हे स्पष्ट करणारे आहे. संतांनी जीवनाची जी 'समगति' दाखवून दिली तीच खरी संतसंगती आहे. या समगतीत हरीची आठवण होऊ लागली की तेथे देहभावच रहात नाही. *''समगतीमाजी हरीचा आठव। नुरे देहभाव देहामाजी,''* हा रामपाठातील चरण स्पष्ट करतो. जीवनाचे समगतीत होणारा हरीचा आठव हेच साधन आहे. देहभाव नाहीसे करणारे हे पुरे साधन आमचे गुरुलिंगजंगममहाराजांनी आपणास दिले आहे; ते करताना मात्र अपुरे पडता कामा नये. परमात्म्याचे आठवात देहाचाआठव न राहिल्याने परमानंदाची जोड होते आणि मनाचे मनत्व न राहिल्याने देवाचा साक्षात्कार होतो. जीवनाच्या समगतीत हरीचा आठव झाल्यामुळे देहभावातीत झालेल्या जीवाला उन्मनी अवस्थेत देवाचे दर्शन होते, हाच खरा दृष्टांत आहे. देवाचे दर्शन झाल्यावर जीवनात नामाशिवाय दुसरे काही उरत नाही; हाच जीवाचा तरणोपाय आहे. *''अमृत संजीवनी। नाम तुझे अमृत संजीवनी॥ सकल मंगल निधि सर्व कार्य सिद्धि। तरणोपाय जनी,''* हे समर्थवचन हेच स्पष्ट करते.

परमार्थात दृष्टांत होणे हे महत्त्वाचे आहे. परमार्थातील अनुभव आत येतो, बाहेर नाही. म्हणून शरीराचा व दृश्याचा जेथे संबंध येतो तो दृष्टांत असत नाही. दृश्याचा अंत म्हणजे दृष्टांत. दृष्टांत हा ज्याच्या-त्याच्यापुरता असतो. परमार्थातील दृष्टांत म्हणजे अंतरात परमात्म्याचा साक्षात्कार होय.

(६)

साधुबोध झाला तो नुरोनिया ठेला । ठायीच मुराला अनुभव ॥१॥
कापुराची वाती उजळली ज्योती । ठायीच समाप्ती झाली जैसी ॥२॥
मोक्षरेखे आला भाग्ये विनटला । साधूचा अंकिला हरिभक्त ॥३॥
ज्ञानदेवा गोडी संगती सज्जनी । हरी दिसे जनी वनी आत्मतत्त्वी ॥४॥

परमार्थात संतसज्जनांची संगती महत्त्वाची मानली जाते. पण साधुसंत कुणाला म्हणतात ? सा म्हणजे सहा, धु म्हणजे धुतले गेले; ज्याचे सहा धुतले गेले आहेत तो साधु. म्हणजे ज्याचे अंत:करणातील काम, क्रोध इत्यादी सहा विकार नष्ट झाले आहेत तो साधु. ज्याच्या मनातील काम, क्रोध इत्यादी सहा वृत्ती नाहीशा झाल्या आहेत तो साधु. कोणतीही वस्तू नष्ट होत नाही तर तिचे रूपांतर होते, असा अध्यात्मशास्त्राचा आणि विज्ञानाचा सिद्धांत आहे. साहजिकच काम, क्रोध नष्ट झाले याचा अर्थ त्यांचा विषय, कार्य बदलते. *''काम असावा ईश्वर भजनी। क्रोध असावा इंद्रिय दमनी। ईश्वरतीर्थप्रसाद ग्रहणी। लोभ अपार असावा॥ मोह असावा सज्जनासी। मद असावा दुर्जनासी। मत्सर तो संसारासी। असावा तो असे की,''* या ओव्यांत सांगितल्याप्रमाणे सहा वृत्तींचे कार्य बदलले की त्या निवृत्त होतात. या ओव्यांतील काही शब्दांचे अर्थ असे आहेत. उदा. भजन म्हणजे भकाराचे - तेज:स्वरूपाचे - ठिकाणी जन म्हणजे इंद्रियांची वृत्ती. तीर्थ म्हणजे ऊर्ध्वप्रवाहिनी गंगा. त्यातून उत्पन्न होणारी उन्मनतेची प्रसन्नता म्हणजे प्रसाद. सज्जन म्हणजे सत्+जन. सत् म्हणजे सत्यस्वरूपाने ज्याच्या इंद्रियवृत्ती जनयुक्त झाल्या तो सज्जन. दुर्जन म्हणजे ज्याच्या इंद्रियवृत्ती परमेश्वरापासून दूर जातात तो. संसार म्हणजे जन्ममरणाचे संसरण. अशा प्रकारे सहा वृत्तींचे प्रवृत्तिधर्म नाहीसे होऊन ज्याचे ठिकाणी निवृत्तिधर्म उत्पन्न झाले आहेत तो साधू. हा साधूच खरा ज्ञानी असतो हे *''तोची ज्ञानी भला। षड्विकार नाही ज्याला''* आणि *''ज्याचे अंतरी ज्ञान जागे। तोचि साधू ओळखावा,''* या वचनांत सांगितले आहे. तसेच, सदा स्वरूपाचे अनुसंधान असणे हे साधूचे आणखी एक लक्षण आहे; या अनुसंधानामुळे तो जगात असूनही जगावेगळा असतो, असे *''सदा स्वरूपानुसंधान। हेचि साधूचे मुख्य लक्षण। जनी असोन आपण। जगावेगळा''* किंवा *'' तो जनी दिसतो परी तो वेगळा,''* या चरणांत सांगितले आहे. साधू हे जरी देहाने वेगळे असले तरी ते ब्रह्म या

वस्तूच्या स्वरूपाचे ठिकाणी एकरूप झालेले असतात. *''साधु दिसती वेगळाले। परी ते स्वरूपी मिळाले। अवघे मिळोनि येकचि जाले। देहातीत वस्तु,''* असे समर्थ रामदास सांगतात. ''स्वरूपी रहाणे'' हा साधूंचा ''स्वधर्म'' असतो.

आता 'स्वधर्म' म्हणजे काय हेही पहाण्यासारखे आहे. जेव्हा साधनाचे अभ्यासाने चित्ताची एकाग्रता आणि दृष्टीची स्थिरता यामुळे श्वसनाची गती आधारचक्रस्थानापर्यंत येते आणि मग तेथून सहस्रदलस्थानापर्यंत श्वसनाच्या गतीचा एक तंतु होतो, हाच स्वधर्म आहे. स्वधर्माचे आचरण हाच नित्य यज्ञ आहे; तेथे पापाला प्रवेश नाही. ज्ञानेश्वरमहाराज सांगतात *''स्वधर्मू जो बापा। तोचि नित्य यज्ञ जाण पा। म्हणौनी वर्तता तेथ पापा। संचारु नाही.''*

असे जे साधू त्यांना हे जग ब्रह्मरूपच दिसते, ते सर्व भूतांकडे समदृष्टीने पहातात आणि सर्वांवर दया करतात. *''सर्वांभूती दया। साधु म्हणावे ऐशीया॥ जग ब्रह्मरूप जाण। हेच साधूचे लक्षण॥ सर्वांभूती समदृष्टी। तोचि साधु इथे सृष्टी,''* असे एकनाथमहाराजांनी सांगितले आहे. *''यथा चित्तं तथा वाचि यथा वाचि तथा क्रिया। चित्ते वाचि क्रियायां च साधूनामेकरूपता''* या सुभाषितात म्हटल्याप्रमाणे जे चित्तात, तेच वाचेत आणि तेच क्रियेत असणारा असा साधू असतो.

अशा साधूचा बोध व्हावयास हवा. सर्वांनाच साधूचा बोध होत नाही. कारण चित्त शुद्ध असल्याशिवाय साधूचा बोध चित्तात शिरत नाही. *''चित्त अशुद्ध जो होइ। बोध प्रवेशेना पाही.''* ही मामांची 'अमृतवाणी' आणि *''तैसे चित्त शुद्ध नाही। तरी बोध करील काई,''* ही तुकोक्ती हेच सांगतात. चित्त शुद्ध होण्यासाठी निवांत बसले पाहिजे. *''बैसोनी निवांत शुद्ध करी चित्त,''* असे तुकोक्तो सांगते आणि साधूचा बोध मनात शिरेपर्यंत साधन करावयास हवे असे ज्ञानेश्वरी सांगते - *''जववरी अर्जुना । तो बोधु भेटेना मना । तवची यया साधना। भजावे लागे.''*

आता एखाद्याला साधुबोध झाला आहे हे कसे ओळखायचे ? तो साधक जर 'नुरोनिया ठेला' या अवस्थेत असेल तर त्याला साधुबोध झाला आहे असे समजावे. 'मी कोणी XYZ आहे' हे त्यांच्या गावीही नसते. *''पूज्यता डोळा न देखावी। स्वकीर्ती कानी नायकावी। हा अमुका ऐसी नोहावी। सेची लोका,''* ही ओवी त्यांच्या बाबतीत अनुभवास येते. आम्ही साधूंचा उपदेश घेतो; पण त्यामागचे वर्म म्हणजे 'अहंकार नाहीसा होणे' हे मात्र आपण सोयीस्कररीत्या विसरून जातो.

साधुबोधाने काय होते? प्राणापानांचे मुशीत सतरावी जीवनकळा प्रदीप्त

करून, सर्व मनोवृत्तींचा होम झाला की तेथे सर्वत्र जे आत्मरूप दिसणे व आपल्या ठिकाणी सर्व दिसणे हे अनुभवास येते. हे ज्ञान अद्वय आहे. तेथे अनुभव घेणारा म्हणून निराळा कोणी शिल्लक उरतच नाही. वेगळेपणा राहतच नाही. *''आपणची जग जाहला। हरी हा आपणची जग जाहला॥ आपणची देव भक्त होऊनी पूजितो आपणाला,''* या कृष्णदयार्णवांचे वचनांचा अनुभव त्याला येतो. ज्ञेय-ज्ञाता-ज्ञान, ध्येय-ध्याता-ध्यान असा त्रिपुटीचा प्रकार रहात नाही. हाच खरा बोधाचा परिणाम आहे. यापेक्षा वेगळे आणि काही नाही. आपल्या आत जे प्रविष्ट होऊन राहिले आहे तेच सर्व विश्वात प्रविष्ट होऊन राहिले आहे. याचा अनुभव येणे हाच खरा अनुभव आहे. येथे अनुभवी, अनुभव्य आणि अनुभव ही त्रिपुटी रहातच नाही.

हा जो अनुभव आहे तो चत्वार देहांचा निरास झाल्याशिवाय प्राप्त होत नाही. *''देहाच्या निरसने पाविजे त्या ठाया.''* म्हणजे तो ठाय सापडण्यासाठी चत्वार देहांचा निरास होणे आवश्यक आहे. या 'ठायी' विश्वाचा अनुभव घेणारा अनुभवी जाणण्याचा अनुभव आहे, आणि तो नि:शब्द आहे म्हणजे तो शब्दांत व्यक्त करण्याजोगा नाही. लौकिक दृष्टीनेसुद्धा कोणत्याही गोष्टीचा प्राप्त होणारा अनुभव हा नि:शब्दच असतो. जसे-साखरेची गोडी शब्दांनी सांगता येत नाही. *''साखरेची गोडी नयेची सांगता। अनुभवाची कथा ऐसी गे माय,''* ही संतोक्ती हेच दर्शविते. परमात्मा तर नि:शब्दरूप आहे. मग त्याचा अनुभव नि:शब्दरूप असल्यास आणि ब्रह्मरूप होणाऱ्या भक्तास तो शांत आणि मौनरूप करीत असल्यास नवल ते काय ? यालाच ''ठायीच मुराला अनुभव'' असे ज्ञानेश्वरमहाराज म्हणत आहेत.

ज्ञानेश्वरमहाराज पुढील कडव्यात सांगतात, *''कापुराची वाती उजळली ज्योती। ठायीच समाप्ती झाली जैसी.''* येथे कापूर हा शब्द चार देह असा अर्थ दाखवितो. एकाक्षरी कोशात 'क' म्हणजे चार असा अर्थ आहे. पुर म्हणजे देह असा अर्थ आहे. या चार देहांमध्ये अनुभवास येणारी एकच वायुस्वरूपिणी वात ही ज्योतीचे योगाने उजळली गेली म्हणजे वायुस्वरूपात सुप्त असणारी आत्मज्योती ही प्रकाशित झाली, आणि त्या योगाने ठायीच समाप्ती झाली म्हणजे कुंभक धारणेत ही वात समाप्त झाली, लय पावली आणि चत्वार देहांच्या निरसनाअंती स्वयंप्रकाश अनुभव येऊ लागला. याठिकाणी जीव-शिवाचा, मी-तू-पणाचा, मोह-धारणेचा लय होतो.

पुढील कडव्यात ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, *''मोक्षरेखे आला भाग्ये विनटला। साधूचा अंकिला हरिभक्त.''* मोक्षरेखेला कोण येतो ? आपण आपणास पहाणे हाच

मोक्ष आहे. आपण म्हणजे आत्मवस्तू ही निर्विकल्प आहे. आणि सविकल्प वस्तू म्हणजे दृश्य. आत्मा निर्विकल्प असल्याने कल्पनेचे द्वारा आत्मवस्तूचे दर्शन होत नाही. आत्म्याला पहावयाचे असल्यास आपल्या दृष्टीतील दृश्य दूर झाले पाहिजे. दृश्याला पहाणे हे कशामुळे उत्पन्न झाले आहे ? दृश्य वस्तूमुळे. आणि दृश्य हे नि:शब्द ब्रह्माचे ठिकाणी जे चंचलत्व निर्माण झाले त्या चंचलत्वामुळे निर्माण झाले आहे. समुद्राच्या पातळीत डोळा ठेवून पाहिले तर काही दिसत नाही, पण लाट आली तर ती दृश्य होते. तद्वत चैतन्याचे ठिकाणी लहर उठली व तिच्यामुळे पाहणे निर्माण झाले. एखादा मनुष्य आंधळा असला किंवा एखाद्याने डोळे मिटले तरी पाहणे हे उरतेच. ''मला काही दिसत नाही'' ही जाणीव ज्यामुळे उत्पन्न झाली असे काहीतरी दृश्य त्याला दिसतच असते. कारण त्याचा प्रज्ञाचक्षू जागा असतो. या प्रज्ञाचक्षूनेच आपण स्वप्नातील दृश्ये पहात असतो. चिद्गुणांच्या योगाने उत्पन्न झालेल्या दृश्याला दृश्यत्व देण्याचे सामर्थ्य या उपाधियुक्त साक्षिभूत प्रज्ञाचक्षूचे ठिकाणी आहे. आता हा साक्षिभूत प्रज्ञाचक्षू किंवा द्रष्टा आपणाशीच म्हणजे आत्मतत्त्वाशी समरस होईल तेव्हा तेथे 'पहाणे' हे पहाणेपणाला मुकेल यात संशय नाही. असा जो कोणी आत्मतत्त्वाशी समरस झाला तो मोक्षरेखे आला. अशा माणसांच्या भाग्याला तोड नाही. त्यांना खऱ्या अर्थाने साधुबोध झाला असल्याने ते साधूंच्या अंकित होऊन रहातात. आणि मग नारायणमहाराज जालवणकरांनी म्हटल्याप्रमाणे, *''जो साधुचा अंकित जीव झाला। त्याचा असे भार निरंजनाला,''* असा प्रकार होतो.

शेवटच्या कडव्यात ज्ञानेश्वरमहाराज सांगतात, *''ज्ञानदेवा गोडी संगती सज्जनी॥ हरि दिसे जनी वनी आत्मतत्त्वी.''* सज्जनांच्या संगतीची गोडी लागली की जनात, वनात सर्वत्र हरीच दिसायला लागतो. असे संतसंगतीचे माहात्म्य आहे.

(७)

**पर्वताप्रमाणे पातक करणे । वज्रलेप होणे अभक्तासी ॥१॥**
**नाही ज्यासी भक्ति ते पतित अभक्त । हरीसी न भजत दैवहत ॥२॥**
**अनंत वाचाळ बरळती बरळ । त्या कैसेनी दयाळ पावे हरी ॥३॥**
**ज्ञानदेवा प्रमाण आत्मा हा निधान । सर्वाघटी पूर्ण एक नांदे ॥४॥**

पातक म्हणजे काय ? देहाच्या अनुषंगाने जे जे काही घडते त्याची गणना पापातच होते. देहावर राहून देवाची पूजा केली किंवा भगवंताच्या ओव्या गायल्या तरी त्याची गणना पुण्यात होत नाही. जनाबाईंच्या शिव्या देवाला आवडायच्या पण आम्ही देवाच्या ओव्या गातो पण तो आमचेकडे ढुंकूनसुद्धा बघायला तयार नाही. असे का ? देहावर राहून केलेली देवाची सेवा देवापर्यंत पोचतच नाही. आमचा देहभाव कधीच हरपलेला नाही; म्हणून घडते ते सर्व पापच. या पापाचे पर्वतच झाले असणार की नाही ? देह हा पापाचे कारण आहे आणि देह हा पर्वताकार आहे.

देहाच्या अनुषंगाने निर्माण होणारी इच्छा म्हणजे काम आणि ती पुरी न झाल्याने येणारा क्रोध हे दोन मोठे पर्वत आमच्या व परमेश्वराच्या मध्ये आहेत. *''काम क्रोध आड आलेती पर्वत। राहिला अनंत पैलीकडे,''* ही संतोक्ती येथे विचारात घेण्याजोगी आहे. या कामक्रोधाचे पर्वत गुरूंनी मार्ग दाखविल्याशिवाय पार करताच येत नाहीत. म्हणून कबीरसाहेब म्हणतात, *''काम क्रोध दो पर्वत ठाडे। लोभ चोर संगात॥ कौन बतावे वाट गुरुबीन कौन बतावे वाट.''*

येथे ज्ञानेश्वरमहाराजांनी वापरलेला 'पर्वत' हा शब्द 'तृणवत्' सारखा आहे; म्हणून परवत् म्हणजे परक्याप्रमाणे; आमची जी आत्म्याशी परक्याप्रमाणे वागणूक आहे तेच पाप आहे. हे शरीर ज्या आत्म्यामुळे चलनवलन करतंय, त्याचं ज्ञान या शरीरात आत्मा आहे तोवरच व्हावयास नको काय ? ते होत नाही हीच आत्म्याशी प्रतारणा नव्हे काय ? पर्वताकार देहाच्या योगाने जवाएवढ्या आत्म्याशी केलेली प्रतारणा हेच पाप आहे.

दु:ख हे पापाचे द्योतक आहे. एखाद्याच्या जीवनात एकादी दु:खदायी घटना घडली की *'' किती हो पाप बिचाऱ्याचे,''* असे आपण म्हणतो. *''जन्माचे ते मूळ पाहिले शोधून। दु:खासी कारण जन्म घ्यावा,''* हे तुकोपनिषद जन्म हा दु:खाला

कारणीभूत आहे हे स्पष्ट करीत आहे. आपल्या शरीरात असणाऱ्या सूक्ष्म सुखस्थानाच्या मानाने शरीर हे पर्वताप्रमाणे आहे. तेव्हा देहबुद्धीने युक्त होणे व मुक्त असताना पायी शृंखला अडकवणे आणि द्वैती द्वंद्वात सापडून वासनाजालात अडकणे याचेच नाव महत्पाप आहे. अशा रीतीने जो पुण्यशील नाही त्याचे हातून पर्वताप्रमाणे पातक घडते. त्याचा देहभाव वाढू लागतो. त्याची देहबुद्धी दृढ होते. त्याला सोहंचे ज्ञान होत नाही. त्याचा संशय प्रबळ होतो आणि *''यया संशयाहोनी थोर। आणिक पातक नाही घोर,''* या ज्ञानेश्वरांच्या उक्तीप्रमाणे त्याचे पापाची परिसीमा होते.

परमात्म्याच्या प्राप्तीसाठी पुण्य पाहिजे. ते शुद्ध पुण्य पाहिजे. ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, *''स्वर्गा पुण्यात्मके पापे येईजे। पापात्मक पापे नरका जाईजे। मग माते जेणे पाविजे। ते शुद्ध पुण्य.''* परमात्म्याच्या प्राप्तीकरता शुद्ध पुण्याची गरज आहे. नामवाचेने जो राम म्हणतो त्याचेच शुद्ध पुण्य असते. *''राम नामवाचे तोचि एक धन्य। त्याचेचि शुद्ध पुण्य इये जनी,''* असे निवृत्तिनाथ सांगतात आणि हेच उत्तम साधन आहे असे *''उत्तम साधन रामनाम जाण,''* या चरणात एकनाथमहाराज सांगतात.

'देह म्हणजे मी' अशी आपली समजूत असल्याने देहावर आपले फार प्रेम आहे आणि तेच पापकर्म आहे. *''देही जे का प्रेम तेचि आहे पापकर्म.''* म्हणून या देहाचा विसर होणे आवश्यक आहे. म्हणून तुकाराममहाराज देवाची प्रार्थना करतात :- *''देवा आता ऐसा करी उपकार। देहाचा विसर पाडी माझ्या.''* हा देहभाव विसरण्यासाठीच आमच्या गुरुलिंगजंगममहाराजांनी आपल्याला साधन सांगितले आहे. गुरुलिंगजंगम म्हणजे श्रेष्ठ असे चैतन्ययुक्त आत्मतत्त्व. ते आत्मतत्त्व म्हणजेच आमचे निंबरगीकरमहाराज आहेत. त्यांनी आम्हाला देहभाव विसरण्यास पुरे साधन दिले आहे पण ते करण्यास आम्ही अपुरे पडतो याचे काय ?

ज्ञानेश्वरमहाराज पुढील कडव्यात सांगतात, *''नाही ज्यासी भक्ति ते पतित अभक्त। हरिसी न भजत दैवहत.''* आपले मूळ स्वरूपाचे ठिकाणी असणारे उत्कट प्रेम म्हणजेच भक्ती आहे. भक्ती म्हणजे दुसरे तिसरे काही नसून प्रेमाची पराकाष्ठा हीच भक्ती आहे. नारदभक्तिसूत्र सांगते, *''सा तु अस्मिन् परमप्रेमरूपा.''* आपली वृत्ती चैतन्याकडे - आपल्या मूळ स्वरूपाकडे - वळवणे याचे नाव भक्ती. भक्तीविषयी तुकारामहाराज सांगतात, *''भक्ती म्हणजे काय जनी जनार्दन.''* जनांच्या ठिकाणी जनार्दनच कसा भरून राहिला आहे हे ओळखणे म्हणजे भक्ती. *''जन नोहे*

*अवघाचि जनार्दन,''* असे एकनाथमहाराज सांगतात, तर ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, *''जे जे भेटे भूत। ते ते मानिजे भगवंत । हा भक्तियोग निश्चित। जाण माझा.''* परमात्माच जगत्‌रूपाने नटलेला आहे. *''हरी हा आपणाची जग झाला। आपणची देव भक्त होऊनी पूजितो आपणाला,''* असे कृष्णदयार्णव सांगतात. मग *''देव देऊळ परिवारु। कीजे कोरुनि डोंगरु। ऐसा भक्तीचा व्यवहारु । का न व्हावा,''* असा ज्ञानेश्वरमहाराज प्रश्न करतात. देव वेगळा, भक्त वेगळा असे काही नाहीच आहे. वाराच देव आणि आणि वाराच भक्त आहे. हा वारा चैतन्याचा हे मात्र लक्षात घ्यावयास हवे. निजत्वाचे विस्मरणाने आपण कोणीतरी वेगळे आहोत असे आपणास वाटते. अहंकारामुळे आपण देवापासून वेगळे आहोत असे वाटते. निजस्वरूपात आले असता, अहंकार नाहीसा होऊन, परमात्म्याशी तादात्म्य होते, हीच खरी भक्ती. हंसरूपाने परमात्मा सर्वत्र भरून राहिला आहे. त्या हंसरूप परमात्म्याचे ज्ञान होऊन त्याच्याशी तादात्म्य पावणे हीच भक्ती. भगवंताचे हे रूप समजून घ्यावयाचे असेल तर आता वेळ घालवून चालणार नाही. म्हणून ज्ञानेश्वरमहाराज सांगतात, *''तरी झडझडोनि वाहिला निघ। इये भक्तिचिये वाटे लाग। जिया पावसी अव्यंग। निजधाम माझे.''* समर्थही तेच सांगतात, *''मना सज्जना भक्तिपंथेचि जावे। तरी श्रीहरी पाविजे तो स्वभावे.''*

अशा प्रकारची भक्ती ज्याचे अंत:करणात नाही, ज्याचे मूळ स्वरूपावर प्रेम नसून देहावर प्रेम आहे, त्याला ज्ञानेश्वरमहाराज अभक्त म्हणतात. अशा अभक्ताचे जिणे लाजिरवाणे असते; त्याच्यापेक्षा दगड बरा असे ज्ञानेश्वरमहाराज पुढील ओवीत सांगतात :- *''तैसे माझिये भक्तिविण। जळो ते जियालेपण। अगा पृथ्वीवरी पाषाण। नसती काई.''* भक्ती नसणारा पशू आहे, असे नाथमहाराज म्हणतात :- *''भक्तिविण पशु कशासी वाढला.''* असा जो अभक्त आहे तो पतित आहे. पतित म्हणजे पडलेला. चैतन्याशी फारकत घेतलेला तो पतित होय. असा जो अभक्त हा दैवहत आणि पतित आहे तो हरीचे भजन करीत नाही आणि मग त्याला भजनाचे समाधान मिळत नाही. कारण भजनाची परिणती समाधानात होते, असे *''हेची देवाचे भजन। सदा राहे समाधान,''* हे जनाबाईंचे वचन किंवा *''भजनी पावे समाधान''* ही नाथांची उक्ती सांगते.

ज्ञानेश्वरमहाराज पुढील कडव्यात सांगतात :- *''अनंत वाचाळ बरळती बरळ। त्या कैसेनी दयाळ पावे हरी.''* देवाचे नाव सोडून आपण जे काही बोलतो त्याला ज्ञानेश्वरमहाराज बरळ म्हणतात. बोलायचे तर फक्त हरीच बोलायचे. आपली *''राऊंड*

*टेबल कॉन्फरन्स''* नको. गुरूदेव रानडेसाहेबांचे वेळी काही साधक मंडळी *''ज्ञानेश्वर एक होते की दोन''*या विषयावर चर्चा करीत होती. गुरुदेव त्यांना म्हणाले, ''हा कडबा कशाला चघळताय ?'' ज्ञानेश्वर एक की दोन या प्रश्नाची चर्चा हा जर कडबा, तर मग आम्ही जे बोलतो त्याला काय म्हणायचे हा प्रश्न आहे. आपल्या बडबडीने काही साध्य होणार नाही. आमचे मामा म्हणायचे ''जगामध्ये अनेक प्रकारची व्यसने आहेत. त्या सर्वांत बोलण्याचे व्यसन वाईट आहे.'' आमची ही ''बत्तिशी'' थांबल्याशिवाय (ज्ञानदेव) तेहत्तिशी आम्हाला कळणार नाही हे निश्चित. आमचा सगळा गोंधळ हा काटेदरवाज्यातील आहे. त्यामुळे हरी कसा भेटणार हा येथे ज्ञानेश्वरमाऊलींचा प्रश्न आहे.

ज्ञानेश्वरमहाराज शेवटच्या कडव्यात म्हणतात, *''ज्ञानदेवा प्रमाण आत्मा हा निधान। सर्वा घटी पूर्ण एक नांदे.''* ज्ञानेश्वरमहाराजांना सर्वांघटी पूर्णत्वाने नांदणारा एक आत्माच प्रमाण आहे. *''सर्वांघटी राम देहादेही एक। सूर्यप्रकाशक सहस्त्ररश्मी,''* हे ज्ञानेशवचन सांगते की सूर्याला प्रकाश देणारा, देहात आणि अदेहात असणारा, घटाघटात नांदणारा आत्माराम एकच आहे. आणि अज्ञानाचा पडदा दूर झाल्याशिवाय हा आत्माराम अनुभवाला येत नाही असे कबीरसाहेब आपल्या पदात सांगतात. ते म्हणतात, *''घटघट बीचमें रामरमैया। झूठा पंचरंग खोल ॥ रे तुज राम मिलेगा। घुंघटका पट खोल.''*

## (८)

संतांचे संगती मनोमार्गे गति । आकळावा श्रीपती येणे पंथे ॥१॥
रामकृष्ण वाचा भाव हा जीवाचा। आत्मा जो शिवाचा रामजप ॥२॥
एकतत्त्वी नाम साधिती साधन। द्वैताचे बंधन न बाधिजे ॥३॥
नामामृत गोडी वैष्णवा लाधली। योगिया साधली जीवनकळा ॥४॥
सत्वर उच्चार प्रल्हादी बिंबला। उद्धवा लाधला कृष्णदाता ॥५॥
ज्ञानदेव म्हणे नाम हे सुलभ। सर्वत्र दुर्लभ विरळा जाणे ॥६॥

संतांच्या संगतीचे आणि नामाचे महत्त्व या अभंगात ज्ञानेश्वरमहाराजांनी सांगितले आहे.

परमात्म्याचा साक्षात्कार संतांचे संगतीत मनोमार्गाचे आकलन होऊनच होऊ शकतो; परमात्म्याचे प्राप्तीसाठी दुसरा मार्ग नाही. दुसऱ्या मार्गाने जर गेला तर परमात्मा हाताला न येता तिसरेच काहीतरी हाताला येईल. *''पंथ आहेत अनेक। दाविती ना विठ्ठल एक,''* ही मामांची अमृतवाणी हेच स्पष्ट करते.

श्रीपती परमात्मा हा जर दृश्य पदार्थांपैकी एक असता तर डोळा उघडला तर तो दिसला असता. त्यासाठी संतसंगतीची जरुरी नव्हती. तसेच परमात्म्याकडे जाणारा मार्ग हा जर बाहेर असता तर पाय असलेल्या जीवांना आपल्या पायांनी तो मार्ग आक्रमण करता आला असता. त्यासाठीही संतसंगतीची काही गरज नव्हती. पण तसं नाही. परमात्मा बाहेर नाही. तो आपल्या आत आहे. अर्थातच त्याचेप्रत जाणारा मार्गही आतच आहे. जरी देव विश्वात्मक आहे तरी तो सर्वांचे आत लपला आहे, म्हणून तो या डोळ्यांना दिसत नाही. *''पै स्थूल दृष्टी माते। भरवसा बांधुनि चित्ते। देखती मज अविनाशाते। परी दिसे कैसा,''* हे ज्ञानेशवचन, आणि *''अस्थीचा देही मासाचा डोळा । पाहेन म्हणे ब्रह्माचा गोळा,''* हे समर्थांचे म्हणणे हेच दर्शविते. जो डोळा देवाला पाहू शकतो तो डोळा गुरूंनी आपल्यास द्यावा लागतो. शिवदिनी सांगतात, *''गुरूच्या उपकारा उपकारा। नाहीच पारावारा॥ देऊनी आपुला डोळा। डोळा दाखविले घननीळा.''*

परमात्म्याकडे जाण्याचा मार्ग सुद्धा गुरूंनी - संतांनी - दाखवावा लागतो. म्हणून ज्ञानेश्वरमहाराजांनी मनोमार्गाचा उल्लेख केला आहे. हा मार्ग बाहेर जगात नाही;

तो आतच आहे. आपण झोपी जाताना मन झुकांडी देऊन ज्या मार्गाने जाते तोच मार्ग आहे परमात्मप्राप्तीचा. आता झोपी जाताना मन कसं झुकांडी देऊन जातं हे जर आपण पहात बसलो तर झोप लागेल का ? आणि इतकं ते जर सहज असतं तर संतांची कृपा, सत्संग याची गरज तरी काय होती ? अहो, प्रत्येकात काहीतरी वर्म आहे; ते समजण्यासाठी गुरुकृपेची, सत्संगतीची गरज आहे. त्यांनी मार्ग दाखविला तर त्या मार्गाचे आक्रमण होणार. नाही तर शक्य आहे का ते ? मार्ग दाखविणे हा संतांचा उपकार आहे. *''मार्ग दाऊनी गेले आधी। दयानिधी संत ते॥ येणेची पंथे चालो जाता। न पडे गुंता कोठे काही,''* या शब्दांत निळोबारायांनी संतांविषयीची कृतज्ञता व्यक्त केली आहे.

आता, संत ओळखल्याशिवाय त्यांची संगती कशी घडणार ? डॉक्टर, वकील यांच्या नावाच्या पाट्या असतात तशी संतांची कोठे पाटी असते का ? आणि पाटी असेल तर ते संत असतील का हाही प्रश्नच आहे. मग संत कसा ओळखायचा ? रामदासस्वामींनी संतांची लक्षणे सांगितली आहेत. ते म्हणतात :- संत हा लोकांच्यामध्ये असतो आणि तो लोकांसारखाच दिसतो पण त्याचे वागणे आणि बोलणे हे इतरांपेक्षा वेगळे असते. त्याचे अंतरात परमात्म्याचे ज्ञान जागृत असते. *''तो जनी दिसतो परी वेगळा। वर्तता भासे निराळा॥ जो जनामध्ये वागे। परी जगावेगळी गोष्टी सांगे॥ ज्याचे अंतरी ज्ञान जागे। तोचि साधु.''* त्याला सर्वत्र चैतन्य दिसत असते; त्यामुळे त्याच्या दृष्टीला सृष्टी दिसत नाही; त्यामुळे दृश्यामुळे होणारे परिणाम त्याचेवर होतच नाहीत. *''दृश्य पदार्थ त्या निर्मळा। स्पर्शलाच नाही,''* असे समर्थ म्हणतात. शाश्वत व अशाश्वत, नित्य आणि अनित्य यांचा विवेक करून त्याने भगवंताला जाणलेले असते, असे समर्थ सांगतात :- *''जो जाणेल भगवंत। तया नाव बोलिजे संत। जो शाश्वत आणि अशाश्वत। निवाडा करी.''* त्याची वृत्ती संथ झालेली असते आणि त्याचे परिसरात आपण गेलो असता आपलीही वृत्ती क्षणभर का होईना संथ होते. समर्थ सांगतात, *''करी वृत्ती जो संथ तो संत जाणा.''* प्राणिमात्र ज्या आत्मस्वरूपाच्या विषयी झोपलेले म्हणजे अज्ञानी असतात, त्याबाबतीत संत जागा म्हणजे ज्ञानी असतो; संतमहात्म्यांना झोपेतसुद्धा चैतन्याची जाणीव असते. आणि ज्या ठिकाणी आपण जागे असतो, जागरुक असतो त्या ठिकाणी म्हणजे व्यवहारात संतांचे अजिबात लक्ष नसते. ज्ञानेश्वरमहाराजांची ओवी हेच सांगते, *''देखै भूतजात निदेले। तेथेची जया पाहले। आणि जीव जेथ चेइले। तेथ निद्रित जो.''* अशा महात्म्याला पाहिले असता

आपले स्वरूप म्हणजे ईश्वरस्वरूप पाहिल्याचे समाधान होते. कारण संत आणि देव यांत फरक नाही. *''देव ते संत देव ते संत। निमित्त त्या प्रतिमा,''* ही तुकोक्ती स्पष्ट आहे. आपले जे हरवले आहे ते संतांना पाहिल्यावर प्राप्त होतंय असे ज्ञानेश्वरमहाराज सांगतात, *''तैसे हारपले आपणपे पावे। तै संताते पाहता गिवसावे। म्हणौनि वानावे ऐकावे। तेचि सदा.''* म्हणून संतसंगती ही फार महत्त्वाची आहे.

आता संगत करावयाची म्हणजे काय ? ते आत, आम्ही आत, ते बाहेर की आम्ही बाहेर; कायम त्यांचे बरोबर रहाणे, म्हणजे सत्संगती का ? आणि हे असे करणे सर्वांना शक्य होईल का ? संतांचे बरोबर असणे ही सत्संगती नाही असे नाही. पण तिला काही मर्यादिपर्यंत अर्थ आहे. असली संगत संतमहात्म्यांना अपेक्षित नाही. सत्संगती म्हणजे नेमके काय हे मामांनी रामपाठात सांगितले आहे. ते म्हणतात, *''संगती म्हणजे समगती जाणे। दाविताती खुणे संतराय.''* म्हणजे अंतर्‌खुणेने संतांनी जी जीवनाची समगती दाखवून दिली तीच खरी संतसंगती आहे.

सत्संगतीचा महिमा सांगणारा एक श्लोक असा आहे :-

*सत्संगतीचा महिमा कळेना। सत्संग होता मन हे ढळेना।*
*सत्संगती पावन सौख्यकारी। सत्संगती सर्व दु:खासी वारी॥*

याच हरिपाठात एका अभंगामध्ये ज्ञानेश्वरमहाराज सांगतात की साधूंचे संगतीत तरणोपाय आहे - ''साधूंचे संगती तरणोपाय.'' संतांच्या संगतीमुळे देव भक्तांच्या पाठीमागे लागतो असे सांगणारे समर्थ रामदासांचे वचन आहे :- *''संतांचेनी संगे देव पाठी लागे। सांडू जाता मागे सांडवेना.''* संतांची संगत केल्याने जन्माचे सार्थक होते असे *''संगत संतनकी करले। जनम का सार्थक कछू करले,''* या पद्यात कबीरसाहेब सांगतात; तर गुप्त असणारा आत्माराम प्रगट होतो, असा आपला अनुभव ज्ञानेश्वरमहाराज *''बरवा संतसमागमु। प्रगटला आत्मारामु,''* या शब्दांत सांगतात.

ज्ञानेश्वरमहाराज पुढील कडव्यात म्हणतात, *''रामकृष्ण वाचा भाव हा जीवाचा। आत्मा जो शिवाचा रामजप.''* राम आणि कृष्ण या जीवनाच्या दोन गती आहेत. जीवन म्हणजे श्वसन आणि श्वसन हेच जीवन आहे. राम आणि कृष्ण या दोन गतींनाच इडा व पिंगला असे म्हणतात आणि हाच तो जीवाचा भाव आहे; कारण याचेवरूनच जीवाचे अस्तित्व ओळखतात. रामकृष्णवाचा म्हणजे श्वसनाची चाललेली अखंड हालचाल. या रामकृष्णगती म्हणजेच इडापिंगला गती जेव्हा सुषुम्नाकार होतात तेव्हा रामनाम - जे शिवाचा आत्मा आहे ते - हाताला येत असल्याचे रामपाठात

आमचे मामांनी नमूद केले आहे. ते म्हणतात, *''इडा आणि पिंगला सुषुम्नेत सरता। रामनाम हाता येत असे.''*

ज्ञानेश्वरमहाराज पुढील कडव्यात सांगत आहेत :- *''एकतत्त्वी नाम साधिती साधन। द्वैताचे बंधन न बाधिजे.''* एकतत्त्वीनाम हेच अद्वैताचे साधन आहे. नाम हेच एकतत्त्व आहे. *''गोविंद म्हणे नाम तत्त्व,''* असे मामांची अमृतवाणी सांगते आणि नाम हे एकच तत्त्व असे आहे की ते मनाला घट्ट पकडेल. *''एक तत्त्व नाम दृढ धरी मना,''* या चरणात ज्ञानेश्वरमहाराज मनाला उपदेश करीत नाहीत; तर ते म्हणतात की एकतत्त्व नामच मनाला घट्ट पकडू शकते. जास्त शक्तीचा पदार्थ कमी शक्तीच्या पदार्थाला खेचू शकतो. मनाची शक्ती नामाच्या शक्तीपुढे क:पदार्थ आहे.

एकतत्त्व नाम हे जे अदैवताचे साधन आहे तेच सगळ्या संतांनी साधले आहे. निरनिराळ्या पंथांच्या अध्वर्यूंच्या वचनाद्वारे हे पहाता येईल. हे जे एकतत्त्वी नाम आहे ते श्वासोच्छवासात आहे. म्हणून श्वासोच्छवासात नाम घ्यावयाचे आहे. रामदासस्वामी सांगतात, *''नाम श्वासोच्छ्वासी असे। परब्रह्म तेथे वसे.''* श्वासात नामाचे स्मरण सांगणारी वचने अशी :- अक्कलकोट स्वामीसमर्थ सांगतात, *''सकळही संती हे केले साधन। नामाचे स्मरण श्वासामाजी.''* गुलाबरावमहाराज म्हणतात, *''आता मज एक सुचला उपाव। घेईन मी नाव श्वासोच्छ्वासी.''* तर गोंदवलेकरमहाराज सांगतात, *''नका करू हो आळस। राम जपा श्वासोच्छ्वास.''* नामाशिवाय जो काणी माणूस श्वासोच्छ्वास करतो त्याच्या जीवनाला धिक्कार असो. तुलसीदास सांगतात, *''श्वासो लेवे नामबिना सो जीवन धिक्कार.''* श्वासात नाम साधून काळाला हटवता येते. *''श्वासोच्छ्वासी नाम साधुनी। काळाला हटवी,''* असे मामामहाराज केळकर सांगतात. श्वासातील नामातच परब्रह्म आहे. *''परब्रह्म तेथे वसे''* आणि परब्रह्म हे एकतत्त्व आहे. असे एकतत्त्वी नामाचे साधन साधले असता, ब्रह्माच्या एकत्वाचा अनुभव येतो, दैवताचे बंधन रहात नाही, आणि द्वैतामध्येच अद्वैत कसे आहे, याची प्रचीती आल्याशिवाय रहात नाही.

पुढील कडव्यात ज्ञानेश्वरमहाराज सांगतात, *''नामामृत गोडी वैष्णवा लाधली। योगिया साधली जीवन कळा.''* एकतत्त्वी नामाची गोडी वैष्णवांना लागते. त्यामुळे त्यांना नामाखेरीज दुसरे काही उच्चारायची लाजच वाटायला लागली. हे स्पष्ट करणारी तुकोक्ती अशी आहे *''गोड तुझे नाम विठोबा आवडते मज। दुजे उच्चारिता मना वाटतसे लाज.''* विठ्ठलवाणीने विठ्ठलाचा उच्चार हीच ती अमृत संजीवनी आहे.

हे तुकाराममहाराज *''विठ्ठल विठ्ठलवाणी । अमृत हे संजीवनी,''* या वचनाद्वारे स्पष्ट करीत आहेत. नाम म्हणजेच अमृतसंजीवनी असे *''अमृत संजीवनी। नाम तुझे अमृतसंजीवनी,''* या चरणात समर्थ सांगत आहेत. आपल्या शरीरातून जे आत्मतत्त्व बाहेर पडले असता शरीर हे मृत होते, ते आत्मतत्त्व हे अमृत आहे आणि ते आत्मतत्त्व म्हणजेच भगवंताचे - परमेश्वराचे - नाम आहे. नाम या शब्दातच त्याचा अर्थ साठविलेला आहे. नाम म्हणजे न + आम. आम म्हणचे प्राण. ज्यात प्राणाशिवाय अन्य काही नाही ते नाम. आता ज्या नामात प्राणाशिवाय काही नाही, जे नाम चैतन्यरूप आहे, ज्या नामामुळे आत्माराम प्रगट होतो, ते नाम या आपल्या कातड्याच्या मुखाने कसे घेता येणार ? *''तुका म्हणे नाम। चैतन्य निजधाम,''* हे तुकारामांचे वचन आणि *''एका जनार्दनी नाम। सुख चैतन्य निजधाम''* हे नाथांचे वचन काय सांगतात, याचा काही विचार करायला नको का ? या मुखाने जर नाम घ्यावयाचे असते तर ते सद्गुरूकडून जाणून घेणे आवश्यक आहे का ? *''सद्गुरूवाचूनि नाम नये हाता। साधन साधिता कोटिगुणे॥ नामदेव म्हणे सद्गुरूपासूनी। नाम घ्या जाणोनी ना ना काही,''* असे नामदेवमहाराजांनी का सांगितले आहे ? म्हणजे नाम कोणते आणि ते कसे घ्यावयाचे हे सद्गुरूशिवाय कळत नाही. हे चैतन्यरूप नाम या कातडी मुखाने घेता येत नाही हे निश्चित.

परमात्म्याप्रत पोचण्याचा भक्तांचा मार्ग वेगळा, योग्याचा मार्ग वेगळा, ज्ञान्याचा मार्ग वेगळा असे काही नाही आहे. परमात्म्याप्रत जाण्यासाठी एकच मार्ग आहे. त्यांचा अनुभव एकच असतो पण शब्द वेगळे असतात. ज्याला वैष्णव - भक्त - नामामृत म्हणतात त्यालाच योगी *'सतरावी जीवनकळा'* म्हणतात. हे नामामृत ज्याचे मुखात सतत अनुस्यूत असते, तोच परमार्थात पुरा म्हणजे पूर्ण, असे *''ज्याचे मुखी नाम अमृत सरिता। तोचि एक पुरता घट्ट जाणा,''* हे निवृत्तिनाथमहाराजांचे वचन सांगते.

ज्ञानेश्वरमहाराज पुढील कडव्यात म्हणतात, *''सत्वर उच्चार प्रल्हादी बिंबला। उद्धवा लाधला कृष्णदाता.''* प्रल्हादाच्या ठिकाणी नामाचा उच्चार बिंबला होता. नाम बिंबणे याचा अर्थ नामाशिवाय दुसरे काही न रहाणे. प्रल्हादाच्या ठिकाणी नाम असे बिंबले होते. चोखामेळांच्या अंगीही नाम बिंबले होते. म्हणून त्यांच्या हाडांतून 'विठ्ठल' ध्वनी निघाला. जनाबाईच्या अंगी नाम बिंबले होते; म्हणून त्यांनी थापलेल्या शेणीतून विठ्ठल-विठ्ठल ध्वनी बाहेर पडला. स्वामी स्वरूपानंदांचे ठिकाणी नाम बिंबले होते म्हणून त्यांचे हृदयातून सोहं ध्वनी निघाला. आमचे मामांनीसुद्धा *'नाम सर्वांगात*

*बिंबले आहे'* अशी खात्री करून घेतली होती. ते म्हणतात, *''नाम सर्वांगी बिंबले। दास म्हणे परीक्षिले.''* आणि याची प्रचीती त्यांनी सर्वांना करून दिली. *''हरी बोला एकांती हरी बोला लोकांती। देहत्यागाअंती हरी बोला,''* हा एकनाथमहाराजांचा चरण त्यांनी सत्य करून दाखविला. सर्व नाड्या सुटल्या असता, त्यांनी *''श्रीराम जयराम जयजयराम''* हा उच्चार मोठ्याने केला व तो सर्व उपस्थित माणसांनी ऐकला.

शेवटच्या चरणात ज्ञानेश्वरमहाराज सांगतात, *''ज्ञानदेव म्हणे नाम हे सुलभ। सर्वत्र दुर्लभ विरळा जाणे.''* नाम सोपे आहे म्हणूनच ते अवघड आहे. मॅट्रिकच्या परीक्षेत मुले मराठी विषयात नापास होतात; कारण ते सोपे आहे म्हणूनच ना ? हे नाम, हे आत्मतत्त्व एखादा विरळाच जाणतो. ''हजारो मनुष्यांत एखादा सिद्धी मिळविण्याचा प्रयत्न करतो आणि सिद्धी मिळविणाऱ्या हजारो सिद्धांतून एखादाच मला सत्यत्वाने जाणतो,'' असे भगवान सांगतात :- *''मनुष्याणां सहस्रेषु कश्चिद् यतति सिद्धये। यततामपि सिद्धानां कश्चिन्मां वेत्ति तत्त्वतः.''* म्हणजे आत्मज्ञान - नाम - किती अवघड आहे ते पहा. आमचे मामा म्हणायचे, '' नामाबद्दल बोलता येईल, वाचता येईल, ऐकता येईल, लिहिता येईल पण नाम घेणे हे अतिशय अवघड आहे.'' म्हणून हे दुर्लभ नाम संतांकडून - सद्गुरूंकडून - जाणून घेणे आवश्यक आहे.

(९)

**विष्णूवीण जप व्यर्थ त्याचे ज्ञान। रामकृष्णी मन नाही ज्याचे ॥१॥**
**उपजोनी करंटा नेणे अद्वयवाटा। रामकृष्णी पैठा कैसेनी होय ॥२॥**
**द्वैताची झाडणी गुरूवीण ज्ञान। त्या कैचे कीर्तन घडे नामी ॥३॥**
**ज्ञानदेव म्हणे सगुण हे ध्यान। नामपाठ मौन प्रचंचाचे ॥४॥**

नामाचा जप कसा व्हावयास हवा याचे वर्म ज्ञानेश्वरमहाराजांनी या अभंगात सांगितले आहे. ते सांगतात जर विष्णूवीण जप चालला असेल तर तो फुकट आहे. कारण जपाचे एक विशिष्ट वर्म आहे. ज्याचा जप करावयाचा त्याला धरून तो जप व्हायला पाहिजे. इकडे विष्णूचा जप चाललाय पण जप करणाऱ्याला विष्णू कोण याचाच पत्ता नाही. *''हाका मारिसी ज्याच्या नावे। त्याचे गावची नाही ठावे,''* असा प्रकार चालेल का ? मुळीच चालणार नाही. आणि असा जप करून काही उपयोग होणार नाही. ज्या देवाला हा जीव हाका मारतो, ज्या देवाच्या दर्शनाची त्याला तळमळ आहे, त्या देवाच्या गावाचा या जीवाला पत्ता नाही. त्यामुळे जीवाने मारलेली हाक त्या देवापर्यंत पोचणारच नाही हो. ज्याची ओळख नाही त्याला आपण हाक मारली तर तो माणूस 'ओ' देत नाही. ओळख असेल तरच माणूस ओ देतो. आता परमेश्वराची आणि आमची ओळख नाही आणि त्याला आम्ही हाका मारीत आहोत. मग तो 'ओ' देईल का ? नाही, देणार नाही. म्हणून विष्णूला ओळखून विष्णूचा जप व्हावयास हवा.

आम्ही जप करतो असे आपण म्हणतो. पण खरे म्हणजे तो जप कोण करते हो ? या संदर्भात कबीरसाहेब सांगतात, *''ओठ कंठ हाले नही। जिव्हा ना करे काम। राम हमारा जप करे। हम बैठे आराम.''* जप करणाऱ्यास ओठ, कंठ हलवावे लागत नाहीत. जिभेचा उपयोग नाही. आमचा जप रामच करतोय, आपण तो जप फक्त श्रवण करावयाचा आहे. समर्थ रामदासस्वामी म्हणतात, *''येकवीस सहस्र सहाशे जपा। जपोनी गेलीसे अजपा। विचार पाहता सोपा। सकळ काही.''* तासाला नऊशे याप्रमाणे चोवीस तासांत एकवीस हजार सहाशे श्वासोच्छ्वास होतात. यातच तो जप साधावयाचा आहे. हा जप साधला असता, काळाला हटवायचे सामर्थ्य साधकाला प्राप्त होते. *''श्वासोच्छ्वासी नाम साधुनी। काळाला हटवी,''* असे आमचे मामा सांगतात. त्यांनीच रामपाठात या जपाचे वर्म सांगितले आहे :- *''जपोनी जपणे जप बोलिलासे।*

*वाया जात असे काय देही॥ कायेमाजी व्यर्थ जात असे नाम। तेची घेणे काम नरदेही.''* आपल्या शरीरात श्वासोच्छ्वास हे नामाशिवाय फुकट चालले आहेत. तसे होऊ नये. एकही श्वास नामाशिवाय फुकट जाणार नाही याची दक्षता घेतली की बस्स ! *''श्वासो लेवे नाम बिना सो जीवन धिक्कार। श्वासोच्छ्वासमें रामजप वोहि धारणाधार,''* हे तुलसीदासांचे वचन येथे लक्षात घ्यावे. श्वासोच्छ्वासाच्या ज्या सूक्ष्म हालचाली चालल्या आहेत त्यालाच ''रामकृष्ण'' असे ज्ञानेश्वरमहाराजांनी पहिल्या चरणात म्हटले आहे. त्या ठिकाणी जर मन नसेल तर सारे व्यर्थ आहे.

हा जो जप आहे तो कोणाचा करावयाचा आहे ? हा जप रामाचाच करावयाचा आहे. तुळशीदासांनी श्वासोच्छ्वासात रामाचाच जप करायला सांगितला आहे. गोंदवलेकरमहाराजही सांगतात, *''नका करू हो आळस। राम जपा श्वासोच्छ्वास.''* कबीरसाहेबांचे मतही असेच आहे. ते म्हणतात, *''राम जपो राम जपो राम जपो रे। भवजल भवजल पार करो रे.''* ज्याचा जप करावयाचा तो राम; आणि जो कोणी जप करतो तोही रामच, हे *''ज्याचे नाम घेसी । तेचि तू आहेसी,''* या संतोक्तीवरून स्पष्ट होते. हे ओळखून जर जप झाला तरच त्या जपाला अर्थ आहे.

ज्याच्या सत्तेने आपले शरीर चालते त्या आत्म्याला ज्ञानेश्वरमहाराजांनी ''आत्मदेव'' असे म्हटले आहे. त्याला जाणणे हे महत्त्वाचे आहे. त्याचे ज्ञान नसेल तर जप, तप, साधन, तीर्थे ही सर्व निरुपयोगी आहेत. म्हणून ज्ञानेश्वरमहाराज सांगतात *''आत्माचि कळला नाही जप तप साधन तीर्थे खोटी गे। ज्ञानदेव म्हणे न सुटती संसाराच्या गोष्टी गे.''* म्हणून आत्मज्ञान होणे हे महत्त्वाचे आहे. आता ''आत्मज्ञान'' म्हणजे तरी काय हो ? समर्थ सांगतात, *''ऐक शिष्या सावधान। ज्ञान म्हणजे आत्मज्ञान। पाहणे आपणासी आपण। या नाव ज्ञान.''* म्हणजे 'आपण आपल्याला पाहणे' याला आत्मज्ञान म्हणतात. आपला आपल्याला विसर पडणे म्हणजे अज्ञान असे ज्ञानेश्वरमहाराज सांगतात :- *''आपुला आपणपेया। विसरू जो धनंजया। तेचि रूप यया । अज्ञानासी.''* ज्याच्यामुळे ज्ञान आणि ज्याच्यामुळे अज्ञान त्याचे ज्ञान म्हणजे ज्ञान आणि ज्याच्यामुळे ज्ञान व ज्याच्यामुळे अज्ञान त्याचे अज्ञान म्हणजे अज्ञान. हे येथे लक्षात घेण्यासारखे आहे.

आपल्या अंतर्यामी असणाऱ्या विश्वाची/परमेश्वराची - विश्व हे नाव परमेश्वराचे आहे - जाणीव झाली की विश्वात भरून राहिलेल्या वासुदेवाची म्हणजे विष्णूची जाणीव होते. हे जे विश्वात आणि आपल्यात असलेले साधर्म्य हेच येथे महत्त्वाचे आहे.

*''म्हणोनी आपणपा विश्व देखिजे। आणि आपण विश्व होईजे। ऐसे साम्यचि एक उपासिजे। पांडवा गा,''* हे ज्ञानेशवचन हेच सांगत आहे. हे सर्व विश्व वासुदेवरूप आहे अशी प्रचीती ज्याला येते तोच भक्तांमधील राजा आणि ज्ञानी असतो. *''हे समस्तही श्रीवासुदेवो। ऐसा प्रतीतिरसाचा वोतला भावो। भक्तामाजी रावो। आणि ज्ञानिया तोचि,''* हे ज्ञानेशवचन हेच स्पष्ट करते. भूतमात्राचे ठिकाणी जो वास करतो तोच वासुदेव होय. *'वसन्ति भूतानि अस्मिन् इति वासुदेवः.'* विष्णू आणि वासुदेव काही वेगळे नाहीत. विश् म्हणजे प्रवेश करणे; या विश् शब्दापासून विष्णू शब्द बनला आहे. जो भूतमात्राचे ठिकाणी प्रविष्ट होऊन राहिला तो विष्णू. अशा विष्णूला म्हणजे वासुदेवाला म्हणजे आत्म्याला न जाणता, त्याला सोडून जर जप झाला तर जप करणाऱ्या त्या माणसाचे ज्ञान व्यर्थ असे माऊली[1] सांगते.

ज्ञानेश्वरमहाराज पुढील कडव्यात सांगतात, *''उपजोनी करंटा नेणे अद्वय वाटा। रामकृष्णी पैठा कैसेनी होय.''* काही लोक म्हणतील की आमचेपाशी करंटेपणाचे कोणतेही लक्षण नाही. मग ज्ञानेश्वरमहाराजांनी आम्हाला करंटे असे का म्हटले आहे ? याला ज्ञानेश्वरमहाराजांचे उत्तर असे आहे :- जो उपजला तो करंटा आहेच. आपण जन्माला आलो आहोत म्हणून करंटे आहोतच. जन्माला येणे हेच दारिद्य आहे. *''जिवा जन्म दारिद्य ठाकोनि आले,''* ही संतोक्ती याला प्रमाण आहे. आपण जी त्वचेमार्फत, कानामार्फत, नाकामार्फत, जिभेपर्यंत बाह्य विषयांकडे भीक मागतो हे दारिद्य नव्हे काय ? फक्त हातात करवंटी घेतलेली नाही इतकाच फरक. त्वचेला चांगला स्पर्श व्हावा, जिभेला गोडधोड खायला हवे, नाकाला चांगला वास हवा, कानाला सुमधुर संगीत ऐकावयास हवे, ही सारी भीक नव्हे काय ? आपण जन्माला आलो हे माणसाला मान्य आहे. कारण कधी ना कधी त्याला असे म्हणण्याची वेळ येतेच की, ''आम्ही जन्माला आलो हीच पहिली चूक झाली.'' अशा माणसाला अद्वय वाटेचे ज्ञान असत नाही. अद्वय वाट म्हणजे ज्या वाटेवर गेले असता द्वैत शिल्लकच रहात नाही. झोपेपूर्वी निसर्ग रोज आपणास एकदा ती वाट दाखवीत असतो. परंतु त्यावेळी आम्ही जागे असत नाही. झोपेत कशाचीच जाणीव नसते. झोपी जाताना मन झुकांडी देऊन ज्या वाटेने जाते तीच ती अद्वय वाट आहे. त्या वाटेने जाताना मनातील विचार मावळतात. झुकांडी देऊन मन कोणत्या मार्गाने जाते हे जर आपण पहायलो लागलो तर आपणाला झोप लागणारच नाही. रामकृष्णगतीवर स्वार झाल्याशिवाय आपल्याला ही अद्वय

१. माऊली म्हणजे श्रीज्ञानेश्वरमहाराज. (सं.टी.)

वाट सापडणार नाही. राम आणि कृष्ण या जीवनाच्या दोन गती आहेत. त्यांमध्ये मनाचे तादात्म्य होणे महत्त्वाचे आहे. मनाचे तादात्म्य झाले की मनोलय झाल्याने ती अद्वय वाट, साधनात साधकाला प्राप्त होते. येथे असा प्रश्न येईल, साधनात आणि झोपेत जर मनोलय होतो तर झोप व साधन यांत फरक काय ? साधन म्हणजे देहाची जाणीव सुटून आत्म्याचे स्मरण रहाणे आणि झोप म्हणजे देहाची जाणीव सुटून आत्म्याचे स्मरण न रहाणे. साधन म्हणजे झोपेच्या आनंदात जागृती - जागे - असणे, किंवा जागृत अवस्थेत झोपेच्या आनंदाची अवस्था असणे म्हणजे साधन.

ज्ञानेश्वरमहाराज पुढील कडव्यात सांगतात, *''द्वैताची झाडणी गुरुवीण ज्ञान। त्या कैचे कीर्तन घडे नामी.''* गुरूने दिलेल्या ज्ञानावाचून द्वैताची झाडणी म्हणजे निरास होत नाही व द्वैताची झाडणी झाल्याशिवाय नामी कीर्तन अनुभवता येत नाही. अंत:करणातील द्वैत लयाला गेल्याशिवाय अद्वैताची अद्वय वाट कदापिही सापडणार नाही. *''भेद लयाप्रती गेला। उद्धव चिद्घन अद्वय केला,''* हे उद्धव चिद्घनांचे बोल येथे विचारात घेण्याजोगे आहेत. अद्वय / अद्वैत अशा देवाचे साक्षात्कारासाठी सगळा भेद लयाला जाणे आवश्यक आहे. *''भेद हा तुटे अभेद उमटे। राम प्रगटे तेचि नवमी,''* हे समर्थांचे वचन उरी बाळगण्यासारखे आहे.

जोवर डोळा उघडला असता वस्तु म्हणजे चैतन्य दिसत नाही तर आकारच दिसतो तोवर आमचे अंत:करणातील द्वैत नाहीसे झालेले नाही असे खुशाल समजावे. आत्मज्ञान झाल्याशिवाय, आपण आपल्याला पाहिल्याशिवाय, असे वस्तुदर्शन-चैतन्यदर्शन-शक्य नाही. आणि तसे होण्यास गुरुकृपेची आवश्यकता आहे. निंबरगीकरमहाराजांनी कृपा केली तरच हे शक्य आहे. शरीराने, मनाने, जीवाने अशा सर्व भावाने महाराजांना शरण जाऊन, सर्व प्रकारचा अभिमान सोडून, त्यांची सेवा केली असता, हे ज्ञान संपादन करता येते. आणि या आत्मज्ञानाच्या प्राप्तीनंतर माणसाला सर्व सृष्टी आत्मवत दिसू लागते. ज्ञानेश्वरमहाराज या संदर्भात म्हणतात - *''ते ज्ञान पैगा बरवे। जरी मनी आथी आणावे। तरी संताते या भजावे । सर्वस्वेसी॥ जे ज्ञानाचा कुरूठा। तेथ सेवा हा दारवंठा। तो स्वाधीन करी सुभटा। वोळगोनी॥ तरी तनु मनु जीवे। चरणासी लागावे। आणि अगर्वता करावे। दास्य सकळ॥ मग अपेक्षित जे आपुले। ते ही सांगतील पुसिले। जेणे अंत:करण बोधले। संकल्पा नये.''* आत्मज्ञान झालेल्या माणसाला पदार्थांचा आकार दिसत नाही; त्याला सर्वत्र चैतन्याचा अनुभव येऊ लागतो. आणि मग *''आत्मवत् सर्वभूतानि य: पश्यति स पश्यति,''* या उक्तीचा प्रत्यय त्याला

आल्यावाचून रहात नाही आणि त्याचे बाबतीत औषधालासुद्‌धा द्‌वैत शिल्लक रहात नाही. अशा माणसाला *''नामी नामसंकीर्तन''* म्हणजे मीपणा नाहीसे करणारे नामसंकीर्तन अनुभवावयास मिळते.

ज्ञानेश्वरमहाराज पुढील कडव्यात सांगतात :- *'' ज्ञानदेव म्हणे सगुण हे ध्यान। नामपाठ मौन प्रपंचाचे.''* नामपाठाने *''प्रपंचाचे मौन''* होणे हेच ज्ञानेश्वरमहाराजांचे सगुण ध्यान आहे. म्हणजे असे :- विष्णूला धरून एकदा का आपला जप सुरू झाला की तो होणारा नामाचा पाठ म्हणजेच सगुण ध्यान आहे. याचा अर्थ असा : नामाचा पाठ सुरू झाला की परमात्मा आकाराला येऊ लागतो. *'' पढिये वो हरि पढिये वो। बाप रखुमादेवीवरे घडिये वो,''* हे ज्ञानेशवचन हेच सांगते. हे सगुण निर्गुणाला चिकटलेले आहे. अर्थात ते सूक्ष्म आहे. *''भावाचे मथिले निर्गुण संचले। ते हे उभे ठेले विटेवरी,''* हे ज्ञानेश्वरमहाराजांचे वचन हे सगुण म्हणजे नेमके काय हे सांगणारे आहे.

असा नामाचा पाठ सुरू झाला की साहजिकच प्रपंचाचे मौन साधले जाते. *''पन्नासा अक्षरी करिशी बरोबरी। शेखी तुझे तोंड तुज वैरी रया॥ रकारापुढे मकार [1] मांडी का। तेणे तुकसी सम शंभूचिया॥ यापरी नामाची ओळ मांडूनी । संसार दवडोनी सांडी परता,''* ही ज्ञानेश-उक्ती हेच सांगते. नामपाठ साधला की प्रपंचाचे मौन होते म्हणजे प्रपंचातील आसक्ती आणि अभिमान हे दूर होऊन प्रपंचच परमार्थरूप होऊन जातो.

१. रकारापुढे मकार म्हणजे 'रा' अक्षरापुढे 'म' हे अक्षर म्हणजे 'राम' हा शब्द. (सं.टी).

## (१०)

**त्रिवेणी संगमी नाना तीर्थे भ्रमी। चित्त नाही नामी तरी ते व्यर्थ ॥१॥**
**नामासी विन्मुख तो नर पापीया। हरीवीण धावया न पवे कोणी ॥२॥**
**पुराणप्रसिद्ध बोलिले वाल्मीक। नामे तिही लोक उद्धरती ॥३॥**
**ज्ञानदेव म्हणे नाम जपे हरीचे। परंपरा त्याचे कुळ शुद्ध ॥४॥**

हरिनामाचा महिमा फार मोठा आहे असे या अभंगात ज्ञानेश्वरमहाराज सांगत आहेत. त्रिवेणी[1] संगमावर स्नान केले, नाना तीर्थक्षेत्री जाऊन तेथेही स्नान इत्यादी केले, पण आपले चित्त जर नामात नसेल तर हे सारे नामाशिवाय व्यर्थ आहे. काशीत जरी मरण आले तरी तेथेसुद्धा उद्धार होतो तो रामनामानेच. ''*मरण आले काशीपुरी। तेथे नामची उद्धरी,*'' ही संतोक्ती याला प्रमाण आहे. पुण्यक्षेत्रात पाप नाहीसे होते. म्हणजे अन्य ठिकाणी केलेले पाप तीर्थक्षेत्रात गेल्याने नाहीसे होते. पण पुण्यक्षेत्रातच जर पाप केले तर ते वज्रलेप होते. ''*अन्यक्षेत्रे कृतं पापं पुण्यक्षेत्रे विनश्यति। पुण्यक्षेत्रे कृतं पापं वज्रलेपो भविष्यति*'' हा श्लोक हेच स्पष्ट करतो. कारण पुण्यक्षेत्रात स्नान वगैरे केल्याने पाप नाहीसे होते. पण पाप करण्याची प्रवृत्ती नाहीशी होत नाही. पण ही पाप करण्याची प्रवृत्ती नाम घेतल्याने नाहीशी होते. हेच नामाचे वैशिष्ट्य आहे. म्हणून नाम महत्त्वाचे आहे. नामाचे ठिकाणी चित्त नसल्याने नाना तीर्थक्षेत्रीं भ्रमण करण्याचा प्रयत्न हा व्यर्थ प्रयत्न आहे.

तीर्थक्षेत्री दगडाचा देव असतो. या दगडाची सेवा करून काय उपयोग होणार असे ज्ञानेश्वरमहाराज एके ठिकाणी म्हणतात, ''*निर्जीवा दगडाची काय करिसी सेवा। तो तुज निर्देवा देईल काय.*'' एकशे आठ तीर्थे ज्याच्या चरणी आहेत असा आत्माराम प्रत्येकाच्या हृदयात आहे ''*अष्टोत्तरशत तीर्थे जयाचे चरणी। तो तुझ्या हृदयभुवनी आत्मारामु.*'' त्या आत्मारामाला सोडून, त्याचे नाव घेण्याचे सोडून आपण मात्र निरनिराळी क्षेत्रे धुंडाळीत बसतो याला काय म्हणावे ? आपण तीर्थक्षेत्रांना भेटी देतो. काय असते तिथे ? एक धोंडा असतो आणि त्याचेजवळ पाणी असते - ''*तीर्थी धोंडा पाणी.*'' अशा तीर्थात बुडी मारली तर वरवर शरीर स्वच्छ होईल पण अंत:करण कसे शुद्ध होणार ? ''*जाऊनीया तीर्था तुवा काय केले। चर्म प्रक्षाळिले वरीवरी॥ अंतरीचे*

१. प्रयाग येथील गंगा, यमुना व सरस्वती या तीन नद्यांचा संगम. (सं. टी.)

*शुद्ध कासयाने केले''* हे तुकाराममहाराजांचे वचन येथे लक्षात घ्यावे. समर्थ रामदासस्वामींच्या एवढे तीर्थाटन इतर कोणत्याही संताने केले नाही. त्यांना जो अनुभव आला तो त्यांनी आपल्या लेखनात नमूद केला आहे. ते म्हणतात, *''गेलो काशी विश्वेश्वरा। सेतुबंध रामेश्वरा। परी संशय फिटेना। पूर्वगुण पालटेना.''* अनेक तीर्थक्षेत्रे फिरलो पण मनातला संशय गेला नाही आणि पूर्वगुणसुद्धा पालटले नाहीत, असे समर्थ स्पष्टपणे सांगतात. या त्यांच्या म्हणण्याचा विचार करावयास हवा की नको ? तीर्थक्षेत्री जाऊन कुणाला ब्रह्माची प्राप्ती झाली असे ऐकिवात नाही, पण 'ब्रह्म' आठवल्याचे मात्र खूपजण सांगतात. म्हणून संतमहात्म्यांनी आंतरशुद्धीचे दृष्टीने बाह्य तीर्थक्षेत्रांना फारसे महत्त्व दिलेले नाही. आत्मतीर्थात स्नान केल्यावर बाह्यतीर्थांचा काय उपयोग आहे. *''कहत कबीर आत्मतीर्थ नहावे। और तीर्थनका क्या काम जी,''* असे कबीरसाहेब विचारतात. मच्छिंद्रनाथांच्या मते तर गंगेला, यमुनेला जाण्याचे कारण नाही; शरीरात 'साठाला आड गेलेले जे तीर्थ आहे' ते आपले अंतर शुद्ध करते. *''गंगा न जाऊ जमुना न जाऊ ना कोई तीरथ न्हाऊ। अडसट तीरथ है घट भीतर वहाँको मनमल धुऊ.''* ज्ञानेश्वरमहाराज अन्यत्र सांगतात, *''तुम्ही व्रते नियमु न करावे। शरीराते न पीडावे। दूरी केही न वचावे। तीर्थासी गा.''* म्हणजे शरीराला त्रास घेऊन, व्रते, नियम, दूरचे तीर्थीगमन असले काही करू नका. आत्मसाक्षात्काराचे दृष्टीने त्यांचा काही उपयोग नाही. याचा अर्थ असाही घेता येईल :- शरीराला त्रास न देणारे नियम, तीर्थे करा. नामाचे नामी नियम करा. बाकीचे त्रासदायक नियम नकोत. *''नित्यनेम नामी तो प्राणी दुर्लभ। लक्ष्मीवल्लभ तया जवळी,''* हे ज्ञानेशवचन 'नामी नेमाचे' वर्णन करणारेच आहे ना ?

संतांचे वास्तव्य मुळी 'त्रिवेणी संगमा'वर असते. आमचे भगवान सद्गुरू श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस हे आपले गुरू जे चिमडमहाराज त्यांचे बाबतीत म्हणतात, *''त्रिकूट शिखरावरती पाहे वस्ती ज्यांची आहे। इडापिंगलासुषुम्नेच्या संगमी वसताहे.''* इडा, पिंगला व सुषुम्ना म्हणजेच गंगा, यमुना व सरस्वती आहे. ज्योतिपंत महाभागवत सांगतात, *''इडा पिंगला सुषुम्ना। गंगा सरस्वती यमुना। तिचे संगमी करिता स्नाना। मुक्ति जीवनासी.''* इडा पिंगला सुषुम्ना असा मार्ग आहे. या मार्गाने त्रिकूटावर आले की साक्षात्कार म्हणजे *'महालिंगदर्शन'* आहे, असे चिमडमहाराज आपल्या अभंगात सांगतात :- *''इडा पिंगला सुषुम्ना। मार्ग आहे कठीण॥ त्रिकूट संगम मार्जन। महालिंग दर्शन.''* तुकाराममहाराज सांगतात, *'' षड्चक्रावरी त्रिकूटा*

*भीतरी। त्रिवेणी सुंदरी गंगा वाहे॥ तेथे नित्य स्नान करताती संत। रजतम द्वैत संहारोनी॥ त्रिवेणी संगमी अनुहात ध्वनी। आहे निशीदिनी वाद्यगजरे॥ ते लक्ष्य भेदुनी वरी जो जाणे अंगा। तुका पांडुरंगा भेटी तेथे.''* म्हणजे तुकाराममहाराजांचे मते :- त्रिवेणी संगमी संत नित्य स्नान करतात. तेथे निशिदिनी अनुहात श्रवण घडते. येथून पुढे दशमद्वारात गेले असता पांडुरंगाचा साक्षात्कार होतो. आपण त्रिकूट शिखरावर गेलो आहोत हे कसे ओळखायचे ? जेव्हा आपले मन आणि पवन - श्वासोच्छ्वास - स्थिर होतील तेव्हा आपण त्रिकूटावर आलो आहोत असे ओळखावे, असे मुकुंदराज सांगतात. *''त्रिकूटी स्थिरावला मनपवन वारू.''* हा सगळा आतला विषय आहे. सर्व काही आपल्याजवळच आहे. सर्व तीर्थे आपल्या जवळच आहेत. तेव्हा ठिकठिकाणी हिंडत बसायचे, या गोष्टीची गरज तरी काय आहे ? आपल्यातच असणाऱ्या आत्म्याचा साक्षात्कार संपादन करून आपण तीर्थांना गेलो तर सोन्याहून पिवळे. पण बाहेरच्या तीर्थांना जाऊन साक्षात्कार होत नाही ही काळ्या दगडावरची पांढरी रेष आहे. त्रिवेणी संगमावर अनाहत श्रवण करणे हा साक्षात्कार न झाल्यास तीर्थयात्रा फुकट आहे.

नामाशिवाय तीर्थयात्रेचा काही उपयोग नाही. इडा आणि पिंगला या सुषुम्नाकार झाल्याशिवाय रामनाम हाता येत नाही, असे आमचे मामांनी रामपाठात सांगितले आहे - *''इडा आणि पिंगला सुषुम्नेत सरता। रामनाम हाता येत असे.''* आणि त्रिवेणी संगमातील नाम हाच गुरूघरचा नेम आहे असे तुकारामांनी सांगून ठेवले आहे :- *''इडा पिंगलेचा त्रिवेणी संगम। तुका म्हणे नेम गुरूघरचा.''* अशा या नामाबद्दल आपण संदेह बाळगतो. 'हे नाम संतांनी सांगितले आहे इतके महत्त्वाचे आहे का ? या नामाने आमचे काय होणार ?' अशा प्रकारच्या नाना शंका आमच्या मनात येतात आणि त्यामुळे आपणाकडून नाम घेण्याची टाळाटाळ होते. यालाच पाप म्हणतात. ज्ञानेश्वरमहाराज सांगतात, *''नामासी विन्मुख तो नर पापीया.''* ज्याला हे त्रिवेणी संगमी प्राप्त होणारे रामनाम प्राप्त होत नाही असा जो कोणी नामाला विन्मुख आहे तो पापी आहे. असेच वचन निळोबारायांचे आहे. ते सांगतात, *''निळा म्हणे पाप मुख्य तेची साचे। नावडे देवाचे नाम मुखी.*[1] *''* आणि जे मुख नाम घेत नाही ते कसे आहे हे सांगताना तुकाराममहाराज म्हणतात, *''नाम न म्हणे ज्याचे तोंड। तेची चर्मकाचे कुंड.''* तर नाथमहाराज सांगतात, *''नामावीण मुख सर्पाचे ते बीळ। जिव्हा नव्हे*

१. नामाचा उच्चार करणारी जिव्हा किंवा मुख कोणते हा विषय अभंग १७ च्या स्पष्टीकरणात आलेला आहे. (सं.टी)

*कालसर्प आहे.''* आपण नाम घेतले नाही तर संकटाचे वेळी सांभाळणारा, आधार देणारा हरी हा आपणास मदत करणार नाही, असे *'हरीविण धावया न पवे कोणी'* या चरणात ज्ञानेश्वरमहाराज सांगतात. तुकाराममहाराजांच्या मतेही संकटातून सोडविण्यास देवावाचून कोणीही नाही :- *''तुका म्हणे तुज सोडवीना कोणी। एका चक्रपाणी वाचोनिया.''* नामनिष्ठ भाविकाला अंतर्बाह्य, अंतकाळी तसेच संकटाचे वेळी हरीच सांभाळतो असे ज्ञानेश्वरांनी हरिपाठातील अन्य एका चरणात सांगितले आहे. ते म्हणतात, *''अंतकाळी तैसा संकटाचे वेळी। हरि तया सांभाळी अंतर्बाह्य.''*

ज्ञानेश्वरमहाराज पुढील कडव्यात सांगतात, *''पुराणप्रसिद्ध बोलिले वाल्मीक। नामे तिन्ही लोक उद्धरती.''* पुराणप्रसिद्ध अशा वाल्मीकिंनी नामाचा महिमा वर्णन केला आहे. त्यांच्या सांगण्याला अर्थ आहे; कारण त्यांनी नामाचा अनुभव स्वत: घेतला व मग इतरांना सांगितला. आपल्या सर्वांना वाल्या कोळ्याची कथा माहीत आहे. या रामनामाचे योगाने वाल्या कोळ्याचा वाल्मीकि ऋषी झाला ही पौराणिक गोष्ट आहे. आणि रामाचा अवतार होण्यापूर्वीच वाल्मीकीने रामाचे चरित्र लिहून ठेवले, असा नामाचा महिमा आहे. समर्थ रामदास सांगतात, *''उफराट्या नामासाठी। वाल्मीक तरला उठाउठी। भविष्य वदला शतकोटी। चरित्र रघुनाथाचे.''* पांडुरंगमहाराज ताम्हनकर आपल्या एका पदात सांगतात, *''नित्यमनी जपा जपा राम राम ॥ वाल्या कोळ्याचा वाल्मीक झाला। जगी वंद्य होऊनिया ठेला.''* असा रामनामाचा महिमा आहे.

ज्ञानेश्वरमहाराज शेवटच्या कडव्यात सांगतात, *'' ज्ञानदेव म्हणे नाम जपे हरीचे। परंपरा त्याचे कुळ शुद्ध.''* हरिनामाचा जप करणाऱ्याची कुळपरंपरा शुद्ध होय. हरिजप करणारा स्वत: तर तरतोच पण तो इतरांची कुळेही उद्धरतो. तुकाराममहाराज सांगतात, *''आपण तरेल नव्हे ते नवल। कुळे उद्धरील सर्वांची तो.''* इतकेच नव्हे तर असा भगवद्भक्त जिथे जन्माला येतो तो देशही धन्य होतो असे तुकाराममहाराजांचे वचन आहे :- *''पवित्र ते कूळ पावन तो देश। जेथे हरीचे दास जन्म घेती.''* याचकरिता उद्धव चिद्घन देवाला मागणे मागताना म्हणतात की ज्या कुळात रामसेवा हा धर्म आहे त्या कुळात मला जन्म दे :- *''ज्याचे वंशी कुळधर्म रामसेवा। त्याचे वंशी मज जन्म देगा देवा.''* असा रामनामाचा महिमा अगाध आहे.

## (११)

**हरि उच्चारणी अनंत पापराशी। जातील लयासी क्षणमात्रे ॥१॥**
**तृण अग्निमेळे समरस झाले। तैसे नामे केले जपता हरी ॥२॥**
**हरि उच्चारण मंत्र पै अगाध। पळे भूतबाध भेणे याचे ॥३॥**
**ज्ञानदेव म्हणे हरी माझा समर्थ। न करवे अर्थ उपनिषदा ॥४॥**

नामाचे कार्य किती अगाध आहे याचा पुनरुच्चार या अभंगात आहे.

हरिनामाच्या उच्चारणाने पापाच्या राशीच्या राशी क्षणात नाहीशा होतात. नामाच्या योगे पाप नष्ट होऊन, पूर्वी महापापी असणारे पवित्र होतात. रामदासस्वामी सांगतात, *''हरिनाम नेमस्त पाषाण तारी। किती तारिले मानवी देहधारी। तया राम नामी सदा जो विकल्पी। वदेना कदा जीव तो पापरूपी.''* ज्या हरिनामाच्या योगाने पाषाण तारले त्या रामनामाचे ठिकाणी साशंक राहून जो नामोच्चार करीत नाही तो माणूस पापरूपी असतो. पण नामाचा उच्चार करणारे *''महापापी तेची झाले। परमपवित्र,''* असे रामदासस्वामी सांगतात. तर अजामेळासारखा पापी माणूस नामाने उद्धरून गेला असे *''अजामेळ पापराशी। नामे गेला वैकुंठासी,''* असे तुकाराममहाराज सांगतात.

समर्थांनी वरील श्लोकात एकदा 'हरिनाम' आणि मग 'रामनाम' असे म्हटले आहे. याचे कारण असे की 'हरी' आणि 'राम' हे वेगळे नाहीत, हेच त्यांना दाखवायचे आहे. एकनाथमहाराजांनीही हरी आणि राम यांचे ऐक्य वेगळ्या पद्धतीने मांडून दाखविले आहे. ते म्हणतात, *''हरि आदि रे हरि अंती रे। हरि हा व्यापकू सर्वाभूती रे.''* म्हणजे आरंभालाही हरी आहे आणि शेवटाला पण हरीच आहे. याचप्रमाणे राम हासुद्धा आदी व अंती आहे, असे नाथमहाराज सांगतात - *''एका जनार्दनी अवघा रामचि आदि अंती.''* याचा अर्थ असा की हरी आणि राम हे एकच आहेत.

हरिनामाचे योगाने पापाचे पर्वत जळून खाक होतात असे सेनामहाराज सांगतात - *''घेता नाम विठोबाचे । पर्वत जळती पापाचे.''* ज्ञानेश्वरमहाराज अन्यत्र नामाचे महत्त्व असे सांगतात :- *''तरी कीर्तनाचेनी नट नाचे। नाशिले व्यवसाय प्रायश्चिताचे। जे नामचि नाही पापाचे। ऐसे केले॥ यमदमा अवकळा आणिली। तीर्थे ठायावरूनी उठवली। यमलोकीची खुंटिली। राहटी आघवी॥ यमु म्हणे काय यमावे।*

*दमु म्हणे कवणाने दमावे। तीर्थे म्हणती काय खावे। दोष ओखदासी नाही॥ ऐसे माझेनि नामघोषे। नाहीचि करिती विश्वाची दुःखे। अवघे जगचि महासुखे। दुमदुमीत भरले॥ कही एकाधेनि वैकुंठा जावे। ते तिही वैकुंठची केले आघवे। ऐसे नामघोषगौरवे। धवळले विश्व.''* याचा अर्थ असा :- नटनाम परमात्म्याचा अंतरी होणारा नाच म्हणजे नामसंकीर्तन. त्यामुळे चित्ताचे व्यवसाय नाहीसे झाले व पापाचे नाव शिल्लक राहिले नाही. पाप नाहीसे झाल्याने तीर्थांना खाण्यास पाप न राहिल्याने तीर्थांना कामच राहिले नाही. जगात सर्वत्र सुख भरून राहिले. पूर्वी कधीतरी एकादा वैकुंठाला जायचा पण त्यानी इथेच वैकुंठ निर्माण केले. नामघोषाने सर्व विश्व दुमदुमून भरले. यामुळे यमराजांना काही कामच शिल्लक राहिले नाही. असा नामघोष महत्त्वाचा आहे.

सध्या अध्यात्माचा महापूर आला आहे. सर्वत्र सत्संग, साधकांचे मेळावे इत्यादी कार्यक्रम होताना दिसतात. देवळात तर पाऊल ठेवायला जागा असत नाही. असं असताना माणसांची पापवृत्ती कुठे कमी झाल्याचं जाणवत नाही. कोणतेही वर्तमानपत्र उघडा म्हणजे समजेल की रोज किती पाप घडत आहे. हे असे का ? याचा विचार व्हायला नको का ?

ज्ञानेश्वरमहाराजांना अभिप्रेत असणारा हरीचा उच्चार माणसाकडून होत नाही. उच्चार हा शब्द कसा बनला हो ? उत्+चर यांचे संधीपासून बनला ना ? उत् म्हणजे वरती आणि चर याचा अर्थ चालणे. म्हणजे नामाचा उच्चार हा 'वरती' कुठेतरी आहे, खालती नाही. नाथमहाराज सांगतात, *''आल्हादे वैष्णव करिती नामाचा घोष। हरिनाम गर्जता गगनी न समाये हर्ष.''* म्हणजे हरिनामाची गर्जना ही आल्हादपूर्वक गगनी करावयाची आहे हो ! मग आनंद मावत नाही असे होते. हरिनाम घेताना आम्हाला कधी आनंद होतो का ? हरिनाम घेताना आमचा चेहरा पाहण्यासारखाच असतो. शामराव लिमयांना[१] बोलावून फोटोच काढून घ्यायला पाहिजे त्यांचा की नाम घेताना घेतलेले छायाचित्र म्हणून. असं का ? आमची हरिनामाची गर्जना गगनात असत नाही म्हणून.

आता ज्या गगनात नामाचा घोष आहे, हे गगन कोणते ? गगन आणि आकाश यांत फरक आहे. समर्थ म्हणतात, *''पंचभूतामध्ये वास। म्हणोनि बोलिजे आकाश। भूतांतरी जो ब्रह्मांश । तेचि गगन.''* पंचमहाभूतांमध्ये रहाते त्याला आकाश म्हणतात आणि भूतांमध्ये जो ब्रह्माचा अंश आहे त्याला गगन म्हणतात. आपले शरीर हे पंचमहाभूतांनीच बनले आहे. संतोक्ती आहे -*''देह हा पाचांचा पाचांचा.''* त्याला

१.शामराव लिमये हे सांगलीतील एक फोटोग्राफर आहेत. (सं.टी.)

तीन गुणांचा गिलावा केला आहे. म्हणून हे शरीर बघण्यासारखे झाले आहे. त्या प्रत्येक शरीरात ब्रह्माचा अंश म्हणजे नारायण म्हणजेच आमचे निंबरगीकरमहाराज हे हृदयस्थानी रहात आहेत. या हृदयापर्यंत वायुसाधनाने कसे पोहचायचे हे मागे[१] सांगून झाले आहे. अशा प्रकारे गगनातील हरिनामाचे श्रवणानंतर पापाच्या अनंत राशी क्षणार्धात लयाला जातात.

ज्ञानेश्वरमहाराज पुढील कडव्यात सांगतात, *''तृण अग्निमेळे समरस झाले। तैसे नामे केले जपता हरी.''* ज्याप्रमाणे गवत आणि अग्नी यांचा संयोग झाल्यावर गवताचा अग्नीच होतो; जळणारा आणि जाळणारा हे वेगळे रहातच नाहीत. त्याप्रमाणे हरिनामाचा जप करणारा साधक अग्निरूप होतो व मग त्याला पापपुण्याचा स्पर्श होत नाही. तुकाराममहाराज सांगतात, *''तुका म्हणे आम्ही झालो अग्निरूप। लागो नेदु पापपुण्य अंगा.''* साधक परमात्मरूप झाल्यावर त्याला पापपुण्याचा स्पर्श कसा होणार ?

ज्ञानेश्वरमहाराज पुढील कडव्यात सांगतात, *''हरि उच्चारण मंत्र पै अगाध। पळे भूतबाध भेणे याचे.''* हरिनामाच्या उच्चाराने भूतबाधेची पीछेहाट होते. हरिनाम या मंत्राचे सामर्थ्य अगाध आहे. ज्ञानेश्वरमहाराज अन्यत्र सांगतात, *''अशौचिया जपो नये । आणिकाते ऐको नये॥ याचे फळ थोडे परी क्षोभणे बहु॥ ऐसा नव्हे रे मंत्रराज। नारायण नाम नारायण नाम जप कारे मना.''* काही मंत्र अशुची माणसाने जपायचे नसतात. ते इतर कुणी ऐकून चालत नाही. अशा मंत्राचे फळ थोडे पण त्रास फार असतो. नारायणमंत्र तसा नाही. तो नारायणमंत्र हा मंत्रराज आहे. नारायण आणि हरी हे काही वेगळे नाहीत. या हरिनामाच्या उच्चारणाने भूतबाधा राहीलच कशी ? समर्थ रामदासस्वामी सांगतात, *''भूत पिशाच्च नाना छंद। ब्रह्मग्रह ब्राह्मण समंध। मंत्रचळ नाना खेद। नामनिष्ठे नासती.'' तुकाराममहाराजांचे मतही असेच आहे. ते म्हणतात, ''तुका म्हणे कदा। नोहे बाधा भुताची.''*

शेवटच्या कडव्यात ज्ञानेश्वरमहाराज सांगतात, ''ज्ञानदेव म्हणे हरि माझा समर्थ। न करवे अर्थ उपनिषदा.'' हरी हा सर्वसमर्थ आहे आणि त्याचे वर्णन उपनिषदांनासुद्धा[२] करता आलेले नाही. आता समर्थ कुणाला म्हणावे ? जे कोणी *''कर्तुम् अकर्तुम् अन्यथा कर्तुं ''* शक्ति-समर्थ असतात ते समर्थ, बाकीचे सारे

---

१. मागे अभंग १ वरील स्पष्टीकरण पहा.

२. वेदाच्या अंत्य भागाला वेदांत अथवा उपनिषदे म्हणतात. त्यामध्ये अनेक प्रकारचे तात्त्विक विचार आलेले आहेत. (सं. टी.)

असमर्थ. आमचे निंबरगीकरमहाराज आणि रामदासस्वामी हे समर्थ. बाकी आपण सारे असमर्थ. निंबरगीकरमहाराजांच्या मनात आले की ते होणारच हे नि:संशय आहे. त्यांच्या मनात आले की रंकाचा राणा होतोय. तुकाराममहाराज म्हणतात, *''तुका म्हणे आले समर्थांच्या मना। तरी होय राणा रंक त्याचा.''* अशा समर्थांच्या छायेखाली असावे; त्यांच्या सेवेत असावे; त्यातच आपले कल्याण आहे. आपण सारे निंबरगीकरमहाराजांच्या छायेखाली आहोत. त्यांच्या कृपेची सावली आहे ती ! *''गुरुलिंगजंगम स्वामिकृपेची। छाया सर्वां परोपरीची,''* हे तात्यासाहेब कोटणीसमहाराजांनी केलेले निंबरगीकरमहाराजांचे वर्णन हे त्यांच्या छायेखाली असणाऱ्यांनी निश्चित अनुभवले आहे. त्यांची छाया सर्वांना सारखी आहे. गरिबाला वेगळी वागणूक आणि श्रीमंताला वेगळी वागणूक असा भेद तेथे नाही. *''जो खांडावया घावो घाली। की लावणी जयाने केली। दोघा एकच साऊली । वृक्ष दे जैसा,''* या ज्ञानेश्वरमहाराजांच्या वचनातील वृक्षाप्रमाणे निंबरगीकरमहाराज सर्वांना समान सावली देतात. आपल्या भक्तांवर छाया करण्याचे एकमेव उदाहरण म्हणजे आमचे श्रीनिंबरगीकरमहाराज. आपल्यासारखे लाखो जीव त्यांच्या छायेखाली आले. त्या सर्वांचे कल्याण महाराजांनी केले.

## (१२)

**तीर्थव्रत नेम भावेवीण सिद्धी । वायाची उपाधी करिसी जना ॥१॥**
**भावबळे आकळे येरवी ना कळे । करतळी आवळे तैसा हरी ॥२॥**
**पारियाचा रवा घेता भूमीवरी । यत्न परोपरी साधन तैसे ॥३॥**
**ज्ञानदेव म्हणे निवृत्ति निर्गुण । दिधले संपूर्ण माझे हाती ॥४॥**

पुण्यतीर्थे, व्रते इत्यादी भावाशिवाय निरुपयोगी आहेत हा मागे आलेला विचारच ज्ञानेश्वरमहाराज येथे पुन: प्रतिपादन करीत आहेत. ते म्हणतात :-

तीर्थाला जाणे, निरनिराळी व्रते करणे, एखादा नेम धरणे हे करताना जर भाव नसेल, तर ती नुसती उपाधीच ठरते. जे करून वाया जाते, निष्फळ ठरते, ती सारी उपाधीच आहे. आपण तीर्थक्षेत्री जातो. देवदर्शनासाठीच ना ? पापक्षालनासाठीच ना ? पण तसे करूनही देवदर्शन होते का ? पाप करण्याची वृत्ती नाहीशी होते काय ? तसे होत नसेल तर का होत नाही, याचा विचार करावयास नको काय ? तीर्थाला जाण्याचा हेतूच जर सफळ होत नसेल तर तीर्थाला जाऊन उपयोग तरी काय ? मग ती उपाधीच नव्हे काय ? लोकांना दाखविण्यासाठीच लोक तीर्थ-व्रते करतात असेच म्हणावे लागते शेवटी ! तीर्थक्षेत्रीही आम्हाला जर देवाचे ऐवजी दगडच दिसत असेल तर काय उपयोग ? भक्त जर संदेहातच रहात असेल तर काय उपयोग आहे तीर्थाला जाण्याचा ? *'' देव दगडाचा भक्त हा मायेचा । संदेह दोघांचा फिटे कैचा, ''* हा नामदेवमहाराजांचा विचार येथे लक्षात घ्यावा असाच आहे. 'देव दगडाचा आहे' असेच जर भक्ताला वाटत असेल, तर त्याला देवाचा साक्षात्कार कसा होणार सांगा. दगडात जर देवाचा साक्षात्कार होत असेल तरच तीर्थाला जाऊन उपयोग आहे. *''अवघे ब्रह्मरूप रिता नाही ठाव । प्रतिमा तो देव कैसा नोहे, ''* हे समर्थवचन अनुभवणाऱ्याला प्रतिमेतही देव दिसतो. अशा लोकांची तीर्थयात्रा सफल होते. आपण तीर्थाला जातो ते पिकनिक म्हणून; मग त्याचा काय उपयोग होणार ?

तीर्थगमन, व्रतपालन हे केव्हा उपयोगी पडतील ? तीर्थाबद्दल, व्रताबद्दल मनात आदर असेल, बळकट भाव असेल, दृढ श्रद्धा असेल तरच. भावाचे बळ असे आहे की तेथे देवाचेही काही चालत नाही. *''भावाचे ते ऐसे फळ । न चले देवाचेही बळ, ''* ही आमच्या मामांची अमृतवाणी हेच स्पष्ट करते आहे. भावाचे फळ असे आहे

की देव जरी या जगात नसेल तरी तो प्रगट होईल. आणि भावाच्या अभावाचे फळ असे आहे की असणारा देव नाहीसा होईल. भावाभावाचे फळ सांगणारा मामांचा पुढील अभंग या दृष्टीने महत्त्वाचा आहे :- *''ऐका भावाभाव फळ। चित्त करोनि निर्मळ॥ नसता देव प्रगट होई। ऐसे भावबळ पाही॥ अभावाचे फळ पाही। असता देव नाही होई.''* भाव असा अत्यंत महत्त्वाचा आहे. म्हणून माणसाचा कोठे तरी बळकट भाव असायला पाहिजे, तरच काही तरी पदरात पडेल. या जगात असा एकतरी दगड - त्याला मी देव म्हणत नाही - पाहिजे की ज्या ठिकाणी आपण कोणत्याही परिस्थितीत नतमस्तक व्हावयास पाहिजे. व या जगात असा एक जिवंत प्राणी पाहिजे की ज्याची आज्ञा आपण शिरसावंद्य मानली पाहिजे हो ! आम्हाला मात्र कशाचे काही असत नाही. हे असे चालत नाही ! जर दृढ भाव असेल तरच परमार्थात काही तरी संपादन करता येईल. असा भाव असणाऱ्या भाविक भक्तांचे हातातच देव आहे. अभाविक शहाणे मेले तरी त्यांना देव सापडत नाही, हेच तुकाराममहाराजांनी म्हटले आहे, *''तुका म्हणे देव भाविकांचे हाती। शहाणे मरती तरी नाही.''*

नेमसुद्धा करावयाचा तो असा की 'शेंडी तुटो की पारंबी तुटो,' त्या नेमात खंड पडता कामा नये. *''बुडो ही धरा की लया विश्व जावो॥ पडो काळ हस्ते शिरी वज्रघावो.''* असे काहीही घडले तरी जो नेम तुटत नाही तो खरा नेम. आमचे मामांचेकडे पहा, आमचे तात्यासाहेबमहाराजांचेकडे[१] पहा; मग नेमावर व्याख्यान करायची गरजच नाही. या महात्म्यांचेवर काही बरेवाईट प्रसंग आले नाहीत का ? आले की ! पण त्यांचा नेम अंतरला नाही. यातच सारं काही आलं. याला म्हणायची नेमनिष्ठा. एकही दिवस खंड न पाडता त्यांनी अखंड नेम आचरला. अगदी निर्याणाचे दिवशीसुद्धा आमचे मामांचा नित्यकीर्तनाचा नेम अंतरला नाही. फार अवघड आहे ! बोलायला सोपे आहे. *''हनुमंत सद्‌गुरुआज्ञे केले अखंड कीर्तन। सर्वस्व वेचियेले समर्पिले पंचप्राण,''* या प्रकारे आमचे मामांनी कीर्तनसेवेच्या नेमासाठी सर्वस्व वेचले. चांगल्या पगाराची नोकरी सोडली ती एक नेम चालावा म्हणून. आणि घरचं काही गडगंज होतं काय ? काही नाही हो ! काही नसताना नेम चालविणे फारच अवघड आहे. *''तुका म्हणे नेम प्राणासवे गाठी,''* ही तुकोक्ती मामांनी खरी करून दाखविली. *''हरि बोला एकांती हरि बोला लोकांती। देहत्यागाअंती हरि बोला,''* हे एकनाथमहाराजांचे वचन मामांनी आचरणात आणले. परमार्थ बोलणारे खूप आहेत; पण नेमाने आचरणात

१. या दोघांनीही आपला नित्यकीर्तनाचा नेम अखंड चालविला, हे लक्षात घ्यावे. (सं.टी.)

आणणारे मामांचेसारखे विरळाच. मामांच्या अखंड कीर्तनाच्या नेमाला ३६ वर्षे पूर्ण झाली. मी त्यांना म्हटले, ''मामा, तुमच्या कीर्तनाला अखंड तीन तपे झाली.'' तेव्हा ते म्हणाले, ''काय सांगतोस, तीन तपे झाली ?'' ते त्यांच्या गावीही नव्हते. कारण आपण कीर्तन करीत आहोत असे त्यांना कधीही वाटले नाही. 'तात्यासाहेबमहाराज कीर्तन करीत आहेत' असा त्यांचा अनुभवच होता. *''दासा हृदयी हनुमान। सदा करितो कीर्तन,''* असा त्यांचा भाव होता.

ज्ञानेश्वरमहाराज पुढील कडव्यात सांगतात, *''भावबळे आकळे ये-हवी नाकळे। करतळी आवळे तैसा हरी.''* रामकृष्णवाचा हा जीवाचा भाव आहे; आणि त्या भावाच्या बळाने आत्मसाक्षात्कार होतो. आत्मबळ ज्याचे जवळ नाही त्याला आत्मसाक्षात्कार होत नाही. *''नायमात्मा बलहीनेन लभ्यः.''* याचा अर्थ असा नव्हे की गामागुंगासारख्या पैलवानांना आत्मा प्राप्त होतो. ज्या बळाने आत्मा प्राप्त होतो ते बळ भावाचे आहे. तुकाराममहाराज सांगतात, *''भावबळे घालू कास। लज्जा चिंता दवडू आस॥ पायी निजध्यास। म्हणवु दास विष्णूचे.''* भावबळाचे योगे द्वैत, चिंता, इच्छा नाहीसे होऊन, निजध्यास लागेल आणि निजत्व म्हणजे विष्णू काय आहे, याचा साक्षात्कार झाल्याविना रहाणार नाही. असे भावबळ असेल तर हातात ठेवलेल्या आवळ्याप्रमाणे देव दाखवू, असे ज्ञानेश्वरमहाराज म्हणत आहेत.

या भावाचे बळ वाढण्यासाठी जे साधन आहे त्याचे वर्म ज्ञानेश्वरमहाराज पुढील कडव्यात सांगत आहेत, *''पारियाचा रवा घेता भूमीवरी। यत्न परोपरी साधन तैसे.''* पारा हा धातू खाली जमिनीवर पडला असता तो पटकन पकडता येत नाही. तो पकडण्यासाठी खूप प्रयत्न करावे लागतात. पारा हे येथे चैतन्याचे रूपक आहे. आपल्या देहात चैतन्य आहे. ते चैतन्य पकडण्यासाठी परोपरीने प्रयत्न करावे लागतात. तेच ते साधन आहे. म्हणून हा चरण असा म्हणता येईल - *''चैतन्याचा रवा घेता देहावरी। यत्न परोपरी साधन तैसे.''* हा चैतन्याचा रवा देहामध्ये कुठे आहे आणि तो कसा पकडावयाचा याचे विवेचन मागे[1] आले आहे ते पुन: येथे सांगण्याचे कारण नाही. हे साधन साधं नाही आहे, म्हणूनच त्याला 'साधन' म्हटले आहे. हे साधन सर्वांना अचूक साधावे अशी प्रार्थना चिमडचे महाराजांनी निंबरगीकरमहाराजांना केली आहे. ते म्हणतात, *''अचूक साधन साधो या गुरुकुळा। तुझिया सकळा दासदासा.''*

---

१. हरिपाठाच्या १ ल्या अभंगाखाली हे विवेचन आले आहे. (सं. टी.)

ज्ञानेश्वरमहाराज शेवटच्या कडव्यात सांगतात, *''ज्ञानदेव म्हणे निवृत्ति निर्गुण। दिधले संपूर्ण माझे हाती.''* आपणाला आपले सद्गुरू कसे दिसले हो ? आपल्याला त्यांचे बाह्यरूपच दिसले ना ? त्यांचे कपडे, त्यांचे शरीर हेच दिसले ना ? तसे ज्ञानेश्वरमहाराजांचे झाले नाही. त्यांना त्यांचे गुरू निवृत्तिनाथमहाराज हे निर्गुण रूपात दिसले. गुरूचे खरे स्वरूप 'सोहं' हे आहे. *''सोहं तोची सद्गुरुराव,''* ही तुकोक्ती हेच स्पष्ट करते आहे. या सोहंरूप सद्गुरुंचे वास्तव्य कोठे असते हो ? *''मम हृदयी या श्रीगुरू,''* हे ज्ञानेश्वरमहाराजांचे वचन सद्गुरुंचे वास्तव्य कोठे असते हे स्पष्ट करणारे आहे. ज्या हृदयात सद्गुरू वास करतात ते हृदय कोणते ते आपण मागे[1] पाहिलेले आहे. आता *''सोहं''*आणि *''निर्गुण''*हे काही वेगळे नाहीत. *''निर्गुण म्हणिजे बहुगुण। बहुगुणी अंतरात्मा जाण''* आणि *''सोहं आत्मा स्वानंदधन। अजन्मा तो तूचि जाण,''* हे समर्थांचे ओवीचे चरण निर्गुण व सोहं हे कसे एकरूप आहेत हे दाखवावयास पुरेसे आहेत. अशाप्रकारे निर्गुण असलेल्या निवृत्तिनाथमहाराजांची कृपा ज्ञानेश्वरमहाराजांचेवर झाली आणि निवृत्तिनाथांनी ज्ञानेश्वरमहाराजांना आपले संपूर्ण सर्वस्व देऊन टाकले. सद्गुरू असेच उदार असतात.

१. हरिपाठाच्या १ ल्या अभंगाच्या स्पष्टीकरणात या हृदयाची माहिती आली आहे. (सं.टी.)

## (१३)

समाधि हरीची समसुखेवीण । न साहेल जाण द्वैतबुद्धि ॥१॥
बुद्धीचे वैभव अन्य नाही दुजे । एक्या केशवराजे सकळ सिद्धि ॥२॥
ऋद्धि सिद्धि निधि अवघीच उपाधी । जव त्या परमानंदी मन नाही ॥३॥
ज्ञानदेवी रम्य रमले समाधान । हरीचे चिंतन सर्वकाळ ॥४॥

या अभंगाच्या पहिल्या चरणात 'समाधि हरीची' असे म्हटले आहे. ही हरिसमाधी म्हणजे हरिपाठाचे अभ्यासाने प्राप्त होणारी समाधी आहे. ही समाधी समसुखावाचून साधत नाही आणि या समाधीत द्वैतबुद्धी चालत नाही. द्वैतबुद्धी निर्माण झाली की संपलेच.

समाधीचे अनेक प्रकार आहेत. भावसमाधी, ध्यानसमाधी, योगसमाधी, सहजसमाधी इत्यादी समाधीचे प्रकार आहेत. रामकृष्ण परमहंसांना भावसमाधी लागायची. म्हणजे ते एका विशिष्ट अवस्थेत जायचे व ''आई आई'' असे ओरडायचे. ध्यान करता करता जी समाधी लागते ती ध्यानसमाधी. ज्यात मुद्दाम, हेतुपुरःसर काही असत नाही अशाप्रकारे सहजावस्थेत प्राप्त होणारी निर्हेतुक समाधी म्हणजे सहजसमाधी. हठयोगाने प्राप्त होणारी ती योगसमाधी.

हठयोगात समाधी हे आठवे अंग आहे. यम, नियम, प्राणायाम, प्रत्याहार, ध्यानधारणा, आसन, मुद्रा आणि मग समाधी, अशी ही यौगिक प्रक्रिया आहे. *''हठयोगाची आठही अंगे। यम नियमादिक साधुनी चांगे। आणिमादिक सिद्धीच्या योगे। लोक भुलवावे,''* असे सुप्रसिद्ध वेदान्ती बाबा गर्दे यांनी म्हटले आहे. या योगाने अणिमा इत्यादी सिद्धी प्राप्त होतात; त्यांचे योगे लोकांना भुलवता येते. पण या योगाने चैतन्याची अनुभूती सहजगत्या येत नाही. हठयोगातील समाधीने त्या योगी माणसाला तटस्थता प्राप्त होते. बंदुकीचे बार जरी त्याच्याजवळ काढले तरी त्याची समाधी भंग पावत नाही. पण या समाधीला 'समाधी' असे म्हणण्यास मुक्ताबाई तयार नाहीत. त्या म्हणतात, *''झालासी तटस्थ नव्हे ती समाधि। उपायाची शुद्धि नेणोनिया॥ काष्ठा ऐसा जड तैसा तू झालासी। स्वरूप नेणसी श्रमोनिया॥ बोलता चालता देखता ऐकता। न ढळे सर्वथा तेची साधी॥ ब्रह्मादिक ऐसी समाधि इच्छिती। तयासी हे स्थिति प्राप्त नाही॥ ऐके रे चांगया टाकी रे कल्पना। पावसी त्या खुणा*

*मुक्ताई म्हणे.''* मुक्ताबाई चांगदेव योगिमहाराजांना सांगत आहेत, तटस्थ होणे म्हणजे समाधी नव्हे. देह जर काष्ठवत होत असेल तर त्या योग्याला चैतन्याची अनुभूती आली आहे असे कोण मान्य करील, हा मोठा प्रश्न आहे. बोलताना, चालताना, पाहताना ज्यात बदल होत नाही असे जे काही आहे ते साधण्यानेच सर्व काही साधेल. शेवटी मुक्ताबाई सांगतात की, कल्पना टाकल्याशिवाय या अध्यात्माच्या खुणा प्राप्त होत नाहीत. कल्पनेचा निरास म्हणजेच वस्तूची ओळख आहे. वस्तू म्हणजे आत्मवस्तू. *''वस्तू ते ओळखा सांडा रे कल्पना। नका आडराना जाऊ झणी,''* ही तुकोक्ती हेच सांगते आहे. कल्पनेचा निरास होणे हीच साधूला समाधी आहे. *''सांडी कल्पना उपाधी। हीच साधूला समाधी,''* ही संतोक्ती साधूला कोणती समाधी प्राप्त होते हेच सांगत आहे. *''कल्पना काजळी कल्पिले कवळी। कैचेनि जवळी देव होय,''* या निवृत्तिनाथांच्या वचनाप्रमाणे; कल्पना ही काजळी जमा झाल्याने, कल्पक असणारा देव/ आत्मा दृग्गोचर होत नाही. कारण कल्पनेच्या उपाधीतून जीवभाव हा जागृत होत असतो. *''कल्पना उपाधी तेणे झाला जीव,''* हे एकनाथांचे वचन येथे चिंतनीय आहे. खरे म्हणजे चैतन्याशिवाय जे काही इतर आहे, ती सारी उपाधीच आहे. संतांनी मात्र चैतन्याचाच स्वीकार केला. त्यामुळे संतांना उपाधीची उपाधी कधीच झाली नाही. कल्पना केली तर माझ्या - ईश्वराच्या - ठिकाणी भूतमात्रे भासतात, पण तीच कल्पना टाकून दिली की भूते नसून मीच - ईश्वरच - सर्व आहे, असा अनुभव संतांना येत असल्याचे भगवान सांगतात. ते ज्ञानेश्वरमहाराजांच्या भाषेत असे :- *''तैसे भूतजात माझ्या ठायी। कल्पिले तरी आभासे काही। निर्विकल्पी तरी नाही। तेथ मीची मी आघवे.''* भूतमात्राची कल्पना टाकून दिली की सर्व ठिकाणी सतत सारखे असणारे जे अद्वितीय परब्रह्म आहे ते जाणवते, सर्वत्र भगवंतच साक्षात्काराला येतो आणि मग *''जे जे भेटे भूत। ते ते मानिजे भगवंत। हा भक्तियोग निश्चित। जाण माझा,''* या ज्ञानेशवचनाची अनुभूती येते. सर्वत्र सम असणाऱ्या परमात्म्याशी जीवाचे तादात्म्य झाले की तो जीव समत्वाचे सुखात येतो व त्याला हरीची समाधी साधते. या ठिकाणी द्वैतबुद्धी शिल्लकच रहात नाही. सर्व ठिकाणी असणाऱ्या परमात्म्याचा अनुभव आला म्हणजे मग समसुख प्राप्त होणार आहे. त्यासाठी समबुद्धीची आवश्यकता आहे. समबुद्धीने नामाचे ग्रहण होणे आवश्यक आहे. समबुद्धीने नाम घेतले असता साधक हा हरिसमानच होऊन जातो. ही अनुभूती ज्ञानेश्वरमहाराज *''समबुद्धी घेता समान श्रीहरी। शमदमावरी हरि झाला,''* या चरणात व्यक्त करीत आहेत. त्यावेळी

इंद्रियनिग्रह, मनोनिग्रह हे सहजच होतात, निग्रह आणि संयम यांची येथे जरुरीच रहात नाही. नामानुसंधान राखले असता नादाचे श्रवण होत असते. नामानुसंधान, नादानुसंधान आणि आत्मानुसंधान हे शब्द एकार्थवाचीच आहेत. आणि हे नामानुसंधान साध्य होण्यासाठी समबुद्धी होणे आवश्यक आहे. आणि समबुद्धी होण्यासाठी चित्ताची समता आवश्यक आहे. *''अर्जुना समत्व चित्ताचे। तेचि सार जाण गा योगाचे। जेथे मन आणि बुद्धीचे। ऐक्य आथी,''* हे यासाठीच ज्ञानेश्वरमहाराजांनी सांगितले आहे.

चित्ताचे समत्व - मनाची सम अवस्था - होणे आवश्यक आहे. ते साधण्यासाठी रामनामाचा जप समत्वाने साधावा लागतो. *''राम राम जप समत्वे साधावा,''* हे निवृत्तिनाथांनी जे वर्म सांगितले आहे ते ध्यानात घ्यावयास हवे. लक्षात घ्यावे की राम राम जप समत्वाने ''साधावयाचा'' आहे ''उच्चारावयाचा'' नाही. राम राम जप साधताना सकार व हकार यांची पारडी असलेला तराजू सम व्हावयास पाहिजे. सकार आणि हकार या पारड्यांतून अहंबुद्धी व अहंकार गेले की ती पारडी सम होतात. आणि मग हा जप समत्वाने साधता येतो. 'नित्य' जे नाम आहे त्याचा जपच येथे खरा महत्त्वाचा आहे. तात्पर्य, जीवनाचे समतेने मनाची, चित्ताची, बुद्धीची समता होऊन सम अशा ब्रह्माच्या साक्षात्काराने समसुखात हरीची समाधी साधली जाते.

पुढील कडव्यात ज्ञानेश्वरमहाराज सांगतात, *''बुद्धीचे वैभव अन्य नाही दुजे। एक्या केशवराजे सकळ सिद्धि.''* दुजेपणाचा अभाव हेच बुद्धीचे वैभव आहे. बुद्धी ही परमात्म्याशी एकरूप होणे हेच बुद्धीचे वैभव आहे. ध्यान हा शब्द धी+आन मिळून बनला आहे. धी म्हणजे बुद्धी आणि आन म्हणजे दुसरे. ज्या बुद्धीत परमात्म्याशिवाय - केशवाशिवाय - अन्य काही नसणे हेच ध्यान आहे, आणि अशी अवस्था होणे हेच ते बुद्धीचे वैभव आहे. आता केशव म्हणजे कोण हो ? केशव शब्दातला 'के' कंसात टाका. काय रहाते ? शव. या शवात के मिसळला की केशव होतो. एकाक्षरी कोशात 'क' म्हणजे चार असा अर्थ आहे. या चार देहावरची ''मात्रा'' म्हणजे तो केशव आहे. अशा केशवाचे ध्यान बुद्धीला लागले की श्रेष्ठ अशी आत्मसिद्धी साधकाला प्राप्त होते.

ज्ञानेश्वरमहाराज तिसऱ्या कडव्यात म्हणतात, *''ऋद्धि सिद्धि निधि अवघीच उपाधी। जव त्या परमानंदी मन नाही.''* परमानंदात मन नसेल तर ऋद्धी, सिद्धी ही अवघी उपाधीच ठरते. ऋद्धि-सिद्धी ही परमात्म्याच्या प्राप्तीतील धोंड आहे. संतमहात्मे या ऋद्धिसिद्धीच्या वाटेला जात नाहीत. तुकाराममहाराजांनी तर

त्यांना लाथाच घातल्या :- *''रिद्धि सिद्धि सुखे हाणीतल्या लाथा.'' ''भुक्ति मुक्ति फुकाचसाठी। कोणी तयाकडे न पाहे रे,''* ही संतोक्तीसुद्धा लक्षात घेण्यासारखी आहे.

ज्ञानेश्वरमहाराज शेवटच्या कडव्यात सांगतात, *''ज्ञानदेवी रम्य रमले समाधान। हरीच चिंतन सर्वकाळ.''* हरीचे चिंतन हेच रम्य समाधान आहे आणि ते प्राप्त करून घेणे हे साधकाचे काम आहे.

## (१४)

**नित्य सत्य मित हरिपाठ ज्यासी । कळिकाळ त्यासी न पाहे दृष्टी ॥१॥**
**रामकृष्ण वाचा अनंतराशी तप । पापाचे कळप पळती पुढे ॥२॥**
**हरि हरि हरि मंत्र हा शिवाचा । म्हणती जे वाचा तया मोक्ष ॥३॥**
**ज्ञानदेवा पाठ नारायण नाम । पाविजे उत्तम निजस्थान ॥४॥**

परमार्थात नाम हे फारच महत्त्वाचे आहे. या नामाचाच महिमा पुन: एकदा या अभंगात ज्ञानेश्वरमहाराजांनी सांगितला आहे.

नित्य, सत्य आणि मित अशा हरिपाठात जो जीव येतो त्याकडे पहाण्याचे सामर्थ्य कळिकाळातही नाही. हरिपाठाचे नेमके स्वरूप काय आहे ते या पहिल्या चरणात माऊलींनी प्रगट केले आहे. हरिपाठाचे स्वरूप काय आहे असे जर आपणास विचारले तर त्यात काय काय विषय आले आहेत ते सांगू आणि त्याची भाषा सोपी आहे असे म्हणू. भाषा सोपी आहे. ती ज्ञानेश्वरमहाराजांची आहे की नाही ? हरिपाठाचे अभंग २७ की २८? त्याच्या पठणाने कोणते फायदे होतात ? इत्यादी विषयांचा ऊहापोह आपण करू. पण या चर्चेत हरिपाठ म्हणजे नेमके काय हे कोणच लक्षात घेत नाही. हरिपाठ कसा आहे हे ज्ञानेश्वरमहाराजांनी फक्त तीनच शब्दांत सांगितले आहे. हरिपाठ हा ''नित्य सत्य मित'' आहे. या जगात नित्य काय आहे, सत्य काय आहे, आणि मित काय आहे, हे ओळखले पाहिजे.

या जगात सत्य काय आहे ? आपण सर्वजण सत्याच्या शोधात आहोत. पण सत्य हाताला गवसले आहे काय ? समर्थ सांगतात, *''मना पाहता सत्य हे मृत्युभूमी.''* जग / विश्व हे मृत्युभूमी आहे एवढे सत्य आहे. माणूस आजारी पडला की काहीही करून त्याला जगवण्याचा प्रयत्न करतात, तोडमोडफोड करतात; पण एवढे करून तो जगेलच याची खात्री आहे काय ? या जगाची मृत्युभूमी ही पाटी बदलता आली काय ? नाही. एवढे प्रयत्न लोक करतात; पण त्यांना 'जीव' काही अजून सापडलेला नाही. त्यांना जीव बाटलीत बंद करावयाचा आहे. पण हे कसे काय शक्य आहे ? अहो, आत्मा हा प्रयोगी आहे. तो प्रयोगाने कसा सिद्ध होईल, हा मोठा प्रश्न आहे. आणि समजा या लोकांच्या प्रयत्नांना यश आले, त्यांनी आत्मा बाटलीत बंद केला, माणसे अमर झाली, तर माणसे एकमेकाला मारतील. तेव्हा मृत्युभूमी ही पाटी बदलणार

नाही हे त्रिकालाबाधित सत्य आहे. जो जन्माला येतो त्याला कधीतरी जग सोडावेच लागते. *''जो का जन्मा आला। कधीतरी त्याला। सोडोनी देहाला। जाणे असे,''* या शब्दांत तात्यासाहेबमहाराज आपणास जागे करीत आहेत. अहो, देह धारण केला की जन्म व मृत्यू हे दोन्ही अटळ आहेत. *''देहाचिया गावा आलिया। जन्ममृत्यूचिया सोहळीया। ना म्हणो नये धनंजया। जियापरी,''* हे ज्ञानेशवचन हेच सांगते आहे.

हे सर्व माहीत असून आमचे वागणे कसे आहे ? काही गोडवा आहे का आमच्या वागण्यात ? आपण इतकी मेलेली माणसे पहातो. आपण कधीतरी जाणार हेही मान्य आहे. पण आमच्यात काहीही बदल नाही. एक गौतम बुद्ध तेवढे अपवाद. त्यांनी आजारी, मेलेला माणूस पाहिला आणि त्यांना वैराग्य आले. अवघड आहे की नाही ? साधा सर्कसचा मॅनेजरसुद्धा एका गावातून दुसऱ्या गावात सर्कस नेताना लोकांच्याकडून ''अजून थोडा मुक्काम वाढवा'' अशा आशयाच्या चिठ्ठ्या घेतो व ''खास लोकाग्रहास्तव सर्कसचा मुक्काम दोन दिवस वाढविला आहे'' असे जाहीर करून टाळ्या मिळवितो. इथे तर परलोकात गमन करावयाचे आहे. ''बरे झाले. घाण गेली,'' असे कोणी म्हणू नये इतपत तरी गोडवा राखता यायला नको का ? *''आपणासी आहे मरण। म्हणोन राखावे बरेपण,''* असा सल्ला समर्थ रामदास आपणास देत आहेत.

*''एक पाहतसा एकाची दहने। सावध त्या गुणे कारे व्हाना''* असा परखड सवाल तुकाराममहाराज करीत आहेत. *''मरणाचे स्मरण असावे''* अशी सूचना समर्थ करीत आहेत. मी म्हणतो मरणाचे स्मरण राहू दे; धरणाचे[1] स्मरण तरी ठेवले पाहिजे की नाही ? *''धरणाचे स्मरण असावे''* ही गोष्ट सांगलीकरांनी तरी उरी बाळगावी अशी आहे.

हे जे सारे आकारलेले आहे ते ते विकारलेले आहे, आणि ते नाश पावणारे आहे. *''जे जे काही साकार दिसे। ते ते कल्पांती नासे,''* हे समर्थवचन हेच सांगते ना ? जे जे काही साकार आहे त्याला स्थित्यंतर, अवस्थांतर, रूपांतर आहे. म्हणूनच त्याला नाश आहे. त्याला आदि-अंत आहे. म्हणून तर त्याला ''भास'' असे म्हणतात. फक्त आत्मस्वरूपच असे आहे की त्याला नाश नाही, ते कायम असते. म्हणून समर्थ

---

१. या वाक्यात कोयनेच्या धरणाचा उल्लेख आहे. इ. स. १९६७ साली कोयना परिसरात फार मोठा भूकंप झाला आणि लौकरच कोयनेचे धरण फुटणार अशी अफवा पसरली. त्या घटनेला उद्देशून हे वाक्य आहे. (सं. टी.)

सांगतात, *''स्वरूप ते असतचि असे। सर्वकाळ.''* स्वरूपाला अदि-अंत नसल्याने आणि ते सर्वकाळ असल्याने ते सत्य आहे. सत्य हे अढळ असते. *''हे उपजे आणि नासे। ते मायावशे दिसे। ये-हवी तत्त्वता वस्तु जे असे। ते अविनाशची''*, असे ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात. उत्पत्ती आणि नाश हे मायेच्या योगाने दिसतात. आत्मवस्तू जी आहे ती अविनाशीच आहे. तीच सत्य आहे.

सत्य कसे ओळखायचे ? जे नित्य असते तेच सत्य असते. *''नित्यं त्वेकं ब्रह्म.''* एक ब्रह्म तेवढे नित्य आहे, बाकी सारे अनित्य आहे. ब्रह्म - आत्मा - नित्य आहे, देह अनित्य आहे. जे आकारलेले आहे ते सारे अनित्य आहे. जे या आकाराच्या मागे दडलेले आहे ते निराकार (आत्म) स्वरूप नित्य आहे. *''देह अनित्य आत्मा नित्य। हाचि विवेक नित्यानित्य''. ''निराकार जाणावा नित्य। आकार जाणावा अनित्य''* हे समर्थ रामदासस्वामींचे वचन हेच स्पष्ट करीत आहे. नित्य काय आहे आणि अनित्य काय आहे याची छाननी करणे म्हणजेच नित्यानित्यवस्तुविवेक आहे.

एक ब्रह्म - परमात्मा - तेवढा सत्य आणि नित्य आहे. तुकाराममहाराज म्हणतात, *''सत्य तू सत्य तू सत्य तू विठ्ठला.''* एक विठ्ठल फक्त सत्य आहे. विठ्ठल हा शब्द विद्+स्थल असा बनला आहे. विद् म्हणजे जाणणे आणि स्थल म्हणजे ठिकाण. विठ्ठल म्हणजे जाणण्याचे ठिकाण. विठ्ठल - आत्मा - तेवढा सत्य आहे व त्याच्यामुळेच जगाचा हा भास होतोय; तो लपला आहे म्हणून जगाचा भास होतो आहे. तो प्रगट झाला की विश्व लयाला जाते. *''जो लपोनि जगदाभासु। दावी मग ग्रासु। प्रगटला करी॥''*, *''प्रगटे तव तव न दिसे। लपे तव तव आभासे॥''* या चांगदेवपासष्टीतील ओव्या आणि *'' ते आघवेचि दिसणे। जयाते का न देखणे। विश्व भासतसे जेणे। लपालेनी''* ही ज्ञानेश्वरीतील ओवी हेच स्पष्ट करीत आहेत.

परमात्मा - विठ्ठल - ब्रह्म हे सत्य व नित्य आहे. मग त्याचे नाम सत्य आहे का ? हो ! तेही सत्यच आहे. *''सत्य साच खरे। नाम विठोबाचे बरे,''* हे तुकोपनिषद किंवा *''रामनाम नित्य है, रामनाम सत्य है''* हे तुलसीदासांचे वचन नाम सत्य आहे हेच सांगते. परमात्मा सत्य म्हणून त्याचे नाम सत्य हे कसे काय ? याचे कारण असे की भगवंताचे नाम आणि भगवंत हे वेगळे नाहीत. व्यवहारात रूपाला नाम आणि नामाला रूप असे असते. हत्तीला पाहिले की त्याचे हत्ती हे नाव आठवते. व हत्ती म्हटले की हत्तीची आकृती डोळ्यांसमोर येते. परमार्थात मात्र असे नाही. परमार्थात *''नाम तेचि रूप रूप तेचि नाम। नामरूप भिन्न नाही नाही,''* या नामदेवमहाराजांच्या

वचनाप्रमाणे अवस्था आहे. परमार्थात देवाचे नाम आणि रूप हे भिन्न नाहीत. *''नाम परब्रह्म वेदार्थे''* म्हणजे ''नाम हेच परब्रह्म आहे असे वेदांनी प्रतिपादन केले आहे'' असे ज्ञानेश्वरमहाराज सांगतात. तेव्हा परमात्मा जर सत्य व नित्य आहे तर त्याचे नामही सत्य व नित्य आहे हे उघडच आहे. हे सत्य व नित्य असणारे नाम हे नित्यनेमाने घेतले असता, अंतरीचा काम नाहीसा होतो असे आमचे मामा रामपाठात सांगतात :- *''नित्याचे नेमाचे असे एक नाम। घेता सरे काम अंतरीचा.''*

परमात्मा व त्याचे नाम हे सत्य व नित्य आहेत. आता ते 'मित' आहे म्हणजे काय ? नाम हे मित म्हणजे प्रमाणबद्ध आहे. हे नाम कसे मित अथवा प्रमाणबद्ध आहे असे सांगणारा एक अभंग आमच्या मामांच्या रामपाठात आहे तो असा :- *''कमी जास्त काही अनित्यता नाही। स्फुरतसे देही अखंडित.''* जे नाम कमी जास्त काही न होता अखंडत्वाने या मानवी देहात अनुस्यूत रीतीने स्फुरण पावत आहे तेच ते मित नाम आहे. या नामाचे आकलन झाले असता व त्याचा पाठ झाला असता, कळिकाळालाही त्या पाठ करणाऱ्याकडे पहाण्याचे धाडस होत नाही. इतकेच नव्हे तर काळ त्याचा गुलाम होतोय. *''काळ गुलाम सलाम करी। तुकया घरी राबतो,''* या तुकोक्तीचा अनुभव त्याला आल्यावाचून रहात नाही.

ज्ञानेश्वरमहाराज पुढील कडव्यात सांगतात, *''रामकृष्ण वाचा अनंतराशी तप। पापाचे कळप पळती पुढे.''* रामकृष्णवाचा हेच महातप आहे. राम आणि कृष्ण या जीवनाच्या दोन गती आहेत. *''ज्ञानदेवा ध्यानी रामकृष्ण मनी। अनंत जन्मोनि पुण्य होय.''* ध्यान, मन व रामकृष्णगती यांचा विषय मागे[1] पाहून झाला आहे. रामकृष्ण गतीतील नामाने घबाड पुण्याची प्राप्ती होते, पाप हे औषधाला शिल्लक रहात नाही, आणि अनंताचा साक्षात्कार होतो.

पुढील कडव्यात ज्ञानेश्वरमहाराज सांगत आहेत, *''हरी हरी हरी मंत्र हा शिवाचा। म्हणती जे वाचा तया मोक्ष.''* शिवाचा हरिमंत्र जे कोणी म्हणतात त्यांना मोक्ष प्राप्त होतो, आम्ही म्हणतो त्या हरिमंत्राने नव्हे. हा हरिमंत्र या आपल्या मुखातील वाचेने म्हणणेचा नाही. आपली ही वाचा चोवीस तास नाम घेऊ शकेल काय ? नाही. आपली जिव्हा/वाचा गोडधोड खाणारी व निंदा स्तुती करणारी आहे. नामाची जिव्हा-वाचा - वेगळी आहे. हा विषय आपण मागे[2] पाहिलेला आहे. अहो, या कातडीमुखाने

१. हरिपाठ अभंग १६ खाली पहा (सं. टी.)
२. हरिपाठ अभंग १७ खाली पहा (सं. टी.)

नाम घेऊन संतांनी जे नामाचे महत्त्व सांगितले आहे त्याचा अनुभव कुणी कधी घेतला आहे काय ? नाही हेच त्याचे उत्तर आहे. वानगीदाखल पहा :- *''राम म्हणता काम क्रोधाचे दहन। जाय अभिमान देशोधडी,''* ही तुकोक्ती या मुखाने राम राम म्हणून किती लोकांनी अनुभवली ? प्रांजळपणे सांगायचं हं ! नाही हेच त्याचे उत्तर आहे. जे नाम उच्चारायचे आहे तेही वेगळेच आहे, असे पुढील दोहा सांगतो :- *''राम राम सब कुछ कहे। ठक ठाकुर और चोर। जिस नामसे ध्रुव प्रल्हाद तरे। वो नाम है कुछ और.''* रामकृष्ण या जीवनाचे गतीत भगवंताचे नाम आहे. त्या गतीत जीवाचे होणारे तादात्म्य हाच तो मोक्ष आहे. *''जाणीव नेणीव भगवंती नाही। हरि उच्चारणी पाही मोक्ष सदा.''* म्हणजे जाणीव-नेणीव-रहित भगवंताच्या नामाच्या उच्चाराशी जीवाचे होणारे तादात्म्य हाच तो मोक्ष आहे, असे ज्ञानेश्वरमहाराज सांगतात आणि हा अनुभव 'शिवाचा हरिमंत्र' जपणाऱ्यांनी घेतलेला आहे. *''मुखी नाम हाती मोक्ष। ऐसी साक्ष बहुतासी,''* ही तुकोक्ती याची ग्वाही देत आहे.

ज्ञानेश्वरमहाराज शेवटच्या कडव्यात सांगतात, *''ज्ञानदेवा पाठ नारायण नाम। पाविजे उत्तम निजस्थान.''* नारायणनामाचे पाठाने उत्तम निजस्थान प्राप्त होते. मागच्या कडव्यात हरिनामाचे महत्त्व ज्ञानेश्वरमहाराजांनी सांगितले आणि तसे करण्याचे आम्ही ठरविले. तोवर या कडव्यात नारायणनामाचे महत्त्व ज्ञानेश्वरमहाराजांनी वर्णन केले. हा काय प्रकार आहे, असे आपणास वाटेल. पण हे समजून घ्यावयास हवे की हरी आणि नारायण हे काही वेगळे नाहीत. *''नारायण हरी नारायण हरी। भुक्ति मुक्ति चारी घरी त्याच्या,''* हा हरिपाठातील चरण हेच दाखवितो की हरी आणि नारायण हे भिन्न नाहीत. या गोष्टीचा स्पष्ट खुलासा गुरुलिंगगीतेत आहे. हरी आणि गुरू हे नारायणच आहेत. म्हणजे निंबरगीकरमहाराजच आहेत. आम्हाला दुसरा नारायण माहीत नाही. ही गोष्ट गुरुलिंगगीतेतील[१] *'हरि नारायण गुरू नारायण'* हे भजन सांगते. आमचे निंबरगीकरमहाराज म्हणजे चालते बोलते ब्रह्म होते. आणि समजा ब्रह्माच्याही पलीकडे आणि काही श्रेष्ठ असेल तर तेही आमचे निंबरगीकरमहाराज होते. *''आरती नारायणा। धन्य जगज्जीवना। सगुण ब्रह्ममूर्ती। काय तपोनिधाना,''* ही निंबरगीकरमहाराजांची आरती हा अनुभव आहे. तेव्हा जर जीवन्मुक्त व्हायचे असेल तर नारायणनामाचा पाठ झाला पाहिजे. *''नारायणनामे होऊ जीवन्मुक्त''* ही तुकोक्ती

१. निंबरगीकरमहाराजांनी कानडी भाषेतील ही गुरुलिंगगीता श्रीदासराममहाराजांना श्रुत केली होती (सं.टी.)

याची ग्वाही देत आहे. नारायणनाम हा मंत्रराज आहे. ज्ञानेश्वरमहाराज सांगतात, *''अशौचिया जपू नये। आणिकाते ऐको नये। ऐसीया मंत्राते जग बिहे। याचे फळ थोडे। परी क्षोभणे बहु॥ ऐसा नव्हे रे मंत्रराज। नारायण नाम नारायण नाम। जप कारे मना.''* नारायणनामाचा पाठ झाला असता अनंता जन्माचे दोष नाहीसे होतात. *''नारायणा बा नारायणा। अच्युत अनंत गोविंद म्हणा॥ दोष जन्माचे जातील साचे। नारायण नाम आलीया वाचे,''* हे सोपानदेवांचे वचन येथे लक्षात घेणेजोगे आहे. या नारायणनामाचे योगे उत्तम निजस्थान म्हणजे मोक्ष प्राप्त होतो, असे ज्ञानेश्वरमहाराज शेवटच्या कडव्यात सांगतात.

## (१५)

**एकनाम हरी द्‌वैतनाम दुरी । अद्‌वैत कुसरी विरळा जाणे ॥१॥**
**समबुद्‌धी घेता समान श्रीहरी । शमदमा वरी हरी झाला ॥२॥**
**सर्वाघटी राम देहादेही एक । सूर्यप्रकाशक सहस्ररश्मी ॥३॥**
**ज्ञानदेवा चित्ती हरिपाठ नेमा । मागिलीया जन्मा मुक्त झालो ॥४॥**

*''एक नाम हरि''* म्हणजे काय हे अगोदर विस्ताराने पहावयास हवे. एक नामच हरी आहे. या हरीपासून ॐकार निघाला. जो हरी वेदाला *'न इति न इति'* असे म्हटल्यावर प्राप्त झाला, त्या हरीला आदी, मध्य आणि अंत नाही. अशा हरीचे - देवाचे - दर्शन झाले असता , मोहरूपी संसारातून जीव परपार होतोय. हीच गोष्ट समर्थ रामदासांचे पुढील पद सांगते- *''त्या देवाचे दर्शन तू घे तू घे। संसार मोहातुनी निघे निघे॥ आदि मध्य ना अंत जयाला। ज्यापासूनी ॐकारची झाला॥ नेति नेति म्हणे श्रुति जयाला। ब्रह्मा विष्णु हर तिघे.''* सोहिरोबांचे म्हणणेही असेच आहे. ज्याला *'ओम् इत्येकाक्षरं ब्रह्म'* असे संबोधले जाते, असा ओंकार हरीपासूनच निघाला. म्हणूनच घनपाठी, जटापाठी असे विद्‌वान ब्राह्मण जेव्हा वेद म्हणतात, तेव्हा ते सुरुवातीला *''हरि: ओम्''* असे म्हणतात. पण हेच ब्राह्मण ''संध्याकाळी हरिभजनाला या'' असे म्हटले तर मात्र येणार नाहीत, अशी मजा आहे.

या हरीची भक्ती होणे हे महत्त्वाचे आहे. हरीची भक्ती घडली असता, संसारात धन्यता प्राप्त होणार आहे. *''हरिभक्ति करी धन्य तो संसारी''* हे समर्थ रामदासांचे वचन आणि *''ओळखिला हरी धन्य तो संसारी''* हे एकनाथांचे वचन हेच सांगत आहे. हरीची भक्ती होण्यासाठी हरी कोण हे जाणले पाहिजे. हरीला न जाणल्याने बारा[१] आणि सोळा जणी रात्रंदिवस फिरत रहातात. *''बारा सोळा जणी हरीसी नेणती। म्हणोनी फिरती रात्रंदिवस,''* हे नाथवचन स्पष्टच आहे. पण याच बारा सोळा जणी जर मिळून आल्या तर ती मजा काही औरच आहे महाराज ! *''बारा सोळा जणी गडे ग बारा सोळा जणी। मिळोनी येती गलगा करिती। मशी गेल्या घेऊनी॥ दहाव्या घरा जाऊनी सखे ग दहाव्या घरा जाऊनी। सत्रावीचे अमृत प्याले हर्ष जाहला मनी.''* बारासोळा जणी मिळून आल्या

१. बारा हे सूर्याचे प्रतीक आणि सोळा हे चंद्राचे प्रतीक. चंद्र व सूर्य म्हणजे इडा व पिंगला या नाड्या. त्या दोन नाड्या एक झाल्या की सुषुम्ना होते.

तर अनुहताचा ध्वनी श्रवण होतोय. आपल्याला लिफ्टमध्ये घालून त्या आपणास थेट दशमद्वारात[1] नेतायत. मग आणखी काय पाहिजे ? पण हे सारे हरीला जाणले तर !

या हरीची ओळख होण्याकरता त्याचा पत्ता माहिती पाहिजे. *''हरि येथे रे हरि तेथे रे। हरीवाचून स्थळ नाही रिते रे॥ हरि आदि रे हरि अंती रे। हरि हा व्यापकू सर्वाभूती रे,''* हा ज्ञानेश्वरमहाराजांचा अभंग, आणि *''वसे हृदयी देव तो जाण कैसा। नभाचे परी व्यापकू जाण तैसा। सदा संचला येत ना जात काही। तयावीण कोठे रिता ठाव नाही,''* हा समर्थ रामदासस्वामींचा श्लोक या हरीचा पत्ता सांगावयास पुरेसे आहेत. आता हरीचा पत्ता कळला, तो सर्व ठिकाणी भरून राहिला आहे हे कळले. पण आम्हाला तर तो कोठेही दिसत नाही आणि तुम्ही तर तो सर्वत्र आहे असे म्हणताय. हे कसे काय ? 'हरी हा चर्मचक्षूंना दिसत नाही.' *''जगी पाहता चर्मचक्षी न लक्षे''* हे रामदासांचे वचन, *''पै स्थूलदृष्टी माते। भरंवसा बांधुनि चित्ते। देखती मज अविनाशाते। परी दिसे कैसा''* हे ज्ञानेशवचन आणि *''अस्थीचा देही मासाचा डोळा। पाहेन म्हणे ब्रह्माचा गोळा। तो ज्ञाता नव्हे आंधळा। केवळ मूर्ख''* ही समर्थांची ओवी हे कोणत्या डोळ्याला हरी दिसत नाही हे सांगतात, तर *''जगी पाहता ज्ञानदृष्टी निरीक्षे''* हा चरण कोणत्या डोळ्याला हरी दिसतो हे सांगत आहे.

परंतु ही ज्ञानदृष्टी आमचेपाशी नाही. ही दृष्टी सद्गुरूंनी द्यावी लागते. याकरिता गुरूची आवश्यकता आहे. उपजत ज्ञान असणारे ज्ञानेश्वरमहाराजांसारखे विरळा हो ! त्यांची अवस्था *''तैसी दशेची वाट न पाहता। वयसेचिया गावा न येता। बाळपणीच सर्वज्ञता। वरी तयाते,''* या ओवीत सांगितल्याप्रमाणे होती. बालपणीच त्यांना ज्ञानप्राप्ती झाली होती. म्हणून तर चांगदेव योगी त्यांना शरण गेले. *''उपजताची ज्ञानी हे वर्म जाणोनी। आले लोटांगणी चांगदेव,''* हा अभंग हे स्पष्ट करतो. पण सामान्य माणसाला गुरूच्या मार्गदर्शनाची आवश्यकता असते. *''सद्गुरूंची आवश्यकता नाही''* असे म्हणणारे लोक त्यांना मानणाऱ्या लोकांचे - अनुयायांचे - गुरू झालेच की हो ! तेव्हा भावार्थ असा की ही ज्ञानदृष्टी सद्गुरूंच्या मार्गदर्शनाशिवाय प्राप्त होत नाही. म्हणून गुरूच्या उपकाराला पारावार नाही असे शिवदिन केसरी म्हणतात, *''गुरूच्या उपकारा उपकारा। नाहीच पारावारा.''* ते पुढे सांगतात, *''देऊनी आपुला डोळा। डोळा दाखविले घननीळा॥ देऊनी आपुली दृष्टि। चिन्मय केली अवघी सृष्टी॥ जिकडे पाहे तिकडे। अवघे ब्रह्मचि दिसते उघडे.''* सद्गुरूंनी दृष्टी दिली म्हणून सर्वत्र ब्रह्म दिसू लागले; अवघी सृष्टी चैतन्यमय दिसू लागली.

---

१. दशमद्वारातून देवाचे दर्शन होते. (सं.टी.). मागे हरिपाठ १ ल्या अभंगाचे स्पष्टीकरण पहा.

ही दृष्टी देणारा महात्मा भेटला पाहिजे. तरच हे शक्य आहे. आमची अहंममता जोवर जात नाही तोवर हा डोळा कधी उघडेल काय, असा प्रश्न आहे. अहंकार जाणेकरिता श्वसनक्रिया मंद होणे आवश्यक आहे. तसे होण्यास महाराजांनी आपणास पुरे साधन दिले आहे; ते करण्यात आपण अपुरे पडता कामा नये. देहाच्या जाणीवेने देवाचा विसर पडत असल्याने, जीवनाचे परिभ्रमणात अहंकाराची लाट उठत असते. म्हणून देहभाव नाहीसा होणे हे महत्त्वाचे. देहभाव नाहीसा करणारे साधन आपले हातून व्हावयास हवे. *''समगतीमाजी हरीचा आठव । नुरे देहभाव देहामाजी ,''* हा मामांचे रामपाठातील चरण साधनातील वर्म सांगणारा आहे. आपल्या जीवनाच्या समगतीमध्ये हरीचा आठव झाला असता देहभाव नाहीसा होत असल्याचे मामांनी स्वत:च्या अनुभवाने सांगितले आहे. श्रीगुरूंनी सांगितलेल्या गतीत दृष्टी व कान यांचा लय झाला म्हणजे ती गती ऊर्ध्वमुख होऊन वाहू लागते. मग हीच गती डोळ्याचे काम करू लागते. ही गती जेथे पडते त्या ठिकाणाला दृष्टी म्हणतात. या दृष्टीनेच आत्मस्वरूप पहाता येते. परमात्मा हा वायुस्वरूप असल्याने त्याला पाहण्याची दृष्टी हीसुद्धा वायुरूपच असते. एकदा का नामगतीची व प्राणगतीची एकता होऊन ही दृष्टी बनली की त्या दृष्टीचा विषय आत्मा हाच होतो. यालाच समर्थ रामदासांनी 'ज्ञानदृष्टि' असे म्हटले आहे. गुरुकृपा असेल तरच आत्मसाक्षात्कारासाठी आवश्यक असणारा डोळा लाभतो व जीवाला आत्मसाक्षात्कार होतो. आणि ज्याला आत्म्याचा साक्षात्कार झाला त्याला सर्वत्र आत्माच दिसत रहातो. साहजिकच त्याचे दृष्टीत सुखदु:खाचे विकार उमटू शकत नाहीत ; व त्याचे समाधान पण भंग पावू शकत नाही. त्याचा देह व्यवहारात काहीही करीत असला तरी त्याला सर्वत्र आत्म्याचे समाधान मिळत रहाते. त्याच्या मनाची आनंदाची बैठक ढळत नाही. त्याला सर्वत्र हरिरूप - आत्मरूप - दिसू लागल्याने, त्याला पूजा, ध्यान, जप इत्यादी गोष्टी वेगळ्या अशा कराव्या लागत नाहीत. या गोष्टी सहजच त्याचेकडून होतात. *''जे जे दृष्टी दिसे ते ते हरिरूप। पूजा ध्यान जप त्यासी नाही ,''* हे नाथमहाराजांचे वचन या दृष्टीनेच आहे.

असे हे परमेश्वराप्रत नेणारे एकनाम हरी आहे. आणि जे द्वैतनाम आहे ते परमेश्वरापासून दूर नेते. *''एकनाम एक प्रचीती, द्वैतनाम द्वैतप्रचीती''* असे त्यातील गमक आहे. सद्गुरू आपल्याला एकनाम देतात. त्यावेळी बारशादिवशी ठेवलेले आपले नाव सद्गुरूला अर्पण करावे लागते. मग एकनाम हरी प्राप्त होण्यासाठी करावे लागणारे साधन प्राप्त होते. असा हा नामाचा व्यवहार आहे. हे एकनाम हरी प्राप्त झाले असता, द्वैतनाम आपोआपच दूर जाते, हे सांगायचे कारणच नाही. द्वैतनाम दूर गेले, अहंममता

गेली की ज्ञानदृष्टी जागृत होऊन, आत्मसाक्षात्कार होऊन, त्या जीवाला सर्वत्र आत्मरूपच दिसू लागते. त्याला आकार - पदार्थांचे आकार - कोठे दिसतच नाहीत; त्याला सर्वत्र आत्मा - चैतन्य - दिसते. हीच 'अद्वैताची कुसरी' आहे. परमेश्वराने अद्वैत पहाण्यासाठी द्वैत निर्माण केले आहे. अद्वैताचे - आत्म्याचे - दर्शन झाले असता, द्वैत हे औषधालासुद्धा शिल्लक रहात नाही. जीव हा शिवरूप होतो व त्याला खऱ्या अर्थाने अद्वैताची प्राप्ती होते. ही स्थिती *''आकारु जेथ सरे। जीवत्व जेथ विरे। द्वैत जेथ नुरे। अद्वय जे''* अशी असते. असे अद्वैत अनुभवणारा आमचे मामांचेसारखा महात्मा एखादाच असतो. आमचे मामांचे इथे खरे अद्वैत होते. सर्व संप्रदायांचे अध्वर्यू हे मामांचेकडे यायचे. त्यांना मामांचे घर आपलेच घर वाटायचे.

ज्ञानेश्वरमहाराज पुढील कडव्यात सांगतात, *''समबुद्धी घेता समान श्रीहरी। शमदमावरी हरी झाला.''* समबुद्धीने हरीचे नाम घेतले असता तो जीव हरि-समान होतो. जीवनाचे समतेने मन, चित्त व बुद्धीची समता होऊन हरीचे नाम घेतले की जीव हा हरिरूपच होतोय. व त्याला मन:संयम व इंद्रियसंयम करण्याची गरज भासत नाही. तो आपोआपच होतो. *''मनाचा मारु न करता। इंद्रियाते न दंडीता। येथ मोक्ष असे आयता। श्रवणाची माजी,''* या ज्ञानेशवचनाचा अनुभव त्या जीवाला आल्यावाचून रहात नाही.

पुढील कडव्यात ज्ञानेश्वरमहाराज सांगतात, *''सर्वांघटी राम देहादेही एक। सूर्यप्रकाशक सहस्त्ररश्मी.''* देहादेही आणि सर्वांघटी सहस्त्ररश्मी सूर्यप्रकाशक एक रामच आहे. *''घट घट बीचमे राम रमैया। झुटा पंचरंग खोल। रे तुज राम मिलेगा। घुंघटका पट खोल.''* अज्ञानाचा पडदा बाजूला झाला की रामदर्शन होणार असल्याची ग्वाही कबीरसाहेब देत आहेत.

ज्ञानेश्वरमहाराज शेवटच्या कडव्यात सांगतात, *''ज्ञानदेवा चित्ती हरिपाठ नेमा। मागिलीया जन्मा मुक्त झालो.''* नित्य, सत्य आणि मित असा जो हरिपाठ आहे, त्याचा नेम साधणाऱ्यांचा हा जन्म अखेरचा आहे. म्हणजेच ते मागल्या जन्मीच मुक्त झालेले आहेत, असे श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगत आहेत. *''नडी नुडी इदे जन्म कडी''* हे निंबरगीकरमहाराजांचे आपणांस आश्वासन आहे. या जन्मीच जर साधन पूर्ण झाले तर हा जन्म अखेरचा आहे. साधन या जन्मीच पूर्ण करणाऱ्या साधकांना *''जन्म नाही रे आणिक। तुका म्हणे माझी भाक''* असे तुकाराममहाराज शपथ घेऊन सांगत आहेत. मात्र त्यासाठी साधन पूर्ण होणे अत्यावश्यक आहे.

## (१६)

हरिबुद्धी जपे तो नर दुर्लभ । वाचेसी सुलभ रामकृष्ण ॥१॥
रामकृष्णनामी उन्मनी साधली । तयासी लाधली सकळ सिद्धी ॥२॥
सिद्धी बुद्धी धर्म हरिपाठी आले । प्रपंची निमाले साधुसंगे ॥३॥
ज्ञानदेवी नाम रामकृष्णी ठसा । तेणे दशदिशा आत्माराम ॥४॥

नाम आणि साधुसंग यांचे महत्त्व पुन: एकदा ज्ञानेश्वरमहाराज या अभंगात सांगत आहेत.

कोणतीही गोष्ट त्या बुद्धीने झाली की चांगली होते. पण हरीचा जप त्या बुद्धीने करणारे फारच थोडे. जे काही आपण करतो त्या ठिकाणी आपली बुद्धी पाहिजे. नाहीतर, इकडे जप चाललाय, आणि आपलं मन, चित्त त्या ठिकाणी नाही, ते दाही दिशा फिरतंय, याला तुम्ही जप - नामस्मरण - म्हणणार का, असा मोठा प्रश्न आहे. *''माला तो करमे फिरे। जिव्हा फिरे मुखमाही। मन तो दाही दिस फिरे। इह तो सुमरन नाही,''* हा तुलसीदासांचा दोहा हे नामस्मरण नव्हे असे सांगतो. तर *''नाम घेता हे वैखरी। चित्त धावे विषयांवरी॥ ऐसे कैसे रे स्मरण,''* हा नाथमहाराजांचा प्रश्न आपल्याला आत्मपरीक्षण करायला लावणारा आहे. आपण जप - नामस्मरण - कसे करतो हे आपले आपण तपासायचे. अहो, सवय झाली की माळ हातात फिरत रहाते, जीभ हलत रहाते, त्याचवेळी मन मात्र प्रपंचातील विषयांचे चिंतन करीत असते. हा असला जप काही उपयोगाचा आहे काय ?

चालण्याचा व्यायाम केला की तब्येत सुधारते. पण कुणाची ? जो केवळ तब्येत सुधारावी या बुद्धीने फिरतो त्याची तब्येत सुधारते. पण पोस्टमन जरी रोज पाचसहा किलोमीटर फिरला, एकही दिवस चुकला नाही, तरी तो असा बारीक का ? कारण तो जे फिरतो. ते खांद्यावरील कामाचे ओझे कमी करण्यासाठी, काम पुरे करण्यासाठी फिरतो, तो काही तब्येत सुधारावी म्हणून फिरत नाही. म्हणजे फिरण्यात तब्येत सुधारावी अशी बुद्धी हवी. तसं इथं आहे. हरीचा जप त्या बुद्धीने अंत:करणापासून व्हावयास पाहिजे. नुसता वेठबिगार जप काही कामाचा नाही.

अंत:करण म्हणजे काय हो ? मन, चित्त, बुद्धी आणि अहंकार हे जे चित्तचतुष्टय आहे त्यालाच अंत:करण म्हणतात. *''तरी बुद्धी आणि मन। चित्त अहंकार हन । हे चतुर्विध चिन्ह। अंत:करणाचे''* या ओवीत ज्ञानेश्वरमहाराज तेच सांगत आहेत. या

अंत:करणापासून जप व्हावयास हवा. जप करताना मन स्थिर पाहिजे. चित्ताचा विषय नारायण हा झालेला पाहिजे. बुद्धीमध्ये परमेश्वराशिवाय अन्य काही असता कामा नये. आणि हा जप रामकृष्णवाचेने केला तर सुलभ आहे. रामकृष्णवाचा म्हणजे श्वसनाची चाललेली अखंड अशी सूक्ष्म हालचाल, आणि या रामकृष्णवाचेचे आकलन चांगल्या लोकांना होते. सुलभ म्हणजे सुजनांना - सज्जनांना - लाभण्यासारखे असते आणि ते सोपे आहे. म्हणूनच ते दुर्लभही आहे. मॅट्रिकच्या परीक्षेत मुले मराठीतच नापास होतात. कारण ती सोपी आहे म्हणूनच ना ? तसेच येथे आहे. *''आहे तरी परम सुगम। परी जनासी जाहले दुर्गम,''* हे समर्थवचन हेच सांगते. संतांनी सोपे करून सांगितले. पण करायचे कोणी ? *''सोपे वर्म आम्हा सांगितले संती। टाळ दिंडी हाती घेऊनी नाचा.''* संत सांगतात - रामकृष्णवाचेने जप करायला जमत नाही ? ठीक आहे. टाळ घेऊन, विठ्ठल विठ्ठल म्हणत नाचा. अहो, देहभाव नाहीसे होणे हे महत्त्वाचे आहे. अहो, पण हे तरी काय आम्हाला जमणार ? आमचे प्रेस्टीज आड येतंय. याला आता काय करणार ?

ज्ञानेश्वरमहाराज पुढील कडव्यात सांगतात *''रामकृष्णनामी उन्मनी साधली। तयासी लाधली सकळ सिद्धी.''* रामकृष्ण या जीवनाचे गतीत जे नाम आहे ते रामकृष्णनाम. त्या नामाच्या योगाने मनाचे मनत्व नाहीसे होते. मनाचे मनत्व जाणे म्हणजेच उन्मनी अवस्था. ही उन्मनी अवस्था प्राप्त होते. जो मनाचे पलीकडे नेतो तोच मंत्र. मग मंत्राने आम्हाला असा अनुभव का येत नाही ? कारण आम्ही ज्याला नाम नाम असे म्हणतो ते नाम या ठिकाणी अभिप्रेत नाही. हे पुन: पुन: सांगावे लागते. नाइलाज आहे.

ज्या मनाचे उन्मन व्हावयाचे आहे ते मन म्हणजे काय आहे हो ? *''संकल्प - विकल्पात्मकं मन:''* संकल्प आणि त्या पाठोपाठ उठणारा विकल्प हे मनाचे स्वरूप आहे. शरीराचे मार्फत इंद्रियांचे द्‌वारा जीवाचे दृश्याशी होणारे तादात्म्य म्हणजे ते मन आहे. मन हा परिणाम आहे. या मनाचा वेग प्रचंड आहे, कल्पनेच्या बाहेर आहे. ध्वनीच्या वेगापेक्षा प्रकाशाचा वेग जास्त, तर प्रकाशाच्या वेगापेक्षा मनाचा वेग जास्त आहे. *''हे मन चंचल मोठे। न लगे याचा अंतची कोठे,''* हे पंचदशीकार बाबा गर्दे यांचे मत आहे. तर *''चंचलं हि मन: कृष्ण प्रमाथि बलवद् दृढम्। तस्याहं निग्रहं मन्ये वायोरिव सुदुष्करम्,''* हे गीतेतील अर्जुनाचे वचन हे मनाला आवरणे किती अवघड आहे हेच दाखवते. मन इतके चंचल - चपळ असूनसुद्धा समर्थ रामदासस्वामी त्या मनाला 'अचपळ' असे का म्हणतात ? *''अचपळ मन माझे नावरे आवरिता''* असे समर्थ सांगतात ते का ? याचे कारण असे :- मन हे जड व चैतन्य मिळून बनलेले

आहे. मन म्हणजे नुसते चैतन्य नाही तर त्यात जडाचाही काही अंश आहे. त्यामुळे ते अचपळ झाले आहे. या अचपळ मनाचा वेग आवरता आवरत नाही.

हे मन मेल्याशिवाय 'उन्मन' होत नाही. *''मन मारुनी उन्मन करा। ताटी उघडा ज्ञानेश्वरा,''* हा मुक्ताबाईंचा ताटीचा अभंग हेच सांगतो. सगळं मरतं पण मन मरत नाही, महाराज ! जितका जितका मनुष्य म्हातारा होत जातो तितकं तितकं त्याचं मन तरणं होत जातं. मन मरता मरत नाही, रामकृष्णनामानेच मन मरणे शक्य होते. आणि मन मरून एकदा का मनाचे उन्मन झाले की शब्दाचा ग्रास होऊन, त्या साधकाला सर्वत्र रामाचा साक्षात्कार होऊ लागतो. *''मना उन्मनी शब्द कुंठीत राहे। तो गे तोचि तो राम सर्वत्र पाहे''* असे समर्थ रामदासांचा ''मनोबोध'' सांगतो.

वर म्हटल्याप्रमाणे संकल्प आणि विकल्प हेच खरे मनाचे स्वरूप आहे. या संकल्पात आणि विकल्पात नाम घेतले असता, संकल्प आणि विकल्प हे नाममयच होतात आणि मग मनाचे मनत्वच रहात नाही. *''संकल्पे विकल्पे रामनाम घेता। मग भेटी तत्त्वता अनायासे,''* ही संतोक्ती हेच स्पष्ट करते. अशा तऱ्हेने दोन पळे ''नामात पवन'' आणि ''पवनात नाम'' साधले असता, मनाचे उन्मन होत असल्याचा अनुभव आमचे मामांनी रामपाठात नमूद केला आहे. ते म्हणतात *''जरी दोन पळ साधेल पवन। मनाचे उन्मन होत असे.''* ज्या साधकाला ही उन्मनी अवस्था साधते त्याला सर्व सिद्धी प्राप्त होतात.

ज्ञानेश्वरमहाराज पुढील कडव्यात सांगतात *''सिद्धी बुद्धी धर्म हरिपाठी आले। प्रपंची निमाले साधुसंगे.''* नित्य, सत्य, मित अशा हरिपाठात सिद्धी, बुद्धी व धर्म या सर्वांचा अंतर्भाव होतो. नित्य, सत्य, मित असलेल्या आत्म्यामुळे मनुष्याला सिद्धी, बुद्धी, धर्म प्राप्त होतात; त्याला आत्मप्राप्ती होते. साधूचे संगतीत जो जीव आला त्याला या हरिपाठाची गोडी उत्पन्न होऊन, हरिजप घडला असता, *''ज्ञानदेव म्हणे हरिजप करणे। तुटेल धरणे प्रपंचाचे,''* या ज्ञानेशवचनानुसार दिननिशी होणारे सायास नाहीसे होऊन, आम्ही जे प्रपंचाला धरले आहे, ते धरणे सुटते आहे.

शेवटच्या कडव्यात ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, *''ज्ञानदेवी नाम रामकृष्णी ठसा। तेणे दशदिशा आत्माराम॥''* रामकृष्ण या जीवनाच्या गतीत उमटणारे नाम हृदयात - अंत:करणात - ठसले म्हणजे सर्वत्र आत्माराम साक्षात्काराला आल्यावाचून रहात नाही. नाम हे आतून उमटते आहेच; तेथे लक्ष द्यायचे इतकेच फक्त आपले काम आहे. *'' रामनाम ध्वनि उमटे। तेथे लक्ष लावी नेटे ''* हे बांदकरमहाराजांचे वचन उरी बाळगावे असेच आहे.

## (१७)

हरिपाठ कीर्ती मुखे जरी गाय । पवित्र तो होय देह त्याचा ॥१॥
तपाचे सामर्थ्य तपिन्नला अमूप । चिरंजीव कल्प कोटि नांदे ॥२॥
मातृपितृ भ्राता सगोत्र अपार । चतुर्भुज नर होऊनी ठेले ॥३॥
ज्ञानगूढ गम्य ज्ञानदेवा लाधले । निवृत्तीने दिधले माझे हाती ॥४॥

हरिपाठाची कीर्ती मुक्त कंठाने वर्णन केल्यास तसे करणाऱ्याचा देह पवित्र होतो. हरिपाठाची कीर्ती म्हणजे कशाची कीर्ती ? नित्य, सत्य तथा मित असे जे भगवंताचे नाम आहे आणि परमात्म्याचे स्वरूप आहे, तोच हरिपाठ. त्याची कीर्ती गायिली की देहातील पेशीन् पेशी बदलती व नश्वर देहसुद्धा पवित्र होतो, असा नामाचा महिमा आहे. एखाद्याची कीर्ती होते म्हणजे काय ? त्याचे नाव सर्वतोमुखी होते असेच ना ? हरीचे नाम हरीची कीर्ती जी साधुसंतांनी गायिली ती काही वेगळी नाही. *''हरीचे नाम आणि हरीची कीर्ति । साधुसंते गाइली.''* इतकेच नव्हे तर चार वेद, सहा शास्त्रे आणि अठरा पुराणे हीसुद्धा हरीचा महिमाच वर्णन करतात. *''चहू वेदी जाण षट्शास्त्री कारण । अठराही पुराणे हरिसी गाती''* असे हरिपाठात ज्ञानेश्वरमहाराजांनी म्हटले आहे. वेदात नामाचे माहात्म्य कोठे सांगितले आहे हे सांगणारा वामनपंडितांचा श्लोक असा आहे :- *''वेदी हा हरिकीर्तनीच महिमा केला असे आदरे । कोठेसा तरि विष्णुसूक्त अवघे शोधुनि पाही बरे । त्यामध्येही तृतीयवर्गीहि 'भवान् मित्रे च नामे' पहा । त्यामध्ये तिसरी ऋचा 'तव तमु स्तोतार' नामे पहा ॥''*

जो सर्वकाळ देवाचे नामस्मरण करतो त्याचा देह पवित्र होतो, हे तुकाराम महाराज असे सांगतात, *''पवित्र तो देह वाणी पुण्यवंत । जो वदे अच्युत सर्वकाळ.''* नाम घेणाऱ्याचा देह तर पवित्र होतो; तसेच त्याने ज्या कुळात जन्म घेतला ते कुळ, ज्या गावात व देशात त्याने जन्म घेतला ते गाव आणि तो देश हे सर्व पवित्र होतात याची खात्री *''पवित्र ते कुळ पावन तो देश । जेथे हरिचे दास जन्म घेती''* ही तुकोक्ती देते.

हजारो जन्मांची पुण्याई असेल तर एक वेळ नाम मुखाला येते असे *''जयाचे वाचा पुढा भोजे । अखंड नाम नाचतसे माझे । कीजे जन्मसहस्री वोळगिजे । एकवेळ यावया,''* या ओवीत ज्ञानेश्वरमहाराज सांगतात. मग ज्यांच्या मुखात अखंड नाम

आहे, त्यांची पुण्याई काय असेल ? ते किती पवित्र असतील ? असे महात्मेच परमार्थात पूर्ण झालेले असतात, असे *''ज्याचे मुखी नाम अमृत सरिता। तोचि येकु पुरता घट्ट जाणा''* या चरणात निवृत्तिनाथमहाराज स्पष्ट करीत आहेत. पंतमहाराज बाळेकुंद्रीकर यांचे अधिकारी शिष्य जे पांडुरंगमहाराज ताम्हनकर यांनी विदेही संत गुंडुबुवा यांना विचारले की सध्या परमार्थात ''पुरा'' कोण आहे ? तेव्हा गुंडुबुवांनी सांगितले, ''आमचा गोंद्या[1] पुरा आहे.'' ही हकीकत पांडुरंगमहाराजांनी आपल्या एका पदात नोंदून ठेवली आहे. ते म्हणतात *''पुरा गोंदा म्हणुनि गुंडा सांगे मजला.''* हे काही सासूबाईंनी केलेले जावयाचे वर्णन नाही, तर एका संतमहात्म्याने दुसऱ्या एका संतमहात्म्याचे केलेले वर्णन आहे. म्हणून त्याला फार मोठे महत्त्व आहे. संतच संतांना ओळखतात हेच खरे आहे. एका श्वासापासून आठ प्रहरांपर्यंत ''नामात पवन'' आणि ''पवनात नाम'' आमचे मामांनी साधले आणि त्यापासून येणारे अनुभव रामपाठात कथन केले आहेत. उगीच का ते परमार्थात 'पुरे' झाले? त्यांनी परमार्थ आचरून दाखविला. ''रामभक्ती कशी करावी हे आचरून दाखविण्यासाठी श्रीमामा केळकरांचा अवतार आहे, असे पावसचे स्वामी स्वरूपानंद आम्हाला सांगत'', असे स्वरूपानंदांचे अधिकारी शिष्य म. दा. भट हे जेव्हा सांगलीत आले होते त्यावेळी त्यांनी मला सांगितले. तर ''स्वामी स्वरूपानंद म्हणजे निखळ स्वरूप आहेत'', असे आमचे मामा कीर्तनात सांगत. स्वामींनी पावस सोडले नाही. मामांनी सांगली सोडली नाही. त्यांची प्रत्यक्ष भेट झाली नव्हती. तरी ते एकमेकांना ओळखत होते. आश्चर्य आहे की नाही ?

परमार्थात 'पुरे'पण येण्यासाठी हरिपाठ हा सर्वकाळ कीर्तिमुखाने गायिला पाहिजे. नित्य, सत्य आणि मित असणारे भगवंताचे नाम हे कीर्तिमुखाने गायिले तरच ते सर्वकाळ गाता येईल. या आपल्या कातडी मुखाने ते सर्वकाळ गाणे हे केवळ अशक्य आहे. एखाद्याने हिय्या करून या मुखाने ते नाम घेतले तर त्यात आपले चित्त नसल्याने, त्या नामोच्चारणाचा तादृश उपयोग होणार नाही. *''नाम घेताहे वैखरी। चित्त धावे विषयावरी॥ ऐसे कैसे रे स्मरण। स्मरणामाजी विस्मरण,''* या एकनाथांच्या वचनानुसार वैखरी वाणीने नाम सुरू आहे, पण चित्त मात्र नामाकडे नाही, त्याला तुम्ही नामस्मरण म्हणणार का, असा प्रश्न आहे. वैखरी वाणीने नामस्मरण केले असता, *''नाम तेचि रूप रूप तेचि नाम। नाम रूप भिन्न नाही नाही,''* हा नामदेवमहाराजांनी सांगितलेला अनुभव येतो का ? उलट *''नामरूपा नाही मेळ। अवघा वाचेचा गोंधळ''*

---

१. हा गोंद्या म्हणजे गोविंद अनंत केळकर ऊर्फ मामामहाराज केळकर.

असाच अनुभव येतो. *''तुका म्हणे नाम। चैतन्य निजधाम''* या तुकोक्तीचा अनुभव येतो का ? आम्ही तोंडाने जे नाम घेतो तेच का ते चैतन्य निजधाम, असे विचारले तर उत्तर आहे काय ? इतके जर नामस्मरण सोपे असते तर प्रयत्नाची काय गरज आहे हे सांगा ना ! नाम कोणते हे नाथमहाराज असे सांगतात की ज्या योगाने आत्माराम प्रगट होतो ते नाम :- *''एका जनार्दनी नाम। नामी प्रगटे आत्माराम.''* म्हणजे हे नाम[1] काही तरी वेगळे असणार की नाही याचा काही विचार करायला नको काय ?

खरे म्हणजे ''हरिपाठ'' करणारी ''वाचा'' वेगळी आहे :- *''हरिनाम सार जिव्हा या नामाची। उपमा त्या दैवाची कोण वानी.''* म्हणजे या नामाचे जिव्हेत हरिनाम सार असून त्याचे माहात्म्य कोणत्या शब्दांनी वर्णन करता येईल, असे ज्ञानेश्वरमहाराज सांगतात. आपण चांदीचे भांडे, सोन्याचे भांडे असे जेव्हा म्हणतो तेव्हा त्या भांड्यात फक्त चांदी व सोनेच असते ना ? तसे आहे हे. नामाची जिव्हा म्हणजे जिच्यात फक्त नामच आहे अशी जिव्हा. संतवाङ्मयात या वाचेला, जिव्हेला, मुखाला निरनिराळ्या नावांनी संबोधले आहे. कबीरसाहेब 'कमलमुख' असे म्हणतात:- *''कमलमुख राम भजनकू दिया.''* ज्ञानेश्वरमहाराज *''शिवनाम शीतलमुखी''* या चरणात त्याला '' शीतलमुख'' म्हणतात. तर नामदेवमहाराज *''काकीमुख दावा काकी मुख दावा''* या चरणात त्याला काकीमुख म्हणतात. काकी मुख मधील ''काकी'' हा शब्द कोणत्याही काकाच्या काकीला उद्देशून वापरलेला नाही. 'काकी'मधील 'का' हा पुरुषवाचक आणि 'की' हा स्त्रीवाचक, मिळून काकी शब्द बनला. पुरुषवाचक आणि स्त्रीवाचक ''इडा'' आणि ''पिंगला'' या नाड्यांना उद्देशून हा शब्द आहे. या काही गप्पा नाहीत. ज्ञानेश्वरमहाराज सांगतात, *''तरी ''का'' म्हणिजे पुरुषवाचू। ''की'' ते स्त्री शब्द साचु। दोहीचा संधी तो मुखाभासु। नभ जैसे अवकाशेसी.''* याचा अर्थ असा - का म्हणजे पुरुष, की म्हणजे शक्ती, या उभयतांचे संधीत जो मुखाभास होतो त्याला काकीमुख म्हणतात. *''ओठ कंठ हाले नही। जिव्हा ना करे काम। राम हमारा जप करे। हम बैठे आराम''* या दोह्यात वर्णन केलेला जप ज्या जिव्हेने होतो ती जिव्हा म्हणजे नामाची जिव्हा होय. या जिव्हेने - वाचेने - हरिपाठाची कीर्ती गायिली असता म्हणजे नाम गायिले असता, देह पवित्र होतोय; कारण नाम हे पावन व पवित्र आहे.

नाम पावन का आहे ? कारण नामाचा आणि पवनाचा संबंध आहे; म्हणून ते

---

१. या नामाचा विचार अभंग २६ खाली झाला आहे.

पावन आहे. आणि ते पावन असल्याने ते पवित्र आहे. *''नाम पावन पावन। त्याहुनि पवित्र आहे कोण,''* ही संतोक्ती हेच स्पष्ट करीत आहे. परमार्थात पूर्ण झालेल्या संतमहात्म्यांचे नश्वर आणि अमंगळ शरीरसुद्धा पवित्र झालेले असते. म्हणूनच मरणोत्तर त्यांच्या अस्थी पूजनात ठेवतात. चोखामेळ्यांच्या हाडांतून विठ्ठल विठ्ठल ध्वनी येत होता. हे कशाचे उदाहरण आहे ? त्यांचा देह पवित्र झाला होता ना ? का शंका आहे ? *''पवित्र सोवळी। तीच एक भूमंडळी॥ त्यांचा आवडता देव। अखंडित प्रेम भाव,''* ही तुकोक्ती हेच सांगते.

ज्ञानेश्वरमहाराज पुढील कडव्यात सांगतात *''तपाचे सामर्थ्य तपिन्नला अमूप। चिरंजीव कल्प कोटी नांदे.''* तपाचे सामर्थ्य अमूप आहे. तपानेच ब्रह्म जाणता येते. *''तपस्तप्त्वा तद्ब्रह्म विजिज्ञासस्व''* हे उपनिषद्वचन हेच सांगते. तप म्हणजे काय हे मागे[1] आपण पाहिले आहे. तप करणाऱ्याचे जवळ अमूप सामर्थ्य येते. व तो तपस्वी अजरामर, चिरंजीव होतोय. ''आपण अमर आहोत'' हे खरे समजले की राहिलेले सारे खोटे आहे हे कळते. *''अमर अहा अमर अहा। खरे की पहा खोटे ते,''* असे तुकाराममहाराज सांगतात. ख्रिस्ती धर्माचे संस्थापक येशू ख्रिस्त ज्या खोलीत ध्यानाला बसायचे त्या खोलीच्या बाहेर "Man is mortal" - मनुष्य मर्त्य आहे - असे लिहिलेले होते व खोलीचे आत "Man is immortal" - मानव अमर आहे - असे लिहिलेले होते. तेव्हा लोक म्हणायला लागले ''एवढा हा येशू धर्मसंस्थापक; त्याचं पण आत एक आणि बाहेर एक असं दिसतं आहे. लोकांनी येशूला विचारले ''महाराज, हे असे का लिहिले आहे?'' तेव्हा येशू ख्रिस्त म्हणाले, ''मी जेव्हा बहिर्मुख असतो तेव्हा मी मर्त्य असतो. म्हणून बाहेर "Man is mortal" असे लिहिले आहे. याउलट मी जेव्हा अंतर्मुख होतो तेव्हा मी अमर असतो. म्हणून आत "Man is immortal" असे लिहिले आहे.'' तेव्हा लोकांना काय उमगायचे ते उमगले.

ज्ञानेश्वरमहाराज पुढील कडव्यात म्हणतात, *''मातृपितृभ्राता सगोत्र अपार। चतुर्भुज नर होऊनी ठेले.''* नामस्मरणाच्या योगाने आई, वडील, भाऊ, सर्व गोत्रज हे विष्णुरूपच होतात; सर्व कुळाचाच उद्धार होतो. एखाद्या कुळात सुलक्षणी मुलगा निघाला तर तो एकवीस पिढ्यांचा उद्धार करतो. एकाद्या कुळात सुलक्षणी मुलगी निपजली तर ती माहेरची एकवीस कुळे व सासरची एकवीस कुळे अशा बेचाळीस पिढ्यांचा उद्धार करते असे म्हटले जाते. तर संतमहात्मा स्वतःचे कुळ उद्धरेल

१. हरिपाठाच्या ६ व्या अभंगाखाली पाहिले आहे (सं.टी.)

यात नवल नाही, तर तो सर्वांचीच कुळे उद्धरून नेतो. *''आपण तरेल नव्हे ते नवल। कुळे उद्धरील सर्वांची तो,''* हा तुकाराममहाराजांचा चरण हेच सांगतो. अशा महात्म्यांचा अवतारच जगदुद्धारासाठी असतो. *''जगदोद्धारासाठी अवतार धरिसी''* असे जे चिमडचे महाराजांनी निंबरगीकरमहाराजांना उद्देशून म्हटले आहे ते हेच दाखविते की निंबरगीकरमहाराजांचा अवतार हा जगदुद्धारासाठीच होता. इथे प्रश्न असा :- एवढं सगळं अनंत जग भरलंय; त्या सर्वांचा उद्धार महाराजांनी केला काय ? लौकिक दृष्टीने निंबरगीकरमहाराजांनी दोन पाच हजार माणसांचा उद्धार केला असेल. पण वस्तुस्थिती अशी असते :- महाराजांची दृष्टी जेथे जेथे जाते तेथील जीव उत्क्रांत होत असतात. असे महात्मे जे बोलतील तो बोधच आहे. अशा महात्म्यांनी शिव्या घातल्या तरी त्या ओव्याच ठरतात. याउलट आमच्यासारख्यांनी ओव्या गायिल्या तरी त्या शिव्यासारख्या असतात. *''तयांचे पिसाट शब्द। सुखे म्हणो येती वेद,''* या ज्ञानेश्वरीतील ओवीप्रमाणे त्यांची अवस्था असते. असे महात्मे हे मूर्तिमंत ज्ञानच असतात. *''ते चालते बोलते ज्ञानाचे बिंब''* या ओवीतील चरणाप्रमाणे तो महात्मा असतो. तो महात्मा म्हणजे ब्रह्मच साकार होऊन अवतरलेले असते. *''गुरु: साक्षात् परब्रह्म''* या काही गप्पा नव्हेत.

शेवटच्या कडव्यात ज्ञानेश्वरमहाराज सांगत आहेत *''ज्ञानगूढ गम्य ज्ञानदेवा लाधले। निवृत्तीने दिधले माझे हाती.''* निवृत्तिनाथमहाराजांनी ज्ञानेश्वरमहाराजांना गूढ ज्ञान दिले. गूढ ज्ञान दिले म्हणजे कोणते ज्ञान दिले ? समर्थ रामदास सांगतात, *''ज्ञान म्हणजे आत्मज्ञान। पाहणे आपणासी आपण। या नाव ज्ञान.''* ज्ञान म्हणजे आपण आपल्याला पहाणे. आत्मज्ञान - आत्मसाक्षात्कार - हा प्रत्येक जीवाचा जन्मसिद्ध हक्क आहे. तो जर त्याने संपादन केला नाही, तर त्याच्या जगण्यात काही अर्थ नाही. *''ऐके जया प्राणियाचे ठायी। इया ज्ञानाची आवडी नाही। तयाचे जियाले म्हणो काई। तरी मरण चांग,''* असे जे ज्ञानेश्वरमहाराज सांगतात ते खरे आहे.

## (१८)

**हरिवंशपुराण हरिनामसंकीर्तन । हरीविण सौजन्य नेणे काही ॥१॥**
**तया नरा लाधले वैकुंठ जोडले । सकळही घडले तीर्थाटण ॥२॥**
**मनोमार्गे गेला तो तेथे मुकला । हरिपाठी स्थिरावला तोचि धन्य ॥३॥**
**ज्ञानदेवा गोडी हरिनामाची जोडी । रामकृष्णी आवडी सर्वकाळ ॥४॥**

इतिहास जुना झाला की त्याला आपण पुराण म्हणतो. मग पुराणातील वांगी पुराणातच का रहातात ? पुराण आपल्याला वास्तव का वाटत नाही ? कारण पुराणकाळात जे ज्ञान होते ते आता बदललेले असते. म्हणून त्यावेळच्या गोष्टींना आपण काल्पनिक समजतो. त्यावेळी जे सत्य वाटत होते ते आता खोटे वाटते. आणि त्यावेळी जे काल्पनिक वाटत होते ते आता सत्य वाटतंय. पाचशे वर्षापूर्वी जर कोणी सांगितले असते की दिल्लीमध्ये चालू असणारा कार्यक्रम त्याचवेळी आपल्याला सांगलीमध्ये पहायला मिळणार आहे, तर कोणी विश्वास ठेवला असता का ? पण ते आज सत्य झाले आहे की नाही ? रामाच्या काळात पुष्पक विमान होते. त्यावेळी ते सत्य वाटत होते. पण आज तसे विमान आपल्याकडे नसल्याने आपणास ते काल्पनिक वाटते. तेव्हा पुराणे काल्पनिक आहेत असे म्हणण्याचे कारण नाही. आपल्याला एखादी गोष्ट माहीत नाही म्हणून ती जगात नाही असे म्हणणे धाडसाचे ठरेल. आपले जे ज्ञान आहे ते बदलणारे आहे. म्हणून ते खरे ज्ञान नाही . जगातील सारे ज्ञान खरे व्यासांचे उष्टे आहे. *''जे महाभारती नाही। ते नोहेचि लोकी तिही। येणे कारणे म्हणिपे पाही। व्यासोच्छिष्ट जगत्रय''* ही ज्ञानेश्वरीतील ओवी हेच दाखविते.

खरे पुराण कोणते ? हरिवंश हेच खरे पुराण. पुराण म्हणजे पोथी नव्हे, पुस्तक नव्हे. जे चिरंतन, पुरातन आहे, जे मागेही होते व पुढेही रहाणार आहे ते हरिवंशपुराण. पुराणे वाचणारे पुष्कळजण असतात, पण पुराणे पहाणारे फारच थोडे तुकाराममहाराजांसारखे. *''पाहिली पुराणे धांडोळली दरुशने''* हे तुकाराममहाराज काय सांगतात, याचा कधी विचार केला का ? या वचनाचा अर्थ ''तुकाराममहाराजांनी पुराणाचा अभ्यास केला'' असा नाही. *''नव्हे आधीचे मधीचे। आम्ही देवाच्या आधीचे,''* असे सांगणाऱ्या तुकाराममहाराजांनी पुराणे पाहिली की नाही याबद्दल शंका बाळगायचे कारण नाही. *''जे जे झाले अवतार। तुका तया बरोबर''* असे म्हणणारे

तुकाराममहाराज, *''राम हा कालचा सुत दशरथाचा''* असे म्हणणारे तुकाराममहाराज आणि जेव्हा जनकाने शुकाचार्यांना समाधी लावली, *''तुका म्हणे तधि होतो आम्ही''* असे सांगणारे जे तुकाराममहाराज, त्यांना जन्ममरणाची इंचपट्टी लावणार काय , हा प्रश्न आहे. तुकाराममहाराजांनी पुराणे पाहिली हो ! थोरोमोठ्यांची चरित्रे नुसती वाचून काही उपयोग नाही. *''थोर महात्मे होऊनि गेले। चरित्र त्यांचे पहा जरा॥ आपण त्यांचे समान व्हावे। हाची सापडे बोध खरा,''* हा चरण काय सांगतो ? आपण त्यांचे समान व्हायचा प्रयत्न केला पाहिजे. त्यांनी काय केले ते आपण केले पाहिजे. तर त्या वाचनाला काही अर्थ आहे. *''वाचा बोलू वेदनीती। करू संती केले ते''* ही तुकोक्ती काय सांगते आहे ?

पुराण समजण्यासाठी पुराणपुरुषाचे ज्ञान होणे आवश्यक आहे. *''उत्तमः पुरुषस्त्वन्यः परमात्मेत्युदाहृतः। यो लोकत्रयमाविश्य बिभर्त्यव्यय ईश्वरः.''* क्षराच्या पलीकडला, अक्षराहून उत्तम, शुद्ध असा परमात्मा आहे. व्याकरणातील ''मी-आम्ही'' व ''तू-तुम्ही'' हे प्रथम व द्वितीय पुरुष हे व्यवहारात उपयोगी; 'तो-ती-ते-ते-त्या-ती' हा तृतीय पुरुष परमात्मा. हा उत्तम पुरुष तो परमार्थाला उपयोगी आहे. हा उत्तम पुरुष हाच पुराण पुरुष. आमचे निंबरगीकरमहाराज हे खरे पुराण पुरुष आहेत. निंबरगीकरमहाराजांना उद्देशून चिमडचे महाराजांनी पुराण पुरुष शब्द वापरला आहे. ते म्हणतात, *''वेदशास्त्र वर्णिती तुम्हासी हो जगत्पती। पुराण सर्व बोलती न जाय कोण दुर्गती। पुराणपुरुष तू खरा तुम्हाविणे न दुसरा। नमो नमो दिगंबरा प्रकाशरूप सुंदरा.''* वेदांनी व शास्त्रांनी ज्या जगन्नायकाचे वर्णन केले आहे, ज्याचे दिशा हेच वसन असून प्रकाश हे स्वरूप आहे, अशा सुंदर पुराणपुरुषाला माझे नमन असो.

या पुराणपुरुषाचे ठिकाणी तादात्म्य झाले असता 'पुराण' काय आहे याचा उलगडा होतो. म्हणून निंबरगीकरमहाराजांचे शिवाय दुसरा विषय डोक्यात येता कामा नये. *''विषय तो त्यांचा झाला नारायण''* या तुकोक्तीप्रमाणे अवस्था होणे आवश्यक आहे. आमचा पण 'नारायण' हा विषय आहे. पण तो कसा ? पहिले शब्द, स्पर्श, रूप, रस व गंध हे पाच विषय आहेतच; त्यांचेबरोबर नारायण हा सहावा विषय आम्ही घेतला आहे. असे परमार्थात चालत नाही.

हा पुराणपुरुष कोणत्या मार्गाने प्राप्त होईल ? चिमडचे महाराज सांगतात *''मुनिजन मानसहर्ष मायागुण आकर्ष। शोधन मार्गशीर्ष तव पुराणपुरुष.''* भगवद्गीतेच्या विभूतियोगात भगवंतांनी 'मार्गशीर्ष' हे आपले रूप असे सांगितले आहे.

भगवान सांगतात, *''मासानां मार्गशीर्षोऽहम्.''* हा मार्गशीर्ष म्हणजे शीर्षाकडे जाणारा मार्ग आहे. या मार्गाने गेल्यास पुराणपुरुषाची प्राप्ती होते. *''मार्ग शीर्षाचा चोखाळी। दासा देव सहस्रदळी''* ही मामांची अमृतवाणी हेच स्पष्ट करते. पुराणे वाचून पंडित होता येईल, पुराण सांगता येईल, पण पुराणपुरुष समजणार नाही, अर्थात पुराणही समजणार नाही. *''झालासी पंडित पुराण सांगसी। परी तू नेणसी मी हे कोण''* ही संतोक्ती हेच सांगते. पुराण पुरुष समजण्यासाठी शीर्षाकडे जाणारा मार्ग सापडला पाहिजे तरच पुराणपुरुष कळणार, हरिवंश कळणार. हरिवंश हेच खरे पुराण आहे.

येथे 'हरिवंश' हा ग्रंथ अभिप्रेत नाही. मग हरिवंश कोणता ? आपण हरिवंशातील आहोत की नाही ? आपण सारे हरिवंशातीलच आहोत. अहो, चैतन्याशिवाय काही निर्माणच होऊ शकत नाही. आईवडिलांचे आत जर चैतन्य नसेल तर जन्म होणे संभवनीय आहे का ? नाही ना ? म्हणजे आईवडील कोण ? चैतन्यच ना ? आपण एक जोंधळा पेरतो व चिपटे[१] मापटे धान्य काढतो. आत चैतन्य आहे म्हणूनच ना ? का आपण काय करतो ? आपण करून काही होते असे वाटते का? नाही ना ? *''तैसा मज एकाचा विस्तारू। ते हे जग,''* या चरणानुसार एका परमात्म्याचा विस्तार म्हणजे हे जग आहे. हरीच जगरूपाने नटला आहे. *''आपणची जग झाला। हरि हा आपणची जग झाला,''* हे कृष्णदयार्णवांचे वचन हेच दाखविते. आपण सारे परमात्म्याचे अंश आहोत. *''ममैवांशो जीवलोके जीवभूत: सनातन:.''* येथे भगवान सांगतात की जीव हे माझेच अंश आहेत, माझेच प्रतिबिंब आहेत. परमात्म्याने हे जग निर्माण केले आणि तो या जगात भरून राहिला, पण तो जगाहून वेगळा राहिला. असा जो परमात्मा, असे जे चैतन्य की जे सर्वत्र भरून राहिले आहे, ते समजले की हरिवंश समजला, पुराण समजले.

हरिवंशात गेल्याशिवाय हरिवंश समजावा कसा ? पाण्यात मासा झोपतो कसा ? छप्पर पलंग घालून डाव्या कुशीवर झोपतो काय ? त्याच्या वंशात गेल्याशिवाय हे समजणार नाही. पाण्यामध्ये म्हणजे जीवनामध्ये मासा म्हणजे मनोमासा कसा झोपतो, हे त्याचे वंशात गेल्याशिवाय कसे कळणार ? मासा म्हणजे मनोमासा. *''काय जळीचा मासा तो मासा म्हणावा''* इत्यादी अनेक प्रश्न करीत शेवटी एकनाथमहाराज सांगतात *''तरी तो मनोमासा ओळखावा.''* हा मनोमासा जीवनात कसा झोपतो

१. किलो वगैरे वजने वापरात येण्यापूर्वी चिपटे, मापटे, शेर असली मापी वजने भारतात वापरात होती (सं. टी.).

म्हणजे त्याचे उन्मन कसे होते ? मनोमासा हा जीवनाचे धारेत वरखाली होत असतो. मनाचा, जीवनाचा व श्वसनाचा घनिष्ठ संबंध आहे. मन हे वायुस्वरूप आहे. मन व श्वसन हे परस्परावलंबी आहेत. मन स्थिर झाले की श्वसन स्थिर होते. श्वसन स्थिर झाले की मन स्थिर होते. म्हणून श्वसन स्थिर होणे महत्त्वाचे. त्यासाठी साधन होणे अत्यंत गरजेचे आहे. दोन पळे नामात पवन आणि पवनात नाम साधले असता मनाचे उन्मन होते, असे आमचे मामांनी स्वानुभवाने रामपाठात सांगितले आहे. याचा अनुभव आपण घ्यावयास हवा. मनाची चंचलता नाहीशी होऊन ते स्वरूपाचे ठिकाणी गुंतून रहाते आणि मन हे मनपणाला मुकते, असे ज्ञानेश्वरमहाराज ज्ञानदेव तेहत्तिशीतील *''मनाची चंचलता। मोडोनी स्वरूपी पडला गुंता। मिळोनी गेले आत्मया अनंता। मन मुकले मनपणा''* या ओवीत सांगतात. मन हे आत्मारामाचे ठिकाणी तल्लीन झाले असता, मन हे रामरूपच होते. मन हे रामरूप झाल्यावर अंतर्बाह्य रामरूपच दिसते असे नाथमहाराज सांगतात, *''मन रामी रंगले। अवघे मनची राम झाले॥ सबाह्य अभ्यंतरी अवघे । रामरूप कोंदले हो.''* तेव्हा सर्वत्र रामरूप कसे भरून राहिले आहे हे ज्याला समजले त्याला हरिवंशपुराण समजले.

या हरिवंशाचे आकलन होण्यासाठी सत्संगाची आवश्यकता आहे. संतांचे वंशात जन्म मिळणे हे फारच भाग्याचे आहे. ज्याचे वंशात रामसेवा हा कुळधर्म आहे त्याचे वंशात मला जन्म दे असे उद्धव चिद्घन म्हणतात :- *''ज्याचे वंशी कुळधर्म रामसेवा। त्याचे वंशी मज जन्म दे गा देवा,''* तर तुकाराममहाराज हे हरिदासांच्या घरी मला जन्म दे असे म्हणतात, *''हरिदासाचिया घरी। मज उपजवा जन्मांतरी.''* सत्संगाशिवाय हे ज्ञान होणे फार अवघड आहे. सत्संग झाल्याने या हरिवंशपुराणाचे ज्याला आकलन - ज्ञान - झाले त्याला हरिनाम कीर्तन समजते. कारण हरिवंशपुराण हेच हरिनामकीर्तन आहे. वंशामध्ये हरिकीर्तन ही नारांची परंपरा होती. ते म्हणतात, *''आम्हा हेचि पै साधन। आमुचे वंशी हरिकीर्तन.''* आमचे वंशात देखील हरिकीर्तनाची परंपरा आहे. आमचे मामांनी[१] तात्यासाहेबमहाराजांचे आज्ञेप्रमाणे त्यांचेच कीर्तन त्यांची सेवा म्हणून एकही दिवस खंड न होता अखंड अडतीस वर्षे केले. आणि *''कदा कीर्तनासी सोडू नये''* ही तुकोक्ती सार्थ केली. आमचे मामांचा अवतारच मुळी कीर्तनासाठी होता, हे पुढील श्लोकात सांगितले आहे :- *''हरीकीर्तना कारणे जन्म झाला। हरीकीर्तनी साच अखंड ठेला। हरीकीर्तनानुग्रहो सत् प्रचीती। नमो कीर्तनानंद*

१. मामा म्हणजे गोविंद अनंत ऊर्फ मामामहाराज केळकर (सं.टी.)

*गोविंद चित्ती.''* संतांना सर्वत्र हरीच - रामच - साक्षात्काराला येत असल्याने, त्यांचं वागणं बोलणं सारं काही गोड झालेलं असतं. हरीशी कोणी उद्धटपणाने बोलेल काय? हरी हेच त्यांच्या सौजन्याचे कारण झालेले असते. 'सौजन्य सप्ताह' पाळून सौजन्य निर्माण होत नाही.

ज्ञानेश्वरमहाराज पुढील कडव्यात सांगतात *''तया नरा लाधले वैकुंठ जोडले। सकळही घडले तीर्थाटण.''* नामसंकीर्तन करणाऱ्याला वैकुंठ जोडले. पूर्वी एखादा महात्मा वैकुंठाला जायचा. पण नामसंकीर्तनाने संतमहात्म्यांनी पृथ्वीवरच वैकुंठ आणले, नामघोषाने सर्व विश्व दुमदुमून सोडले, सर्व विश्व सुखी केले, त्यामुळे दुःख हे औषधालासुद्धा शिल्लक राहिले नाही, हे ज्ञानेश्वरमहाराज असे सांगतात, *''कही एकाधेनि वैकुंठा जावे। ते तिही वैकुंठची केले आघवे। ऐसे नामघोष गौरवे। धवळले विश्व॥ ऐसे माझेनी नामघोषे। नाहीशी करिती विश्वाची दुःखे। अवघे जगचि महासुखे। दुमदुमीत भरले.''* तुकाराममहाराजही सांगतात, *''तुका म्हणे त्यांनी। केली वैकुंठ मेदिनी.''* अशा महात्म्यांना तीर्थाला जावे लागत नाही. तर तीर्थेच त्यांच्या पायाशी पुनीत होणेसाठी येतात व त्यांना सहजच तीर्थस्थान घडते. *''तीर्थे तया ठाया । येती पुनीत व्हावया''* असे तुकाराममहाराज सांगतात.

पुढील कडव्यात ज्ञानेश्वरमहाराज सांगतात, *''मनोमार्गे गेला तो येथे मुकला। हरिपाठी स्थिरावला तोची धन्य.''* संतांचे संगतीत मनोमार्गाचे आकलन होऊन आपण जर त्या मार्गाने गेलो, तर आपण मनाला मुकून, नित्य-सत्य-मित अशा नामाचे ठिकाणी स्थिर होतो व जीवनात धन्यता येते. मनोमार्ग कोणता हा विषय आपण मागे[१] पाहिला आहे.

शेवटच्या कडव्यात ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, *''ज्ञानदेवा गोडी हरिनामाची जोडी। रामकृष्णी आवडी सर्वकाळ.''* सर्वकाळ रामकृष्ण या जीवनाचे गतीचे ठिकाणी लक्ष देण्याची आवड निर्माण झाली असता, त्याला हरिनामाची जोडी मिळते. रामकृष्णनामाची अशी आवड आपल्या ठिकाणी येणे आवश्यक आहे.

---

१. हरिपाठाचे ८ व्या अभंगाखाली पहा (सं. टी.)

## (१९)

वेदशास्त्र प्रमाण श्रुतीचे वचन। एक नारायण सार जप ॥१॥
जप तप कर्म क्रिया नेम धर्म। वाऊगाची श्रम व्यर्थ जाय ॥२॥
हरिपाठी गेले ते निवांतचि ठेले। भ्रमर गुंतले सुमनकळिके ॥३॥
ज्ञानदेवी मंत्र हरिनामाचे शस्त्र। यमे कुळगोत्र वर्जियेले ॥४॥

नारायण-हरि-नामाचे जपापुढे जप, तप, इत्यादी केवळ श्रम आहेत, असे ज्ञानेश्वरमहाराज पुन: एकदा या अभंगात सांगत आहेत.

वेदशास्त्रांना प्रमाण असा सारभूत नारायणनामाचा जप आहे असे श्रुतीचे वचन आहे. वेदांना व शास्त्रांना नारायणनाम हे कसे प्रमाणभूत आहे हे आपण मागे [1] पाहिले आहे. आता हे नारायणनाम सार कसे आहे हे पहावयाचे आहे.

वेद म्हणजे ज्ञान. परमात्म्याच्या नि:श्वासातून जे ज्ञान प्रगट झाले ते वेद. हे ज्ञान आचरणात कसे आणावयाचे, आणि त्यासाठी करावे लागणारे प्रयोग, ताळा इत्यादी सांगते ते शास्त्र. अशी एक गोष्ट आहे. :- ''सर्वं खल्विदं ब्रह्म'' असे गुरूंनी शिष्यांना शिकविले. पण त्याचे प्रात्यक्षिक कळण्यापूर्वीच एक शिष्य फिरायला गेला. एका बोळातून जाताना समोरून एक हत्ती येत होता. हत्तीवरील माहुताने त्या शिष्याला सांगितले ''दूरं गच्छ'' बाजूला हो; हत्ती येतोय. शिष्य म्हणाला ''सर्वं खल्विदं ब्रह्म''; मग मला हत्ती काय करणार ? हत्तीने शिष्याचे पायावर पाय दिला. शिष्य ओरडत गुरूकडे गेला. त्याने गुरूंना सर्व प्रकार सांगितला आणि म्हटले, ''मी मरायचोच. पण नशीब चांगले म्हणून वाचलो.'' तेव्हा गुरूजी म्हणाले, ''झाले ते बरोबरच झाले. तुझ्यातले ब्रह्म जेव्हा रस्त्यातल्या ब्रह्मावरून जात होते, तेव्हा हत्तीतील ब्रह्मसुद्धा रस्त्यातल्या ब्रह्मावरून तुझ्यातील ब्रह्माकडे येत होते. त्यावेळी माहुतातील ब्रह्माने तुझ्यातील ब्रह्माला दूर जाण्यास सांगितले. पण ते तुझ्यातील ब्रह्माने ऐकले नाही. हत्तीतल्या ब्रह्माने तुझ्यातील ब्रह्माच्या पायावर पाय दिला. यात काय बिघडले ? मुला, तुला फक्त तत्त्व सांगितले होते. अजून प्रात्याक्षिक शिकवले नव्हते. तू गडबड केलीस. त्यामुळे असे घडले. *''सर्प विंचू नारायण। परी वंदावे दुरून,''* हे प्रात्याक्षिक शिकवायचे होते. म्हणून हा अनर्थ घडला.

१. हरिपाठातील दुसऱ्या अभंगाच्या विवरणात पाहिले आहे. (सं. टी.)

जे दिसते त्याचा खुलासा करण्यास आधिभौतिक शास्त्रे आहेत. पण हे दृश्य कशामुळे दिसते ते सांगण्यास अध्यात्मशास्त्र आहे. ज्या एका जाणीवेतून हे दृश्य प्रकट झाले त्या जाणिवेला महत्त्व आहे. आत्मा नसेल तर व्यवहाराची, विषयाची, देहाची, जगाची, दृश्याची जाणीव होणारच नाही. आत्मा नसेल तर दृश्य आहे का ? आत्मा आहे म्हणून शरीराची, दृश्यांची जाणीव होते. जगाला, अनंत विश्वाला हलविणारा आत्मा आहे, आणि आत्म्याशिवाय अस्तित्व नाही हे अध्यात्मशास्त्र सांगते. आत्मा - चैतन्य - असल्यामुळे दृश्य व व्यवहार यांची अनुभूती जीवाला घेता येते. जो विषय ज्ञानात येईल तेवढेच भौतिकशास्त्राला मान्य असते. आत्मा हा ज्ञानाचा विषय नाही. म्हणून भौतिकशास्त्र आत्म्याचे मागे नाही. आत्मा हा ज्ञानाचा विषय नसून, आत्म्याचा विषय ज्ञान आहे. ज्ञान आणि अज्ञान या दोन्ही गोष्टी आत्म्यामुळे आहेत. आत्मा आहे म्हणून एखादा माणूस ज्ञानी आणि आत्मा आहे म्हणून दुसरा एखादा अज्ञानी; आत्मा नसेल तर ज्ञान आणि अज्ञान हे दोन्हीही नाहीत. आत्मा हा प्रयोगी आहे; तो प्रयोगाने कसा सिद्ध होणार, हा प्रश्न आहे.

माणसे म्हणतात ''हे विज्ञानयुग आहे. अध्यात्माचा आता काय उपयोग आहे ?'' तथापि भौतिकशास्त्राने एवढी नेत्रदीपक प्रगती केली, मनुष्य सुखाकडे चालला, परंतु सुख मात्र माणसाकडे का येईना ? याचा विचार करायला नको का ? भौतिक ज्ञान जे माणसाला झाले तेसुद्धा आत्मा आहे म्हणूनच ना ? त्याच्या जोरावरच भौतिकशास्त्र प्रगत आहे. तथापि भौतिकशास्त्रालाही ज्या आत्म्यामुळे प्रगती आहे त्या आत्म्याचे ज्ञान नसल्याने ते शास्त्र लंगडे आहे. म्हणून आत्मज्ञान महत्त्वाचे. ज्याच्यामुळे ज्ञान आणि ज्याच्यामुळे अज्ञान त्याचे ज्ञान म्हणजे ज्ञान, आणि ज्याच्यामुळे ज्ञान आणि ज्याच्यामुळे अज्ञान त्याचे अज्ञान म्हणजे अज्ञान. आपला आपल्याला विसर पडणे हेच अज्ञान. आणि आपण कोण आहोत याचे ज्ञान म्हणजे ज्ञान. *''ज्ञान म्हणजे आत्मज्ञान । पाहणे आपणासी आपण । या नाव ज्ञान''* ही समर्थ रामदासांची ओवी हेच सांगत आहे. आत्मसाक्षात्कार हा प्रत्येक जीवाचा जन्मसिद्ध हक्क आहे. तो जर आपण प्राप्त करून घेणार नसू तर त्या जगण्याला काय अर्थ आहे ? आत्मज्ञान नसताना जगण्यापेक्षा मेलेलेच बरे. ज्यांना हे आत्मज्ञान झालेले आहे ते महात्मे *''आत्मतृप्त''* असतात. आत्मा हेच त्यांच्या तृप्तीचे साधन असते. अशा महात्म्यांची इंद्रिये समाधान पावलेली असतात. अशा महात्म्यांना या आत्मलाभापुढे बाकीचे ऐहिक लाभ तुच्छ वाटतात. म्हणून अध्यात्मशास्त्राचे सार म्हणजे आत्मा आहे, असे म्हटले तर वावगे होणार नाही.

प्रत्येक प्राण्याचे हृदयात असणारा, अध्यात्माचे सार असणारा आत्मा आणि प्राण हे दोन्ही एकच आहेत. *''प्राण एव आत्मा''* असे श्रुतिवचन आहे. *''देव म्हणजे आपुला प्राण''* असे समर्थ रामदास सांगतात. हा प्राण - आत्मा - म्हणजेच परमेश्वर- नारायण आहे. हा आत्मा - प्राण - जर कळला नाही तर काय कळले, हे मोठे प्रश्नचिन्ह आहे. आत्मा कळला तर जप, तप, साधन, तीर्थे यांना अर्थ आहे. हा आत्मा - प्राण - नसेल तर शरीर तरी व्यवहार करील काय ? म्हणूनच *''प्राण गेलीया शरीर। काय करील व्यवहार,''* असा तुकाराममहाराज प्रश्न करतात. आत्म्याच्या सत्तेने हे शरीर चालतंय-बोलतंय. म्हणजे महत्त्व कोणाचे ? शरीराचे की आत्म्याचे ? आत्म्याचेच ना ? पण व्यवहारात बडेजाव कोणाचा आहे ? देहाचा. आत्म्याचे स्मरण तरी होते का ? *''देखवी ऐकवी एक नारायण''* ही तुकोक्ती नारायण आणि आत्मा एकरूप आहेत हे दाखविते. हा आत्मा - नारायण - सार आहे. बाकी सारे असार आहे. आणि रूप आणि नाम भिन्न नसल्याने नारायणाचे नाम सारभूत आहे आणि ती गोष्ट वेदाला, शास्त्राला प्रमाणभूत आहे. म्हणूनच *''नामापरते नाही सार''* असे केशवस्वामी सांगतात.

ज्ञानेश्वरमहाराज पुढील कडव्यात सांगतात, *''जप तप कर्म क्रिया नेम धर्म। वाऊगाची श्रम व्यर्थ जाय॥''* जर आत्मा - नारायण - कळला तर त्याचे नामाचा जप, आणि तदनुषंगिक कर्म व धर्म यांचा उपयोग आहे; नाही तर ती नुसती कवायत होईल व केलेले श्रम वाया जातील, हे निश्चित; पदरात काही पडणार नाही.

पुढील कडव्यात ज्ञानेश्वरमहाराज सांगतात *''हरिपाठी गेले ते निवांतची ठेले। भ्रमर गुंतले सुमनकळिके.''* माणसाला निवांतपणा केव्हा प्राप्त होईल याचे वर्म ज्ञानेश्वरमहाराज या कडव्यात सांगत आहेत. जेव्हा हृदयात परमात्म्याचा साक्षात्कार होतो तेव्हा निवांतपणा प्राप्त होतोय. प्रत्येकाचे हृदयात परमात्मा आहेच. पण त्याचा साक्षात्कार-अनुभव-यायला नको काय ? *''बाप रखुमादेवीवरू हृदयी प्रगटला। निवांत राहिला ज्ञानदेव,''* हे ज्ञानेश्वरमहाराजांचे वचन आणि *''रखुमादेवीवरे अंगीकार केला। निवांत राहीला सेना न्हावी,''* हे सेनामहाराजांचे वचन निवांतपणा केव्हा प्राप्त होतो हेच सांगत आहेत. होणारी इच्छा आणि ती पुरी न झाल्यास येणारा राग यांनी माणसाला एवढे जर्जर केले आहे की त्याला निवांतपणा प्राप्त करून घेण्यासाठी निवांत वेळसुद्धा नाही. आता बोला, यावर इलाज काय ? आम्हाला मोकळा वेळ आहे कोठे ? व्याप फार आहेत ना ! *'' निद्राभरे रात्र गेली । पहाटे साखर झोप आली। दिवसा प्रपंच घालमेली। रिता वेळ मग कोठे,''* ही चिमडमहाराजांनी केलेली भूपाळी आमचा

दिनक्रमच सांगते. मग अशा माणसाला कुठला परमार्थ ? अशा माणसाला परमार्थ करणेचा अधिकारच नाही. हेच ज्ञानेश्वरमहाराज असे सांगतात : *''जो रसनेंद्रियाचा अंकिला । का निद्रेसी जीवे विकिला । तो नाही एथ म्हणितला । अधिकारीया''* म्हणून ''बाबांनो, आळस व निद्रा सोडा आणि साधनाला लागा'' अशी विनवणी चिमडमहाराज करतात :- *''यास्तव बरवा विचार करी । सांडूनी आळस निद्रा वैरी । साधन करूनी सुख घे करी । दास विनवी श्रीगुरूचा .''* हे साधन समजण्यास आणि पूर्ण होण्यास गुरुकृपेची आवश्यकता आहे. गुरुकृपेने साधनाचा अभ्यास होऊन, सूर्याच्या बारा व चंद्राच्या सोळा कळा एकत्र येतात व मग त्या साधकाला हरिपाठाचे आकलन होते. मग तो जीव दशमद्वारात येतो. तेथे त्याला परमात्म्याचा साक्षात्कार होतो आणि मग त्याला निवांतपणा प्राप्त होतो.

शेवटच्या कडव्यात ज्ञानेश्वरमहाराज सांगतात *''ज्ञानदेवी मंत्र हरिनामाचे शस्त्र । यमे कूळगोत्र वर्जियेले .''* हरिनामाचे शस्त्र हातात असले की यम त्याचे कुळगोत्रच वर्ज्य करतोय. हरिनाम हे शस्त्र आहे म्हणजे काय ? हरिनामाने संसारासारखा शत्रू नामोहरम होतोय म्हणून त्याला शस्त्र असे संबोधले आहे. या हरिनामाचे योगे निर्गुण आत्मा प्रगट होतो आहे, असे सामर्थ्य आहे या मंत्राचे. *''पै संसारू जिणते हे शस्त्र । आत्मा अवतरविते मंत्र । अक्षरीये''* हे ज्ञानेश्वरमहाराजांचे वचन हेच स्पष्ट करते. असा हरिनामाचा घोष ज्या ठिकाणी सुरू असतो, त्याठिकाणी यमराजांना प्रवेश नाही.

## (२०)

नामसंकीर्तन वैष्णवांची जोडी। पापे अनंत कोडी गेली त्याची ॥१॥
अनंता जन्माचे तप एक नाम। सर्व मार्ग सुगम हरिपाठ ॥२॥
योगयागक्रिया धर्माधर्म माया। गेले ते विलया हरिपाठी ॥३॥
ज्ञानदेवी यज्ञयाग क्रिया धर्म। हरिवीण नेम नाही दुजा ॥४॥

वैष्णव कोण ? ज्याच्याजवळ पाप औषधालाही शिल्लक राहिलेले नाही तो वैष्णव. आता पाप म्हणजे काय हो ? निळोबाराय म्हणतात, *''निळा म्हणे पाप मुख्य तेचि साचे। नावडे देवाचे नाव मुखी.''* ज्ञानेश्वरमहाराजही सांगतात *''नामासी विन्मुख तो नर पापीया.''* म्हणजे नामाची आवड नसणे हेच पाप आहे. व ज्याला नामाची आवड नाही तोच पापी. आणि नामस्मरण म्हणजे काय ? देहाचे विस्मरण व केवळ चैतन्याचे स्मरण म्हणजे नामस्मरण. देहावर आमचे जे प्रेम आहे तेच पापकर्म आहे. देहावर राहून देवाची पूजा केली तरी त्याची गणना पुण्याईत होत नाही. म्हणून देहभाव नाहीसा होणे हे महत्त्वाचे आहे.

आता हा देहभाव – हे पाप – जाणार कसे ? *''हरी उच्चारणी अनंत पापराशी। जातील लयासी क्षणमात्रे,''* हा हरिपाठातील चरण पाप कसे नाहीसे होते हे सांगतो. हरिनामाचा उच्चार झाला असता अनंत असा जो परमात्मा तो साक्षात्काराला येतो. मग देहभाव नाहीसा होऊन पाप औषधालाही शिल्लक रहात नाही.

ज्याची पापे नामोच्चारणाने नाहीशी झाली आहेत अशा वैष्णवाचा अधिकार काय सामान्य असेल ? निरंतर नामसंकीर्तनाने वैष्णवांचे घर हे मंदिरच झालेले असते. *''धन्य धन्य ते वैष्णव मंदिर। जेथे नामघोष होय निरंतर''* असे भानुदासमहाराज म्हणतात. वैष्णवांच्या घरांची मंदिरे होतात, तर आम्ही मंदिराची लग्नकार्यालये करतो. एवढा त्यांच्यात आणि आमच्यात फरक आहे. या वैष्णवांच्या नुसत्या दर्शनाने पाप-ताप नाहीसे होते, मनाला समाधान होते. *''तुका म्हणे मना झाले समाधान। देखिल्या चरण वैष्णवांचे,''* हे तुकारामवचन आणि *''त्रिविध तापाची झाली बोळवण। देखिल्या चरण वैष्णवांचे''* हे नाथवचन हेच स्पष्ट करते. ज्या घरात सतत नामघोष, नित्यकीर्तन असते त्या घरात देव सुखावला तर आश्चर्य वाटायचे कारण नाही. भगवंताला कीर्तनाची आवड असलेने, त्याचा मुक्काम या वैष्णवांचे घरातच असतो.

*''वैष्णवा घरी देव सुखावला। न वजे बाहेरी दवडोनी घातला॥ देव म्हणे माझे पुरतसे कोडे। संगती गोड या वैष्णवांची॥ कीर्तनाची देवा आवडी मोठी,''* हा नाथमहाराजांचा अभंग स्पष्टच आहे.

सुखाचा सुखनिधी, सुखसागर असा परमात्मा वैष्णवांचे घरी सुखावतो. तेव्हा या वैष्णवांचे घरात काय सुख असेल याची काही कल्पना करता येईल काय ? अहो, या वैष्णवांचे घरी स्वत: प्रेम हेच या सुखाची इच्छा करते. मुळात प्रेमामध्ये सुख असतेच. आणि तेच प्रेम या वैष्णवांच्या घरातील सुखाची इच्छा करतेय. तर इकडे आपण आतुरतेने ज्या ऋद्धिसिद्धीची वाट पहातोय की त्या कधी आम्हाला प्राप्त होतील आणि आम्ही सुखी होऊ. मुळात या ऋद्धिसिद्धी आम्हाला प्राप्त होणे अवघड. समजा, प्राप्त झाल्या तर आम्ही त्यांच्या शिरा ओरबाडून खाऊ. अशा ऋद्धिसिद्धी या वैष्णवांचे घराचे दारात हात जोडून उभ्या असतात. *''या या वैष्णवांचे घरी। प्रेम सुख इच्छा करी। ऋद्धी सिद्धी द्वारी। कर जोडूनी तिष्ठती,''* ही तुकोक्ती वैष्णवांच्या घराचे वर्णन करणारी आहे.

हे वैष्णव सर्वकाळ नामघोष करतात. अर्थात दिवसभर टाळांचा खणखणाट हा ओघाने आलाच ! मग ते खातात काय ? अहो, ते कण्याभाकरी खातात, पण त्यांचे समाधान मात्र अमृताच्या भोजनाचे असते. झोपायला काही गादी, उशी आहे का ? कुठले हो ? झोपायला, बसायला साधे कांबळे. त्यांचे चित्त परमेश्वराशी एकरूप झालेले असल्याने त्यांना या असल्या गोष्टींची आठवणही होत नाही. नामदेवमहाराज सांगतात *''वैष्णवाघरी सर्वकाळ। सदा झणझणती टाळ॥ कण्याभाकरीचे खाणे। गाती रामनाम गाणे॥ बैसावयासाठी कांबळा। द्वारी तुळस रंगमाळा.''* आपण प्रपंचात जागे असतो, तेथे हे संतमहात्मे उदासीनच असतात, झोपलेले असतात. वैष्णवांचे चित्त हरीच्या पायाशी रंगलेले असते तर आमचे चित्त प्रपंचात रंगलेले असते. हे महात्मे भगवंताचे गुणानुवाद करण्यात इतके तल्लीन झालेले असतात की त्यामुळे त्यांना देहाचे भान असतच नाही. अशा प्रकारे हरिकीर्तनाने ते आपल्याच ठिकाणी सुखी झालेले असतात. *''कैसे माझ्या गुणी धाले। देशकालाते विसरले। कीर्तने सुखी झाले। आपणपाची,''* ही ओवी संतमहात्म्यांच्या या अवस्थेचे वर्णन करते. या ओवीत ''गुण'' हा शब्द फार वेगळ्या अर्थाने आला आहे. येथे गुण या शब्दाचा अर्थ ''सूत्र'' असा आहे. गुण व अवगुण या जोडीतील गुण हा अर्थ येथे अभिप्रेत नाही. जे माझ्या गुणाचे - सूत्राचे - ठिकाणी देहभान हरपून तृप्त झाले ते कीर्तनात आपल्याच ठिकाणी सुखी झालेले असतात.

परमेश्वराचे सूत्र म्हणजे काय ? *''गुणी प्रीति राखे क्रमू साधनाचा। जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा,''* या श्लोकात ज्या गुणाचे ठिकाणी प्रेम करणे हा साधनाचा क्रम असल्याचे समर्थ रामदास सांगत आहेत, तोच गुण म्हणजे सूत्र परमेश्वराचे आहे. प्रत्येक जीवाचे ठिकाणी परमेश्वराचे सूत्र आहे. हे जे सूत्र आहे ते परमेश्वराच्या हातात आहे. म्हणून ते परमेश्वराचे सूत्र आहे. ते सूत्र हातात धरून परमेश्वर या सगळ्या बाहुल्या नाचवतोय. *''हे प्रभो विभो अगाध किती तव करणी॥ बाहुली मनुष्ये केली। त्या अनेक रूपे दिधली। परी त्यांची सूत्रे सगळी। नाचविसी हाती धरूनी,''* हे काव्य याच सूत्राचा पुरस्कार करते आहे. या सूत्राचे ठिकाणी जे तृप्त झाले, ते देश, काल, सारे काही विसरले. आणि ते भगवंताची कीर्ती देहभान हरपून सांगू लागले. तेच ते कीर्तन; आत मावत नाही म्हणून बाहेर पडतेय याचे नाव कीर्तन. अशा कीर्तनात भगवंताच्या कीर्तीशिवाय अन्य काही असूच शकत नाही.

वैष्णवांनी नामसंकीर्तन का केले ? कारण असे :- वैष्णव तो की ज्याची देवावर भक्ती, प्रीती, माया आहे. *''वैष्णव तो जया। अवघी देवावरी माया,''* असे तुकाराममहाराज सांगतात. ज्याच्यावर आपले प्रेम असते त्याला जे आवडते ते आणि तेच आपण करतो ना ! ते केले तरच त्याचेवर आपले प्रेम आहे हे त्याला समजते. देवाला ज्याची आवड आहे ते आणि तेच आपण केले तरच देवाशी आपले सख्य होईल. देवाला कीर्तनाची आवड आहे. म्हणूनच वैष्णवांनी कीर्तनच केले. या देवाला कीर्तनाची आवड आहे हे कशावरून ? *''कीर्तनाची गोडी। देव निवडी आपण,''* ही तुकोक्ती, आणि *''कीर्तनाची गोडी। देवा आतून आवडी,''* ही मामांची अमृतवाणी ही देवाला कीर्तनाची आवड आहे हे दाखविते.

ज्या ठिकाणी कीर्तन सुरू असते, जेथे नामघोष सुरू असतो, तेथे भगवान हमखास उपस्थित असतात. *''नाहं वसामि वैकुंठे योगिनां हृदये रवौ। मद्भक्ता यत्र गायन्ति तत्र तिष्ठामि नारद,''* हे भगवद्वचन, *''तो मी वैकुंठी नसे। एकवेळ भानुबिंबीही न दिसे। वरी योगियांचीही मानसे। उमरडोनी जाय॥ परी तयापासी पांडवा। म्या हारपला गिवसावा। जेथ नामघोष बरवा। करिती माझा,''* या ज्ञानेश्वरीतील ओव्या, आणि *''नसे वैकुंठीचे ठायी। नसे योग्यांचे हृदयी॥ माझे भक्त गाती जेथे। उभा नारदा मी तेथे॥ ब्रह्मादिकासी नातुडे। तो मी कीर्तनी सापडे॥ रामदास म्हणे साचे। वचन आहे भगवंताचे,''* हे समर्थांचे पद भगवंताचा नेमका पत्ता सांगतात.

आता, या कीर्तनापासून आमचा फायदा काय ? कारण काही फायदा असेल

तर आम्हीपण करू ना ! या कीर्तनामुळे सगळे दोष नाहीसे होतात, उत्तम गती प्राप्त होते आणि भगवत्प्राप्ती होते. आणखी काय पाहिजे ? या कीर्तनाचे योगाने हे नश्वर शरीर ब्रह्मरूप होते. *''कीर्तने महादोष जाती। कीर्तने होय उत्तम गती। कीर्तने भगवत्-प्राप्ति। यदर्थी संदेह नाही,''* हे समर्थ रामदासांचे वचन आणि *''कीर्तन चांग कीर्तन चांग। होय अंग हरिरूप,''* ही तुकोक्ती याला पुष्टीच देते.

या कीर्तनाचे बाह्य स्वरूप काय ? कीर्तन करणाऱ्याला साधुसंतांची पदे, अभंग, ओव्या पाठ पाहिजेत. सभाधीटपणा पाहिजे. थोडेसे गायनाचेही अंग पाहिजे. कीर्तन करणे हे वाटते तितके सोपे नाही. नित्यकीर्तन करणे हे तर दुरापास्तच. तुकाराममहाराज सांगतात की मी आधी विश्वासाने व आदराने संतांची वचने पाठ केली :- *''काही पाठ केली संतांची उत्तरे। विश्वासे आदरे करोनिया.''* सुभाषितकाराच्या म्हणण्याप्रमाणे जरी *''वक्ता दशसहस्त्रेषु''*, दहा हजारात एखादा वक्ता असला तरी सरावाने सभाधीटपणाने बोलायला येऊ लागते. आता तो संतांचा अभंग चालीत म्हणता यावयास हवा. नामदेवमहाराजांचे कीर्तनात ज्ञानेश्वरमहाराज अभंग म्हणावयाचे. मग कीर्तनात इतका रंग भरायचा की भगवान नाचू लागायचे, डोलू लागायचे. आणि नाचता नाचता त्यांचा पीतांबर गळून पडायचा. *''नामदेव कीर्तन करी पुढे बा नाचे पांडुरंग। जनी म्हणे बोला ज्ञानदेवा अभंग॥ अभंग बोलता कीर्तनी रंग भरला॥ प्रेमाचेनी छंदे देव नाचू लागला। नाचता नाचता देवाचा गळला पीतांबर,''* हा जनाबाईचा अभंग तो प्रसंग डोळ्यापुढे उभा करणारा आहे. अभंग गायची थोडी माहिती हवी. कारण गायनाचे रंगात अद्भुत शक्ती आहे. *''गायनाचे रंगी। शक्ति अद्भुत हे अंगी,''* असे तुकाराममहाराजांनी म्हटले आहेच. पण गायनाचा अतिरेक होता कामा नये. कारण *''एक मन गेले स्वरी। कोणे चिंतावा श्रीहरी,''* असा प्रकार होईल.

ढोबळ मानाने कीर्तनाचे दोन भाग होतात - पूर्वरंग आणि उत्तररंग. पूर्वरंगात मूळ अभंगाचे विवेचन केले जाते व उत्तररंगात मूळ अभंगाशी सुसंगत असे आख्यान किंवा संताची गोष्ट सांगितली जाते. पण असले कीर्तन सर्वांनाच साधता येईल असे नाही. जे सर्वांना साधता येईल त्या कीर्तनाचे खरे स्वरूप तात्यासाहेबमहाराजांनी असे प्रगट केले आहे :- *''अखंडित वाचे श्रीराम स्मरण। हेची पै कीर्तन दासालागी.''* अखंडित वाचेने केलेले श्रीरामाचे स्मरण हेच खरे कीर्तन आहे. ज्ञानेश्वरमहाराज सांगतात, *''तरी कीर्तनाचेनी नट नाचे.''* म्हणजे अंतर्यामी होणारा नटनाम

परमात्म्याचा नाच हेच ते कीर्तन. या कीर्तनाला तबला, पेटी इत्यादींची साथ लागत नाही. *'तबला ना पेटी झांज ना मृदंग। रंग तो श्रीरंग आपण झाला.''* जर श्रीरंगामुळेच कीर्तनात रंग निर्माण होतोय, तर वाद्यांची गरज काय ?

हरिकीर्तनात कोणते विषय हाताळावेत याचेही काही नियम आहेत. कीर्तनात काय सांगावे हे एकनाथमहाराज असे सांगतात:- *''सगुण चरित्रे परम पवित्रे सादर वर्णावी। सज्जनवृंदे मनोभावे आधी वंदावी॥ संतसंगे अंतररंगे नाम बोलावे। कीर्तनरंगी देवासंनिध सुखेची डोलावे॥ भक्तिज्ञानाविरहित गोष्टी इतरा न कराव्या। प्रेमभरे वैराग्याच्या युक्ति विवराव्या॥ जेणे करूनी मूर्ती ठसावी अंतरी श्रीहरीची। ऐसी कीर्तन मर्यादा आहे संतांच्या घरची॥ अखंड स्मरणे अद्वय भजने वाजवी कर टाळी। एका जनार्दनी मुक्ती होये तात्काळी.''* भक्ती, ज्ञान आणि वैराग्य यांव्यतिरिक्त हरिकीर्तनाचा विषय होऊ शकत नाही. जेणेकरून श्रोत्यांच्या अंत:करणात श्रीहरीची मूर्ती ठसेल असे विवरण हवे. याव्यतिरिक्त जर अन्य काही विषय विवेचनात घेतले जात असतील तर त्याला हरिकीर्तन म्हणता येणार नाही.

हरिकीर्तन करणाऱ्यानेसुद्धा काही नियम पाळावयाचे असतात. तुकाराममहाराज सांगतात, *''जेथे कीर्तन करावे। तेथे अन्न न सेवावे॥ बुक्का लावू नये भाळा। हार घालू नये गळा॥ तट्टा वृषभासी दाणा। कदा मागो नये जाणा॥ तुका म्हणे देती घेती। तेही दोघे नरका जाती,''* हे नियम पाळून कीर्तन करणारे किती ? फार थोडे, आमचे तात्यासाहेबमहाराजांसारखे आणि मामांसारखे.

हरिकीर्तनाची परंपरा जुनी आहे. कीर्तनाची परंपरा शुकाचार्यांचेपासून आली. कीर्तनाची परंपरा नारदांचेपासून आली असा समज आहे. पण हे नारदमुनी शुकाचार्यांचे मागे वीणा घेऊन उभे रहात. शुकाचार्यांचे कीर्तनाचे महिमान सांगणारे एक पद असे आहे :- *''कीर्तनासी उभा शुक सुखाचा सोहळा। प्रल्हाद तो ताल धरी घेवोनिया टाळा॥ उद्धवाचे हाती झांज नारदाते वीणा। पार्थ उभा पाठीमागे घेई दिव्य ताना॥ मृदंग वाजवी इंद्र चपळाई फार। सनकादिक मुनि सारे करिती जयजयकार.''* ज्या कीर्तनात प्रल्हाद टाळ वाजवी, उद्धव झांज वाजवी, पखवाजाला इंद्र, आणि नारदाचे हाती वीणा आणि पार्थ रागदारी आळवी, त्या कीर्तनाचे काय वर्णन करणार ? शुकाचार्यांचे नंतर नारदांनी कीर्तन केले. नारदांचे नंतर ज्ञानेश्वरमहाराजांनी कीर्तन केले. ज्ञानेश्वरी हे महाराजांचे धर्मकीर्तन होते. त्यांचेनंतर नामदेवमहाराजांनी कीर्तन केले. भगवंताचे महाद्वारात नित्यकीर्तन करण्याचा मान नामदेवमहाराजांना होता.

*''नामा म्हणे नित्य तुझे महाद्वारी। कीर्तन गजरी सप्रेमाचे,''* असे नामदेवमहाराज सांगतात. त्यानंतर एकनाथमहाराजांनी कीर्तन केले. *''नित्य नवा कीर्तनी कैचा वोढवला रंग। श्रोता आणि वक्ता स्वये झाला श्रीरंग,''* या एकनाथवचनावरून त्यांच्या कीर्तनाचे स्वरूप कळते. नाथमहाराजांचे कीर्तन म्हणजे दरबार होता. त्यांच्या कीर्तनात श्रोता आणि वक्ता हे दोघेही परमात्मरूप व्हायचे. त्यांचे नंतर तुकाराममहाराजांनी कीर्तन केले. मानअपमान बाजूला ठेवून चित्ताचे आसनावर तुकाराममहाराजांचे कीर्तन व्हायचे. *''चित्ताचे आसन। तुका करितो कीर्तन॥'', ''थुंकोनिया मान। तुका करितो कीर्तन.''* सात सात दिवस उपास झाले तरी त्यांनी कीर्तन सोडले नाही. *''आयुष्य करी उणे। परी मज आवडो कीर्तन,''* असे त्यांनीच म्हणावे; त्यांना ते शोभते. तीन शिंका आल्या की आम्ही कीर्तनाला सुट्टी घेणार, त्या आम्ही असे म्हणावे का ? तात्यासाहेबमहाराजांनी, आमच्या मामांनी असे म्हटले तर ते त्यांना शोभेल. तुकाराममहाराजांचे नंतर त्यांचे शिष्य जे निळोबाराय त्यांनी नित्यकीर्तन केले. पण त्यांचे अंत:करणात ''तुकाराममहाराजच कीर्तन करत आहेत'' अशी भावना होती. *''निळा म्हणे मी बोलता । दिसे परी त्याची सत्ता,''* असे निळोबाराय सांगतात. त्यानंतर आमचे तात्यासाहेबमहाराजांनी सांगली गावात नित्य पंचवीस वर्षे हरिकीर्तन केले. त्यांचे कीर्तन कसे होते हे त्यांच्याच एका पदात असे सांगितले आहे :- *''कीर्तन संतरायांचे। परमार्थ तत्त्वबोधांचे॥ सांगणे बहुत प्रेमाचे। प्रासादिक गुरुभक्तीचे॥ आदरे ऐकती साचे। धन्य भाग्य त्या लोकांचे॥ देव कीर्तनात प्रगटला। जेथे तेथे पहाता भरला॥ असा अनुभव कोठे न आला। तनु पुलकित जेथे होई॥ हरिकथा गोड बहु झाली। वाचे न बोलती बोली। भाग्यवंत मंडळी बसली। अशी शोभा कोठे न दिसली॥ स्वारी सद्गुरूची आली। चित्तवृत्ती तल्लीन झाली। जिऊबाई कीर्तना आली। शिऊबाई तिजसी भेटली। मनुबाई निवांत ठेली। दासा प्राप्त झाली गुरूपायी.''* ज्या कीर्तनात देव प्रगट व्हायचा, चित्तवृत्ती तल्लीन व्हायची, जीवाशिवाची भेट व्हायची आणि मन हे निवांत व्हायचे, त्या कीर्तनाचे वर्णन काय करायचे ? शब्दांत वर्णन करता येईल का ? गुरुदेव रानडेसाहेबांना जे काही पारमार्थिक अनुभव आले त्यांतील बरेचसे तात्यासाहेबांचे कीर्तनात आले, असे त्यांनीच एका पुस्तकाच्या प्रस्तावनेत नमूद केले आहे. यावरून तात्यासाहेबमहाराजांच्या कीर्तनाचे महत्त्व लक्षात येईल. तात्यासाहेबांचे नंतर त्यांचे आज्ञेने, त्यांचे कीर्तन, त्यांचीच सेवा म्हणून, एकही दिवस खंड न पडता, अखंड अडतीस वर्षे आमचे मामांनी हरिकीर्तन केले. तरी 'आपण कीर्तन करतो' हे

त्यांचे गात्रीही नव्हते. *"दासा हृदयी हनुमान[1]। सदा करी तो कीर्तन ॥"* अशी त्यांची अनुभूती होती. त्यांची सर्व कीर्तने नामाभोवती फिरायची. त्यांची "अमृतवाणी"[2] वाचली असता याची कल्पना आल्यावाचून रहाणार नाही. थोडक्यात काय, सर्व वैष्णवांनी नामसंकीर्तन केले असेच आढळून येते.

पुढील कडव्यात ज्ञानेश्वरमहाराज सांगतात, *"अनंता जन्माचे तप एक नाम। सर्व मार्ग सुगम हरिपाठ."* अनंताचे साक्षात्कारासाठी नाम हेच तप असून, सर्व मार्गांत हरिपाठ हा सोपा आहे. अनंताचा साक्षात्कार होण्यासाठी ध्याना-मनाचा विषय रामकृष्ण-जीवनाची गती व्हावा लागतो. त्याची आवड लागली म्हणजे हरिनामाची जोड होते. या नामाचे पाठानेच - तपानेच - अनंताचा साक्षात्कार होतो. *"ज्ञानदेवा गोडी हरिनामाची जोडी। रामकृष्णी आवडी सर्व काळ,"* आणि *"ज्ञानदेवा ध्यानी रामकृष्ण मनी"* हे हरिपाठातील चरण ही गोष्ट स्पष्ट करतात.

ज्ञानेश्वरमहाराज पुढील कडव्यात सांगतात, *"योग-याग-क्रिया धर्माधर्म माया। गेले ते विलया हरिपाठी."* देहाच्या अनुषंगाने होणारा योग, याग, धर्म, अधर्म ही सर्व माया आहे. हरिपाठाच्या योगाने देहभावच रहात नसल्याने साधक परमात्मरूपच होतो; त्याला योग इत्यादीची जरुरी लागत नाही. योगाची जरुरी केव्हा निर्माण झाली ? वियोग झाला म्हणून ना ? परमात्म्याच्या वियोगानेच जीवत्व आले ना ? याग कशासाठी ? पाऊस पडावा म्हणूनच ना ? क्रिया कशाकरता ? खायला पाहिजे म्हणूनच ना ? हे योग इत्यादी कशाला चिकटलंय ? देहालाच ना ? आम्ही जे जे देहाच्या अनुषंगाने करतोय ती वट्ट सर्व माया आहे. हरिपाठाचे योगाने ही सर्व माया लयाला जाते.

शेवटच्या कडव्यात ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात *"ज्ञानदेवी यज्ञ याग क्रियाधर्म। हरिवीण नेम नाही दुजा."* यज्ञ, याग, क्रिया, धर्म हे देहाच्या अनुषंगाने झाले की माया, आणि तेच चैतन्याच्या अनुषंगाने झाले की "हरी". योग होऊ दे, पण कसा ? चैतन्यात चैतन्य मिसळले पाहिजे, वाऱ्यात वारे मिसळले पाहिजे, एवढाच परमार्थ आहे. यज्ञ करा, पण कोणता ? स्वधर्म हाच नित्य यज्ञ आहे. *"स्वधर्मू जो बापा। तोची नित्य यज्ञ जाण पा."* स्वधर्माचे आचरण केले असता त्यात पापाचा प्रवेश होत

---

१. हनुमान म्हणजे येथे हणमंत पांडुरंग कोटणीस ऊर्फ तात्यासाहेबमहाराज कोटणीस हे होते. (सं. टी.)

२. मामामहाराज केळकरांच्या अभंगांची गाथा 'अमृतवाणी' या नावाने प्रकाशित झाली आहे. (सं. टी.)

नाही. पण 'स्व'चा ''धर्म'' कोणता हे कळले पाहिजे ना ? *''सकळ धर्ममध्ये धर्म। स्वरूपी रहाणे हा स्वधर्म.''* स्वरूपाचे ठिकाणी रहाणे हाच स्वधर्म असे समर्थ रामदास सांगतात. या स्वधर्माचे आचरण जो अनुक्रमे आधारचक्रापासून करतो, त्याला त्याच्या व्यापाराने निश्चित मोक्ष मिळतो असे ज्ञानेश्वरमहाराज पुढील ओवीत सांगतात- *''देखे अनुक्रमाधारे। स्वधर्मू जो आचरे। तो मोक्ष तेणे व्यापारे। निश्चित पावे.''* चैतन्याला धरून असणारा धर्म, स्वधर्म. स्वधर्माचरण कळले की नित्य यज्ञ काही वेगळा नाही. चैतन्याला धरून योग, याग, धर्म घडले की तोच हरी आहे. या हरीशिवाय दुसरा नेम असूच शकत नाही.

**(२१)**

**काळ वेळ नामस्मरणासी नाही। दोही पक्ष पाही उद्धरती ॥१॥**
**रामकृष्ण नाम सर्व दोषा हरण। जड जीवा तारण हरी एक ॥२॥**
**हरिनामसार जिव्हा या नामाची। उपमा त्या दैवाची कोण वानी ॥३॥**
**ज्ञानदेवी सांग झाला हरिपाठ। पूर्वजा वैकुंठ मार्ग सोपा ॥४॥**

या अभंगातही ज्ञानेश्वरमहाराज नामाचे महत्त्वच सांगत आहेत.

नाम घेताना काळवेळेचे बंधन नाही. ते केव्हाही घ्यावे. याचा अर्थ ''केव्हाही घ्यावे, वाटले घ्यावे न घ्यावे'' असा मात्र नाही. नाम हे दिक्कालातीत असल्याने, नामस्मरणास काळवेळ नाही, म्हणजे काय हे सांगताना *''सदा सर्वदाही उच्चारावे''* असे रामपाठात मामांनी सांगितले आहे. नाम हे श्वासाशी निगडित आहे; श्वास सदा आहे; म्हणून नाम कदा घेऊन कसे चालेल असा प्रश्न आहे. कबीरांना एका गृहस्थांनी विचारले ''तुमचा हा रामनामाचा कोर्स किती वर्षांचा आहे ?'' तेव्हा कबीर म्हणाले, *''सीताराम कहो जी मनमों। जबलग श्वास चला तनमों ''* म्हणजे जोवर श्वासोच्छ्वास चालू आहे तोवर रामनाम घ्यावयाचे. तो बंद झाला की तुम्हाला कोणी रामनाम घ्यावयास सांगणार नाही हे निश्चित. एकनाथमहाराज म्हणतात *''हरि बोला देता हरि बोला घेता। हसता खेळता हरी बोला॥ हरी बोला गाता हरी बोला खाता। सर्व कार्य करीता हरी बोला॥ हरी बोला एकांती हरी बोला लोकांती। देहत्यागा अंती हरी बोला॥ हरी बोला भांडता हरी बोला कांडता। उठता बैसता हरी बोला॥ हरी बोला जनी हरी बोला विजनी। एका जनार्दनी हरी बोला.''* सर्व क्रिया करताना हरी बोलायचा आहे. केव्हा नाम घ्यावे हे सांगताना समर्थ रामदास सांगतात, *''हर्षकाळी विषमकाळी। पर्वकाळी प्रस्तावकाळी। विश्रांतिकाळी निद्राकाळी। नामस्मरण करावे॥ कोडे साकडे संकट। नाना संसार खटपट। अवस्था लागता चटपट। नामस्मरण करावे॥ चालता बोलता धंदा करता। खाता जेविता सुखी होता। नाना उपभोग भोगिता। नाम विसरू नये॥ संपत्ती अथवा विपत्ती। जैसी पडेल काळगती। परी नामस्मरणाची स्थिती। सांडोचि नये॥ वैभव सामर्थ्य आणि सत्ता। नाना पदार्थ चालता। उत्कट भाग्यश्री भोगिता। नाम विसरू नये॥ आधी अवदसा मग दसा। अथवा दसे उपरी अवदसा। प्रसंग असो भलतैसा। परंतु नाम सोडू नये.''* या सर्वांचा अर्थ असा की कोणताही काळ

नामस्मरणास अयोग्य नाही. वामन पंडितही सांगतात *"अहो येता जाता उठत बसता कार्य करिता। सदा देता घेता वदनी वदता ग्रास गिळीता। घरी दारी शय्येवरी रति सुखाचे अवसरी। समस्तांची लज्जा त्यजुनी भगवच्चिंतन करी."* माणसाची बाह्यत: कोणतीही क्रिया घडत असू दे, नामाकडचे आपले अनुसंधान ढळता कामा नये. आता कीर्तन ऐकताना आपले अनुसंधान घराकडे असते की नाही ? तसे कोणतीही क्रिया होत असताना प्रयत्नपूर्वक नामाकडे - चैतन्याकडे - अनुसंधान ठेवणे, लक्ष देणे हे शक्य आहे. *"बोलता चालता देखता ऐकता। न ढळे सर्वथा तेची साधी,"* असे नामसाधनेतील एक वर्म मुक्ताबाईंनी चांगदेवांना सांगून ठेवले आहे.

अहो, माणसाचे मागे एवढी आकर्षणे - व्यवधाने - बाहेर असताना, सतत नामाकडे अनुसंधान ठेवणे एकदम जमणार नाही, हे संतांना माहीत आहे. म्हणून त्यांनी सुरुवातीला तीन वेळा नामाचा नेम करा म्हणून सांगितले. पण हे नामाची गोडी लागेस्तोवर. *"नामस्मरण सर्वकाळी करीत जावे"* येथपर्यंत आपल्याला अभ्यास वाढवावयाचा आहे, हे विसरून चालणार नाही. *"नित्य नेम प्रात:काळी। माध्यान्हकाळी सायंकाळी। नामस्मरण सर्वकाळी। करीत जावे,"* असेच समर्थही सांगतात. त्रिकाल साधनाच्या अभ्यासाने दोन प्रहर म्हणजे सहा तास 'नामात पवन' आणि 'पवनात नाम' साधले असता विष्णूचे दर्शन होऊन, आठही प्रहर म्हणजे चोवीस तास साधन साधते, असे आमचे मामांनी स्वानुभवाने रामपाठात नमूद केले आहे. ते म्हणतात *"ज्यासी दोन प्रहर साधेल पवन। विष्णूचे दर्शन होत असे॥ साधिलीया जीवा विष्णूचे दर्शन। अष्टौप्रहर साधन चालतसे."*

असे नाम घेणारा व ऐकणारा या दोघांचाही उद्धार होतो. *"नित्य नवा कीर्तनी कैचा वोढवला रंग। श्रोता आणि वक्ता स्वये झाला श्रीरंग,"* हे नाथवचन हे स्पष्ट करते. नाम घ्यायचे आणि ते घेत असताना आपणच कानांनी ते ऐकावयाचे. *"वाचा गीत गाईजे। गाता गाता श्रवणी ऐकिजे रया। लीला विनोदे संसार तरिजे रया"* हा ज्ञानेश्वरमहाराजांचा चरण नाम गाता गाता काळाचे सार्थक कसे होते आणि जीव संसारातून कसा तरतो हे स्पष्ट करतो.

पुढील कडव्यात ज्ञानेश्वरमहाराज सांगतात *"रामकृष्ण नाम सर्व दोषा हरण। जड जीवा तारण हरी एक."* हे कलियुग म्हणजे दोषाचा सिंधू आहे तेथे "धर्मसिंधु"[१] काय रडणार ? जी जी साधने म्हणून सध्या उपलब्ध आहेत ती सारी नरकाकडे

१. धर्मसिंधु हे धर्मशास्त्रावरील एका ग्रंथाचे नांव आहे. (सं. टी.)

नेणारीच आहेत. याचा अधिक खुलासा कीर्तनात करता येत नाही. या कलियुगामुळे सत्याचे वाटोळे झाले आहे. सत्य औषधालासुद्धा शिल्लक राहिलेले नाही. दोष खूप वाढले आहेत. नीतो हा शब्द फक्त शब्दकोषातच राहिला आहे. तुकाराममहाराज कलियुगाचे वर्णन असे करतात *''कलियुगामुळे। झाले सत्याचे वाटोळे॥ दोष झाले बळिवंत। नाही ऐसी झाली नीत॥ मेघ पडे भीती। पिके सांडियेली क्षिती॥ तुका म्हणे काही। वेदा वीर्य शक्ति नाही.''* तथापि कलियुगात कितीही दोष अथवा दोषांचे डोंगर असू देत, या रामकृष्णनामाने म्हणजे राम व कृष्ण या जीवनाचे गतीत असणाऱ्या नामाने नाहीसे होतात. *''नाम स्मरे निरंतर। ते जाणावे पुण्य शरीर। नाना दोषांचे गिरिवर। रामनामे नासती,''* म्हणजे नामाचे स्मरण निरंतर असेल तर दोषांचे डोंगर भस्मसात होतात अशी ग्वाही समर्थ रामदास देत आहेत. या रामनामाने कलियुगाचे सत्ययुग होणार नाही का ? होईल की हो, पण त्यासाठी निरंतर नामस्मरण व्हावयास पाहिजे. काय आहे की कर्म करीत असताना कळत न कळत माणसाचे हातून दोष घडत असतात. ते दोष नाहीसे करण्यास प्रायाश्चित्ते सांगितलेली आहेत. पण आमच्या मामांच्या मते सर्व दोष दूर होण्यासाठी नामस्मरण हे एकमेव प्रायाश्चित आहे. ते सांगतात *''सर्व दोषा प्रायाश्चित। एक नामची उचित.''*

या नामाच्या योगाने जड जीवांचा उद्धार निश्चित आहे. *''जड जीवा तारण हरि एक''* ही ज्ञानेश्वरमहाराजांनी केलेली ''नामाची जाहिरात'' आहे. काही वर्षांपूर्वी ''जगाचा तारणहार येशू ख्रिस्त'' असे ठिकठिकाणी भिंतीवर लिहिलेले आपण पाहिले असेलच. तशा पद्धतीचे आश्वासन सातशे वर्षांपूर्वीच ज्ञानेश्वरमहाराजांनी दिले आहे. नामाच्या योगे कोट्यावधी जीव तरले, तरत आहेत आणि तरतील असा भरवसा सर्व संतांनी दिला आहे. *''नामेची तारिले कोट्यान हे कोटी॥''* ही तुकोक्ती हेच दर्शविते. पण आमचा विश्वास पाहिजे ना ? *''नाम तारक हा प्रचीतीचा डंका। धरू नको शंका दास म्हणे,''* ही मामांची अमृतवाणी आपल्या मनातील शंका दूर करणारी आहे. आपल्या सद्गुरूंनी दिलेले नाम हे आपणाला तारणारे आहे असा मनात निश्चय पाहिजे का नको ? असा निश्चय असेल तर त्याचे फळ मिळाल्याशिवाय रहाणार नाही. *''निश्चयाचे बळ। तुका म्हणे तेची फळ,''* ही तुकोक्ती स्पष्टच आहे.

पुढील कडव्यात ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, *''हरिनाम सार जिव्हा या नामाची। उपमा त्या दैवाची कोण वानी.''* या नामाच्या जिव्हेत हरिनाम हे सार असून, त्याचे माहात्म्य कोण जाणेल ? नामाची जिव्हा म्हणजे जी फक्त नामच घेते,

जी नामाचीच बनली आहे. चांदीचे भांडे म्हणजे त्यात फक्त चांदीच असते; तसे इथे आहे. हा विषय आपण मागे[1] पाहिला आहे. हरिनाम हे सार आहे. *''सार सार सार विठोबा नाम तुझे सार''* हे ज्ञानेशांचे वचन आणि *''नाम हेची सार विठोबाचे''* ही तुकोक्ती ही ''हरिनाम सार आहे'' या विधानाला पुष्टी देणारी आहे. असे हे सार हरिनाम जो कोणी घेईल त्याच्या दैवाला पार नाही, असे ज्ञानेश्वरमहाराज सांगतात.

शेवटच्या कडव्यात ज्ञानेश्वरमहाराज सांगतात *''ज्ञानदेवी सांग झाला हरिपाठ। पूर्वजा वैकुंठ मार्ग सोपा.''* या चरणानंतर हरिपाठ संपला आहे असे वाटते, पण तो पुढे सुरूच आहे. दासबोधातसुद्‌धा *''सरली शब्दाची खटपट''* या शब्दांनंतर दासबोध संपला असा समज होतो; पण दासबोध पुढे चालूच रहातो तसे येथे आहे. हरिपाठ हा सांगच आहे. तो पूर्णच आहे. तो अपूर्ण आहे कोठे ? नित्य, सत्य आणि मित अशा हरिपाठाच्या नेमाने निर्गुण परमात्म्याची प्राप्ती होऊन, जीव स्वतः तर मुक्त होतोच पण त्याच्या पूर्वजांनाही वैकुंठाचा मार्ग सुकर होतो. असे या हरिपाठाचे माहात्म्य आहे.

---

१. हरिपाठ अभंग १७ वरील विवेचन पहा. (सं. टी.)

(२२)

नित्यनेम नामी ते प्राणी दुर्लभ । लक्ष्मीवल्लभ तया जवळी ॥१॥
नारायण हरी नारायण हरी । भुक्तीमुक्ती चारी घरी त्याच्या ॥२॥
हरिवीण जन्म नर्कची पै जाणा । यमाचा पाहुणा प्राणी होय ॥३॥
ज्ञानदेव पुसे निवृत्तीसी चाड । गगनाहोनी वाड नाम आहे ॥४॥

नामाचे स्वरूप आणि नामाचा महिमा पुन: एकदा या अभंगात ज्ञानेश्वरमहाराजांनी सांगितला आहे. आपला मुद्दा पटविण्यासाठी अशी द्विरुक्ती केली जाते.

नामाचा 'नामी' म्हणजे 'ना मी' म्हणजे 'मी नाहीसा करणारा' नित्य नेम सांभाळणारा प्राणी दुर्लभ असून त्याच्याजवळ लक्ष्मीवल्लभ विष्णू वास्तव्य करतात. आमच्या दृष्टीने परमार्थ हा सवडीचा विषय आहे. म्हणजे आम्हाला वेळ मोकळा असेल, जर जमत असेल, तर करण्याचा विषय परमार्थ आहे. वस्तुत: जो परमार्थ आपण वेळात वेळ काढून करावयास हवा, तो परमार्थ आम्ही सवडीने करतो, आणि प्रपंचात लक्ष देतो. खरे तर प्रपंच हा प्रारब्धाचे अधीन आहे; तो आम्ही जीव टाकून करतो. याउलट परमार्थ हा खरे तर जिवाभावाचा विषय आहे; जीवाने शिवरूप होणे हा येथील अनुभव आहे. पण परमार्थात आपण जीव टाकीत नाही. आहे की नाही मजा ?

खरे म्हणजे परमार्थ किती वेळ झाला याला महत्त्व नाही. ज्ञानेश्वरमहाराज सांगतात दिवसाचे काठी परमार्थासाठी एक निमिष दिले तरी पुरे :- *''तरी गा ऐसे करी। यया आठा पहारामाझारी। मोटके निमिषभरी। देतु जाय.''* एक निमिष नेम पुरे, पण तो नित्याने, नेमाने, निष्ठेने होणे महत्त्वाचे आहे. आमचा मात्र ''कशाचाच नेम नाही'', हाच आमचा नेम आहे. आपल्याला परमार्थातील श्रेष्ठतर श्रेष्ठतम अनुभव घ्यावयाचे असतील तर असे चालणार नाही. आम्ही ''नित्य नेम'' करतो पण तो सरळ तीन दिवससुद्धा चालत नाही. *''तेरड्याचा रंग तीन दिवस''* असे याचकरिता म्हणतात. आमचा नेम का चालत नाही ? याचे कारण आमचे मनात नेम करावयाचे असतच नाही. *''तुका म्हणे मनी नाही। नये आकाराते काही.''* मनात दृढपणा असल्याशिवाय काही होणारच नाही. आमचे मनच नेमाचा घात करणारे आहे. *''मनजी पाटील देहगावीचा। विश्वास धरू नका हो त्याचा। घात करील नेमाचा। पाडील फशी,''*

हे एकनाथमहाराजांचे वचन स्पष्टच आहे. म्हणून नेम कडेला जाण्यासाठी मनाचा निग्रह - निश्चय - पाहिजे.

आता, जो नेम करावयाचा आहे तो कोणता ? कोणता नेम करावयाचा हे ज्ञानेश्वरमहाराजांनी त्याच चरणात *''नित्य नेम नामी''* असे सांगितले आहे. 'नित्यनेम' हा ''नामी'' म्हणजे ''ना मी'' म्हणजे मीचा लय करणारा आहे. नित्यनेम शब्दाचा नेमका अर्थ मामांनी अमृतवाणीत सांगितला आहे. ते म्हणतात, *''नित्यामाजी असे नेम। तोची जाणा नित्यनेम.''* जे नित्य आहे त्याला धरून असणारा नेम, जे नित्य आहे त्यातच समाविष्ट असणारा नेम म्हणजे नित्यनेम होय. आता, नित्य काय आहे ? नित्य एक ब्रह्म आहे, नित्यं त्वेकं ब्रह्म; ब्रह्माखेरीज बाकी सारे अनित्य आहे. ज्ञानेश्वरमहाराज सांगतात *''तो नित्यरूप पार्था.''* एक परमात्मा नित्यरूप आहे. तेव्हा नित्य ब्रह्माला - परमात्म्याला - धरून होणारा नेम तो नित्यनेम होय. परमात्मा नित्य आहे; तसे त्याचे नाम नित्य आहे. *''रामनाम नित्य है''* असे तुळसीदास सांगतात. जे नाम नित्य आहे तेच नेमात बसवले आहे. म्हणून रामनाम हाच खरा नित्यनेम आहे. *''एका जनार्दनी नेम। नित्य वाचे रामनाम.''* नित्यवाचेने रामनाम घेणे हाच तो नित्यनेम. असे हे नित्याचे नेमाचे असणारे नाम जर आपण घेतले तर मनातील काम म्हणजे इच्छा नाहीशी होते, असे आमचे मामा रामपाठातील *''नित्याचे नेमाचे असे एक नाम। घेता सरे काम अंतरीचा''* या शब्दांत सांगतात. असा काम नाहीसा झाला की रामाचा साक्षात्कार होतो. कारण काम व राम हे एकत्र राहूच शकत नाही. ही गोष्ट *''जहाँ राम तहाँ काम नही। जहाँ काम तहाँ राम नहीं''* असे तुळसीदास सांगतात.

नित्याचे नेमाचे हे रामनाम आहे तरी कसे ? *''इडा आणि पिंगला सुषुम्नेत सरता। रामनाम हाता येत असे''* असे मामा म्हणतात. जेव्हा इडा आणि पिंगला या सुषुम्नाकार होतात तेव्हा रामनाम हाताला येते. *''इडा पिंगलेचा त्रिवेणीसंगम। तुका म्हणे नेम गुरूघरचा''* असे तुकाराममहाराजही सांगतात. हे रामनाम वैखरीने अगर मनाने घेण्याचे नाही; ते अखंडत्वाने अनुस्यूत रीतीने, कमीजास्त न होता, स्फुरण पावत आहे. *''कमी जास्त काही अनित्यता नाही। स्फुरतसे देही अखंडित''* या चरणात मामा हे स्पष्ट करतात. हा रामनाम जप समत्वाने साधावयाचा असतो, तो ''करावयाचा'' नसतो. ही गोष्ट *''रामराम जप समत्वे साधावा''* या निवृत्तिनाथांच्या चरणात स्पष्टपणे सांगितली आहे. हे रामनाम घेताना जपाची माळ लागत नाही; कारण हा जप अखंडत्वाने देहाचे आत सुरूच आहे. *''न लगे जपमाळ। राम वदे सर्वकाळ॥*

*एका जनार्दनी राम। अखंड जपे हृदयधाम''*, असे एकनाथमहाराज सांगतात. *''राम जपा श्वासोच्छ्वास''* या चरणाद्वारे नामस्मरणातील सोपे वर्म हे नामावतार गोंदवलेकरमहाराजांनी सांगून ठेवले आहे. नेमाबद्दल तुकाराममहाराज आणखी असेही सांगतात *''तुका म्हणे नेम प्राणासवे गाठी.''* याचा अर्थ असा की प्राणाशी गाठ पडणे हाच खरा नेम आहे. ''असंगाशी संग आणि प्राणाशी गाठ'' अशी म्हणच आहे. संगामध्ये असंगता आली की असंगाचा संग होतो. म्हणजे देहाचा संग सुटणे हे यातील वर्म आहे. काहीतरी जिद्द असल्याशिवाय हे घडत नाही. *''तुका म्हणे येथे कराराचे काम। तया आहे राम जवळीच.''* कराराने नेम होत राहिला की राम जवळच आहे. असा हा नेम साधणारी माणसे फार दुर्मिळ असतात, आमचे मामांसारखी. एकही दिवस खंड न होता अखंड हरिकीर्तन ही काही चेष्टा नव्हे. मामांनी *''तुका म्हणे नेम प्राणांसवे गाठी''* ही तुकोक्ती अंतर्बाह्य खरी करून दाखविली, सार्थ केली. अहो, देह ठेवताना नेमाच्या रामनामाचे स्मरण ! अशा महात्म्याजवळ लक्ष्मीवल्लभ रहात असेल तर त्यात काय नवल !

ज्ञानेश्वरमहाराज पुढील कडव्यात सांगतात, *''नारायण हरी नारायण हरी। भुक्तीमुक्ती चारी घरी त्याच्या.''* नारायण आणि हरी हे एकच कसे आहेत, हे आपण गुरुलिंगगीतेतील *''हरी नारायण गुरु नारायण''* या श्रुत झालेल्या भजनाच्या आधारे पाहिले आहे. हरी आणि गुरु हे दोघेही नारायण म्हणजे आमचे नारायणराव निंबरगीकरमहाराज ही माझी धारणा आहे. त्यांचे नुसते नाव जरी घेतले तरी आमचा उद्धार ठरलेला आहे. त्यांचे नाव घेतल्याने सर्व सौख्ये आणि चारही प्रकारच्या मुक्ती प्राप्त होत आहेत, असे महत्त्व आहे निंबरगीकरमहाराजांचे. आमचे हे महाराज सर्वांचे मनोरथ पूर्ण करण्यास समर्थ आहेत. त्यांच्या मनाला आले की ''रंकाचा राणा'' होतोय. *''तुका म्हणे आले समर्थाच्या मना। तरी होय राणा रंक त्याचा,''* ही तुकोक्ती हेच स्पष्ट करते. निंबरगीकरमहाराजांचे येथे काही कमी आहे काय ? ते श्रीमंताहून श्रीमंत आहेत. *''श्रीमंताहून हे श्रीमंत। केवळ ईश्वर हे निभ्रांत''* असा कृष्णसुतांचा सिद्धांत आहे. *''मोक्षश्रीया अलंकृत । ते हे संत श्रीमंत। जीव दरिद्री असंख्यात। नृपति केले''* असे समर्थमत आहे. *''नारायण श्रीमंत आमुचा। नारायण श्रीमंत॥ दारिद्र्याचा लेश नसे ज्या। लक्ष्मीपति गुणवंत,''* असे कृष्णाबाई गाडगीळ म्हणतात. भुक्ती आणि मुक्तीचे आम्हाला कौतुक हो ! निंबरगीकरमहाराजांना त्याचे काय ? असे हे महात्मे भुक्ती व मुक्ती यांकडे पहावयाससुद्धा तयार असत नाहीत.

*''भुक्ती मुक्ती फुकाच साठी। कोणी तयाकडे न पाहे रे,''* ही संतोक्ती हेच सांगते.

पुढील कडव्यात ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात *''हरिवीण जन्म नरकची पैं जाणा। यमाचा पाहुणा प्राणी होय.''* हरिविण जन्म जाणे हाच नरक आहे. खरे म्हणजे हरीशिवाय जन्म होऊच शकत नाही. आपण हरीशिवाय जन्माला आलेलो नाही. हरी म्हणजे चैतन्य. चैतन्याशिवाय आपण जन्माला आलो काय ? चैतन्याशिवाय जन्म होऊच शकत नाही. ज्या हरीमुळे जन्म झाला त्याला सोडून आपला सर्व व्यवहार चालला आहे. हाच हरिवीण जन्म. आता, हा जो कोणी व्यवहार करतो, तो कोण करतो हो ? चैतन्यामुळे - आत्म्यामुळे - व्यवहार होतो पण आपणाला मात्र वाटत असते की हे सारे देहाकडून होत आहे. ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, *''आत्माची कर्मकर्ता। हाही निश्चय नाही तत्त्वता। देहोची मी कर्मकर्ता। मानितो साच.''* हा हरी - चैतन्य - सर्वत्र भरून राहिला आहे. *''हरी येथे रे हरी तेथे रे। हरीवाचून न दिसे रिते रे''* हे ज्ञानेश्वरमहाराजांचे बोल स्पष्ट आहेत. पण आपले दैव कसले ? ते चैतन्य, तो हरी आम्हाला दिसत नाही. तेव्हा हरीला ओळखणे, जाणणे हे महत्त्वाचे आहे. त्याशिवाय जीवनाला धन्यता नाही. *''ओळखिला हरी। धन्य तो संसारी,''* हा नाथमहाराजांचा विचार येथे लक्षात घेण्याजोगा आहे. हरीला न ओळखता जर सर्व जन्म गेला तर तोच नरक आहे. हरीला ओळखून ज्याचा जन्म चालला आहे तो कुठेही असला तरी तो वैकुंठात आहे.

शेवटच्या कडव्यात ज्ञानेश्वरमहाराज सांगत आहेत, *''ज्ञानदेव पुसे निवृत्तीसी चाड। गगनाहुनी वाड नाम आहे.''* अहो, ते हरीचे नाम केवढे मोठे आहे हो ? असे ज्ञानेश्वरमहाराजांनी निवृत्तिनाथमहाराजांना विचारले. तेव्हा निवृत्तिनाथ म्हणाले, ''नामात आकाश सामावलेले आहे. नाम गगनापेक्षा मोठे आहे.'' दिक, काल, आकाश या सर्वांच्या अतीत असणारे नाम हे आकाशापेक्षा मोठे आहे. *''आत्मन: आकाश: संभूत:''* असे उपनिषदे सांगतात. म्हणजे आकाश हे आत्म्यापासून उत्पन्न झाले आणि आत्मा - परमात्मा - हा आकाशाला व्यापून असणारा आणि आकाशापेक्षा मोठा आहे. या संदर्भात ज्ञानेश्वरमहाराज जे सांगतात *''जे आकाशाहूनी वाड। जे अव्यक्ताची पैल कड। जे भेटलिया अपाडपाड। पडो नेदी''* ते या अर्थानेच. तर रामदासस्वामी विचारतात *''मही नव्हे पावक। वायु नव्हे उदक। नभासी व्यापक। ते काय गे बाई,''* आणि नभाला व्यापक असणाऱ्या परमात्म्याचा निर्देश करतात. आता आत्मा - परमात्मा - हरी हा जर आकाशापेक्षा मोठा आहे तर अर्थात त्याचे नाम पण आकाशापेक्षा मोठे आहे.

नाम हे आकाशापेक्षा कसे मोठे आहे याचा अनुभव घेण्यासाठी ज्ञानेश्वरमहाराजांची मानसकन्या असणारे संत गुलाबरावमहाराजांनी काय केले, ते त्यांनी आपल्या एका अभंगात जे सांगितले आहे, ते मोठे पहाण्यासारखे आहे. ते म्हणतात, *''आता मज एक सुचला उपाव। घेईन मी नाव श्वासोच्छ्वासी ॥ आकाशात आत्मा आत्म्यात आकाश । करोनी मनास दाखवीन.''* आकाशात आत्मा आणि आत्म्यात आकाश हे मनाला दाखविण्यासाठी त्यांना श्वासोच्छ्वासी नाम घेण्याचा उपाय सापडला, असे गुलाबरावमहाराजांनी या अभंगात नमूद केले आहे. तात्पर्य परमात्म्याचा - आत्म्याचा - हरीचा - चैतन्याचा अनुभव घ्यायचा असेल तर साधन करावयास नको काय ? श्वासोच्छ्वासात नाम साधावयास नको काय ?

## (२३)

**सात पाच तीन दशकांचा मेळा। एकतत्त्वी कळा दावी हरी ॥१॥**
**तैसे नोहे नाम सर्व मार्गा वरिष्ठ। तेथे काही कष्ट न लगती ॥२॥**
**अजपा जपणे उलट प्राणाचा। तेथेही मनाचा निर्धारू असे ॥३॥**
**ज्ञानदेवा जिणे नामेविण व्यर्थ। रामकृष्णी पंथ क्रमियेला ॥४॥**

नाम जपणे हा परमेश्वराप्रत पोचण्याचा मार्ग आहे, तो इतरांचेपेक्षा श्रेष्ठ आहे असे ज्ञानेश्वरमहाराज या अभंगात मुख्यत: सांगत आहेत.

सप्तविध धातू, पंचमहाभूते, त्रिगुण आणि दशेंद्रिये यांचा मेळ म्हणजे हे दृश्य आहे. कोणी लोक पंचमहाभूते व एक पुरुष अशी सहाच तत्त्वे मानतात. तर कित्येक जण पाच इंद्रिये, पाच भूते, जीव, शिव आणि मन मिळून एक अशी अकरा तत्त्वे मानतात. कोणी प्रकृती व पुरुष अशी दोनच तत्त्वे मानतात. तर कोणी पुरुष हे एकच तत्त्व मानतात. ज्ञानेश्वरीच्या तेराव्या अध्यायात ज्ञानेश्वरमहाराजांनी छत्तीस तत्त्वांच्या मिळणीला क्षेत्र असे संबोधले आहे. :- *''तैसी छत्तीसही इये तत्त्वे। मिळती जेथे एकत्वे। तेणे समुहपरत्वे। क्षेत्र म्हणिपे.''* ही जी छत्तीस तत्त्वे झाली ती कशी झाली हो ? मुळात एकच तत्त्व होते; त्यातून ही निर्माण झाली. *''अव्वल तो एक कथा। उससे नाम न था। इस दरम्यान पैदा हुआ एकसे दो दो से तीन तीन से चार चारसे पाच पाच से पचीस पचीस से छ्तीस॥ छ्तीसमों एक रहा है। वो गुरू गारुडीकी याद है,''* असे नाथमहाराज स्पष्ट करतात. मुळात एकच होते. त्यात एक मिसळले की दोन झाले; द्वैत निर्माण झाले. दोनीत एक मिसळले की तीन होतात; म्हणजे त्रिगुण, त्रिदोष निर्माण झाले. तीनीत एक मिसळला की चार होतात; चार वाणी, चार खाणी या निर्माण झाल्या. या चारीत एक मिसळला की पाच होतात; पंचमहाभूते, पाच विषय हे निर्माण झाले. आता प्रत्येक महाभूतात उरलेली चार महाभूते असतातच. जसे, एक पृथ्वीतत्त्व घेतले तर त्यात आप, तेज, वायू आणि आकाश ही तत्त्वे असतातच. अशी एकूण ५ X ५= पंचवीस तत्त्वे झाली. यात दहा इंद्रिये व अकरावे मन मिसळले की (२५+११ = ) छत्तीस तत्त्वे होतात. या छत्तीस तत्त्वांत हरी आहेच. *''एक तीन पाच मेळा पंचविसाचा। छत्तीस तत्त्वांचा मूळ हरी,''* हे नाथमहाराज सांगतात. निवृत्तिनाथमहाराजही सांगतात *''एक तत्त्व हरी असे पै सर्वत्र.''* म्हणजे जरी तत्त्वे छत्तीस असली तरी त्या सर्वांचे

मुळाशी हरी हे एकच तत्त्व आहे. म्हणजे हरी सोडून जे काही असेल तो सारा वाऊगा पसारा आहे. *''तुका म्हणजे एक विठ्ठलची खरा। येर तो पसारा वाऊगाची,''* ही तुकोक्ती हे स्पष्ट करते.

हा जो छत्तीस तत्त्वांचा पसारा आहे तो दृश्य आहे. या दृश्याचे ज्ञान जे माणसाला होते ते चैतन्यामुळेच ना ? का दृश्यालाच दृश्याचे ज्ञान होते ? या छत्तीस तत्त्वांचे मागे एक हरितत्त्व लपले आहे. त्यामुळे या जगाचा भास होतोय. *''जो लपोनी जगदाभासु''* हा चांगदेवपासष्टीतील चरण काय सांगतो आहे ? तो हरी लपलाय म्हणून दृश्य हे दृश्य होतंय; तो प्रगटला की विश्व लयाला जाते आहे. म्हणजे या दृश्याचे अस्तित्वच मुळी या हरितत्त्वावर अवलंबून आहे असाच याचा अर्थ होतो की नाही ?

वस्तुत: जड असे काही नाहीच आहे. आहे ते सारे चैतन्यच आहे. अहो, स्पंदाशिवाय पदार्थ नाही. श्वसनाशिवाय स्पंद नाही आणि जीवाशिवाय श्वसन नाही. म्हणजे आहे ते सारे 'सजीव' आहे, चैतन्यरूप आहे. खरे पाहिले तर आपणाला जे ज्ञान होते ते कशाचे होते ? आपणास चैतन्याचेच ज्ञान होत असते. चैतन्याला चैतन्याचे ज्ञान होते. द्रष्टा व दृश्य हे वेगळे नाहीच आहेत. द्रष्टा व दृश्य यांमध्ये असणाऱ्या साधर्म्याने माणसाला त्या वस्तूचे ज्ञान होते. हे पटण्याकरिता एक उदाहरण पाहू. ''अ'' हा ''ब''कडे पहातो; तेव्हा अ हा द्रष्टा आणि ब हे दृश्य आणि ''ब'' जेव्हा ''अ''कडे पहातो तेव्हा ''ब'' हा द्रष्टा आणि ''अ'' हे दृश्य. आता मला सांगा, यातला द्रष्टा कोणता आणि दृश्य कोणते ? काही सांगता येतंय का ? दोन्ही एकच आहे. मग आपणाला द्वैत का दिसते ? त्याचे कारण आहे अज्ञान. (द्रष्टा, दृश्य सारे काही हरी ही वस्तूच असल्याने) साधकाने दृष्टी उघडली की त्याला प्रथम वस्तु दिसली पाहिजे मग तो पदार्थ दिसला पाहिजे, असे आमचे निंबरगीकरमहाराज म्हणायचे.

एकतत्त्वी नामाची ज्याची कळ आहे असा जो हरी, त्याचे योगाने हे दृश्य दृष्टीसमोर येते आहे. नाम हे वारेमाप पसरलेले आहे. छत्तीस तत्त्वे ही हरीची, चैतन्याची नामाची उपाधी आहे. पण *''उपाधीमाजी गुप्त। चैतन्य जे सर्वगत। ते तत्त्वज्ञ संत। स्वीकारिती.''* म्हणजे संत आणि ज्ञानी लोक हे सर्वगत चैतन्याचाच फक्त स्वीकार करतात. उगाच का त्यांना सर्वत्र चैतन्य दिसते ? त्यांना स्त्री, पुरुष, लहान, थोर असा भेद दिसतच नाही. त्यांना सर्वत्र चैतन्यच - परमात्माच - दिसत असतो. *''नरनारी बाळे। अवघा नारायण''* या श्रीतुकाराममहाराज यांच्या वचनाप्रमाणे त्यांची अवस्था झालेली असते.

(आपण म्हणत असतो की अमक्या तमक्या शास्त्रज्ञाने, तत्त्वज्ञाने अमुक अमुक शोध लावला. पण) मनुष्य शोध लावतो म्हणजे काय करतो हो ? जे आपल्याला परमेश्वराने उपलब्ध करून दिले आहे त्याचाच उपयोग तो करतो ना ? का तो नवीन काही निर्माण करतो ? अहो, शक्ती आहेच; फक्त गरजेनुरूप तिचे स्वरूप बदलते इतकेच. Energy can neither be created nor destroyed but can be converted into other forms. हे शास्त्र काही वेगळे सांगत का ? हे अध्यात्मच आहे ना ?

ही पंचमहाभूते ही त्या महद्भूतापुढे काय हो ? क:पदार्थ. परमात्म्याच्या सत्तेने सारे काही चालते. जे एकतत्त्व नाम, चैतन्य, सर्वत्र वारेमाप पसरलेले आहे त्याची ही सत्ता आहे. संतमहात्म्यांचे हातून जे काही चमत्कार घडतात, ते चमत्कार ते करीत नाहीत; ते या चैतन्याच्या सत्तेमुळेच होतात. असे जे चैतन्य - नाम - आहे त्याची शक्ती काय आहे ? ती शक्ती आपल्या कल्पनेबाहेरची आहे. त्याच्या शक्तीपुढे मनाची शक्ती किती हो ? ते एक चैतन्यच - नामच - या मनाला घट्ट पकडू शकते. *''एकतत्त्वी नाम दृढ धरी मना''* या चरणात ज्ञानेश्वरमहाराज काही मनाला विनंती करीत नाही आहेत, याची आता आपल्याला कल्पना आली असेल. म्हणून आमचे मन नेमात लागत नाही, ही तक्रार लंगडी आहे. या एकतत्त्व नामाचे साधन साधले असता सर्वत्र चैतन्य अनुभवाला येते व मग त्या जीवाला द्वैताचे बंधन रहातच नाही. सर्वत्र अद्वैतच कसे आहे याचा अनुभव त्याला येतो. *''एक तत्त्व नाम साधिती साधन। द्वैताचे बंधन न बाधिजे ''*असे हरिपाठात ज्ञानेश्वरमाऊली हेच सांगते. या नामासारखे तत्त्व शोधूनही सापडणार नाही. त्यामुळे नाम सोडून बाकीच्या मार्गाने जाणे हा केवळ वेळेचा अपव्यय ठरणार आहे. *''नामापरते तत्व नाही रे अन्यथा। वाया आणिका पंथा जाशी झणी.''* म्हणून या नाम तत्त्वाचेच महत्त्व जगामध्ये आहे असे आमचे मामा *''गोविंद म्हणे नाम तत्त्व। जगी त्याचेच महत्त्व''* या चरणाद्वारे सांगत आहेत.

ज्ञानेश्वरमहाराज पुढील कडव्यात सांगतात *''तैसे नोहे नाम सर्व मार्गा वरिष्ठ। तेथे काही कष्ट न लगती.''* सर्व मार्गात नामभक्तिपंथ हा सर्वश्रेष्ठ आहे; ते नाम घेताना कोणतेही कष्ट पडत नाहीत. *''ओठ कंठ हाले नही जिव्हा ना करे काम। राम हमारा जप करे हम बैठे आराम,''* असा तो जप आहे. अहो, नुसते स्वस्थ बसायचे आहे. मग कष्ट आहेत का सांगा. *''मुखी नाम उच्चारिता कष्ट नाही''* हे समर्थवचन येथे लक्षात घेण्याजोगे आहे.

पुढील कडव्यात ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात *''अजपा जपणे उलट प्राणाचा।*

*तेथेही मनाचा निर्धारु असे.''* प्राणाचा उलट साधणे हाच अजपा जप आहे. संतांच्या वाङ्मयात 'प्राण' हा शब्द वेगवेगळ्या अर्थाने येतो. तो कोठे कसा आला हे पाहून त्याचा अर्थ करावा लागतो. या ठिकाणी ज्ञानेश्वरमहाराजांनी जो प्राण शब्द वापरला आहे तो श्वासाला उद्देशून वापरला आहे. श्वास - जीवन - हे ऊर्ध्वगामी होणे हाच तो प्राणाचा उलट आहे. तो कसा साधणार ? *''नासिकेचे वारे कोंडोनिया प्राणे। उफराटे जाणे ऊर्ध्वपंथे,''* हे नामदेवमहाराजांचे वचन काय सुचवीत आहे? श्वास खाली सोडला असता तो सामान्यत: १८ ते २० अंगुळे खाली येतो. तो कमीत कमी अंगुळे खाली आला पाहिजे. तो जेवढा कमीत कमी खाली येईल तेवढा अनुभव येत जातो. *''सर्वसाधारण अठरा ते वीस। अंगुळे निश्वास गति वाहे॥ पंधरा अंगुळे निश्वास वहाता। तरी ये स्थिरता सहजेची॥ द्वादश अंगुळे साधनी निश्वास। समता चित्तास प्राप्त होय॥ एकादश अंगुळे जरी होय वहाती। तरी काव्यस्फूर्ती आत्मयाची॥ दशम अंगुळे निश्वास वहाता। अक्षरे देखता दृष्टीपुढे॥ नवांगुळापासूनी साधी अष्ट सिद्धी। असे त्याचा अवधी द्वयांगुळी॥ एकची अंगुळ वहाता निश्वास। होय नादघोष सुस्वरेसी॥ जरी होय बंद ऐसा हा निश्वास। दरवळे सुवास चहू ठायी॥ ऊर्ध्वमुख होता देखे साक्षात्कार। दासराम स्थिर अलक्ष्यातु.''*

असे होण्यासाठी श्वास जोरात खेचून भागेल का ? आपण श्वास जोरात खेचला तर श्वास आत जाऊन फुफ्फुसे गच्च भरतील; पण तो श्वास - जीवन - ऊर्ध्वगामी होणार नाही. जीवन हे ऊर्ध्वगामी होण्यासाठी जीवन हे शुद्ध आकाशरूप होणे गरजेचे आहे. याकरिता साधन होणे आवश्यक आहे. म्हणजे एकवीस हजार सहाशे इतकी जी श्वासोच्छ्वासाची नित्य सहजक्रिया होते तिचे अखंड अनुसंधान ठेवावयास हवे. त्यामध्ये असणारे नाम साधणे हेच श्रेष्ठ साधन आहे. हाच तो अजपा जप आहे. *''एकवीस सहस्र सहाशे जपा। जपोनी गेलीसे अजपा,''* असे समर्थ रामदास सांगतात. *''अजपाजपाचेनी छंदे। अनुहताचेनी नादे। सत्रावीचे निज छंदे। स्वरूप देखावे॥ अजपाजपाचे आसनी बैसावे। मन मुरडोनी स्वरूपी लावावे। गोल्हाट मंडळ भेदोनी जावे। समाधि सुखा कारणे,''* या ज्ञानदेव तेहत्तिशीतील ओव्या अजपाजपाचा अनुभव सांगणाऱ्या आहेत. या अजपाजपाचे योगाने शरीराला कोणताही त्रास न होता बाह्य श्वसनाचा योग्य प्रमाणात निरोध साधतो व चित्ताची एकाग्रता आणि दृष्टीची तादात्म्यता होऊन, हृदयात वायूची घर्षणक्रिया आपोआप होते. हृदयात वायूची घासणी झाली की ओंकाराचा वन्ही प्रगट होतो. या वन्हीच्या आचेने उपाधिभूत जीवनातील

- श्वासातील - पृथ्वी, आप, तेज व वायू ही तत्त्वे बाजूला होतात. ओंकारवन्हीने जीवनाची वाफ होऊन जे शुद्ध आकाशरूप जीवन रहाते, ते ऊर्ध्वगामी होते आणि मग परमार्थातील श्रेष्ठतर श्रेष्ठतम अनुभव साधकाला प्राप्त होतात.

ज्ञानेश्वरमहाराज शेवटच्या कडव्यात सांगतात *''ज्ञानदेवा जिणे नामेवीण व्यर्थ। रामकृष्णी पंथ क्रमियेला.''* रामकृष्ण या जीवनाचे गतीत - श्वासोच्छ्वासात - नाम असल्याने, त्या नामाच्या अनुसंधानाशिवाय श्वास, फुकट घालविणे हे व्यर्थ आहे. *''तीन भुवन और चौदा लोक। एक श्वासका मोल। तुलसी कहे राम भजन बीन। वृथा श्वास मत खोल.''* येथे तुलसीदास सांगतात की रामनामाशिवाय श्वास फुकट घालवू नका. अशा प्रकारे रामकृष्णी पंथाचे आक्रमण होणे हे महत्त्वाचे आहे. तसे झाल्यावर परमार्थातील इष्ट ते साध्य होणार आहे.

(२४)

जप तप कर्म क्रिया नेम धर्म। सर्वां घटी राम भाव शुद्ध ॥१॥
न संडी रे भावो टाकी रे संदेहो। रामकृष्णी टाहो नित्य फोडी ॥२॥
जात वित्त गोत कुळशील मात। भजे का त्वरित भावनायुक्त ॥३॥
ज्ञानदेवा ध्यानी रामकृष्ण मनी। वैकुंठभुवनी घर केले ॥४॥

सर्वांघटी राम हाच शुद्ध भाव असून, त्याला धरूनच जपतपादी क्रिया आहेत. जप, तप, कर्म, क्रिया, नेम, धर्म या सर्व गोष्टी जर सर्वांघटी एकच राम - आत्मा - कसा आहे, हे जाणून घडल्या तर त्या गोष्टींना अर्थ प्राप्त होतो.

''आम्ही जप करतो'' असे आपण म्हणतो. पण जप कोण करते हो ? तुम्ही म्हणाल ''आमची वाणी जप करते.'' मग प्रश्न असा, मुक्या माणसाने जप कसा करावयाचा ? का त्याला जपाचा अधिकार नाही ? मग *''सकळांसी येथे आहे अधिकार''* असे म्हणता येईल का ? खरे म्हणजे जप कोण करते हे माहीत नसते. बरं, कोणाचा जप करता ? त्याची काही माहिती आहे का ? अहो, विष्णू सर्वांतरस्थ आहे (त्याचा जप करावयाचा असतो.) पण त्या विष्णूची ओळख नसते. मग जप करून काय उपयोग ? तो जप हा ''विष्णुवीण'' की हो ! बरं, जप म्हणजे तरी काय हे तरी माहीत आहे काय ? संतमहात्म्यांना ज्या नामाचा जप अपेक्षित आहे तो जप. *''राम राम सब कुछ कहे ठक ठाकुर और चोर। जिस नामसे ध्रुव प्रल्हाद तरे वो नाम है कुछ और.''* ज्या नामाने ध्रुव, प्रल्हाद तरले, ते नाम आम्ही समजतो त्या नामापेक्षा वेगळे आहे. ज्या नामाबद्दल *''नाम परब्रह्म वेदार्थे''* असे ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, ते नाम आपल्याला माहीत आहे का ? माहीत असेल तर फारच चांगले. परमार्थात भगवंताचे नाम व त्याचे रूप भिन्न नाहीतच. परमार्थात रामाचा जप करून रामालाच रामाचीच प्राप्ती होते. 'चैतन्याने चैतन्याचे द्वारा चैतन्याशी तादात्म्य पावून चैतन्याची अनुभूती घेणे हाच निखळ परमार्थ आहे.' इथे शरीर कुठे आडवे येतेय का ? आपलीही जी इंद्रिये आहेत ती बहिर्मुख असल्याने ती आत्मसाक्षात्काराचे दृष्टीने कुचकामी आहेत. या डोळ्याला परमात्मा दिसत नाही. हे कान आतला नाद घेऊ शकत नाहीत. ही वाणी ''चैतन्य निजधाम'' अशा नामाचा उच्चार करू शकत नाही. हा सर्व विषय आपण मागे[1] सविस्तरपणे पाहिलेला आहे. परमार्थात नाद

१. मागे हरिपाठ अभंग १७, १५ चे स्पष्टीकरण पहा. (सं.टी.)

हा नादानेच घ्यावयाचा असतो. तो नाद नादाने घेण्याचा नाद आपणाला लागला पाहिजे. स्वाद हा स्वादानेच घ्यावयाचा असतो. आत काही 'रस ' आहे म्हणूनच बाहेर काही रस आहे. हा जो आतला आनंद आहे तो आनंदानेच घ्यायचा असतो. *''जो नादे ऐकिजता नादु । स्वादे चाखिजता स्वादु । जो भोगितसे आनंदु । आनंदेची,''* हे ज्ञानेश्वरवचन हेच स्पष्ट करते. मग शरीराला काही महत्त्व आहे की नाही ? जरूर महत्त्व आहे. कारण शरीरात तो आत्मा असेतोवरच आत्मसाक्षात्कार माणसाला होऊ शकतो. शरीर हे आत्मसाक्षात्कारासाठी पूरक आहे. चैतन्याने चैतन्याचे द्वारा चैतन्याशी तादात्म्य पावून चैतन्याची अनुभूती घ्यावयाची असल्याने, प्रत्यक्ष आत्मसाक्षात्काराच्या प्रक्रियेत शरीराचा सहभाग नाही; शरीर ही आत्मसाक्षात्काराची प्रयोगशाळा आहे. आत्मसाक्षात्कार ''देहात'' होतो ''देहाने'' नाही. समजा आम्हाला नागमणी मिळवावयाचा आहे. तो नागाला ठार करून मिळविता येत नाही; कारण नाग मारला असता तो मणी विरघळतो म्हणे. मग काय करायचे ? त्या नागाला पुंगी वाजवून खिळवून ठेवावयाचे व मग हळूच तो नागमणी मिळवावयाचा तसेच येथे आहे. शरीर असताना आणि शरीरात आत्मा असताना देहभाव गेला की झाले ! आत्मसाक्षात्कार निश्चित आहे. म्हणून देहावर राहून देहाच्या अनुषंगाने केलेला परमार्थ हा परमार्थ आहे का, हा मोठा प्रश्न आहे. देहावर राहून आम्ही जो जप करतो तो जप आहे का ? नाही. देहावर राहून कीर्तन केले तरी त्याचा उपयोग नाही. जप करणारा कोण आहे हे आम्हाला माहीत नाही, जप कोणाचा करतो त्याची ओळख नाही, जप म्हणजे नेमके काय आहे हे माहीत नाही, मग आम्ही परमार्थात काय रडणार, सांगा. हा ''नामरूप'' भगवान राम चराचरात कसा भरून राहिला आहे याचे ज्ञान व्हावयास नको काय ? *''घट घट बीचमे राम रमैया । झूठा पंचरंग खोल ॥ घुंगटका पट खोल .''* अज्ञानाचा घुंगट - पडदा - दूर झाल्याशिवाय रामाचा साक्षात्कार होणार नाही. व त्याशिवाय सूर्यप्रकाशक सहस्ररश्मी असणारा, सर्व घटांत - देहांत - आणि अदेहांत असणारा एकच राम अनुभूतीला येणार नाही. या आत्मारामाचे ज्ञान नसताना हा जप करून काही उपयोग होईल का ?

आता तप म्हणजे काय आहे ? जप म्हणजेच तप आहे. *''पांडुरंग नामजप । हेचि माझे महातप,''* ही संत जनाबाईची उक्ती हेच स्पष्ट करते. साहजिकच तप हेसुद्धा सर्वांघटी असणाऱ्या रामाला - चैतन्याला - धरूनच होणे आवश्यक आहे.

कर्म हेसुद्धा घटाघटात असणाऱ्या रामाला धरूनच व्हायला पाहिजे. आता,

कर्म म्हणजे नेमके काय हो ? *''कर्मसु अमृतम्''* असे उपनिषदे सांगतात. जी ''अमृतधारा'', म्हणजे श्वसनक्रिया आपल्या शरीरात वाहते आहे, ती म्हणजे कर्म. *''प्रेम अमृताची धार। वाहे देवाचे समोर.''* ही प्रेमामृताची धार देवाचे समोर वहाते आहे. ही जी धार वहाते आहे हे कर्म कोण करते ? ''आत्माची कर्मकर्ता''. प्राणाच्या धक्क्यावर श्वसनप्रक्रिया - श्वसनाचा - दांडा हलतो. पण आपल्याला वाटते ही श्वसनक्रिया ही देहानेच चालते आहे. पण तसे नाही. माणूस झोपल्यावर शरीराकडून कोणतीही क्रिया होत नसते; तरी श्वासोच्छ्वास हे कर्म चालत असते. श्वसन हे सहजगत्या होत असलेले कर्म असल्याने ते कर्म असल्याचे आपणास जाणवत नाही. पण श्वासात अडथळा निर्माण झाला की मग समजते की ते कर्म कसे आहे !

नाही तरी आपण जे बाह्यत: कर्म म्हणून करतो; ते तरी कोण करते? शरीराची हालचाल कोणाच्या सत्तेने होते ? *''चाले हे शरीर कोणाचिये सत्ते। कोण बोलविते हरीविण॥ देखवी ऐकवी एक नारायण,''* ही तुकोक्ती काय सांगते आहे ? खरे म्हणजे हे सारे विश्व त्या परमात्म्याच्या सत्तेने चलनवलन करते आहे आणि आम्ही म्हणतो ''हे मी केले, ते मी केले''. या म्हणण्याला काही अर्थ आहे काय? राम - नारायण - कर्ता आहे; निंबरगीकरमहाराज कर्ते आहेत. *''कर्ता करविता देता देवविता। नेता नेवविता तोची आहे.''* अशा स्थितीत *''मी कर्ता ऐसे म्हणसी। तेणे तू कष्टी होशी। राम कर्ता म्हणता पावसी। यश कीर्ति प्रताप,''* ही समर्थांची ओवी आपणास अंतर्मुख करणारी आहे. कर्माचा खरा कर्ता कळला की यश, कीर्ती प्राप्त होणार आहे. कर्ता जाणून जर कर्म घडत असेल तर ते कर्म सर्वांघटी असणाऱ्या रामाला धरूनच घडेल की नाही ? ''राम कर्ता'' असे गोंदवलेकरमहाराज म्हणायचे त्यातले हेच वर्म आहे. ''राम कर्ता'' ही परमार्थातील पहिली पायरी आहे असे श्रीब्रह्मचैतन्यमहाराज सांगायचे. जेथे मी एक कोणी **"X Y Z"** आहे याची आठवणही नाही त्याठिकाणी कर्तेपणाची भावना उरेल का ? आणि कर्तेपणाची भावना नसताना जे कर्म होते, तेच नैष्कर्म्य आहे. कर्म न करणे म्हणजे नैष्कर्म्य नव्हे. *''अगा करितेनवीण कर्म। तेचि ते निष्कर्म''* असे ज्ञानेश्वर माऊली सांगते. जनक राजा आपली विहित कर्मे करून मोक्षसुख मिळविता झाला ते असेच. *''देख पा जनकादिक। कर्मजात अशेख। न संडिता मोक्षसुख। पावते जहाले,''* असेच ज्ञानेश्वरीत ज्ञानेश्वरमहाराज सांगत आहेत. ज्याच्या अंत:करणात कर्माचा अहंकार नाही अशा महात्म्याला संसार बाधू शकत नाही.

कर्म करण्यातले एक वैशिष्ट्य असे आहे की माणसाने कर्म करीत रहायचे

पण त्याचे फळांची आशा धरावयाची नाही. फलाशायुक्त केलेले जे कर्म असते ते लाभदायी असत नाही, पण फलाशारहित होऊन केलेली आवश्यक कर्तव्ये ही माणसाला निःसंशयपणे मोक्षपदाला नेतात. *"कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन। मा कर्मफलहेतुर्भूर्मा ते संगोऽस्त्वकर्मणि,"* हे गीतावचन हेच सांगत आहे. याकरिता निर्हेतुक सत्क्रिया आचरली पाहिजे. कोणतेही कर्म म्हटले की तेथे कर्ता व क्रिया हे आलेच. आत्मा - नारायण - राम - कर्ता आहे हे जाणून, फळाची इच्छा न धरता होणारे कर्म हे महत्त्वाचे. आपण अनेकदा जे कर्म करतो ते *"शांत्यर्थं पुष्ट्यर्थं"* असा संकल्प सोडून असते. हे कर्म ही क्रिया निर्हेतुक आहे का ? या जगात वारे हे एकमेव सहज आहे, निर्हेतुक आहे; त्याची सहज होणारी जी क्रिया आहे तेवढीच फक्त सत्क्रिया आहे. म्हणजे सत्स्वरूपाला दाखविणारी आहे. त्याची सत्क्रिया म्हणजे नेमके काय हे समजून घ्यायला पाहिजे. ही क्रिया संतमहात्मे आपल्या ठिकाणी उमटवतात, ठसवितात, आणि दाखवितात. संतांनी सांगितलेली ती क्रिया सतत करीत रहाणे हे आपले काम आहे. सगळ्या असत्क्रिया टाकून ही सत्क्रिया भक्तीने आचरणे, हाच तो सत्त्वगुण, असे सांगताना समर्थ रामदास दासबोधात म्हणतात *"सत्क्रिया आचरावी। असत्क्रिया त्यागावी। वाट भक्तीची धरावी। तो सत्त्वगुण."* सत्क्रियेचे आचरण हेच ते साधन आहे. हे साधन जो करीत नाही, ज्याला वैराग्य काय आहे हे माहीत नाही, ज्याला भजनाची आवड नाही, जो नुसत्या ब्रह्मज्ञानाच्या गोष्टी बोलतोय, अशा माणसाला समर्थ रामदास पढतमूर्ख म्हणतात :- *"नाही भक्तीचे साधन। नाही वैराग्य ना भजन। क्रियेवीण बोले ब्रह्मज्ञान। तो येक पढतमूर्ख."*

मग साधक कोण ? आमच्यासारखा पाच मिनिटे, तीन मिनिटे, दोन मिनिटे डोळे मिटणारा माणूस साधक असेल काय ? नाही. तर ज्याने असत्क्रिया सोडून सत्क्रियाच आचरली आहे, ज्याला स्वरूपाचा साक्षात्कार झाला आहे, तो साधक असल्याचे समर्थ रामदास *"असत्क्रिया ते सोडली। आणि सत्क्रिया ते वाढविली। स्वरूपस्थिती बळावली। या नाव साधक"* या ओवीत स्पष्ट करतात.

सत् स्वरूपाचे - आत्मस्वरूपाचे - अनुसंधान सतत रहाणे हाच स्वधर्म, असे सांगताना समर्थ म्हणतात, *"सकळ धर्मामध्ये धर्म। स्वरूपी रहाणे हा स्वधर्म॥"* जो या स्वधर्माचे आचरण करतो त्याला मोक्ष मिळतो असे ज्ञानेश्वरमहाराज सांगतात, *"देखे अनुक्रमाधारे। स्वधर्मु जो आचरे। तो मोक्ष तेणे व्यापारे। निश्चित पावे."* हा जो स्वधर्म आहे तोच नित्ययज्ञ आहे. त्याचे आचरण केले असता तेथे पापाचा प्रवेश

होत नाही. पण जर का एकदा याचे आचरण सुटले व कुकर्माकडे प्रवृत्ती वाढली तर मात्र परत संसारबंध प्राप्त होतो असे ज्ञानेश्वरमहाराज सांगतात :- *''हा निजधर्म जै सांडे। आणि कुकर्मी रती घडे। तैची बंधु पडे। सांसारिक.''*

अशा प्रकारे जप, तप, कर्म, क्रिया, नेम, धर्म या सर्व क्रिया या सर्वगत असलेल्या चैतन्याला - रामाला - धरूनच असल्या पाहिजेत.

पुढील कडव्यात ज्ञानेश्वरमहाराज सांगतात :- *'' न संडी रे भावो टाकी रे संदेहो। रामकृष्णी टाहो नित्य फोडी.''* संदेह टाकणे म्हणजेच भाव धरणे आणि ते साध्य होण्यासाठी रामकृष्ण या जीवनाचे गतीचे ठिकाणी नित्य टाहो फोडला पाहिजे.

ज्ञानेश्वरमहाराज पुढील कडव्यात सांगतात, *''जात वित्त गोत कुळशील मात। भजे का त्वरित भावनायुक्त.''* आमचे मामा म्हणायचे की जेथे संध्याकाळी आरतीचे वेळी घरातील सगळी माणसे देवापुढे हात जोडून उभी आहेत असे घर जगाला भारी होईल. मग समजा जातच्या जात, जमातच्या जमात ही भावनायुक्त अंत:करणाने जर भगवंताचे भजन करेल तर काय निर्माण होईल, असा प्रश्न आहे.

शेवटच्या कडव्यात ज्ञानेश्वरमहाराज सांगतात :- *''ज्ञानदेवा ध्यानी रामकृष्ण मनी। तेणे वैकुंठभुवनी घर केले.''* ज्याच्या ध्यानामनाचा विषय रामकृष्ण - रामकृष्ण ही जीवनाची गति - झाला, त्याचे घर मृत्युलोकात नसते. तर त्याचे घर वैकुंठभुवनात असते; तेथेच त्याचे अखंड वास्तव्य असते.

(२५)

जाणीव नेणीव भगवंती नाही। हरि उच्चारणी पाही मोक्ष सदा ॥१॥
नारायण हरी उच्चार नामाचा। तेथे कळिकाळाचा रीघ नाही ॥२॥
तेथील प्रमाण नेणवे वेदांसी। ते जीव जंतूसी केवी कळे ॥३॥
ज्ञानदेवा फळ नारायणपाठ। सर्वत्र वैकुंठ केले असे ॥४॥

भगवंताच्या स्वरूपाची अनुभूती एकदा का जीवाला आली की तेथे जाणीव-नेणीव रहातच नाही. आत्मानुभव घेताना ज्ञान आणि अज्ञान हे दोन्ही बाजूला ठेवावे लागतात. ज्ञान-अज्ञान, पाप-पुण्य, स्वर्ग-नरक ही सारी द्वंद्वे देहामुळे आहेत. निखळ चैतन्याचा संबंध आला की तेथे कोणत्याही प्रकारचे द्वंद्व नाही. जसे दिवस-रात्र हे द्वंद्व पृथ्वीवर रहाणाऱ्या आपणाला आहे. सूर्यलोकात दिवसरात्र असते का ? पृथ्वीच्या परिभ्रमणामुळे आपण दिवस-रात्र अनुभवतो; त्याप्रमाणे जीवांचे परिभ्रमणाने जीव हा भ्रांतीने सम-विषम, द्वंद्वात्मक स्थिती अनुभवतो. आपले - जीवाचे - जर परमात्म्याशी तादात्म्य झाले किंवा त्याचे नामाशी तादात्म्य झाले तर तेथे जाणीव-नेणीव या दोन्हीही शिल्लक रहात नाहीत. 'जाणीव-नेणीवरहित जीवाचे भगवंताच्या नामाच्या सदा उच्चाराशी होणारे तादात्म्य म्हणजेच ''मोक्ष'' आहे.'

जीव जाणीवेमध्ये आला की त्याला आत्मसाक्षात्कार होत नाही. म्हणून जाणीवेचे ओझे टाकून द्यायला हवे. *''जाणीव शहाणीव ओझे सांडूनिया दोनी। आपण वस्तीकर वर्ततसे संसारी॥ धन्य जगी तोचि एक हरिरंगी नाचे। रामकृष्ण वासुदेव सदा स्मरे वाचे''* या शब्दांत एकनाथमहाराज तेच सांगत आहेत. जाणीव आणि तिचे पाठोपाठ येणारी शाणीव, शहाणपण हे दोन्ही टाकून जो सदा नामाचे ठिकाणी सदा रंगून गेला आहे, तोच या जगात धन्यता मिळवितो. देहाच्या अनुषंगाने होणारी जाणीव आणि नेणीव हे दोन्ही आत्मसाक्षात्काराचेच अनुभूतीने नाहीसे होणार आहेत. आत्मसाक्षात्काराच्या योगाने तो जीव ब्रह्मरूपच होतो. देहाच्या अनुषंगाने येणारी जाणीव-नेणीव नष्ट झाल्यावर, आपल्या आत जे चैतन्य आहे तेच सर्वत्र कसे पसरलेले आहे याची जाणीव त्या जीवाला होते. मग त्याच्या दृष्टीला सृष्टी प्रत्ययाला येतच नाही तर सर्वत्र चैतन्यच अनुभवाला येते. जीव ब्रह्म होऊन ब्रह्माशीच व्यवहार करीत असतो असा अनुभव केशवस्वामी पुढील पद्यात व्यक्त करतात :- *''स्वयं ब्रह्म जो आपणची*

*झाला। देव मस्तकी वंदिती त्याला। ज्याच्या दृष्टीसी सृष्टी नाही। देही असोनी पूर्ण विदेही॥ जेथे जाणीव नेणीव नाही। तेथे काहीच उरले नाही॥ ब्रह्म होऊनी ब्रह्मीच खेळे। केशव त्याच्या चरणी लोळे.''* अशा ब्रह्मरूप महात्म्याचे सारे व्यवहार ब्रह्माबरोबर - देवाबरोबर - होतात. *''देव खाते देव पिते। देवावरी मी निजते॥ देव देते देव घेते। देवासवे व्यवहारिते॥ देव येथे देव तेथे। देवाविण नाही रिते॥ जनी म्हणे विठाबाई। भरुनी उरले अंतरबाही,''* ही जी जनाबाईंची अनुभूती आहे, तिलाच केशवस्वामी म्हणतात, *''ब्रह्म होऊनी ब्रह्मीच खेळे,''* आणि असा जो महात्मा असतो, त्याला आत्मज्ञानी - ब्रह्मज्ञानी - म्हणतात. *''मी माझे स्मरण नाही। विश्वी ईश्वर एकचि पाही॥ दास म्हणे ऐसा पाही। तोचि जाणा आत्मज्ञानी''* येथे श्रीब्रह्मचैतन्य-महाराज हेच स्पष्ट करीत आहेत.

आत्मज्ञान्याची अवस्था प्राप्त होण्यासाठी गुरुकृपेची आवश्यकता आहे. गुरुकृपा झाल्यावर ही सारी सृष्टी ब्रह्मरूप दिसते, असे *''गुरुकृपा झाल्यावरी। ब्रह्मरूप सृष्टी सारी''*या चरणात तुकाराममहाराज सांगतात :- गुरूंनी शिष्याला आपला डोळा - दृष्टी - दिली तर शिष्याला डोळ्यात परमात्मा दिसतो असे शिवदिनी केसरी सांगतात. ते म्हणतात *''देऊनी आपुला डोळा। डोळा दाखविले घननीळा॥ देऊनी आपुली दृष्टी। चिन्मय केली अवघी सृष्टी.''* हा डोळा म्हणजे ''डोळियाचा डोळा'' आहे, आणि त्यातच परमात्मा साक्षात्काराला येतो. हा ''डोळा'' कोणता हे मागे[१] आपण पाहिले आहे. समजा ''अ'' ''ब''ला भेटला. त्यावेळी ''अ'' हा ''ब'' चे डोळ्यांत पहातो आणि ''ब'' हा ''अ''चे डोळ्यांत पहातो. मग ''अ'' ला ''ब'' आणि ''ब'' ला ''अ'' भेटल्याची जाणीव होते. आता ''अ''चे डोळे हे ''ब''चे डोळेच पहातात काय ? का आणखी काही पहातात असा प्रश्न आहे. जर आपण डोळेच पहात असू, तर एखाद्या मृत व्यक्तीच्या डोळ्यांत पाहिल्यास त्याला भेटल्याची जाणीव होते का ? होत नाही. डोळा डोळ्याला पहात नाही. डोळा आत्म्यालाही पहात नाही. खरे म्हणजे आत्माच आत्म्याला पहात असतो. *''डोळा डोळ्यासी न पाहे। आत्मा आत्मरूप पाहे.''* येथे द्रष्टा व दृश्य हे वेगळे नाहीतच मुळी. पण ते ज्ञान आपणाला नसते. विश्व म्हणजे चैतन्याचा पसारा आहे, चिद्विलास आहे. म्हणून आत्मज्ञान्याला सर्वत्र आत्माच दिसतो. त्याचे नामाच्या उच्चाराशी तादात्म्य झालेले असते. त्याच्या ठिकाणी जाणीव-नेणीव नसतेच. तीच मोक्ष-अवस्था होय. हे महात्मे जिवंतपणीच मोक्ष प्राप्त करून घेतात.

---

१. हरिपाठ अभंग १५ खालील स्पष्टीकरण पहा. (सं.टी).

त्यांना मोक्ष ही काही अवघड गोष्ट नाही. *''मोक्षाचे तो आम्हा नाही अवघड। तो असे उघड गाठोडीसी,''* अशी तुकोक्ती आहे.

हा जो मोक्ष आहे तो कसा प्राप्त होतो ? *''मोक्ष नव्हे स्नाने। मोक्ष नव्हे दाने। तपतीर्थाटने। मोक्ष नव्हे.''* स्नान, दान, इत्यादी करून मोक्ष प्राप्त होत नाही. माणसाला ''सत्य ज्ञान'' प्राप्त झाले तर त्याला मोक्ष मिळतो, असे *''सत्य ज्ञान येता हाती। मग जीवा मोक्षप्राप्ती''* या चरणात मामांनी सांगितले आहे. खरे म्हणजे जीवाला जेव्हा सद्गुरूचा अनुग्रह प्राप्त होतो तेव्हा त्याला सत्य ज्ञान होते आणि त्याला मोक्ष प्राप्त होतो. *''जे क्षणी अनुग्रह झाला। तेच क्षणी मोक्ष त्याला''* असे समर्थ रामदास सांगतात. तो जो अनुग्रहाचा क्षण आहे, आणि ज्या क्षणाला जीव मुक्त होतो, तो क्षण तसाच वाढवत रहायचे म्हणजे साधन करायचे. यालाच जप म्हणतात. तोच तो शिवाचा हरिमंत्र आहे. *''हरी हरी हरी मंत्र हा शिवाचा। म्हणती जे वाचा तया मोक्ष.''* म्हणजे शिवाचा हरिमंत्र जे वाचेने जपतात त्यांना मोक्ष मिळतो असे ज्ञानेश्वरमहाराज सांगतात. हा शिवाचा हरिमंत्र म्हणजेच आधारचक्रापासून होणारे स्वधर्माचे आचरण आहे. *''देखे अनुक्रमाधारे। स्वधर्मु जो आचरे। तो मोक्ष तेणे व्यापारे। निश्चित पावे''* असे ज्ञानेश्वरमहाराज सांगतात आणि या नामाच्या उच्चाराने मोक्षाची प्राप्ती होते असा अनुभव सर्वांनी घेतला असे तुकाराममहाराज *''मुखी नाम हाती मोक्ष। ऐशी साक्ष बहुतासी''* या चरणात सांगतात.

पुढील कडव्यात ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, *''नारायण हरी उच्चार नामाचा। तेथे कळिकाळाचा रीघ नाही.''* जेथे कळिकाळाचा रीघ नाही तोच नारायण हरी हा नामोच्चार आहे. उच्चार हा शब्द उत्+चर् या धातूपासून बनला आहे. उत् म्हणजे वर, व चर म्हणजे चालणे. म्हणून नामाचा संबंध ''वरती'' आहे. ऊर्ध्वगामी जीवनात नामाचा उच्चार आहे. तेथे कळिकाळाचा प्रवेश नाही. या नामोच्चाराने संतमहात्म्यांनी काळाचे सार्थक केले. *''काळ सार्थक केला त्यांनी। धरिला मनी विठ्ठल''* हे निळोबारायांचे वचन हेच दर्शविते. म्हणून काळ हा संतमहात्म्यांचा गुलाम झाला, तो त्यांना नमस्कार करू लागला. *''काळ गुलाम सलाम करी। तुकयाघरी राबतो''* असा तुकाराममहाराजांचा अनुभव आहे.

ज्ञानेश्वरमहाराज पुढील कडव्यात सांगत आहेत *''तेथील प्रमाण नेणवे वेदासी। ते जीव जंतुसी केवी कळे.''* जे नाम ऊर्ध्वगामी जीवनात आहे, जे नाम दिक्काल आणि आकाश यांचे अतीत आहे अशा सर्वव्यापी नामाचे, भगवंताचे महत्त्व वेदाला

कळले नाही ते जीवजंतूंना काय कळणार ? *''अठराही भागले सहाही शिणले। चारहि राहिले मौन्य धरूनी''* हे सेनामहाराजांचे म्हणणे व *''वेदासी कानडा श्रुतीसी कानडा। तो असे उघडा पंढरीये''* हे नामदेवमहाराजांचे वचन ही दोन वचने वेदाला, शास्त्राला तो कसा अनाकलनीय आहे हे दाखववावयास पुरेशी आहेत.

ज्ञानेश्वरमहाराज पुढील कडव्यात सांगतात, *''ज्ञानदेवा फळ नारायण पाठ। सर्वत्र वैकुंठ केले असे.''* हरिपाठाचे गोड फळ नारायणपाठ हे आहे. त्यायोगे सर्वत्र वैकुंठ अवतरले. *''नारायण नामे होऊ जीवन्मुक्त। कीर्तनी अनंत गावू गीती.''* म्हणजे नारायणनामाचे कीर्तनाने जीवन्मुक्त होता येते. या नारायणनामामुळे चारी मुक्ती प्राप्त होतात. नारायणनाम हे सारभूत आहे, असे वेदांनी, शास्त्रांनी, श्रुतींनी सांगितले आहे. नारायणनामाच्या योगाने उत्तम असे निजस्थान प्राप्त होते. हा सारा विषय आपण मागे[1] पाहिला आहे. या नामाच्या योगाने संतमहात्म्यांनी ही अवनीच वैकुंठरूप केली. *''तुका म्हणे त्यांनी। केली वैकुंठ मेदिनी,''* असे तुकाराममहाराज सांगतात.

१. हरिपाठ अभंग १९, २२ खालील विवरण पहा. (सं.टी.).

(२६)

एक तत्त्व नाम दृढ धरी मना। हरीसी करुणा येईल तुझी ॥१॥
ते नाम सोपा रे रामकृष्ण गोविंद। वाचेसी सद्‌गद जपे आधी ॥२॥
नामापरते तत्त्व नाही रे अन्यथा। वाया आणिका पंथा जाऊ नको ॥३॥
ज्ञानदेवा मौन जपमाळ अंतरी। धरोनी श्रीहरी जपे सदा ॥४॥

नाम हे एकच महत्त्वाचे तत्त्व आहे आणि माणसाने त्या नामाचा जप करावयास हवा, असे ज्ञानेश्वरमहाराज या अभंगात सांगत आहेत.

भगवंताला दया - करूणा - यावयास हवी. त्यासाठी कोणते साधन करावयास पाहिजे, ते ज्ञानेश्वरमहाराजांनी पहिल्या कडव्यात सांगितले आहे. एकतत्त्व नामाने मनाला घट्ट धरले किंवा मनाने एकतत्त्व नामाला घट्ट केले म्हणजे हरीला आपली करुणा येईल. हे एकतत्त्व नामच अद्‌वैताचे साधन आहे अथवा अद्‌वैताचे साधन हे एकतत्त्वी नाम आहे. *''एकतत्त्व नाम साधिती साधन। द्‌वैताचे बंधन न बाधिजे ''* असे ज्ञानेश्वरमहाराजांनी हरिपाठातच सांगितले आहे. हे एकतत्त्व नाम साधन हेच हरीचे साधन आहे; ते साधले तरच उपयोग; बाकीच्या साधनांनी काही साधणार नाही. *''करा रे बापांनो साधन हरीचे। झणी करणीचे करू नका ''* असे एकनाथमहाराजही सांगतात. हे एकतत्त्व नाम हरी हेच सर्वत्र पसरले आहे असे सर्व शास्त्रांनी सांगितले आहे, असा विचार निवृत्तिनाथमहाराज, *''एकतत्त्व हरी असे पै सर्वत्र। ऐसे सर्व शास्त्र बोलियेले ''* या चरणात व्यक्त करीत आहेत. जरी छत्तीस[1] तत्त्वे असली तरी त्या सर्वांचे मुळाशी हरी हे एकच तत्त्व आहे. एक हरी खरा आहे बाकी सारा वाऊगा पसारा आहे.

हे जे एकतत्त्व नाम सर्वत्र पसरलेले आहे त्याचा अनुभव आम्हास कसा यावा? सद्‌गुरूंची कृपा असल्याशिवाय याचा अनुभव येणार नाही. त्यांनी कृपा केली तरच ते शक्य आहे. कृपा झाली की मग प्रत्यय आल्यावाचून रहात नाही. *''कृपा झाली आता आले प्रत्ययासी। कैसे या मनासी करू दादा ''* हे मुक्ताबाईंचे वचन येथे लक्षात घेण्याजोगे आहे. सद्‌गुरू हे दयासागर आहेत त्यांनी आपल्या अनंत सेवकांच्यामध्ये आमचा समावेश केला. आमचे गुण आणि अवगुण न पहाता त्यांनी कप्प्यातल्या

१. छत्तीस तत्त्वांसाठी हरिपाठ अभंग २३ खाली पहा. (सं.टी.)

कप्प्यातले अंतरीचे सुख आम्हाला दिले. नाहीतर आमची तशी योग्यता आहे का ? आपणास सद्गुरूचे किती महत्त्व वाटते हे ज्याचे त्याने तपासून पहावे. *''गुण दोष याती न विचारी काही। ठाव दिला पायी आपुलिया ''* ही तुकोक्ती व *''दया सागरे हो मला थोर केले। बहू सेवकामाजी ते मेळविले। कृपेने दिले सौख्य ते अंतरीचे। परी भोगणे लागले या देहाचे ''* हा नित्यपाठातील[1] श्लोक, ही दोन वचने हे स्पष्ट करतात.

सद्गुरूंचेपासून काय जाणून घ्यायचे हो ? सद्गुरूंचेपासून हे नाम जाणून घ्यावयाचे आहे. आपण जे नाम समजतो त्या नामात जाणून घेण्यासारखे काय आहे ? ते नाम आपण समजतो तसे नाही, म्हणूनच ते जाणून घ्यावे लागते. *''नामा म्हणे तरी सद्गुरुपासोनी। नाम घ्या जाणोनी ना ना काही ''* असे नामदेवमहाराज सांगत आहेत. अखिल विश्वात जे साधर्म्य तेच ते नाम आहे. ते नाम सर्वत्र आहे म्हणून दृश्य हे दृश्य होते आहे. आपले शरीर क्षेत्र हे छत्तीस तत्त्वांचे बनले आहे. पण हे कशामुळे दृग्गोचर होते आहे तेच ते एकतत्त्वी नाम आहे. या नामाचे साधन साधले असता द्वैताचे बंधन रहातच नाही. अहो, कसे द्वैत राहील ? जे आपल्या आत आहे तेच सर्वत्र भरून राहिले आहे ही अनुभूती आल्यावर द्वैत राहीलच कसे ?

हे जे एकतत्त्वी नाम आहे तेच मनाला घट्ट धरते आणि जे मनाला घट्ट धरते तेच एकतत्त्वी नाम आहे. मन व श्वासोच्छ्वास यांचा निकटचा संबंध आहे. मनाची गती ही श्वसनाचे गतीवर अवलंबून आहे. उदा. मनात राग आला की श्वासोच्छ्वास जोरात चालतो. श्वासोच्छ्वास स्थिर झाला की मन स्थिर होते. आता हे जे नाम आहे ते श्वास आणि उच्छ्वास यांच्या दरम्यान जो संधिकाळ आहे त्यात आहे, त्यात नामाची धारणा आहे. या नामाच्या अभ्यासाने - साधनाने - श्वसनाची गती संथ होते. साहजिकच मन स्थिर होते. मग ''मन लागत नाही'' ही तक्रारच रहात नाही. मग हरीची ओळख होऊन त्याला आमची करुणा आल्यावाचून रहात नाही.

पुढील कडव्यात ज्ञानेश्वरमहाराज सांगतात *''ते नाम सोपा रे रामकृष्ण गोविंद। वाचेसी सद्गद जपे आधी.''* येथे ''ते नाम'' का म्हटले आहे तर ते ''हे नाम'' नव्हे म्हणून. ते नाम - जे सोहंमध्ये पालन केले आहे ते नाम - म्हणजे रामकृष्णगोविंद हे सद्गदित वाचेने जपावे. नाम घेताना ''आत'' काहीतरी हलले पाहिजे हो ! तेथे वेठबिगार उपयोगी नाही. मनात काहीतरी प्रेम पाहिजे तरच हे होईल. साधकाने नाम घेणे हे महत्त्वाचे; पण त्याला ते आवडत नाही. विद्यार्थ्याला अभ्यास महत्त्वाचा; परंतु

---

१. नित्यपाठ म्हणजे ''चिन्मय नित्यपाठ'' हा ग्रंथ होय (सं.टी.).

त्याला अभ्यास करणे आवडत नाही. आजारी माणसाने पथ्य करणे हे महत्त्वाचे; पण ते त्याला आवडत नाही. आपल्याला जे आवडत नाही ते महत्त्वाचे आहे असे समजावे व ते सर्वांचे आधी करावे. म्हणून साधकाने साधन, नामस्मरण सर्वांत आधी करावे. *''रामराम स्मरा आधी''* हे तुकया बंधूंचे वचन, *''प्रभाते मनी राम चिंतीत जावा । पुढे वैखरी राम आधी वदावा,''* हे समर्थ रामदासांचे मत, आणि ''श्रीविठ्ठलाचे नाम आधी'' ही ज्ञानेश - उक्ती सांगतात की आरंभालां नाम घ्यावे.

ज्ञानेश्वरमहाराज पुढील कडव्यात म्हणतात *''नामापरते तत्त्व नाही रे अन्यथा। वाया आणिका पंथा जाऊ नको.''* या नामासारखे तत्त्व या जगात शोधूनसुद्धा सापडणार नाही. म्हणून जगामध्ये नामाचे महत्त्व अबाधित आहे. मामांची अमृतवाणी सांगते *''गोविंद म्हणे नामतत्त्व। जगी त्याचेच महत्त्व.''* या नामाशिवाय जे काही उरले ते सर्व वाया आहे. म्हणून हा नाम-पंथ महत्त्वाचा आहे. पंथ अनेक आहेत. परंतु परमात्म्याप्रत नेणारा हा एकमेव नामपंथ आहे म्हणून तो सर्वांपेक्षा श्रेष्ठ आहे. *''पंथ आहेत अनेक। दाविती ना विठ्ठल एक,''* आणि *''नाम भक्तिपंथ सकळा वरिष्ठ । जेथे जीवा कष्ट न पडती॥ दृढ धरी मनी रामनाम कथा। वाया आणिका पंथा जाऊ नको,''* ही मामांची अमृतवचने या दृष्टीने महत्त्वाची आहेत. आमच्या निंबरगीकरमहाराजांनी जे नामसाधन सांगितले त्याला तोड नाही. या नामपंथाने गेले असता दुसऱ्या पंथाची आवडच रहात नाही. *''नारायणपदी राहे कृष्णा। अन्य नावडे पंथ''* हे वचन येथे लक्षात घेण्याजोगे आहे.

पुढील कडव्यात ज्ञानेश्वरमहाराज सांगतात, *''ज्ञानदेवा मौन जपमाळ अंतरी। धरोनी श्रीहरी जपे सदा.''* अंतरात - अंत:करणात - हरिनामाची माला धरून श्रीहरीचा सदा होणारा जप म्हणजेच ते मौन आहे. अंतर्बाह्य असणारे मौन हे महत्त्वाचे. अखंड नामस्मरण हेच खरे मौन आहे. *''अखंड नाम मुखी देख। मौन थोर सर्वाधिक''* असे मामांची अमृतवाणी सांगते. या जगात अनेक व्यसने आहेत त्यामध्ये बोलण्याचे व्यसन हे सर्वांत वाईट आहे, असे आमचे मामा म्हणायचे. आपले तोंडच आपले उरावर बसणार आहे. *''पन्नासा अक्षरे करिसी बरोबरी। शेखी तुझे तोंड तुज वैरी ग्या''* हे ज्ञानेश्वरमहाराजांचे म्हणणे येथे लक्षात घ्यावे.

(२७)

सर्व सुखगोडी साही शास्त्र निवडी। रिकामा अर्धघडी राहू नको ॥१॥
लटिका व्यवहार सर्व हा संसार। वाया येरझार हरिवीण ॥२॥
नाममंत्रजप कोटी जाईल पाप। रामकृष्णी संकल्प धरूनी राहे ॥३॥
निजवृत्ती काढी सर्व माया तोडी। इंद्रिया सवडी लपू नको ॥४॥
तीर्थव्रती भाव धरी रे करुणा। शांतिदया पाहुणा हरि करी ॥५॥
ज्ञानदेवा प्रमाण निवृत्तिदेवी ज्ञान। समाधि संजीवन हरिपाठ ॥६॥

सर्वसुखाची गोडी लागणे ही साही शास्त्रांची निवड आहे व ती प्राप्त होण्यासाठी रिकामा वेळ घालवून चालणार नाही. त्यासाठी प्रयत्नाची गरज आहे. प्रत्येक जीवाला सुखाचीच अपेक्षा असते; त्याला किंचितसुद्धा दुःख नको असते. माणूस संसार करतो तो सुख व्हावे म्हणूनच ना ? पण सुख प्राप्त होते का ? आपल्या अपेक्षेप्रमाणे सुख मिळत नाही, हे निश्चित. माणसाला सुख मिळते पण दुःखाचे मानाने ते फारच थोडे असते. लगेच उठून विजेच्या तारेला हात लावून जीव द्यावा एवढे दुःख नसते पण येथून पुढे १०० वर्षे जगत रहावे एवढे सुखही मिळत नाही. *''सुख पहाता जवापाडे। दुःख पर्वताएवढे''* असे तुकोबांचे मत आहे.

विज्ञानाने एवढे शोध लावलेत. पूर्वीच्या मानाने काहीच शारीरिक श्रम राहिले नाहीत. टी.व्ही, गीझर, इत्यादी सुखाची साधने घरोघर आली आहेत. पण सुख काही माणसाकडे येत नाही. याचे कारण काय याचा विचार नको का करायला ? ऐहिक सुखात खरे सुख नाही; तेथे सुखाचा भास आहे. संसारातील सुख हे *''सुखस्यानंतरं दुःखं दुःखस्यानंतर सुखं''* असे असते. उदाहरणार्थ आपल्याला श्रीखंड आवडते. म्हणून भरपूर श्रीखंड खाल्ले. इकडे जिभेला सुख झाले पण तिकडे पोटात दुखायला लागले. पोटात कळा येऊ लागल्या, लगेच दुःख झाले. अशा प्रकारे आपल्याला जे सुख वाटते तेच पुढे दुःखाला कारणीभूत होते. मग त्या सुखाला सुख म्हणणार का ? *''सुख सुख म्हणता हे दुःख ठाकोनि आले''* हे समर्थांचे वचन सुखाचे स्वरूप सांगत आहे. अहो, आपण सुख सुख म्हणून कवटाळायलो गेलो की दुःखच पुढे उभे रहाते.

''संसार सुखाचा नाही आणि संसारात सुख नाही'' हे समजण्यात सुख

आहे. *''संसार सुखाची कहाणी। ऐकिजेल कवणाचिये श्रवणी। कैची सुखनिद्रा अंथरुणी। इंगळाच्या''* असे ज्ञानेश्वरमहाराज सांगतात. संसार आणि सुख यांचे प्रमाणच व्यस्त आहे. संसारात सुखाची गोष्ट कधी ऐकायला मिळेल का ? संसारात सुखाचा विचारसुद्धा नाही मग सुख तर दुरापास्तच ! हीच गोष्ट *''दुःख बांदवडी आहे हा संसार। सुखाचा विचार नाही कोठे''* या शब्दांत तुकाराममहाराज व्यक्त करतात. संसार हा दुःखाचे कारण आहे; येथे 'विश्रांती' हा शब्दसुद्धा तोंडातून काढायचा नाही. रात्रंदिवस नुसती काळजी. अजिबात स्वस्थता नाही, असे *''संसार दुःखमूळ। चहूकडे इंगळ। विश्रांति नाही कोठे। रात्रंदिवस तळमळ''* या शब्दांत ज्ञानेश्वरमहाराज सांगतात. या संसारात *''कोठे काही कोठे काही। एक आहे एक नाही''* असे अनुभवाला येते. पैसा आहे तर विद्या नाही, विद्या आहे परंतु पैसा नाही, असेच पहावयास मिळते. *''संसारसागरे दुःखं तस्माज्जागृहि जागृहि''* या शब्दांत शंकराचार्य आपणास सावध करीत आहेत. पण आपण सावध होतोय का ?

हे जे ऐहिक सुखदुःख आहे ते सारे प्रारब्धाप्रमाणे मिळते. *''प्रारब्धेची होय सुख। प्रारब्धेची पावे दुःख''* अशी तुकोक्ती आहे. सुखदुःखाचे ढग येतात आणि जातात. *''सुख दुःखाची आभाळे। येती जाती आपुल्या काळे''* असे संत सांगतात. या संसारात 'सर्वसुखी' असा शोधूनही सापडणार नाही. म्हणून 'जगी सर्वसुखी असा कोण आहे ?' असा प्रश्न रामदासस्वामी करतात.

या संसारात आपण ज्याला 'सुख' म्हणतो ते तरी काय आहे हो? दुःख हलके होणे म्हणजे सुख, हे बरोबर आहे ना ? पूर्वीच्या काळची एक गोष्ट आहे. एका माणसाने गुन्हा केला. ४० मणांचे ओझे त्याने डोक्यावर घ्यावे अशी शिक्षा न्यायाधीशाने दिली. शिक्षा ऐकून तो माणूस मटकन् खाली बसला. त्याने गयावया केली. न्यायाधीशाने शिक्षा कमी करून २० मण ओझे उचलायची सवलत दिली. ते ऐकल्यावर त्या माणसाला सुख झाले. आता २० मण हे तरी ओझे नाही का ? आहे की ! पण ४० मणांपेक्षा कमी म्हणून बरे. ४० मण ओझे उचलण्यातील दुःखापेक्षा २० मण ओझे उचलण्यात कमी दुःख आहे इतकेच. आपले सुख हे असे आहे. ते खरे सुख नव्हे.

जी सुखे अन्य साधनांच्या अधीन असतात ती दुःखच असतात किंवा ती दुःखालाच कारणीभूत होतात. याउलट अकृत्रिम, अनादी, स्वसंवेद्य, अनादि-अनंत असे जे आत्मरूप आहे त्यापासून मिळणारे सुख ते खरे सुख आहे. *''यत् सुखं साधनाधीनं तद्दुःखमेव च। अकृत्रिममनाद्यंतं तत् सुखं सात्त्विकं विदुः''* हे सुभाषित

अथवा *''किंबहुना सोये। जीव आत्मयाची लाहे। तेथ जे होये। तया नाम सुख''* हे ज्ञानेश्वरांचे वचन, ही सुख म्हणजे नेमके काय हे स्पष्ट करतात. आत्म्यापासून मिळणारे सुख हेच 'सर्वसुख' आहे. सुखनिधी, सुखसागर असा आत्माराम - राम परमात्मा - हा हृदयात असताना, माणसे मात्र बाहेरील शब्द, स्पर्श, रूप, रस व गंध या विषयांतून मिळणाऱ्या सुखांची अपेक्षा करतात आणि आत्म्याची उपेक्षा करतात. आहे की नाही हे आश्चर्य! संतमहात्म्यांना मात्र या आत्मसुखापुढे विषयसुख तुच्छ वाटत होते. या संतमहात्म्यांनी सुखनिधी, सुखसागर असा परमात्मा अनुभवला. *''सुखाचा सुखनिधी सुखसागर जोडिला''* असे ज्ञानेशवचन सांगते. मला सांगा, बाह्य दृष्टीने तुकाराममहाराजांना किंवा ज्ञानेश्वरमहाराजांना काय सुख होते ? त्यांचेवर बाह्यत: दु:ख आहे असेच दिसत होते. पण त्यांच्या लिखाणात स्वत:च्या दु:खाविषयी एक ओळ तरी सापडते का ? नाही. आश्चर्य आहे की नाही ? संतमहात्म्यांची बुद्धी ही आत्मस्वरूपाचे ठिकाणी स्थिर झालेली असते. त्यांनी आत्मसुखाचा अनुभव घेतलेला असल्याने, त्यांचे अंत:करण सदैव प्रसन्न असते. त्यांचे चित्तातील समाधान कधीच ढळत नाही. त्यामुळे बाह्य संसार-दु:खांचा प्रवेशच त्यांचे ठिकाणी होत नाही. हा भाग ज्ञानेश्वरमहाराजांनी पुढील ओव्यांत सांगितला आहे :- *''देखे अखंडित प्रसन्नता। आथी जेथ चित्ता। तेथ रिगणे नाही समस्ता। संसार दु:खा ॥ तैसे हृदय प्रसन्न होये। तरी दु:ख कैंचे के आहे। तेथ आपैसी बुद्धी राहे। परमात्मरूपी.''*

संतवाङ्मयात 'सर्वसुख' हा शब्द खूपदा येतो. त्या शब्दाचा अर्थ आम्ही समजतो तसा नाही. आपण काय समजतो की जगात जी सुखे म्हणून उपलब्ध आहेत ती सर्व आपणास मिळाली की आपण सर्वसुखी झालो. हा अर्थ येथे नाही. ''सर्व'' शब्दाचा अर्थ 'ब्रह्म' असा आहे. *''सर्वं खल्विदं ब्रह्म''* हे श्रुतिवचन स्पष्ट आहे. आणि या ब्रह्मसुखाची गोडी साही शास्त्रांनी पुरस्कारिली आहे. या 'सर्वसुखाचे' म्हणजे 'ब्रह्मसुखाचे' ठिकाणी संतमहात्मे निमग्न झालेले असतात. त्यांचे रिद्धीसिद्धींचेकडे लक्ष असत नाही. अशा संतमहात्म्यांवर बाह्य सुखदु:खांचा कोणताही परिणाम होत नाही. ते देहावरच नसल्याने देहाच्या अनुषंगाने होणारे सुखदु:ख त्यांचेवर काय परिणाम करणार ? *''सुखी संतोषा न यावे। दु:खी विषादा न भजावे। लाभालाभ न धरावे। मनामाजी''* ही ओवी त्यांनी व्यवहारात आणलेली असते. हे 'ब्रह्मसुख' किंवा 'आत्मसुख' प्राप्त होण्यासाठी देहाचा विसर पडणे हे महत्त्वाचे असते. म्हणूनच तुकाराममहाराज आमच्यासाठी देवाची प्रार्थना करीत आहेत :- *''देवा आता ऐसा*

*करी उपकार। देहाचा विसर पाडी माझा॥ तरीच हा जीव सुख पावे माझा."* देहभाव सर्व गेल्याशिवाय हे "विदेही" सुख प्राप्त होत नाही. *"देहभाव सर्व जाय। तेव्हा विदेही सुख होय"* हे जनाबाईंचे वचन येथे लक्षात घ्यावे. हा देहभाव नाहीसा होण्यासाठी आमच्या निंबरगीकरमहाराजांनी पुरे साधन दिले आहे; त्या साधनाचे बाबतीत आपण अपुरे पडता कामा नये. *"देहभाव जेथे विरे। ऐसे साधन दिले पुरे"* या ज्ञानेश्वरमहाराजांच्या चरणावरून हे स्पष्ट होते. या साधनाचे सतत अभ्यासाने देहभाव आटून जातो, मनाचे उन्मन होते आणि "सर्वसुख" हाताला येते. सर्व संतमहात्म्यांनी या सर्वसुखाचा अनुभव घेतला असे त्यांच्या अभंगांवरून - पदांवरून - कळून येते.

*"सर्वसुखाचे आगर। बाप रखुमादेवीवर"* असे ज्ञानेश्वरमहाराज सांगतात, तर *"सर्वसुखाचे आगर। म्हणे लीला विश्वंभर"* असे विश्वंभरबुवा म्हणतात. जनाबाईंचे शब्द आहेत, *"सर्वसुखाचे आगर। जनी म्हणे शारंगधर." "सर्वसुखाचे आगर। म्हणे नरहरी सोनार"* अशी नोंद नरहरी सोनार करतात. यावरून सर्व संतांना एकच अनुभव आला हे कळून येते.

पुढील कडव्यात ज्ञानेश्वरमहाराज सांगतात, *"लटिका व्यवहार सर्व हा संसार। वाया येरझार हरिवीण."* हरीशिवाय होणारी जीवनाची वाया येरझार हाच लटका संसार आहे. संसार लटका का आहे ? कारण त्याचे पर्यवसान लटक्यात होते म्हणून ! हरीला सोडून होणारी येरझार हरीला धरून झाली की तोच परमार्थ होतोय.

ज्ञानेश्वरमहाराज पुढील कडव्यात म्हणतात, *"नाममंत्र जप कोटी जाईल पाप। रामकृष्णी संकल्प धरूनी राहे."* नाममंत्रजपाने पापाची 'कोटी' म्हणजे पापाचा प्रकार उरत नाही. जप करताना इतर कोणतेही संकल्पविकल्प न आणता, रामकृष्णी संकल्प धरला की झाले. "रामकृष्णी संकल्प" हा परमेश्वराचा आहे. तो आपण धरावयाचा इतकेच.

पुढील कडव्यात ज्ञानेश्वरमहाराज सांगतात *"निजवृत्ती काढी सर्व माया तोडी। इंद्रिया सवडी लपू नको."* राममय वृत्ती झाली असताना साधकाचा अहंकार नाहीसा होतो, शरीरभाव उणा होतो, मग आत्मसुखाची गोडी साधकाला लागते. ही गोष्ट *"राममय वृत्ति झाली आता काय उणे। अहंकार दग्ध झाला स्वात्मसुख घेणे"* या पदात सांगितली आहे. आणि एकदा का जीवाला आत्मसुखाची गोडी लागली की त्याला इंद्रियांचे द्वारे मिळणाऱ्या सुखाचे महत्त्व रहात नाही. त्याच्या वृत्ती दृश्यावरती उठत नाहीत तर चैतन्यावरच उठतात व मग 'निजवृत्ती'च शिल्लक रहाते.

ज्ञानेश्वरमहाराज पुढील कडव्यात म्हणतात *''तीर्थव्रती भाव धरी रे करुणा। शांति दया पाहुणा हरी करी.''* तीर्थगमन, व्रत करताना त्या तीर्थाबद्दल आणि व्रताबद्दल अंत:करणात श्रद्धा असेल तर उपयोग होतो. ते तीर्थगमन, व्रत करून जर दया, क्षमा, शांती हे गुण आपल्या ठायी उतरले तर हरीचा साक्षात्कार झाल्यावाचून रहाणार नाही. *''दया क्षमा शांती। तेथे देवाची वसती''* या संतोक्तीचा अनुभव निश्चितपणे प्राप्त होईल.

शेवटच्या कडव्यात ज्ञानेश्वरमहाराज सांगतात *''ज्ञानदेवा प्रमाण निवृत्तिदेवी ज्ञान। समाधी संजीवन हरिपाठ.''* निवृत्तिदेवी ज्ञान हेच ज्ञानेश्वरमहाराजांना प्रमाणभूत होते. *''वाचा बोलू वेदनीती। करू संती केले ते.''* वेदनीती तोंडाने बोलू पण आचरणात संतांनी काय आणले तेच करू. असे काही तरी पाहिजे तरच काहीतरी हाताला येईल. गुरुवाक्यांवर विश्वास पाहिजे. गुरुवाक्यावर शास्त्रवचन घासून घ्यायचे; शास्त्रावर गुरुवाक्याचा पडताळा घ्यावयाचा नाही. *''गुरुवाक्यावाचूनी शास्त्र। हाती न शिवे''* अशी साधकाची स्थिती हवी.

येथे कोणते ज्ञान ज्ञानेश्वरमहाराजांना अभिप्रेत आहे ? *''समाधि संजीवन हरिपाठ''* येथे समाधि संजीवन या शब्दाचा अर्थ काय ? समाधि-अवस्थेत संजीवनाचा अनुभव म्हणजे समाधि संजीवन आणि तोच तो नित्य, सत्य व मित असा हरिपाठ आहे.

आळंदीत ज्ञानेश्वरमहाराजांची संजीवन समाधी आहे. काही वर्षापूर्वी एक टूम निघाली होती की समाधी बोअर (boar) करून, आतील ज्ञानेश्वरमहाराज होते तरी कसे, हे पहावयाचे. बोअर (boar) करून ज्ञानेश्वरमहाराज दिसतील का ? बोअर (boar) करून फक्त बोअर (bore) होईल. संजीवन स्वरूपात ज्ञानेश्वरमहाराज आजही तेथे आहेत. ते बोअर करून कसे दिसणार, हाच येथे प्रश्न आहे. आळंदीतील समाधिमंदिरात आजसुद्धा हरिपाठ घुमतो आहे. आमच्या चिमडच्या महाराजांना तो हरिपाठ तेथे ऐकावयास आला असे या हरिपाठाचे महत्त्व आहे.

## (२८)

अभंग हरिपाठ असती अठ्ठावीस। रचिले विश्वासे ज्ञानदेवे ॥१॥
नित्यपाठ करी इंद्रायणी तीरी। होय अधिकारी सर्वथा तो ॥२॥
असावे स्वस्थ चित्त एकाग्र मन। उल्हासे करून स्मरण जीवी ॥३॥
अंतकाळी तैसा संकटाचे वेळी। हरी तया सांभाळी अंतर्बाह्य ॥४॥
संतसज्ञनांनी घेतली प्रचीती। आळशी मंदमती केवी तरे ॥५॥
श्रीगुरुनिवृत्ति वचन प्रेमळ। तोषला तात्काळ ज्ञानदेव ॥६॥

हरिपाठातील हा शेवटचा अठ्ठाविसावा अभंग फलश्रुती सांगणारा आहे. काही लोक हरिपाठाचे सत्तावीसच अभंग मानतात. पण ज्ञानेश्वरमहाराजांच्या हरिपाठाचे अभंग अठ्ठावीसच आहेत. *''अभंग हरिपाठ असती अठ्ठावीस,''* असे ज्ञानेश्वरमहाराजांनी स्वत: या अभंगात सांगितले आहे. त्यामुळे अठ्ठाविसावा अभंग कोणता हा प्रश्नच उपस्थित होत नाही. परमात्मा अठ्ठावीस युगे विटेवर उभा आहे. ही युगे कधी सत्तावीस अथवा एकोणतीस होणार नाहीत, हे लक्षात घेण्यासारखे आहे. या संदर्भात *'युगे अठ्ठावीस विटेवरी उभा'* ही नामदेवमहाराजांची विठोबाची आरती, तसेच *''युगे झाली अठ्ठावीस। अजूनी का न म्हणसी बैस,''* हा तुकाराममहाराजांनी पुंडलिकाला केलेला खडा सवाल लक्षात घेण्याजोगा आहे. बाह्यत: पाहिल्यास सूर्याच्या बारा कळा व चंद्राच्या पंधरा कळा आहेत. या सत्तावीस कळांवर व्यवहार चालतो, परमार्थ नाही. परमार्थात चंद्राची सोळावी कळा आहे. सोळा आणि बारा मिळून अठ्ठावीस. म्हणून परमात्मा अठ्ठावीस युगेच उभा आहे व हरिपाठाचे अभंग हेही अठ्ठावीसच आहेत.

चंद्राची सोळावी कला भगवान शंकरांनी आपल्या मस्तकी धारण केली आहे. ही सोळावी कला जर चंद्राच्या पंधरा कळांत मिसळली तर सारे विश्व ब्रह्मरूप होऊन तेथे व्यवहारच राहणार नाही. शंभर नंबरी सोने जर पाहिले तर माणूस वेडा होतो. असे सोने बाजारात येतच नाही. जरा कमी कस असला म्हणजेच व्यवहार होतो. *''बारा सोळा जणी हरीसी नेणती,''* अशी अवस्था असल्याने, त्या रात्रंदिवस फिरत आहेत आणि या जीवनाच्या गतीच्या परिभ्रमणामुळे जीवाचे बाहेर भ्रमण चालू आहे. या बारा-

सोळांचे जर ऐक्य झाले तर अनाहत नाद होतो आणि त्या नादानुसंधानात आत्मसाक्षात्कार होतो असा महीपतींचा अनुभव आहे. *"बारा सोळा जणी गडे गं बारा सोळा जणी। मिळोनी येती गलगा करिती मशी गेल्या घेऊनी,"* या पदात महीपती ज्याला "गलगा" म्हणतात तो चैतन्याचा ध्वनी आहे आणि तो अठ्ठावीस कलांतून प्रगट झाला आहे. या बारा-सोळांचे ऐक्यातून श्रीहरीची अनुभूती आहे, हे स्पष्ट करणारा हा हरिपाठ असल्याने, याचे अभंग अठ्ठावीसच आहेत याबद्दल कोणताही संदेह रहाणार नाही. हे हरिपाठाचे अभंग *"ज्ञानादेव तु कैवल्यम्"* अशा ज्ञानदेवांनी विश्वासाने रचले आहेत. 'विश्वासाने' रचले म्हणजे कुणी रचले, हे तुकाराममहाराजांच्या पुढील अभंगावरून लक्षात येते :- *"विश्वास तो देव। म्हणुनी धरियेला भाव॥ माझी वदविता वाणी। जेणे धरिली धरणी॥ जोडिली अक्षरे। नव्हती बुद्धीची उत्तरे॥ तुका म्हणे झरा। आहे मुळीचाच खरा."* अहो, विश्वास हाच देव आहे; त्याने जसे स्फुरवले - वदवले - तसे ते उतरले गेले आहे. ते काही 'र'ला 'ट' आणि 'ट'ला 'र' असे जोडून केलेले बुद्धिचातुर्य नाही. तर ही अजोड अक्षराची जोड आहे. 'अ' म्हणजे नाही 'क्षर' म्हणजे नाश; म्हणून ज्याला नाश नाही अशा अक्षराची ही जोड आहे.

पुढील कडव्यात ज्ञानेश्वरमहाराज सांगतात, *"नित्यपाठ करी इंद्रायणी तीरी। होय अधिकारी सर्वथा तो."* नित्य अशा हरिपाठाचा नित्य पाठ केला असता, तो सर्वथा अधिकारी होतो. परमार्थ करण्याचा अधिकार सर्वांना आहे, कोणाला आहे कोणाला नाही असा प्रकार येथे नाही. *"सकळांसी येथे आहे अधिकार,"* ही तुकोक्ती सर्वांना अधिकार देत आहे. नाम घ्यायचा अधिकार दिला, पण नाम घ्यायचे कोणी ? आम्ही घेतो का ? *"जो रसनेंद्रियाचा अंकिला। का निद्रेसी जीवे विकला। तो नाही एथ म्हणितला। अधिकारिया,"* असे ज्ञानेश्वरी सांगते. जेवणे आणि झोपणे यांशिवाय आम्ही काही करीतच नाही. मग कुठला अधिकार आणि कुठले काय ? नित्य हरिपाठाचे नित्य पठणाने योग्य तो अधिकार प्राप्त होतो.

हे पठण कसे व्हावयास हवे हे ज्ञानेश्वरमहाराज पुढील कडव्यात सांगतात, *"असावे स्वस्थचित्त एकाग्र मन। उल्हासे करून स्मरण जीवी."* स्वस्थ चित्ताने एकाग्र होऊन आल्हादाने अगदी जीवापासून स्मरणपूर्वक हरिपाठाचे पठण व्हायला पाहिजे. तर तो जीव परमार्थाचा अधिकारी होतो.

पुढील कडव्यात ज्ञानेश्वरमहाराज सांगतात, *"अंतकाळी तैसा संकटाचे वेळी। हरि तया सांभाळी अंतर्बाह्य."* हरिपाठ करणाऱ्या माणसाचे अंतर्बाह्य रक्षण अंतकाळी

तसेच संकटाचेवेळी हरी करतो. अंतकाळी आपणाला कोण सोडवितो ? सगळे जण बाजूने हातपाय मारतात; पण धारेला कोणी पडत नाही. एका परमात्म्याशिवाय अन्य कोणीही आपल्याला सोडवत नाही. *''तुका म्हणे तुज सोडवीना कोणी। एका चक्रपाणी वाचोनीया,''* ही तुकोक्ती हीच गोष्ट स्पष्ट करते. अंतकाळी व संकटाचे वेळी हरी रक्षण करतो याची प्रचीती नित्य हरिपाठाचे नित्यपठण करणाऱ्यांनी घेतली आहे. जे साधनांचा आळस करणारे आहेत, त्यांना ही प्रचीती कशी येणार, हा प्रश्न आहे. हीच गोष्ट ज्ञानेश्वरमहाराज पुढील कडव्यात सांगत आहेत :- *''संतसज्जनांनी घेतली प्रचीती। आळशी मंदमती केवी तरे.''*

आता हरिपाठाच्या शेवटच्या अभंगाच्या शेवटच्या कडव्यात ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, *''श्रीगुरुनिवृत्ति वचन प्रेमळ। तोषला तात्काळ ज्ञानदेव.''* हरिपाठ रचल्यावर ज्ञानेश्वरमहाराजांनी तो आपले सद्गुरू निवृत्तिनाथमहाराज यांना दाखविला. तेव्हा निवृत्तिनाथांना फार आनंद झाला. त्यांनी धन्योद्‌गार काढले आणि प्रत्यक्ष सद्‌गुरूंनी कौतुक केल्यामुळे ज्ञानेश्वरमहाराजांना अत्यंत संतोष झाला.

---

हरिपाठ-संकीर्तन समाप्त

॥ शुभं भवतु ॥

## श्रीदासराममहाराज कृत

## ॥ भावार्थ हरिपाठ ॥

१

जीवनप्रकाश देवद्वारी उभा। मोक्षत्वे स्वयंभा पहाणे होय ॥१॥
हरी मूके म्हणा हरी मुखे म्हणा। कोण करी गणना पुण्याचिये ॥२॥
संसरणी असुनी जिव्हा वेगी आली। वेदशास्त्र उकली दो हाती जे ॥३॥
*ज्ञानदेव भक्त* बोले व्यास खुणा। द्वारकेचा राणा पंचप्राणी ॥४॥

२

चत्वार देहाचे निश्वासी जे प्राण। षट्शास्त्राकारण पुराणी ते ॥१॥
जीवनाचे मंथनी घेईजे अनंता। एरव्ही वाया कथा मार्ग सांडी ॥२॥
जीवशिवासम एक हरी आत्मा। नातरी दुर्गमा मन नेदी ॥३॥
*ज्ञानदेव भक्ता* हरी वय कुंठ। तोची घनदाट भरला असे ॥४॥

३

जीवनी जे रज अंधार निःसत्त्व। त्रिगुणाचा भाव असार जो ॥१॥
तया पैल गुण अगुण नी शून्य। सगुण निर्गुण मार्ग ऐसा ॥२॥
हरिवीण मन तेची व्यर्थ होय। सारासार काय शोधुनी पाहे ॥३॥
चराचर प्रार्थी जेथोनी हरीसी। निराकार ऐसी अव्यक्तता ॥४॥
*ज्ञानदेव भक्ता* ध्यानी रामकृष्ण। अनंत जन्मोन पुण्य होय ॥५॥

४

अस्ति-भावे भक्ती निरुपाधी मुक्ती। आत्मबळे शक्ती उपैगा ये ॥१॥
कसल्या दैवत प्रसन्न त्वरित। न शिणता निवांत उगी उगा ॥२॥
ऐसा कोण गुण हरीसी न भजसी। सायास दिननिशी प्रपंच तो ॥३॥
*ज्ञानदेव भक्ता* हरिजप करणे। तुटेल खेवणे प्रपंचाचे ॥४॥

५

वायाची उपाधी कैचा दंभधर्म। विधाने संभ्रम योगयागे ॥१॥
अस्तित्वोची देव जो का निःसंदेह। गुरुकृपे अनुभव निश्चयेसी ॥२॥
तपाने दैवत दिधल्याने प्राप्त। गुज तेची हित अंतरीचे ॥३॥
*ज्ञानदेव भक्ता* दृश्याचा जो अंत। तरणोपाय दृष्टांत साधुसंगे ॥४॥

६

उपाधी निरसोनी साधुबोधे ठेला। ते ठायी मुराला अनुभव ॥१॥
चत्वार देहाची जीवन सूत्र वाती। उजळता ज्योती समाप्ती ते ॥२॥
मोक्षरेखा भाग्ये भाग्यवान झाला। साधूसी अंकिला हरिभक्त ॥३॥
*ज्ञानदेव भक्ता* गोडी सत्‌समगती। हरीची प्रचीती आत्मत्वेसी ॥४॥

७

परवत आत्मा पर्वताप्रमाणे । पातकाने होणे अभक्तची ॥१॥
भक्तिहीन तेची पतित अभक्त। दुर्दैवी न भजत हरीलागी ॥२॥
होवोनी वाचाळ बरळती बरळ। हरी दयाळ मूळ तया कैचा ॥३॥
*ज्ञानदेव भक्ता* आत्मा हाचि प्राण। एक परिपूर्ण सर्वांघटी ॥४॥

८

संताचे समगती मनोमार्ग गती। आकळी तो श्रीपती याची पंथे ॥१॥
रामकृष्ण वाचा जीवा अस्तिभाव। शिवा आत्मभाव रामजप ॥२॥
एकत्व प्रचीती एकतत्त्वी नाम। साधिती परम अद्वैत जे ॥३॥
नामामृत गोडी वैष्णवी चाखिली। योग्यांनी साधिली जीवनकळा ॥४॥
उत्‌चर उच्चार प्रल्हादी ठसला। उद्धवा जाहला कृष्ण सखा ॥५॥
सर्वत्र दुर्लभ तेणे जो निराळा। तो जाणे विरळा नाम एक ॥६॥
*ज्ञानदेव भक्ता* नाम हे सुलभ। होत असे लाभ भल्या जीवा ॥७॥

९

रामकृष्णतत्त्वी नाही ज्याचे मन। जप विष्णूविण ज्ञान व्यर्थ ॥१॥
उपजे तो करंटा नेणे अद्वयवाटा। रामकृष्णी सुभटा कैचा वसे ॥२॥
द्वैताचे रेचक म्हणे गुरूविण। कैचे त्या कीर्तन नामी घडे ॥३॥
*ज्ञानदेव भक्ता* मौने नामपाठ। ध्यान जे वरिष्ठ सगूणची ॥४॥

१०

इडा नी पिंगला सुषुम्नासंगमी। असुनी जीव भ्रमी नाना तीर्थे ॥१॥
नामाविण चित्त तरी सर्व व्यर्थ। पापी असमर्थ न सुटेची ॥२॥
नामविन्मुखता हेची थोर पाप। हरीविण ताप नुरवी कोण ॥३॥
पुराणी प्रसिद्ध वाल्मीकी बोलिले। नामे उद्धरिले लोक तीनी ॥४॥
*ज्ञानदेव भक्ता* नाम श्रीहरीचे। परंपरे त्याचे शुद्ध कुळ ॥५॥

११

उत्चर उच्चारे हरिनाम ज्यासी। अनंत पापराशी जाती लया ॥१॥
सुषुम्नाग्नी मेळे जीवन मीनले। देह तृण उजळे नामे तेची ॥२॥
हरिउच्चारण मन तर अगाध। नसे भूतबाध पंचतत्त्वी ॥३॥
*ज्ञानदेव भक्ता* श्रीहरी समर्थ। उपनिषदाही अर्थ गिवसेना ॥४॥

१२

अस्तिभावेविण तीर्थव्रत सिद्धी। नेमाची उपाधी उपाधीते ॥१॥
अस्तिभावे आकळे नातरी नाकळे। करतळी आवळे भक्ता हरी ॥२॥
चैतन्याचा रवा देहाचिये वरी। घेता परोपरी साधन ते ॥३॥
*ज्ञानदेव भक्ता* निर्गुण निवृत्ती। संपूर्ण ते हाती वृत्तीविण ॥४॥

१३

समत्व चित्ताचे हरीची समाधी। जेथे द्वैतबुद्धी उरेचिना ॥१॥
जन्म जे का दुजे नाही ऐसा भाव। बुद्धीचे वैभव केशिराज ॥२॥
सर्व हे उपाधी रिद्धी सिद्धी निधी। मन परमानंदी जव नाही ॥३॥

*ज्ञानदेव भक्ता* हरीच चिंतन। रम्य समाधान रमे जेथे ॥४॥

१४

नित्य तेची सत्य सत्य तेची मित। कळि न पहात तया दृष्टी ॥१॥
रामकृष्णवाचा हेची महातप। पापालागी काप सुटे जेणे ॥२॥
सुषुम्नेसी हरी मंत्र तो शिवाचा। साधिलिया वाचा मोक्षप्राप्ती ॥३॥
*ज्ञानदेव भक्ता* नारायण नाम। पाविजे उत्तम उगमस्थान ॥४॥

१५

एकची प्रचीती एकनाम हरी। द्वैतनाम दुरी दुरावले ॥१॥
कलाकुशल ते विरळा हरी जाणे। अद्वैत हे बाणे जये ठायी ॥२॥
सम नाम सम बुद्धी सम गती। समान श्रीपती शमदमी ॥३॥
देहादेही सर्व घटी राम एक। सूर्यप्रकाशक सहस्रदळी ॥४॥
*ज्ञानदेव भक्ता* हरिपाठ नेमा। गाठी झाली जन्ममरणाची ॥५॥

१६

चौदेहाचा अंत ज्या बिंदूमाझारी। चमके निर्धारी तेथे कायी ॥१॥
तये बुद्धी हरी जपे तो दुर्लभ। रामकृष्ण सुलभ नाम वाचे ॥२॥
रामकृष्णगती उन्मनी साधिली। म्हणोनी लाधिली सकळ सिद्धी ॥३॥
सुषुम्नेचे पाठी सिद्धी बुद्धी धर्म। निमाले परम प्रपंची ते ॥४॥
*ज्ञानदेव भक्ता* रामकृष्णी ठसा। सत्संगे दशदिशा आत्मा एक ॥५॥

१७

सुषुम्नेचा ध्वनी मूके जरी गाय। देह तोही होय पवित्रची ॥१॥
प्रकाशे प्रकर्षे सामर्थ्य अमूप। तपस्क तो कल्पकोटी नांदे ॥२॥
चतुर्भुज विष्णुस्वरूप ते गोत्र। चतुर्गती नर होऊनी ठेले ॥३॥
*ज्ञानदेव भक्ता* ज्ञानगूढ लाधले। निर्गत वृत्ती आले सहज हाती ॥४॥

१८

शीर्षमार्ग हरिवंश ते पुराण। हरिनामकीर्तन आन नेणे ॥१॥

वैकुंठ जोडले ज्यासी हे लाधले। तीर्थाटण झाले सर्व त्याचे ॥२॥
मनपवनमार्गे गेला तो मुकला। धन्य तो स्थिरला हरिपाठी ॥३॥
*ज्ञानदेव भक्ता* रामकृष्णी आवडी। हरिनामाची जोडी जीवनी या ॥४॥

१९

नि:श्वासी प्रमाण श्रवणी जे वचन। सार नारायण जप एक ॥१॥
तयाते नेणोनी जप तप धर्म। क्रिया नेमधर्म वाऊगेची ॥२॥
सुषुम्नजीवन निवांत ते ठेले। मन ते गुंतले भ्रमरगुंफे ॥३॥
*ज्ञानदेव भक्ता* हरिनाम शस्त्र। वर्जियेले गोत्र यमानेही ॥४॥

२०

नामातून नाम नामसंकीर्तन। जोडिती वैष्णवजन निष्पाप जे ॥१॥
अनंत निश्वासी प्रकाश नामाचा। जेथे एकत्वाचा अनुभव ॥२॥
ऐसे एक नाम तेची एक नाम। मार्ग तो सुगम हरिपाठ ॥३॥
हरिपाठी यागे याग सर्व क्रिया। धर्माधर्म माया लया जाती ॥४॥
*ज्ञानदेव भक्ता* यज्ञ याग धर्म। हरी हाची नेम नाही दुजा ॥५॥

२१

श्वासोच्छ्वासी वेळ तया ग्रासी काळ। तयाचिया पैल नाम आहे ॥१॥
म्हणोनी तयासी काळवेळ नाही। उद्धारची होई साधिलिया ॥२॥
रामकृष्णी नाम सर्व दोषाहरण। ऐक्ये हरी तारण जड जीवा ॥३॥
नामाची जे जिव्हा हरिनामसार। दैवा नाही पार हरिमुखी ॥४॥
मार्ग वैकुंठीचा पूर्वजा हा सोपा। येणे चुकती खेपा जन्मांतरीच्या ॥५॥
*ज्ञानदेव भक्ता* हरिपाठ सांग। सकाराचे अंग पूर्वजेसी ॥६॥

२२

नित्यामाजी नेम तोची नित्यनेम। साधिलिया परम दुर्लभ तो ॥१॥
तयाचिया जवळी लक्ष्मी वल्लभ। सुखरूप स्वयंभ नामयोगे ॥२॥
नारायण हरी नारायण हरी। जीवनी घरघरी चारी मुक्ती ॥३॥

हरीवाचोनिया श्वसन तो नरक। पाहुणा नि:शंक यमाचा तो ॥४॥

*ज्ञानदेव भक्ता* श्रीनिवृत्ती चाड। नाम हेची वाड गगनाहोनी ॥५॥

२३

एकतत्त्वी कळा श्रीहरी जो डोळा। दावीतो सोहळा या दृश्याचा ॥१॥

सात पाच तीन दशकाचा मेळा। सहज हे लीळा श्रीहरीची ॥२॥

सर्व मार्गाहोनी नाम हे वरिष्ठ। जयालागी कष्ट न पडती ॥३॥

प्राण उलथलिया अजपा जपणे। निधारे रहाणे मनाचे ते ॥४॥

*ज्ञानदेव भक्ता* नामाविण व्यर्थ। रामकृष्णी पंथ जीवनाचा ॥५॥

२४

सर्वाघटी राम हाची शुद्ध भाव। तयासी सावेव जप तप ॥१॥

टाकणे संदेहो हाची धरणे भावो। रामकृष्णी टाहो फुटलिया ॥२॥

भावयुक्त भजन पहाता हे प्रमाण। आवश्य स्वजन गणगोता ॥३॥

*ज्ञानदेव भक्ता* रामकृष्ण मनी। वैकुंठभुवनी घरघर ॥४॥

२५

नामोच्चारी नाही जाणीव नेणीव। हाची मोक्षभाव सदा असे ॥१॥

नारायण हरी उच्चार हा वाचा। प्रवेश काळाचा तेथे नाही ॥२॥

प्रमाण जेथीचे न कळे वेदासी। कळे ते जीवासी काय सांगा ॥३॥

*ज्ञानदेव भक्ता* नारायणपाठ। सर्व हे वैकुंठ आत्मयाचे ॥४॥

२६

एक नाम घट्ट धरी मनालागी। मन काय संगी येई त्याच्या ॥१॥

नाम धरिताची धरी ते या मना। हरीसी करूणा येई जेणे ॥२॥

सोहंचे पालनी तेथ जे राखले। ते नाम शोभले जीवनी या ॥३॥

सद्‌गती सद्‌गद रामकृष्ण गोविंद। आनंदी आनंद जप हाची ॥४॥

नामाचिया परते नाही जे अन्यथा। वेगळिया पंथा जाशी झणी ॥५॥

*ज्ञानदेव भक्ता* जपमाळ अंतरी। मौनेची श्रीहरी जप सदा ॥६॥

२७

साही शास्त्री निवडी सर्व सुख गोडी। अवघी नाही थोडी अर्ध घडी ॥१॥
जीवनाची हरीविण येरझार। संसरणी व्यवहार लटिकाची ॥२॥
परिणामी लटिके म्हणोनी लटिके। येथे कोण टिके संसारी या ॥३॥
रामकृष्णी संकल्प कोटी जाय पाप। नाममंत्र जप आन नाही ॥४॥
इंद्रिया सवडी सर्व माया तोडी। न लपता काढी निजवृत्ती ॥५॥
तीर्थी व्रती भाव धरीता करुणा। शांती दया पाहुणा हरी होय ॥६॥
*ज्ञानदेव भक्ता* निवृत्ति देव ज्ञान। हरिपाठ संजीवन समाधी ते ॥७॥

२८

सोळा बारा मिळणी मिळुनी अठ्ठावीस। विज्ञानाचे श्वास रचियेले ॥१॥
अभंग हरिपाठ म्हणुनी अठ्ठावीस। प्रगटविले विश्वासे ज्ञानदेवे ॥२॥
इंद्रायणीकाठी नित्यपाठ करी। होय अधिकारी परमार्थाचा ॥३॥
स्वस्थ जे असिजे तेथे एक मन। जीवी हे स्मरण उल्हासाचे ॥४॥
देहा होय अंत हा होय अनंत। संकटाची मात काय तेथे ॥५॥
अंतर्बाह्य तया श्रीहरी संभाळी। कैवारी ज्या बळी पांडुरंग ॥६॥
आळशी मंदमती रहाती ऐलतीरी। गेले पैलतीरी संतजन ॥७॥
निवृत्ती चैतन्य शब्द जो प्रेमळ। तोषले तत्काळ ज्ञानराज ॥८॥
ज्ञानदेव भक्त घाली लोटांगण। ज्ञानाईने कथन केला भाव ॥९॥
भावार्थ हरिपाठ आकळावा म्हणुनी। लागलो चरणी ज्ञानेशांचे ॥१०॥
ज्ञानाईने ठेला मस्तकी या कर। जाहले अंतर भावरूप ॥११॥
भावार्थ हरिपाठ येथ पूर्ण झाला। संध्या नेम भला पांथिकांचा ॥१२॥
निवृत्ती ज्ञानाई नाम बहू गोड। *दासरामी* आवड त्या नामाची ॥१३॥

### श्रीदासराममहाराज कृत

## ।। सुश्लोक भावार्थ हरिपाठ ।।

देवाचिये द्वारि उभे राहता। चत्वार मुक्ती तया येति हाता।।
हरी मुखी जो हरिनाम गातो। संसारि या तोचि तो धन्य होतो ।।१।।

चौ वेद षट्शास्त्र हरीसि गाती। पुराणे जयाची खरी भाट होती।।
मंथोनिया नाम घेती अनंता। वैकुंठ तो श्रीहरी भेटि संता ।।२।।

जेणे असे विश्व हे तेचि सार। हरीविना कोण तरे असार।।
चराचरी व्यापकता हरीची। अनंत जन्मोनि पुण्याई कैची ।।३।।

निवांत होवोनि उगाचि राहे। येणे परी श्रीहरि तो दिसो ये।।
निशिदिनी कष्ट प्रपंच तोचि। हरी जपे त्या न वार्ता तयाची ।।४।।

वाया उपाधी तरि दंभ धर्म। संदेह देहो निसंदेह राम।।
दृश्याचिया होतसे जेथ अंत। दृष्टांत तो माऊली सांगतात ।।५।।

नुरोनी उरे धन्य तो साधुबोध। जिथे वायुचा गंध ना तो सुगंध।।
विदेहीपणे जे समाधीच ठायी। हरीभक्त तो काय त्याची नवाई ।।६।।

परक्यापरी आत्मवस्तू जयाला। अभक्त तो मान जगी जहाला।।
ज्ञानाईसी एक आत्मा निधान। सर्वांघटी तोचि तो एक पूर्ण ।।७।।

संतांचिया संगती कोणी आला। मनाचिया मार्ग गती तयाला।।
पंथेचिया श्रीपती आकळे तो। भावे जिवाच्या हरिनामी येतो ।।८।।

मन ना जयाचे कधि रामकृष्णी। जपे व्यर्थ तो विष्णुविनाचि ज्ञानी।।
जन्मोनिया तो सदाचा करंटा। कधी नये तो परि ऐक्य वाटा ।।९।।

त्रिवेणिचे संगमिया असोनी। नामाविना जो करि तीर्थ कोणी।।

नामी पराङ्मूख तो एक पापी। नामी जरी तो परमात्मरूपी ॥१०॥

उद्‌गामि उच्चार जो श्रीहरीचा। पापा नसे लेश कधी तयाचा॥
तया नसे पाहता भूत बाध। असे ज्ञानियांचा हरी तो अगाध ॥११॥

तीर्थी व्रती नेम भावेचि सिद्‌धी। भावाविना व्यर्थचि ते उपाधी॥
देहावरी ते स्वरूपानुभूती। निवृत्ति ते ज्ञानिया पूर्ण देती ॥१२॥

समत्वे सुखी श्रीहरीची समाधी। जेथे नुरे पाहता द्वैतबुद्‌धी॥
हरीच हे चिंतन सर्वकाळ। समाधान ते पूर्ण बुद्‌धी विशाल ॥१३॥

खरे नित्य जे एक प्रमाणरूप। तेची असे श्रीहरिपाठरूप॥
कळीकाळ ही दृष्टि तया न पाहे। नारायणी वृत्ति जडोनि राहे ॥१४॥

एकत्व दावीतसे एकनाम। द्वैता आणी तेचि गा द्वैतनाम॥
समबुद्‌धी घेता तुळे तो हरीसी। सहस्ररश्मीहि सूर्या प्रकाशी ॥१५॥

बुद्‌धी जपे श्रीहरी दुर्लभू तो। मनोन्मनी रामकृष्णीच येतो॥
सिद्‌धी नि बुद्‌धी हरिपाठी आले। प्रपंचिही साधुसंगे निमाले ॥१६॥

हरीपाठ कीर्ती हरिनाम वानी। पवित्र तो देह त्याचा निधानी।
चतुर्भुजा विष्णूची जीव होतो। निवृत्ती श्रीज्ञानिया ठाव देतो ॥१७॥

हरीवंश हे सत्य पुराण ज्यासी। हरिनाम संकीर्तन तेचि काशी॥
असे आवडी एकचि रामकृष्णी। गोडी तया श्रीहरिरूप ध्यानी ॥१८॥

अनंत जन्मोनि प्रकाश नाम। हरीपाठ हा मार्गचि पूर्णकाम॥
या पाठिया जाति लया पसारे। ज्ञानाईसी साध्य नामीच सारे ॥१९॥

हरीवाचुनी जो घडे नेम धर्म। तया शीणची हेचि गा येथ वर्म॥
हरीपाठि जे येती होती निवांत। तयांची जगी धन्यची एक मात ॥२०॥

नसे काळ ना वेळ नामासि काही। घेता आणि ऐकता मुक्त होई॥

जीवा खरे तारण एक नाम। हरोनि दोषा करि पूर्णकाम ॥२१॥

जगी नित्य ते तोचि जयासि नेम। हरिनाम जिव्हे हरीचेचि नाम॥
हरीवाचुनी जन्म तो नर्क ज्यासी। का नाम ते गा गगनासि ग्रासी ॥२२॥

दृश्यासि या मेळ ज्याचे कलेने। असे नाम हे श्रेष्ठची त्या गुणाने॥
असा कोणता नेण रे आजपा रे। जयाचेनि हे धन्य जिणे खरे रे ॥२३॥

सर्वाघटी भाव जो शुद्ध राम। तेणेचिया प्रक्रिया नेम धर्म॥
संदेह जाता धरिजेत भावो। सदा असो हा हरिकृष्णि टाहो ॥२४॥

हरीनामी या लुप्तचि देहभावो। असे मोक्ष तोची पहाता स्वभावो॥
वेदा कळेना कळे काय जीवा। नारायणी हा खलु मुक्ति ठेवा ॥२५॥

मनासी धरी घट्टची नाम एक। श्रीरामकृष्णेसि गोविंद चोख॥
मौनेचिया माळ धरोनिया ही। होवोनिया सद्गद नाम राही ॥२६॥

लटिके टिकेनासी ऐसा प्रकार। संसारिया चालिली येरझार॥
हरीपाठ संजीवन ते समाधी॥ निवृत्ती-ज्ञानेश अखंड साधी ॥२७॥

हरीपाठ अठ्ठाविस काय जाणा। प्रसन्न गाताचि तो ज्ञानराणा॥
संती कशी घेतली हे प्रचीत। जाणोनि वंदू गुरु ज्ञाननाथ ॥२८॥

भावार्थ हरिपाठ ज्ञानेश बोली। स्फुरोनिया एथ वृत्ती निमाली॥
हनुमंत गोविंद पदी आराम। हरीपाठ चिंतीतसे *दासराम* ॥२९॥

## परिशिष्ट - ३

श्रीदासराममहाराज विरचित

# (श्रीज्ञानेश्वरमहाराज कृत) हरिपाठाच्या आरत्या

(१)

भगवद्गीतादेवी ऐसा हरिपाठ। श्रीज्ञानेश्वर विष्णू दावी निघोट।
कर्म उपासना ज्ञान चोखट। नित्य नेमे पढता पावे वैकुंठ ॥१॥
जय देव जय देव जय श्रीहरिपाठा। ओवाळू आरती प्रेमे मूळपीठा ॥ध्रु.॥
समाधी संजीवन सहजे उत्कट। अखंड हरिपाठ होय घडघडाट।
चिम्मड महाराजे ऐकियला स्पष्ट। श्रीहनुमंतप्रभूंनी केला बोभाट ॥२॥
(भामनाथगिरी या श्रीतुकया श्रेष्ठ। लक्ष आवर्तन करी हरिपाठ।
नामामृत गोडी आवडी अवीट। मुक्तिमंदिर शोभे भक्तीचा मुगुट।
इंद्रायणी लहरी लहरती हरिपाठ। दया क्षमा शांति तेची वाळुवंट।
नामे नाचती वैष्णव हरिकीर्तन भाट। प्रेमे ज्ञानराजा नामी संतुष्ट॥)
देवाचिये द्वारी उभा जरी नीट। ओळंगिल्या मुक्ती चारी घनवट।
हरिपाठाचे हे सारची एकवट। *गोविंदसुत राम* अंतरीया निकट ॥३॥

(२)

प्राकृत गीता देवी ऐसा हरिपाठ। भाविक भक्ता दावी ज्ञानाई वाट।
प्रेमे नित्याचि पढता सहजे वैकुंठ। भागवत धर्माची उपासना नीट ॥१॥
माऊलीचिया रूपा जय जय हरिपाठा। आरती ओवाळू माऊली श्रेष्ठा ॥ध्रु.॥
समाधी संजीवन सहजे उत्कट। अखंड हरिपाठ होय घडघडाट।
चिम्मड महाराजांनी ऐकियला स्पष्ट। माऊलीचे लडिवाळ शब्दची चोखट ॥२॥
(हरिमुखे म्हणा हरिमुखे म्हणा। कोण करील मग पुण्याची गणना।
इंद्रायणी लहरी उठताती नाना। साद प्रतिसाद वैष्णव भक्तजना॥)
होती साधुसंत सज्जन वरिष्ठ। गाती ऐकती होऊनिया भाट।
ऐसे स्वरूप पाहुनी प्रेमे आकृष्ट। *गोविंदसुत रामा* गोडी अवीट ॥३॥

(३)

प्राकृत गीतादेवी ऐसा हरिपाठ। श्रीज्ञानेश्वर विष्णू दावी निघोट।
कर्म भक्ती ज्ञान फलश्रुती अवीट। नित्य नेमे पढता भूवरी वैकुंठ ॥१॥
जय देव जय देव जय श्रीहरिपाठा। ओवाळू आरती अक्षर वैकुंठा ॥ध्रु.॥
देवाचिया द्वारी उभा जरी नीट। ओळंगिल्या मुक्ती चारी वरिष्ठ।
हरिपाठी अवतरला श्रीरामपाठ। विस्फुरला गोविंदी *दासराम* विनट ॥२॥

●●●

श्रीदासराममहाराज विरचित

## श्रीज्ञानेश्वरीच्या आरत्या

(१)

आरती ज्ञानेश्वरी। जे का ज्ञान ईश्वरी।
अंतरी हेलावली। स्वानंदाची लहरी ॥ध्रु.॥
सम्राट ज्ञानियांचा। महाराजा ज्ञानेश्वर।
भावार्थ बोधियेला। परम गीता तत्त्वसार ॥१॥
ऐश्वर्य योग दावी। अर्जुनासी श्रीहरी।
*दासराम* चिंतीतसे। भीतरिया अक्षरी ॥२॥

(२)

आरती ज्ञानदेवी। ज्ञानेश्वरी गुज दावी।
भावार्थ दीपिका तू। ज्ञानेश्वर कृपे ठावी ॥ध्रु.॥
अक्षरे चैतन्याची। गीता गीत अनुवाद।
अर्जुनाचे कर्णपुटी। तत्त्व निनादे गोविंद ॥१॥
हृदया हृदय मेळविले। ज्ञानराजे ऐक्य केले।
संतांची अनुभव गोठी। *दासराम* पायी लोळे ॥२॥

●●●

श्रीदासराममहाराज विरचित

## श्रीज्ञानेश्वरमहाराजांची आरती

ओवाळू आरती धन्य ज्ञाननाथा।
निद्रेतुनी उत्थान करोनी जागृति देसी आता ॥ध्रु.॥
वायु प्रकाश चैतन्य तुम्ही सत्य ज्ञानदेव।
तव नामचिंतने कैचा उरे येथे ठेव ॥१॥
जयामुळे ज्ञानाज्ञान असार ती सार।
तेथ अनुभूती म्हणुनि म्हणती ज्ञानेश्वर ॥२॥
विश्वाची माऊली निगमवल्ली प्रगट केली ।
*बालराम* पायी लोळे केली कृपेची साऊली ॥३॥

## श्रीदासराममहाराजांची आरती

आरती रामराया। करी कृपेची छाया।
दावोनी दीनी दया। धन्य धन्य महाराया ॥ध्रु.॥
सद्गुरू हनुमंत। पिता गोविंद संत।
बोधी गुरुलिंग सिद्ध। धरुनि रूप सिद्धानंद ॥१॥
सिद्धसाधनाने । स्वये ब्रह्मची झाले ।
भावादरे *केशवाने* । चरणी मस्तक ठेविले ॥२॥

के. वा. आपटे

श्रीदादा हे आत्मसाक्षात्कार झालेले श्रेष्ठ संत होते. स्वत:च्या अनुभवाच्या आधारावर त्यांना हरिपाठाचा जो अर्थ स्फुरला, तो त्यांनी कीर्तनातून निवेदन केला. साहजिकच श्रीदादांनी केलेले हरिपाठाचे विवरण हे इतरांनी केलेल्या हरिपाठाच्या अन्य भाषांतरात्मक अथवा स्पष्टीकरणात्मक उपलब्ध ग्रंथांपेक्षा वेगळेपणाने खुलून आणि उठून दिसते.

–प्रा. डॉ.के.वा. आपटे